(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी./मु.शी.: सदस्यांचा परिचय व शपथविधी.

श्री. राजेश टोपे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातर्फे निर्वाचित सदस्य श्री. सुरेशदादा देशमुख यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. सुरेशदादा देशमुख यांनी शपथ घेतली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

मुंबईत येणाऱ्या परप्रांतीयांच्या लोंढ्याबाबत करावयाची उपाययोजना

(१) * १७१४ श्री. मधुकर चव्हाण , डॉ. अशोक मोडक , श्रीमती संजीवनी रायकर , श्री. विनोद तावडे : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दररोज येणारे परप्रांतीयांचे लोंढे ही गंभीर समस्या असल्याचे मत व्यक्त करुन यावर तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र सरकार काहीच प्रयत्न करीत नाही असे अभिप्राय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीटाने राज्यशासनाला एका खटल्यात दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत येणारे लोंढे रोखण्यासाठी राज्यसरकारने कडक उपाययोजना केली पाहिजे, असेही आदेश वजा मत मुंबई उच न्यायालयाच्या खंडपीटाने व्यक्त केले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यशासनाने कोणती उपाययोजना केली आहे, अथवा करण्याचे योजिले आहे?

श्री. राजेश टोपे, विलासराव देशमुज यांच्याकरिता : (१) व (२) अशा प्रकारचे आदेश मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनाला दिले असल्याचे आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे ते अयोग्य आहे असे मला वाटते. या उत्तरामध्ये शासनाला काही दुरुस्ती करावयाची आहे काय ? या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "अशा प्रकारचे आदेश मा. उच्च न्यायालयाने राज्य शासनाला दिले असल्याचे आढळून आले नाही." सभापती महोदय, दिनांक 12 जानेवारीला एक रिटपिटीशन हायकोर्टासमोर होते. त्यामध्ये माननीय मुख्य न्यायमूर्ती दलवीर भंडारी आणि न्यायमूर्ती शरद बोबडे यांच्यासमोर खंडपीठासमोर जेष्ठ पत्रकार श्री. माधव गडकरी, श्री. सुभाष भेंडे, पत्रकार श्री. अरुण साधू, श्री. सदाशिव अमरापूरकर यांनी एक जनहित याचिका दाखल केली होती आणि त्यामध्ये मागणी केली होती की, अनधिकृत झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या लोकांचा मतदानाचा हक्क काढून घ्यावा. त्यावेळेला त्या ठिकाणी आपले ऑब्जर्व्हेशन्स देताना माननीय मुख्य न्यायमूर्ती आणि त्यांच्यासोबतच्या खंडपीठाच्या न्यायमूर्तींनी सांगितले की, आम्हाला असे आदेश देता येणार नाहीत परंतु तुम्ही या लोंढयासंबंधी काय करता ? काहीच करीत नाही. त्यावेळी ॲडव्होकेट जनरल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

ता. प्र. क्र. 1714 ..... श्री. मधुकर चव्हाण .....

श्री. थोरात यांनी असे सांगितले की, जोपर्यन्त केंद्र शासन असा कोणताही कायदा करीत नाही तोपर्यन्त आम्ही हे लोंढे रोखू शकत नाही. त्यावेळी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला तेव्हा रागाने माननीय न्यायमूर्तींच्या खंडपीठाने या सारख्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी इतर देश ज्याप्रमाणे प्रयत्न करताना दिसतात ते तपासून पाहण्याचा राज्य सरकार प्रयत्न करीत नाही आणि या इ ोपडपट्टीसंबधी कोठल्याही प्रकारची कारवाई करताना दिसत नाही, असे ऑब्झर्वेशन केले आहे हे खरे आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, प्राप्त माहितीप्रमाणे कोठलीही सूचना माननीय हायकोर्टाने दिलेली नाही.

श्री. मधुकर चव्हाण : अशा तऱ्हेचे एक रिटपिटीशन माननीय मा. न्यायालयासमोर 12 तारखेला दुपारी 2.00 नंतर चर्चेला आले होते आणि त्या ठिकाणी ॲडव्होकेट जनरल श्री. विजय थोरात हे उपस्थित होते काय ? ते कोणते रिटीपिटीशन होते ? श्री. थोरात हे कशाचे उत्तर देण्यासाठी हायकोर्टात गेले होते ? पत्रकार श्री. अरुण साधू, श्री. माधव गडकरी, सुभाष भेंडे, श्री. सदाशिव अमरापूरकर इत्यादींचा जनहित जनाधिकार समितीच्या वतीने कोणता खटला होता आणि कोणती जनहित याचिका समोर होती ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, श्री. माधव गडकरी यांनी त्या ठिकाणी एक जनहित याचिका जरुर दाखल केली आहे. परंतु त्यासंबंधी मा. उच्च न्यायालयाने कोणत्याही परिस्थितीत निदेश, सूचना किंवा आदेश शासनाला दिलेला नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : प्रश्न अगदी स्पेसिपिक आहे. सूचना, निर्देश, आदेश असा प्रश्न नाही. प्रश्न काय आहे ? प्रश्न असा आहे की, असे अभिप्राय मा.हायकोर्टाच्या खंडपीठाने शासनाला दिले आहेत का ? हा अभिप्राय दिलेला आहे. आपण ॲडव्होकेट जनरल यांना विचारावे. कोर्टामध्ये अभिप्राय व्यक्त होतो, याप्रकरणी अभिप्राय व्यक्त झाला आहे किंवा नाही. तुम्हाला निर्देश, सूचना दिलेली नाही. परंतु हा अभिप्राय मा.उच्च न्यायालयाने व्यक्त केला आहे किंवा नाही ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या विधी विभागाच्या अधिका-यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे याप्रकरणी मा.हायकोर्टाने जरुर कोणताही निदेश किंवा अभिप्राय दिलेला नाही. परंतु सभागृहाच्या परंपरेनुसार मा.सदस्य देत असलेली माहिती निश्चितपणे तपासून घेण्यात येईल.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, "मुंबईत पाहुण्यांना आता जागा नाही, टिळक भवनातील बैठकीत झोपडयांच्या प्रश्नावर बोलताना मुंबईत आता परप्रांतातून येणा-या पाहुण्यांना जागा नसल्याचे " मा.मुख्यमंत्र्यांनी म्हटलेले आहे. "मुंबईत एकही झोपडी बांधण्यास जागा नाही. पाच वर्षात मुंबईचा कायापालट करावयाचा असल्यास अनधिकृत झोपडयांबाबत आता कठोर कारवाई करावीच लागेल, मुंबईत परप्रांतातून येणा-या पाहुण्यांसाठी आता जागा नाही." असे मत मा.मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलेले असताना आणि या प्रश्नामध्ये विचारल्याप्रमाणे मुंबईत दररोज येणा-या परप्रांतीयांबद्दल शासनाची भूमिका काय आहे ते कळले पाहिजे. कारण मा.मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले आहे त्याबाबात शासनाची भूमिका काय आहे ?

श्री.राजेश टोपे : आपल्याला देशाच्या घटनेप्रमाणे कोठेही जाता येते, त्याला रोखता येत नाही. ही महत्वाची वस्तुस्थिती सगळयांना माहीत आहे. परंतु सध्याच्या झोपडपट्टी ॲक्टप्रमाणे 1.1.1995 च्या नंतरच्या झोपडपट्टया आपण अनधिकृत ठरविलेल्या आहेत. कोर्टामध्ये शासनाने ॲफिडेव्हिट केलेले आहे की, आम्ही त्यानंतरच्या झोपडपट्टयांना संरक्षण दिलेले नाही आणि देणार नाही. याबाबत अशाप्रकारे शासनाचे सध्याचे धोरण आहे.

श्री.विलास अवचट : सन्माननीय राज्यमंत्र्यांनी घटनेचा उल्लेख केला आहे. त्या घटनेच्या अधीन राहून मा.मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले आहे त्याची त्यांना कल्पना आहे. परंतु यासंबंधीची वस्तुस्थिती मांडताना घटनेची कल्पना मा.मुख्यमंत्र्यांना आहे. अशा परिस्थितीमध्ये मुंबई....

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शहराचे संपूर्ण चित्र त्यांनी उभे केले आहे. त्यामुळे मा.मुख्यमंत्री एक सांगतात आणि तुम्ही दुसरे सांगत आहात, यासंबंधी शासनाची निश्चित नेमकी भूमिका काय आहे ?

श्री.राजेश टोपे : शासनाच्या जमिनीवर किंवा कायद्याने कोणालाही अनधिकृत ठिकाणी राहण्याची परवानगी नाही. आम्ही अजिबात राहू देणार नाही हे शासनाचे धोरण आहे. आम्ही अनधिकृत झोपडया वाढू देणार नाही आणि अनधिकृतपणे त्यांना राहू देणार नाही. पोलीस ॲक्टप्रमाणे किंवा झोपडपट्टी ॲक्टप्रमाणे आपण जरुर त्यांच्यावर कारवाई करु. यासबंधी विभागातील वॉर्ड ऑफिसर असतील वा पोलीस अधिकारी असतील त्यांच्यावर जबाबदारी सोपविली आहे. कोणी जर अनधिकृतपणे राहत असतील त्यांना आपण काढणार आहोत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला थोडीशी माहिती पाहिजे. तुम्ही 1995 पर्यंत शासनाचे धोरण काय आहे वा शासनाची कडक भूमिका काय आहे ते सांगितले आहे. आपण नगरविकास खात्याचे राज्यमंत्री आहात आणि या खात्याचे कॅबिनेट मंत्री मा.मुख्यमंत्री आहेत. मा.मुख्यमंत्र्यांनी मधल्या काळामध्ये वर्तमानपत्रातून यासंबंधी घोषणा केली ते काय म्हणाले हे तुम्हाला माहीत नाही काय ? ते तुमच्यावर बंधनकारक नाही काय, तुम्ही ते बोलण्यापूर्वीची भूमिका सांगत आहात, ते बोलल्यानंतरचे धोरण काय आहे ? मा.मुख्यमंत्री बोलतात हे शासनाचेच धोरण असते हेही तुम्हाला माहीत आहे ना ? तुमच्या या धोरणाच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री वर्तमानपत्रामध्ये बोलले, त्यांनी घोषणा केल्या. ते दिल्लीला गेले, त्यांच्या हायकमांडबरोबर चर्चा केल्यानंतर ते मिडीयासमोर बोलले. मा.मुख्यमंत्र्यांबद्दल आम्हाला सहानुभूति आहे, परंतु त्यांच्यावर दबाव आला, इच्छा नसताना सुध्दा कदाचित त्यांना बोलावे लागले असेल असे त्यांच्या चेह-यावरुन दिसत होते. ते बोलले आहेत. त्यावेळी ते बोलले ते तुम्ही ऐकले नाही काय ? मी तर मा.मुख्यमंत्र्यांचे धोरण टी.व्ही.वर ऐकलेले आहे. वर्तमानपत्रामध्ये वाचले आहे. कदाचित तुम्हाला माहीत नसेल तर मुख्यमंत्री सांगतील.

नंतर श्री.शिगम.....

अशुधीत प्रत / शुद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.1714 पुढे सुरु....)

श्री. विलासराव देशमुख : सन्माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर अतिशय योग्य आहे. कारण शवेटी राज्य सरकारने कायदा केलेला आहे. त्यानंतर एका प्रकरणामध्ये आमची भूमिका आम्ही कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट करुन मांडली. 1.1.95च्या झोपड्यामध्ये वाढ करणार नाही असे ॲफिडेव्हिट केल्यानंतर आणि पर्पज सर्व्ह झाल्यानंतर ती पीआयएल हायकोर्टाने परत घेतलेली आहे. अशा परिस्थितीत मधल्या काळामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेस पक्ष यांचा जो जाहीरनामा इ ाला त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, 1995 नंतरच्या झोपड्यांच्या बाबतीत आम्ही सहानुभूतीने विचार करु. त्यामध्ये थोडी वाढ करावी असा काही लोकप्रतिनिधींचा आग्रह आहे. त्यांच्या पुनर्वसनाची व्यवस्था केली पाहिजे असे विचार मांडण्यात आले. पीआयएलमध्ये आम्ही एक ॲफिडेव्हिट केलेले आहे. त्याचा रेफरन्स हायकोर्टामध्ये करावा असा निर्णय आम्ही केलेला आहे. त्या प्रमाणे हौसिंग विभाग हायकोर्टाला रेफरन्स करील. त्यानंतर हायकोर्ट जे डायरेक्शन्स देईल त्याप्रमाणे सरकार पुढचे धोरण ठरविल.

श्री. नितीन गडकरी : हायकोर्टामध्ये काय रेफरन्स देणार ? या संदर्भात आपल्या केन्द्रीय हायकमांडने दिशादर्शन करण्यासाठी चर्चेसाठी बोलावले होते. न्यूजमध्ये तुम्ही बोलत असताना दाखविले. आम्ही तुमचे स्वागत केले. आम्ही म्हटले की, मुंबईच्या हितासाठी आपण बोलत आहात. हा प्रश्न रिलिजिअस, लिंग्विस्टिक आणि कास्टवाईज न घेता मुंबईच्या इन्फ्रास्ट्रक्चरल लिमिटचा विचार केला पाहिजे. याबाबतीत आपण सांगितले की, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. राजकारण न करता हा प्रश्न केन्द्र सरकासरकडे नेला पाहिजे. हा आपला व्ह्यू पॉईट झाला. 1995 पर्यन्त सर्व झोपड्यांना संरक्षण देऊ असे सांगून आपण जाहीरनाम्याची अडचण देखील सांगितली. त्याबाबतीत आपण खुलासा केलेला आहे. जाहीरनाम्यातील सगळ्याच गोष्टी शक्य नसतात. त्या पाळायच्या असतात असे नाही....

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहील. मिडियामध्ये संदर्भ बाजूला ठेवला जातो आणि त्यानंतर बोलले जाते. प्रश्न याठिकाणी कापसाला दिलेल्या भावाच्या संदर्भात आहे. 2700रु. भाव देण्याचे बोलले गेले. प्रत्यक्षात तो भाव दिलेला नाही. आम्ही जाहीरनाम्यामध्ये आश्वासन दिलेली असली तरी प्रत्यक्षपणाने या क्षणी ती पाळणे शक्य नाही. याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.1714 पुढे सुरु....) (श्री. विलासराव देशमुख....)

अर्थ, "जाहीरनाम्यातील गोष्टी पाळायचा असतातच असे नाही" असे जे विधान मा. विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी केलेले आहे, तसा अर्थ राहू नये. शेवटी लोकांपुढे कमिटमेंट दिलेल्या असतात. काही आश्वासने दिलेली असतात. ती पाळायची असतात. ती पाळत असताना अडचणी येतात. तेव्हा मा. विरोधी पक्षनेत्यांनी "जाहीरनाम्यातील गोष्टी पाळायच्या असतात असे नाही" असे जे विधान केलेले आहे ते विपर्यस्त आहे. ते रेकॉर्डवर राहू नये.

श्री. नितीन कडकरी : एक गोष्ट मला मान्य आहे की, काही गोष्टी बोलण्यासाठी असतात. जाहीरनामा घाईघाईने तयार होतो. त्यामुळे 2700रु. भाव जाहीर होतो. मा. उपमुख्यमंत्र्यांनी पुढील 5 वर्षामध्ये 2700 रु. भाव देऊ असे सांगितले. मोफत वीज देऊ असेही सांगितले. मला फक्त एवढेच सांगायचे आहे की, हायकोर्टामध्ये आपण जो रेफरन्स देणार आहात तो जुन्या ॲफिडेव्हिटच्या संदर्भाने की दुसरा नवीन रेफरन्स देणार आहात ? नेमका कशाचा रेफरन्स आपण देणार आहात ?

श्री. राजेश टोपे : याबाबतीत अनेक मतप्रवाह आहेत. वृतपत्रातूनही अनेक लोकांची या संदर्भात्ील मते छापून येत आहेत. काहीचे मत असे आहे की, 1995नंतरच्या झोपड्या राहू नयेत. काहीचे मत त्या रहाव्यात असे आहे. यासंदर्भात व्यापक चर्चा करुन निर्णय घ्यावयाचा आहे आणि तो चर्चेअंती घेतला जाईल.

श्री. विलासराव देशमुख : हायकोर्टामध्ये 1995च्या संदर्भात एक ॲफिडेव्हिट केले. त्यामधील लिगल पॉईन्ट संपल्यानंतर हायकोर्टाने पीआयएल खारिज केले. ॲफिडेव्हिट देणार असाल तर नवीन रेफरन्स करावा लागेल आणि तो रेफरन्स काय देणार असा सुस्पस्ट आणि योग्य प्रश्न मा. विरोधी पक्षनेत्यांनी विचारलेला आहे. ..

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझे त्याला एवढेच उत्तर आहे की, ज्या झोपडया शासकीय किंवा सार्वजनिक वापराच्या जागेवर वसलेल्या आहेत. त्या सगळयाचा सगळया झोपडया एकाच वेळी हटविणे कोणालाही शक्य नाही. उलट सार्वजनिक वापराच्या जागेवर जर झोपडया वसल्या असतील व तेथे इन्फ्रास्ट्रक्चरचे काम सुरु करावयाचे असेल तर तेथील झोपडया हटविणे आवश्यक असते. रस्ता रुंदीकरणाचे काम करावयाचे आहे परंतु रस्त्याच्या दोन्ही बाजूला झोपडया वसलेल्या असतील तर झोपडया हटविल्या शिवाय रस्ता रुंदीकरणाचे काम होऊ शकत नाही. रेल्वेच्या जमिनी आहेत, विमानतळाची जमीन आहे, ज्या सार्वजनिक उपयोगाच्या जागा आहेत. अशा जागांवर सार्वजनिक उपयोगाचे काम करावयाचे असेल तर त्या ठिकाणच्या झोपडया हटविणे आवश्यक आहे. या संदर्भामध्ये 1995 पर्यन्तचे धोरण आणि 1995 ते 2000 पर्यन्तचे धोरण यामध्ये आम्ही फरक करण्याचे ठरविले आहे.1995 पर्यन्तच्या झोपडयांना मोफत घरे देण्याची योजना होती. तीच योजना आम्ही कंटीन्यू केली आहे. त्यामुळे मुंबई शहरात मोठया प्रमाणात लोक येऊ लागले आहेत.मुंबई शहरात आल्या नंतर झोपडी बांधली की, मोफत घर मिळते, मोफत फ्लॅट मिळतो अशी एक समजूत दुर्दैवाने सर्वदूर झालेली आहे. आता आम्ही असे ठरविले आहे की,1995 ते 2000 पर्यन्तच्या लोकांचे पुनर्वसन करावे लागेल. या कालावधीतील लोकांना मोफत घरे देण्याची योजना आम्ही स्वीकारणार नाही. यापुढे अशा लाभार्थ्यांकडून आम्ही 5 हजार,10 हजार, शासन यासंबंधीची जी रक्कम ठरवील ती रक्कम त्यांना भरावी लागेल. ज्यांनी पैसे भरले त्यांना पाणी व इतर नागरी सुविधा देण्याचे धोरण आम्ही ठरविले आहे. या संदर्भात आम्हाला कोर्टात जाऊन मार्गदर्शन घ्यावे लागणार आहे.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, मला एका गोष्टीची माहिती हवी आहे. आपल्या देशाच्या घटनेमध्ये हायकमांडचा दर्जा काय आहे? दोन्ही सभागृहाने आणि शासनाने घेतलेला निर्णय व त्या निर्णयावर माननीय पंतप्रधानांनी शिक्कामोर्तब केले, न्यायालयाने सुध्दा त्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. आपल्या पक्षीय लोकशाहीमध्ये एखाद्या पक्षाच्या नेत्या किंवा नेते ज्या वेळेला निर्णय प्रक्रिया चालू असते त्यावेळेस हस्तक्षेप करतात ही गोष्ट मी समजू शकतो. परंतु निर्णयाची अंमलबजावणी सुरु असताना तो निर्णय रोखण्याचा अधिकार हायकमांडला आहे काय ? आपण जो निर्णय घेतला होता त्याप्रमाणे तुम्ही खूप पुढे गेला होतात. त्यानंतर पाच झोपडीदादा तुमच्या हायकमांडकडे गेले. त्यांनी त्या ठिकाणी काय सांगितले हे मला माहिती नाही. त्यांनी सांगितल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर तुम्हाला हायकमांडकडे बोलावणे आले. हायकमांडला भेटून आल्यानंतर तुम्ही मात्र आपला निर्णय फिरविला आणि अतिक्रमणे हटविण्याची कारवाई बंद केली. सरकारने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यानंतर तो निर्णय आपण अर्धवट कसे काय थांबवावयास लागलात. उद्या केंद्र शासनाने आझाद काश्मिरमध्ये सैन्य पाठविण्याचे ठरले. सैन्य त्या ठिकाणी गेले. नंतर तुमचे हायकमांड म्हणतील की, तुमचे सैन्य मागे घ्या. हायकमांडकडे अधिकार किती आहेत ? निर्णय प्रक्रिया चालू असताना हायकमांडने काही बदल केला असता तर ते मी समजू शकतो. कारण प्रत्येक राजकीय कार्यकर्ता हा पक्षांशी बांधील असतो. परंतु दोन्ही सभागृहाने निर्णय घेतला,शासनाने निर्णय घेतला, माननीय पंतप्रधानांनी त्या निर्णयाचे कौतूक केले, न्यायालयाने त्या निर्णयाचे कौतूक केले. परंतु त्या निर्णयाच्या संदर्भात पाच झोपडीदादा हायकमांडकडे जातात. त्यानंतर आपल्याला तेथे बोलाविले जाते. तुम्ही हायकमांडला भेटून आल्यानंतर तो निर्णय फिरवून येतात. जर हायकमांड सभागृहातील निर्णय अशा प्रकारे फिरविणार असेल तर या सदनामध्ये कुठल्याही विषयावर चर्चा करण्याची गरजच नाही.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या प्रश्नाचा आणि हायकमांडचा काहीही संबंध येत नाही. मुळामध्ये कारण नसताना हा विषय एका राजकीय वळणावर घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जात आहे हे योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री.नवलकर हे या सभागृहाचे सिनियर सदस्य आहेत. आम्ही जो संयुक्त जाहीरनामा मान्य केला आहे. त्या जाहीरनाम्याच्या विरोधात कार्यवाही चालली आहे अशी तक्रार काही लोकप्रतिनिधींनी त्या ठिकाणी जाऊन करतात. त्या तक्रारीची शहानिशा करण्यासंदर्भातील चर्चा त्या ठिकाणी झाली. ही कामे थांबवा, ही कामे करु नका असे कोणतेही आदेश आम्हाला हायकमांडने दिलेले नाहीत. सरकारचे एवढेच म्हणणे होते की, 2000 पर्यन्तच्या लोकांना संरक्षण देण्याचे मान्य केले आहे. त्यांच्या पुनर्वसनाचा नंतर विचार करा. 2000 सालानंतर जेवढया काही झोपडया झाल्या असतील त्यासंदर्भात तुमची जी काही कारवाई होते आहे ती तशीच पुढे चालू ठेवा असे आम्हाला सांगण्यात आले. या संदर्भात हायकमांडचा कुठेही हस्तक्षेप झालेला नाही. त्यामुळे हायकमांडला कुठले तरी विशेष अधिकार आहेत अशी जी चर्चा केली गेली ती चर्चा अप्रस्तुत आहे. या विषयाला धरुन नाही एवढेच मला सांगावयाचे आहे.

यानंतर श्री. उपरे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आता असे सांगितले की, हायकमांडचा काही संबंध नाही. तरी यावर आम्ही कितपत विश्वास ठेवावयाचा ? संपूर्ण मुंबई शहरामध्ये बोर्ड लागले होते. तुमचा फोटो त्यामध्ये नव्हता. सन्मानीय श्री.गुरूदास कामत, श्रीमती सोनिया गांधी असे सगळ्यांचे फोटो होते आणि या मुंबईतील 2000 सालापर्यंतच्या झोपड्यांना अभय देण्याच्या संदर्भात काही वाक्ये होती. सोनिया गांधी आपले हार्दिक अभिनंदन असे मुंबईमध्ये शेकडो बोर्डस् लागलेले होते. पक्षाने लावलेले बोर्डस् श्रीमती सोनिया गांधी यांचे अभिनंदन करणारे होते. मात्र आपला फोटो त्यामध्ये नव्हता हे मला मान्य आहे.

उप सभापती : आपण आता जे काही सांगितले ते येथे लागू नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलतात.)

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मला आपले संरक्षण हवे आहे.

उप सभापती : मी तुम्हांला संरक्षण देत आहे पण बाकीचे सन्माननीय सदस्य आपणास अडचणीमध्ये आणत आहेत.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी काही गोष्टी सांगितल्या. श्री.नाना चुडासमा यांचे कालचे होर्डींगचे वाक्य आहे ते मी आपल्याला सांगतो. "Occupy a land, construct a Hut and own a Flat." अशी मुंबईची अवस्था आहे. या ठिकाणी आपण देशाच्या घटनेचा उल्लेख केला. घटनेने असे सांगितले आहे की, कोठेही जाऊन कोणालाही राहता येते. तरी घटनेने असे सांगितले आहे काय ? कोणालाही कोठेही जाऊन अनधिकृत बांधकाम करता येईल. मग तेही आपण स्पष्ट करा. आमचा मूळ मुद्दा जो आहे तो असा आहे की, जरी घटनेने जाता येते असे सांगितले असले तरी कोठेही जाऊन अनधिकृत बांधकाम करता येते काय ? तसे करता येत नसेल तर आपण 1995 नंतरच्या झोपड्यांना संरक्षण देत आहात ते तुम्ही थांबविणार किंवा नाही ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी अगोदरच्याच उत्तरामध्ये असे सांगितले की, अशा पध्दतीने अनधिकृतपणे कोठेही जाऊन रहाता येत नाही. याच्या बाबतीत कोणताही कायदा नाही. त्यामुळे अनधिकृत लोकांना काढण्याचाच आपला विषय चालू आहे. आपण कायद्यानेच 1995 पर्यन्तच्या झोपड्या रेग्युलराईज केल्या आहेत. त्याप्रमाणे 2000 पर्यंतच्या करण्याचा विषय झाला तर ते करावे लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभपती महोदय, माननीय मुख्य मंत्र्यांनी 1995 ते 2000 पर्यंतच्या झोपडयांबद्दल सहानुभूतीचे धोरण स्वीकारण्यात येईल असे सांगितले. म्हणजे नेमके काय ? गेल्या महिन्यातील मंत्री मंडळाच्या बैठकीनंतर मुंबईच्या कमिशनरना असा आदेश देण्यात आला होता की, 1995 ते 2000 या कालावधीत किती झोपड्या बांधल्या आहेत याची यादी आठ दिवसांमध्ये द्या. तरी ती यादी आली आहे काय आणि सहानुभूतीचे धोरण म्हणजे काय ? ते कृपया या ठिकाणी सांगावे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय मुख्य मंत्र्यांनी सांगितले की, पक्षाच्या जाहीरनाम्याप्रमाणे लोकांनी मागणी केली आहे. त्यामुळे कोर्टामध्ये ॲफिडेव्हीट शासनाने केलेले आहे. त्यामुळे पुन्हा कोर्टामध्ये जाऊन शासनाला परवानगी घ्यावी लागेल. कोर्टाने जर परवानगी दिली तर त्याप्रमाणे नवीन कायदा करण्यात येईल.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, आयुक्तांना दिलेल्या आदेशाबाबत या ठिकाणी प्रश्न विचारला गेला. जे आदेश आम्ही आयुक्तांना दिलेले होते त्यामध्ये 1995 ते 2000 या कालावधीत ज्या झोपड्या डिमॉलिश केल्या आहेत त्यांची संख्या किती ? ही संख्या 5,645 आहे. या झोपड्या 1995 ते 2000 या दरम्यानच्या आहेत बाकीच्या झोपड्या 2000 नंतर आलेल्या आहेत. त्यामुळे त्याच्याबद्दलची सहानुभूती व्यक्त करण्याची कसलीही गरज नाही. 5,645 झोपड्या आहेत त्यांचे पुनर्वसन करण्याच्या संदर्भात जी काही भूमिका आम्हांला घ्यायची आहे तीसुध्दा कोर्टाच्या पूर्व परवानगीने आम्हाला घ्यावी लागेल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मुंबईच्यादृष्टीने अतिशय महत्वाचा आणि जीवनमरणाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. सभापती महोदय, आमच्या समोर समस्या आहे ती निराळी आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले ते त्याहून जास्त धोकादायक आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, भारतीय घटनेप्रमाणे आपल्या मुंबई शहरात कोणालाही कोठेही जाऊन रहाता येते....

श्री.राजेश टोपे :सभापती महोदय, असे मी म्हटलेले नाही. अनधिकृतपणे कोठेही रहाता येणार नाही. सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे जाऊ नये. मी असे म्हटले की, कोठल्याही परिस्थितीत या ठिकाणी येणारे लोंढे आपल्याला रोकता येत नाहीत. परंतु जे येणारे लोक आहेत

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीकार नोंद

(श्री.राजेश टोपे)

ते अनधिकृतपणे अतिक्रमण करीत असतील तर त्यांना त्या ठिकाणी राहता येणार नाही असे माझे म्हणणे आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : मुंबईमध्ये लोकांचे लोंढे येत असून अनधिकृत बांधकामे वाढत आहेत. शासनाच्या, महानगरपालिकेच्या सगळ्या भूखंडांवर त्यांचे आक्रमण होत आहे. परदेशातील नागरीक येथे येतात. त्यांची अतिक्रमणे चालली आहेत. हजारो झोपड्या बांगला देशी नागरीकांनी या मुंबई शहरामतध्ये बांधल्या आहेत. हे पोलिसांना, महानगरपालिकेला आणि शासनाला कळविले आहे. पण त्यांच्या बाबतीतसुध्दा कारवाई करताना शासनाला घटनेची, कोणत्या पक्षाच्या प्रमुखाची किंवा हायकोर्टाची परवानगी घेण्याची आवश्यकता आहे काय ? जर आवश्यक नसेल तर मग ती कारवाई आपण कोणत्या कारणासाठी थांबविली आहे ? असा माझा प्रश्न आहे.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1714...

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय,बांगला देशाच्या नागरिकांना किंवा अन्य देशाच्या नागरिकांना या ठिकाणी राहण्याचा अजिबात अधिकार नाही. अनधिकृतपणे राहणा-या व्यक्तींना कायदेशीर पध्दतीने बाहेर काढण्याची कार्यवाही चालू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

वनक्षेत्रपाल, परळी (जि.बीड) या कार्यालयांतर्गत झालेल्या भ्रष्टाचाराबाबत

(२) * ४५७६ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. यशवंतराव गडाख , श्री. रमेश निकोसे , प्रा. जोगेंद्र कवाडे : सन्माननीय वने मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनक्षेत्रपाल, परळी (जि.बीड) या कार्यालयांतर्गत झालेल्या भ्रष्टाचाराबाबतची मुख्य वन संरक्षक अधिकाऱ्यामार्फत सुरु असलेली चौकशी पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषी व्यक्तींवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाशी संबंधित श्री.सराफ व मुख्य वन संरक्षक यांच्या विरोधातील विभागीय चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधितावर काय कारवाई करण्यात आली, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व किती कालावधीत सदरहू कारवाई अपेक्षित आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : (१) व (२) चौकशी अंशतः पूर्ण झाली आहे. तथापि सदर प्रकरणी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीच्या निष्कर्षावरुन सकृतदर्श-ी दोषी आढळलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर त्यांनी निलंबनाची कार्यवाही केलेली आहे.

(३) व (४) सदर प्रकरणाशी संबंधित सहाय्यक वनसंरक्षक श्री.सराफ यांना निलंबित करण्यात आले आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय,सदर भ्रष्टाचारामध्ये पाच वर्षे रोजगार हमी योजनेतून बोगस मस्टरमधून एकूण किती लाखांचा गैरव्यवहार करण्यात आला होता ?तो आकडा माननीय मंत्रीमहोदय सांगतील काय ? त्याचबरोबर भ्रष्टाचार केल्याची रक्कम दोषी व्यक्तींकडून वसूल करण्यात येणार आहे काय ? त्यानंतर मला दुसरा प्रश्न विचारावयाचा आहे की, सदर चौकशी ही अंशत: पूर्ण झाली आहे असे माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात म्हटलेले आहे तेव्हा या चौकशीस विलंब होण्याची कारणे काय आहेत ? ती केव्हा पर्यन्त पूर्ण होईल ? सदर चौकशी पूर्ण झाल्यावर माननीय मंत्रीमहोदय सदरचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतील काय?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय,या प्रकरणामध्ये एकूण 11 लाख 64 हजार रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. या कामामध्ये अनियमितता झाल्याचे चोकशीत आढळून आले आहे तसेच.या संदर्भात अंशत: चौकशी झालेली आहे . ही चौकशी करण्यामध्ये काही अडचणी निर्माण झाल्या होत्या. सिनिअर ऑफिसरला पाठवून त्यांनी ही चौकशी केलेली आहे.हे सी.सी.टी.चे काम

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असून त्या कामाची मोजणी करण्यास वेळ लागला आहे. तसेच त्यात अनियमितता झालेली आहे काम कमी होऊन सुध्दा जास्त रकमेची बिले काढण्यात आली आहेत.या बाबी लक्षात आल्यामुळे एकूण पाच अधिका-यांना निलंबित करण्यात आलेले आहे. त्या अधिका-याना निलंबित केलेले असल्यामुळे भ्रष्टाचाराची रक्कम त्यांच्याकडून वसूल करावयाची काय याबाबतीत कायदेशीर रीत्या ज्या गोष्टी करता येतील त्या आम्ही जरुर करु. चौकशी पूर्ण होण्यास वेळ लागणार आहे परंतु चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्याचा अहवाल सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, फायर लाईन टाकण्याच्या कामात भ्रष्टाचार झाला आहे.पाच वर्षात कोणतेही काम न करता मस्टर भरण्यात आल्या सबंधीचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी विचारला होता. तो प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे.एकूण किती रकमेचा भ्रष्टाचार झाला आहे? आणि ही रक्कम संबंधित अधिका-यांकडून वसूल करण्यात येणार आहे काय ?फायर लाईन टाकण्याचे काम कोठपर्यन्त आले आहे आणि हे काम कधी पूर्ण होणार आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : आता फायर लाईनचे काम पूर्ण झालेले आहे परंतु त्यावेळी हे काम अपूर्ण होते.काम न करता बिले काढण्यात आली होती.असे चौकशीमध्ये आढळून आलेले असल्यामुळे या अधिका-यांना निलंबित करण्यात आले होते. भ्रष्टाचाराची रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्याच्या बाबतीत कायदेशीर कारवाई आपण पुढे चालू ठेवू.

श्री.दिवाकर रावते :हे काम कधी पूर्ण होणार आहे?

श्री.बबनराव पाचपुते : हा प्रश्न जेव्हा विचारण्यात आला होता त्या कालावधीत हे काम पूर्ण झालेले नव्हते. आता हे काम पूर्ण झालेले आहे.गेल्या वर्षी काम झालेले नव्हते. त्या काळात भ्रष्टाचार झाला होता परंतु आता काम पूर्ण झाले आहे..

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, वनक्षेत्रपाल परळी यांच्या कार्यालया अंतर्गत भोपा वडवणी येथील फॉरेस्ट सर्व्हे नंबर 75, क्षेत्र 50 हेक्टर मध्ये 10 फेब्रुवारी 1999 ते 10 फेब्रुवारी 2004 च्या कालावधीत फायर लाईन न टाकता पाच वर्षे रोजगार हमी योजनेतून बोगस मस्टर उचलून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याबाबत श्री. धोडीराम पोपळे यांनी दिनांक 2 जून 2004

अशुद्धीत प्रत/शीघ्रलेखासाठी नाही

रोजी उपवन संरक्षक औरंगाबाद यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. त्या अनुषंगाने चौकशीला सुरुवात करण्यात आली होती आणि या चौकशीत असे आढळून आले होते की, त्यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे.तेव्हा या चौकशीसाठी किती वेळ लागणार आहे ? आणि असे प्रकार येथुन पुढच्या काळात होऊ नयेत यासाठी कोणत्या उपाययोजना करणार आहात ?

श्री.बबनराव पाचपुते : चौकशीसाठी एक महिना लागेल. ही चौकशी लवकर संपवावी असे निर्देश दिलेले आहेत वनाला आग लागू नये म्हणून पट्टा तयार करावाचा असतो आणि तो पाच वर्षात नाही तर एक वर्षात तयार झाला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : या प्रकरणात सहाय्यक वन सरक्षक श्री.सराफ यांच्याबरोबर एकूण किती अधिका-यांना निलंबित करण्यात आले आहे आणि त्याचा कालावधी किती आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : श्री.सराफ यांना आता निलंबित करण्यात आले आहे.या प्रकरणात एकूण पाच अधिका-यांना निलंबित करण्यात आलेले आहे.या अधिका-यांना खात्यातून रिमूव्ह करावयाचे की फक्त निलंबित करावयाचे यासंबंधीचा निर्णय चौकशी पूर्ण झाल्यानंतर घ्यावा लागेल.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इमारतीची दुरुस्ती व पु□र्रच□च्या संदर्भात श्री.अफजलपूरज र यांच्या अध्यजतेजाली □मज्यात आलेल्या समितीचा अहवाल

*** 1903 श्री. विलास अवचट, श्री. मधुज र सरपोतदार , श्री. अरविंद सावंत , श्री. अ□ा तरे , डॉ. नीलम जोन्हे, श्री. □ी□ जडज री , श्री. वि□ाद तावडे , श्रीमती संजीव□ रायज र , श्री. मधुज र चव्हाज , श्री. जजनाथ शेवाळे , श्री. जितेंद्र आव्हाड , डॉ. वसंत पवार , श्री. वसंतराव चव्हाज दि□ांज 15 डिसेंबर, 2004 रोजी सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आलेल्या अतारांजि त प्रश□ोत्तरांच्या 10 च्या यादीतील प्रश□ ज्र मांज 43101 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : स-मा-न-नीय मु□य मंत्री पुढील □ोष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) इमारतीची दुरुस्ती व पु-र्रच-ेच्या संदर्भात श्री.अफजलपूरज र यांच्या अध्यजतेजाली -ेमज्यात आलेल्या समितीचा अहवालाबाबतच्या प्रस्तावावर मंत्रीमंडळा-े -िर्जय घेतला आहे ज ाय,
(2) असल्यास, या -िर्जयाचे स्वरुप ज ाय आहे,
(3) -ासल्यास, विलंबाची ज ारजे ज ाय आहेत?

श्री.दयानंद मस्के, श्री.विलासराव देशमुज यांच्याकरिता : (1), (2) व (3) समितीच्या अहवालातील शिफारशी संदर्भात प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या विचारार्थ सादर ज रज्यात आलेला आहे.

श्री. दयानंद मस्के : अध्यक्ष महाराज, मला या उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. 'हा अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे' असे उत्तर यामध्ये वाचावे. याप्रमाणे उत्तर दुरूस्त केल्याप्रमाणे.

श्री. विलास अवचट : अध्यक्ष महाराज, या सभागृहामध्ये मी यापूर्वी 16.6.2004 रोजी याच प्रकारचा प्रश्न विचारला होता आणि आज जे उत्तर येथे दिलेले आहे तेच उत्तर तेव्हाही देण्यात आले होते. अहवाल तयार असून तो मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी घेण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव तयार झाल्यानंतर मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी ठेवण्यात येईल असे उत्तर देण्यात आले होते. अध्यक्ष महाराज, मुंबई शहराप्रमाणेच उपनगरामध्येदेखील घरदुरुस्ती व्हावी यासाठी एखादे घरदुरुस्ती मंडळ असावे अशी अनेकांची मागणी होती त्यामुळेच अफझलपूरकर यांची याबाबत अभ्यास करण्यासाठी नियुक्ती केली गेली. अध्यक्ष महाराज, या संबंधात अनेक बैठका झाल्या. मुंबई शहरामध्ये घरदुरुस्तीचा प्रश्न मोठा असल्याने येथे घरदुरूस्ती मंडळ नेमण्यात आले आणि ते शहरासाठी सक्षम असल्याने मुंबई शहरातील घरदुरुस्ती मोठ्या प्रमाणात होऊ लागली. परंतु उपनगरामध्ये अशा प्रकारची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे गोविंद टॉवर ही इमारत पडली आणि त्यात अनेक जण मृत्यूमुखी पडले आणि अशा इमारती उपनगरामध्ये देखील

..... जी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मोठ्या संख्येने आहेत की ज्या दुरुस्ती होण्याची प्रतिक्षा करीत आहेत. तेव्हा मुंबई शहराच्या दृष्टिकोनातून उपनगराची व्यापकता आणि गांभीर्य लक्षात घेऊन हा अहवाल मंत्रिमंडळापुढे मान्यते साठी केव्हा पाठविला आहे आणि मंत्रिमंडळाची यास मान्यता मिळाल्यानंतर त्याची अमलबजावणी केव्हा होईल ?

श्री. दयानंद मस्के : अध्यक्ष महाराज, हा अहवाल अधिवेशनाच्या कालखंडामध्ये पूर्ण होईल...

श्री. विलास अवचट : अध्यक्ष महाराज, आता तर सांगण्यात आले की, अहवाल मंत्रिमंडळाच्या पुढे ठेवलेला आहे ....

श्री. विलासराव देशमुख : अध्यक्ष महाराज, माननीय राज्यमंत्र्यांना असे म्हणावयाचे आहे की, हे सत्र संपेपर्यंत याबाबत निर्णय होईल.

श्री. मधुकर सरपोतदार : अध्यक्ष महाराज, आता माननीय मुख्यमंत्र्यांकडे हा विषय परत आलेला आहे. गृहनिर्माण विभाग हा माननीय मुख्यमंत्र्यांकडेच आहे. या संदर्भात अडचण अशी आहे की, या बाबतीत खूप बैठका झाल्या. या अगोदरच्या गृहनिर्माण मंत्र्यांनीही आमदारांच्या बैठका घेतल्या आहेत आणि त्यामध्ये या संबंधात शेवटी निर्णय काय होणार आहे याबाबतसुध्दा चर्चा झालेली आहे. त्या गोष्टीला बराच काळ झाला. मध्यंतरी नागपूर अधिवेशन झाले आणि आता हे अधिवेशन सुरू होऊनही दोन आठवड्यांचा काळ होत आला आहे. पण अजूनही या प्रश्नाचा निकाल लागत नाही, अंतिम निर्णय होत नाही. आज शहरामध्ये अशा अनेक इमारती आहेत की ज्यांना दुरुस्तीची, पुनर्रचनेची मोठी आवश्यकता आहे. पण त्याबाबत काही निर्णय होत नाही. तेव्हा याबाबत आपण पुन्हा एकदा आपल्या स्वत:च्या अध्यक्षतेखाली, पुढाकार घेऊन, संबंधित सर्व आमदारांची, लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन याबाबत अंतिम निर्णय कोणत्या पध्दतीने घ्यावा या दृष्टीने त्वरित पावले उलणार का ?

श्री. विलासराव देशमुख : अध्यक्ष महाराज, ही गोष्ट खरी आहे की, या बाबतीत चर्चा खूप झालेली आहे आणि आता केवळ निर्णय घेणे बाकी आहे. त्यामुळे हे सत्र संपण्यापूर्वी या बाबतचा निर्णय शासन घेईल.

..... जी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, हा अहवाल आपल्याकडे येईल तो भाग वेगळा पण मुंबईत असलेल्या जवळपास 16 हजार जुन्या इमारतींपैकी साडेपंधराशे इमारती मोडकळीस आलेल्या आहेत आणि त्या केव्हाही पडतील अशी अवस्था त्यांची असल्याचा अहवाल आपल्याकडे आलेला आहे, त्या इमारतींची यादी देखील जाहीर झालेली आहे. त्या संदर्भात कोर्टामध्ये देखील केस होती आणि त्यांचा निर्णय झाला की, अशा कोणत्याही इमारतीची पुनर्बांधणी करावयाची असेल तर ती बाब समितीपुढे जावी आणि ती समितीच हे ठरविल की, त्या इमारतीची पुनर्बांधणी करावयाची की नाही. त्यामुळे अनेक इमारतींबाबत अजून निर्णयच होऊ शकलेला नाही. म्हणून पुन्हा एकदा या संदर्भात कोर्टापुढे जाऊन ॲफिडेव्हिट करून याबाबतीतील निर्णय करावा लागेल, ते आपण करणार काय ? तसेच पुनर्बांधणी इमारतीच्या बाबतीत तेथील भाडेकरूंच्या बाबतीत 154(ए) होता तो 154(बी) केला. त्याबाबतचा निर्णयही आपण जाहीर केला. परंतु आचार संहितेच्या कारणास्तव निवडणूक आयुक्तांनी त्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. आता निवडणूक झाल्यानंतर तो निर्णय अमलात यायला पाहिजे होता पण तो आलेला नाही. तेव्हा त्याबाबतीतदेखील शासन तातडीने पावले उचलील का ?

(यानंतर श्री. जागडे ..... एच 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, मुंबई शहरातील अनेक इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. आता हेच ठरविण्यासाठी ही समिती नेमली आहे. इमारतीचे लाईफ असताना जादा एफएसआय मिळावा म्हणून इमारती पाडल्याकडे अनेक लोकांचा कल असतो. म्हणून यामधील मध्यबिंदू साधता आला पाहिजे. त्यासाठीच ही समिती नेमण्यात आली आहे. इमारतीचे लाईफ शिल्लक असतानाही इमारत पाडण्यासाठी परवानगी दिली तर पुन्हा प्रश्न उभा राहतो. म्हणून या समितीने साधारणत: या इमारतींचे लाईफ ठरवावे. त्यानंतर शासनाला पुढील कार्यवाही करणे सोपे लाईल. माननीय सदस्यांनी निवडणूकीच्या कालखंडाचा उल्लेख केला आहे, त्याप्रमाणे कलम 154 नुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

श्री मधुकर चव्हाण : सभापती महोदय, म्हाडाच्या अंतर्गत रिपेअर बोर्ड आहे. आता ही समिती निर्माण करुन भ्रष्टाचाराचे एक टेबल निर्माण करण्यात आले आहे. सभापती महोंदय, इमारती दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने जमीन दिल्यानंतरही प्लॅन सँक्शन करण्यासाठी मुंबई महानगरपालिका दीड वर्ष घेते. आज अनेक लोक ट्रन्झीट कॅम्पमध्ये राहत आहेत. तसेच आपण 1940 पूर्वीच्या इमारतींनाच दोनचा एफएसआय देत आहोत. यासाठी म्हाडाचे उपाध्यक्ष आणि मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त यांची एक समिती नेमली आहे. परंतु या समितीची बैठक चार महिन्यातून एकदाही होत नाही. मी या ठिकाणी कोर्टाचा अवमान करीत नाही. शासनाने कोर्टात जाऊन सांगितले पाहिजे की, या तंज्ञ समितीची आवश्यकता नाही. या ठिकाणी रिपेअर बोर्ड सक्षम आहे. या ठिकाणी जी तंज्ञ समिती नेमण्यात आली आहे, ती एकमेव आहे काय ? या बाबत शासन कोणता विचार करणार आहे ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, यामध्ये अनेक अडचणी आहे. इमारतीतील भाडेकरु हे कोर्टामध्ये तक्रार करीत असतात. तेव्हा यामध्ये ब-याच अडचणी आहेत. म्हणून सरकार याबाबत पुन्हा एकदा या बाबतचा विचार करील, त्यावेळी माननीय सदस्यांनी सूचविलेल्या सूचनांचा विचार करु.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शहरी भागातील सुवर्ण जयंती योजनेचे अंतर्गत परिक्षण गेल्या १० वर्षांपासून करण्यात न आल्याबाबत

(४) * ४५१९ श्री. चंद्रकांत रघुवंशी : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरी भागातील सुवर्ण जयंती योजनेचे अंतर्गत परिक्षण गेल्या १० वर्षांपासून करण्यात आलेले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विलंबाची कारणे कोणती,

(३) याकरिता शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात येणार आहे वा आला आहे,

(४) असल्यास, त्याची अंमलबजावणी केंव्हा पासून करण्यात येणार आहे ?

श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुज यांच्याकरिता : (१) हे ,जरे -नाही.

(२) ,(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, प्रश्न विचारताना टाईपिंग चूक झाली आहे, मी परिक्षण असे प्रश्नात म्हटले आहे. तर ते नसून त्याऐवजी सर्व्हेक्षण असे माननीय मंत्रिमहोदयांनी लक्षात घ्यावे. सभापती महोदय, 1997 सालापासून आतापावेतो शहरी भागातील लोकांचे सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत सर्व्हेक्षण झालेले नाही. ग्रामीण भागातील दारिद्ररेषेखालील माणसाचे सर्व्हेक्षण झालेले आहे. शहरी भागातील सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत सर्व्हेक्षण न झाल्यामुळे शहरी भागातील लोकांना निरनिराळ्या योजनांचा लाभ मिळत नाही. तेव्हा शहरी भागात राहणा-या लोकांचे सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे ?

श्री. राजेश टोपे : 2005-2006 वर्षात हे काम निश्चितपणे केले जाईल.

-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईच्या विकासासाठी नियोजन आयोगाकडे अर्थसहाय्याची केलेली मागणी

(५) * १७३७ श्री. अनिल परब , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , डॉ. दिपक सावंत , श्री. अनंत तरे , श्री. दिवाकर रावते , डॉ. निलम गोऱ्हे , डॉ. वसंत पवार , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. राजेंद्र जैन , श्री. वसंतराव चव्हाण , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जगन्नाथ शेवाळे : स-मा-न-नीय मु□य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या वार्षिक महसूलात महाराष्ट्राचा मुंबईसह एकतृतीयांश हिस्सा असून त्या तुलनेत मुंबईच्या विकासाला केंद्र शासनाकडून आर्थिक मदत मिळत नाही हे खरे काय,

(२) असल्यास, मुंबईच्या विकासासाठी दरवर्षी सुमारे १८०० कोटी रुपयांची मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाच्या नियोजन आयोगाकडे केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील कोणकोणत्या विकासाच्या कामाकरिता मागणी केली आहे ,

(४) असल्यास, शासनाच्या मागणीबाबत केंद्र शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

श्री. विलासराव देशमुज : (१) तुलनात्मक दृष्ट्या केंद्र शासनाकडून मुंबई विकासासाठी पूरेशी आर्थिक तरतूद आतापर्यंत झाली -ाही हे जरे -ाही.

(२) दरवर्षी सुमारे रु.२१५१ कोटीची मागणी राज्य शासनाने केली आहे.

(३) मुंबई शहराच्या विकासासाठी मुंबई शहरात खालील नमूद पायाभूत नागरी सुविधा प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित आहे.

१) मुंबई मेट्रो रेल प्रकल्प

२) मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (शिवडी-न्हावा जलसेतू),

३) धारावीचा पुनर्विकास,

४) झोपडपट्टीवासियांचे पु-ार्वस-ा,

५) मोडकळीस आलेल्या इमारतीचा पुनर्विकास,

६) केईएम हॉस्पिटलला राष्ट्रीय दर्जा देणे,

७) मुंबइ्र नागरी वाहतूक प्रकल्प-२

८) बांद्रा-नरिमन पॉईंट जलसेतू प्रकल्प,

९) मध्य वैतरणा पाणीपुरवठा प्रज ल्प,

१०) मुंबई मल निस्सारण प्रकल्प.

(३) सदरहू आराखड्यास केंद्र शासनाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख.....

(४) स-ा २००५-२००६ च्या केंद्रीय अर्थ संकल्पात केंद्र शासनाने मुंबई विकासाच्या विशेष प्रकल्पातंर्गत मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प,मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्प, पश्चिम द्रूत गती मार्ग प्रकल्प या प्रकल्पांचा उल्लेख केलेला आहे.

श्री. अनिल परब : सभापती महोदय, मी प्रश्न क्र. 1 असा विचारला होता की, केंद्र शासनाच्या वार्षिक महसूलात महाराष्ट्राचा मुंबईसह एक तृतीयांश हिस्सा असून अशा तुलनेत मुंबईच्या विकासाला केंद्र शासनाकडून आर्थिक मदत मिळत नाही, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी नाही असे उत्तर दिले आहे. माझा प्रश्न असा आहे की, आतापर्यन्त केंद्र सरकारने यासाठी किती रकमेची तरतूद केली आहे ?

(यानंतर श्री. सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1737....

श्री. अनिल परब...

दुसरा प्रश्न असा की, अर्थसंकल्पामध्ये 1 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. हे पैसे आपल्याला जागतिक बँकेकडून मिळाले आहेत की, या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये केलेली तरतूद आहे?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मुंबई शहरामधून दरवर्षी केंद्र सरकारला 40 हजार कोटी रुपये कराच्या माध्यमातून मिळतात ही वस्तुस्थिती आहे. त्या रकमेच्या तुलनेत केंद्र सरकार खूप कमी पैसे आपल्याला देते ही वस्तुस्थिती आहे. 2004-05 मध्ये फक्त 100 कोटी रुपये दिले. त्यामुळे ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन मुंबईच्या वाढत्या नागरीकरणामुळे नागरी सुविधांवर ताण पडत आहे...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. लेखी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की "तुलनात्मकदृष्टया केंद्र शासनाकडून मुंबई विकासासाठी पुरेशी आर्थिक तरतूद आतापर्यंत झाली नाही हे खरे नाही". आता आपण म्हटल्याप्रमाणे केंद्र सरकारला 40 हजार कोटी रुपये देतो त्या तुलनेत केंद्र सरकारने 100 कोटी रुपये मुंबईकरिता दिले. असे असतांना 40 हजार कोटी रुपयांच्या तुलनेत किती रक्कम मिळावयास हवी होती?

श्री. राजेश टोपे : केंद्र सरकारने किती तरतूद करावी हा केंद्र सरकारच्या अखत्यारितील प्रश्न आहे...

श्री. दिवाकर रावते : परंतु त्यांना सांगण्याचे आपले काम नाही काय?...

श्री. राजेश टोपे : त्यासाठी क्रमांक 2 च्या उत्तरात म्हटल्याप्रमाणे " दरवर्षी सुमारे रु.2151 कोटींची मागणी राज्य शासनाने केली आहे" . आणि येत्या पाच वर्षामध्ये साडे दहा हजार कोटी रुपये मिळावेत अशी आमची अपेक्षा आहे. त्यापैकी एक हजार कोटी रुपये या वर्षीच्या नियोजनामध्ये समाविष्ट केले आहेत. तो केंद्र सरकारने केलेल्या तरतुदीचा भाग आहे म्हणून याठिकाणी उल्लेख केला आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. केंद्र सरकारने तुम्हाला 100 कोटी रुपये दिले. तुम्ही 2151 कोटी रुपयांची मागणी केली . त्यापैकी यावर्षी 1 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे काय? केंद्र सरकारने देशातल्या 6 शहरांसाठी तरतूद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

केलेली आहे त्यापैकी एक हजार कोटी रुपये स्पेसिफिक आम्ही तुम्हाला देऊ असे त्यांनी सांगितले आहे काय? आपण 1 हजार कोटी रुपयांची केलेली तरतूद कोणती आहे?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या संदर्भात पहिल्यांदा एवढा अँबिशिअस प्रोग्राम केंद्र सरकारकडे पाठविला. आणि पहिल्यांदा केंद्र सरकारने अर्बन रिनिव्हल फंडाची घोषणा केली. त्यामध्ये 6 मेट्रो सिटीचा समावेश आहे. त्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये साडे पाच हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यासंबंधी आमची प्लॅनिंग कमिशनबरोबर चर्चा झाली तेव्हा त्यांनी सांगितले की, 1 हजार कोटी रुपये या फंडातून मिळतील. तेव्हा तेवढी तरतूद तुम्ही तुमच्या अर्थसंकल्पामध्ये दाखविली पाहिजे. म्हणून 1 हजार कोटी रुपयांची तरतूद दाखविली आहे. याबाबत आमची अशी अपेक्षा आहे की, ॲडव्हान्स स्टेजवर आपल्या अनेक योजना असल्यामुळे आणि मुळात मेट्रो सिटी योजना तयार होण्यासाठी विलंब लागणार असेलतर आम्हाला या कामासाठी 2 हजार कोटी रुपये केंद्र सरकारकडून उपलब्ध व्हावेत.

डॉ. अशोक मोडक : मुळात प्रश्न असा आहे की, साडे पाच हजार कोटी रुपये हे रिनिव्हल फंडातून सहा मेट्रोपॉलीसच्या संदर्भात मिळाले आहेत. वास्तविक बिझिनेस वर्ल्ड सारख्या वर्तमानपत्रातून मुंबईच्या विकासासाठी 10 हजार कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे प्रसिध्द झाले आहे. केंद्र सरकारने अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली साडे पाच हजार कोटी रुपयांची रक्कम मुंबईला मिळणार नाही. प्रश्न असा आहे की, केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये केलेली तरतूद ही अपेक्षेप्रमाणे पूरी होत नाही. ही सद्यस्थिती आहे की नाही?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, सदनाचा गैरसमज होण्याचे काही कारण नाही. पुढील पाच वर्षामध्ये या कामाकरिता 10 हजार कोटी रुपये लागणार आहेत. या प्रोजेक्ट गॅपमध्ये केंद्र सरकारकडून पैसे मिळणार आहेत, तसेच इतर वित्तीय संस्थांकडून निधी मिळणार आहे व हा प्रोजेक्ट बी.ओ.टी. तत्वावर करणार असल्यामुळे संबंधित प्रायव्हेट पार्टनरचा त्यामध्ये सहभाग घेतला जाणार आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज्याठिकाणी प्रोजेक्ट गॅप निर्माण होतो, तेवढा पैसा जरी केंद्र शासनाने उपलब्ध केला तरी योजना फिजीबल होऊ शकतात, हे आम्ही प्लॅनिंग कमिशनला सांगितलेले आहे. अशा वेळी प्रत्येक योजनेसाठी केंद्र शासनाकडून किती हिस्सा लागणार आहे, याचे कोष्टक तयार करुन ते देखील त्यांना कळविले आहे. शेवटी एका वर्षामध्ये दहा हजार कोटी रुपयांची व्यवस्था करुन ते खर्च होणार नाहीत. म्हणून प्रत्येक वर्षी दोन-दोन हजार कोटी असे मिळून, पुढील पाच वर्षामध्ये निधी उपलब्ध करुन दिला तरी, ज्या योजना हातामध्ये घेतलेल्या आहेत, त्या पूर्ण करण्यासाठी निश्चितपणे मदत मिळेल.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, मग त्यांनी यावर्षी नक्की किती रक्कम दिली आहे ते मा.मुख्यमंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, मी आपली एन्झायटी समजू शकतो. आपली जी इच्छा आहे, तीच आमची देखील आहे की, मुंबईसाठी जास्त पैसा उपलब्ध झाला पाहिजे, कारण अनेक वर्षापासून मुंबईचे प्रश्न तसेच राहीलेले आहेत. आपण पहिल्या टप्प्यामध्ये एक हजार कोटी रुपयांची व्यवस्था केलेली आहे. आमची अपेक्षा अशी आहे की, बाकीच्या ज्या मेट्रोपॉलीटीन सिटीज् आहेत, त्यांना या योजनांच्या बाबतीत कामकाज करण्यासाठी विलंब लागण्याची शक्यता आहे, म्हणून याबाबतीत आम्ही अपेक्षा करीत आहोत. एक हजार कोटी रुपये तर नक्की मिळणार आहेत आणि बाकी पैसेही मिळविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये याचा उल्लेख होता. तेव्हा आपण स्पेसीफीक सांगितले तर बरे होईल.

मेजर सुधीर सावंत : सभापती महोदय,मी सर्वप्रथम माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. कारण त्यांनी मुंबईच्या संबंधात स्वत: जातीने लक्ष घालून केंद्र शासनाकडून प्रचंड निधी आणण्याचा प्रयत्न केला आहे. मी आपले दोन गोष्टींकडे लक्ष वेधू इच्छितो. मुंबईत प्रचंड प्रमाणात लोंढे येतात. त्यासाठी पाणी आणि सिव्हरेज हे विषय महत्वाचे आहेत. याबाबतीत यावर्षी कोणतीही तरतूद केलेली नाही. सिव्हरेजच्या बाबतीत आपण जागतिक बँकेकडे सिव्हरेज डिस्पोजल प्रोजेक्ट प्रस्तुत केला आहे आणि त्यासाठी 2380 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. हा प्रोजेक्ट

. . . .जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1737 . . . .

मेजर सुधीर सावंत . . . .

इम्प्लीमेंट झाल्यानंतर 80 टक्के लोकांचा सॅनिटेशनचा प्रश्न सुटेल. याचा अर्थ सध्या प्रचंड प्रमाणात मल समुद्रात सोडले जाते. हे थांबविण्यासाठी या प्रोजेक्टला टॉप प्रॉयॉरिटी देण्याची गरज आहे. तेव्हा पाणी आणि सिव्हरेज डिस्पोजल प्रोजेक्टसाठी काय तरतूद करण्यात येत आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, जागतिक बँकेकडून लोन घेऊन बी.एम.सी.च्या माध्यमातून योजना राबवित आहेत.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, मुंबइ विकासासाठी नियोजन आयोगाकडून पैसे मिळणार आहेत. याठिकाणी निरनिराळे प्रकल्प घेतलेले आहेत. माझा माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, हे प्रकल्प जेथे राबविले जाणार आहेत, ती संपूर्ण जमीन बांधकामाने पिडीत आहे. तेव्हा अगोदर याबाबतीत सर्व्हेक्षण केलेले आहे का ? जेथे अनधिकृत बांधकाम असेल, ते पाडावे लागेल आणि जे अधिकृत बांधकाम असेल, त्याबाबतीत संबंधितांना पर्यायी जागा द्यावी लागेल. मग त्या झोपडपट्टया असतील, तर अशा वेळी आपल्याला किती घरकुले उपलब्ध करुन द्यावी लागतील याचा सर्व्हे केला आहे का ? तसेच यासाठी किती निधी लागणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, प्लॅनिंग आणि सर्व्हेक्षणाचा भाग हा पुढे होईल. पण जर काही अडथळे आले तर ते निश्चितपणे काढले जातील.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, आज सुध्दा मुंबई शहरामध्ये एम.यु.टी.पी.-1 ची कामे प्रगतीपथावर आहेत. त्यांच्यासाठी मानखूर्द व इतर ठिकाणी जवळपास 53 हजार घरे प्रत्यक्षपणे बांधून तयार आहेत. तसेच त्यांच्या शिफ्टींगचे काम चालू आहे. तसेच पी.ए.पी.साठी आपण प्रोजेक्टमध्ये व्यवस्था केलेली आहे, तो प्रकल्पाचाच भाग आहे. मी याठिकाणी सभागृहाला माहिती सांगू इच्छितो की, याठिकाणी काल जागतिक बँकेची टीम आली आहे आणि त्यांच्याबरोबर माझी प्राथमिक चर्चा झाली आहे. ही टीम मुंबईमध्ये आठ दिवस राहणार आहे आणि विविध प्रोजेक्टनां भेटी देणार आहे. आम्ही जागतिक बँकेला विनंती केली आहे की, मुंबईच्या या प्रकल्पांसाठी आपण आम्हाला मदत करावी. त्या अनुषंगाने या कामांची पाहणी करुन आणि नेमकी किती मदत देता येईल यादृष्टीने ते आठ दिवसामध्ये पाहणी करतील. त्यानंतर ते पुन्हा माझ्या बरोबर चर्चा करतील आणि मग याबाबतीत अंतिम निर्णय करणार आहेत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

ता.प्र.क्र.1737 (पुढे चालू...

श्री.नितीन गडकरी : एक गोष्ट चांगली आहे की, केंद्र सरकारने या वर्षी पहिल्यांदा मेट्रो सीटीच्या नावाने 5 हजार कोटीपेक्षा जास्त फंड तयार केलेला आहे. ही गोष्ट स्वागतार्ह आहे. त्यांनी आपल्या बजेटमध्ये 1 हजार कोटीची तरतूद केलेली आहे. केद्र सरकारच्या नगरविकास विभागाने प्रोजेक्ट तयार करायचा की वित्त विभागाने हा प्रोजेक्ट तयार करायचा हा प्रश्न आहे. माझ्या माहितीप्रमाणे केंद्र सरकारचा नगरविकास विभाग हा प्रोजेक्ट करेल. परंतु आपण याबाबतचे कागदपत्र तयार केले नाही तर काही अडचणी येऊ शकतात. आपण याबाबतचे काम फास्ट ट्रॅकवर करुन कागदपत्रे नीट तयार करून देणे आवश्यक आहे. यासाठी उत्कृष्ट ऑफीसरची निवड करून, त्यांना लियाझनिंग ऑफीसर म्हणून नेमून, केंद्रसरकारकडे कागदपत्रे देऊन त्याबाबातचा पाठपुरावा करावा. दिल्ली येथील आयुक्त कार्यालय आणि मंत्रालयातील अधिकारी हे याबाबतचा पाठपुरावा करण्यास कमी पडतात. यासाठी प्रायव्हेट लियाझनिंग ऑफीसर नेमण्याची परिस्थिती नाही. प्रायव्हेट लियाझनिंगना अशा कामासाठी नेमले तर 1 हजार रुपयाचे 1500 रुपये करून देतील. आपले जे मंत्रालयातील अधिकारी आहेत, ते या कामासाठी नेमून डे टू डे मॉनिटरिंग करुन केंद्र शासनाकडून पैसे मिळविण्याच्या संबंधात प्रयत्नशील रहावे,अशी विनंती आहे.

श्री.विलासराव देशमुख : या सगळया कामाचे सुपरव्हीजन करण्यासाठी एक विशेष सचिव नेमलेले आहेत, ते या कामाचा पाठपुरावा करतात. कालच आपण वाचले असेल. शिवडी-न्हावाशेवा या 22 कि.मी.चा ब्रीज तयार करण्यासाठी एम.ओ.यू साईन करण्याचा कार्यक्रम रस्ते विकास मंडळाने केला. त्याबाबत पर्यावरण विभागाचा क्लिअरन्स प्राप्त झालेला आहे. असे काही ॲडव्हान्स स्टेजचे प्रकल्प आहेत. तसेच घाटकोपर ते वर्सोवा या मेट्रो रेलचे काम अंतिम टप्प्यामध्ये आलेले आहे. आम्ही या वर्षी दीड हजार कोटी रुपयांची पहिल्या टप्प्यासाठी त्यांच्याकडे मागणी केलेली आहे. केंद्रीय अर्थमंत्री महोदयांच्या भाषणामध्ये त्याबाबतच्या तरतुदीचा उल्लेख आलेला आहे. तेव्हा सन्माननीय विरोधी पक्षनेते यांना अभिप्रेत असलेल्या दिशेनेच आम्ही वाटचाल करीत आहोत. मुंबईच्या विकासासाठी जास्तीत जास्त साडेपाच हजार कोटी रुपये कसे मिळतील, यासाठी योग्य ती यंत्रणा निश्चितपणे तयार करू.

श्री.मधुकर सरपोतदार : प्रश्न असा आहे की, प्रोजेक्ट अफेक्टेड पर्सन आहेत, झोपडपट्ट्या उभ्या केलेल्या आहेत त्याबाबतचे सर्व्हेक्षण करण्याचे काम हे स्पार्स या स्वयंसेवी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संस्थेला दिलेले आहे. खरे तर हे काम करण्यास स्पार्स ही संस्था रिलायबल नाही. त्यांच्याकडे ओळखपत्र देण्याचे कामही सोपविलेले आहे. या स्वयंसेवी संस्थेने मुंबई शहराचे वाटोळे लावण्याचे काम केलेले आहे. या एन.जी.ओ.कडून हे काम काढून घेऊन ते आपल्या शासकीय यंत्रणेकडे सोपविणार आहात काय ? या एनजीओंनी काय काम केलेले आहे,याची माहिती घेऊन त्यांच्याबाबतीत योग्य ती उपाययोजना करणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : ही बाब तपासून घेण्यात येईल.

--

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

ठा□ शहरातील धो□ादाय□ अवस्थेत असलेल्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत

(6) * 2849 श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. जो□द्र □वाडे , प्रा. फौजीया □ा□, डॉ. वसंत पवार , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. ज□माथ शेवाळे , श्री. वसंतराव चव्हा□ तारां□त प्रश□ □मां□ 42999 ला दि□ां□ 27 मे, 2004 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : स□मा□□य मुज्य मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा जरतील जाय :-

(1) ठाजे शहरातील जु□या व मोडज्ळीस आलेल्या इमारतीच्या दुरुस्ती व पु□रच□बाबतच्या अहवालाची छा□□ पूर्ज झाली आहे जाय,

(2) असल्यास, त्या□ुसार जाय जारवाई जरज्यात आली वा येत आहे,

(3) □सल्यास, विलंबाची जारजे जाय आहेत ?

श्री.दयानंद मस्के श्री.विलासराव देशमु□ यांचेकरिता: (1) होय.

(2) ठाजे महा□जरपालिजा जेत्रासाठी घरदुरुस्ती व पु□रच□ मंडळाच्या □□मिती संबंधात अहवाल सादर जरज्यासाठी समिती □□युक्त जरज्याचा प्रस्ताव शास□ाच्या विचाराधी□ आहे.

(3) प्रश□ उद्भवत □ाही.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आपले संरक्षण हवे आहे. या प्रश्नासंदर्भाने ठाणे शहरासाठी इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ त्वरित स्थापन करावे,अशाप्रकरचे आपण निर्देशही दिलेले आहेत. त्याप्रमाणे शासनाने या सभागृहात निवेदनही केलेले आहे. 30 दिवसामध्ये याबाबतचे सर्व्हेक्षण करून आम्ही मंडळ स्थापन करु, असे सांगितलेले होते. परंतु या संदर्भात कोणतीही कारवाई पूर्ण झालेली नाही. म्हणून आता जे या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आणि दिशाभूल करणारे आहे. तेव्हा शासन यासंबंधातील स्पष्ट भूमिका मांडेल काय ?

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 2849....

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे.यासाठी शासनाने विचार करुन पूनर्रचना करण्याच्या संदर्भात एक सदस्य समिती नियुक्त केलेली आहे. ती समिती दोन महिन्यात आपला अहवाल सादर करील.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्देशावर सभागृहात आश्वासन देण्यात आले होते की, 60 दिवसात संपूर्ण अहवाल ही समिती सादर करील. आता मंत्रिमहोदय, सांगत आहात की, दोन महिन्यात एक समिती स्थापन करुन तिचा अहवाल आल्यानंतर निर्णय घेण्यात येईल हे उत्तर विसंगत आहे. सभापती महोदय, आपण ऑलरेडी निर्देश दिलेले आहेत आणि हे मंडळ 60 दिवसात स्थापन करु असे शासनाने त्यावेळेस सांगितले होते.आता मंत्रिमहोदय म्हणता की, ती समिती स्थापन करु, तिचा अहवाल मागवू आणि मग मंडळ स्थापन करु. म्हणून या प्रश्नाचे स्पेसिफिक उत्तर द्यावे की, हे अधिवेशन संपण्याच्या आत जी काही कारवाई करावयाची आहे ती पूर्ण करुन, मंडळ स्थापन करणार काय? गेले दोन वर्षे हा प्रश्न या सभागृहात चर्चीला जातो.आणि या दोन्ही वर्षी अधिवेशनाच्या काळात 30 दिवसात करु, 60 दिवसात करु, पंधरा दिवसात करु एवढेच शासन आश्वासन देत आहे.

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, या प्रश्नासाठी श्री. बी. के. अग्रवाल ही एक सदस्यीय समिती दिनांक 19.3.2005 रोजी स्थापन करण्यात आलेली आहे. दोन महिन्यात ती समिती आपला अहवाल सादर करील.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या सभागृहात माननीय राज्यमंत्र्यांनी असे आश्वासन दिले होते की, 60 दिवसात हे मंडळ स्थापन करुन त्यांना त्यांचे अधिकार प्रदान केले जातील. तसे असतांना आज त्या निर्देशांचे पालन करण्यात आलेले नाही. सभापती महोदय, आपण निर्देश दिलेले असतांना परत एक सदस्य समिती नेमणे आणि परत 60 दिवसांचा कालावधी मागणे हे सगळे कॉन्ट्रॅडिक्टरी आहे. हे कॉन्ट्रॅडिक्शन्स बाजूला काढून आपण ठाणेकरांना न्याय देणार काय? आणि सभापतींचे निर्देश असतांना शाससनाने परत अशी समिती नेमणे हे उपयुक्त ठरेल काय?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आपण निदेश दिले, त्या निदेशामुळे तर या कामाला गती आली. सभापती महोदयांनी यामध्ये वेळेवर हस्तक्षेप केला. ठाणेकरांच्या विशेषत: जुन्या इमारतीमध्ये राहणा-या लोकांच्या, भाडेकरु तत्वावर राहणा-या लोकांच्या भावनेचा पूर्ण विचार करुनच निदेश दिले आणि ते निदेश दिल्यानंतर तातडीने त्यासंदर्भात काही पावले उचलण्यासाठी मधल्याकाळामध्ये तेथील महापौरांबरोबर काही बैठका झाल्या. याचा आपण जो पर्यंत शास्त्रशुध्द अभ्यास करीत नाही, म्हणून एक सदस्य समिती दोन वर्षासाठी किंवा सहा महिन्यासाठी ती समिती नेमलेली नाही तर फक्त दोन महिन्यासाठी ती समिती नेमलेली आहे. आणि या सगळयाचा विचार करुन मी एवढेच सांगतो की, जूनपूर्वी या संदर्भातील अंतिम निर्णय घेऊन त्यासंदर्भातील आदेश शासनाच्या वतीने निर्गमित केले जातील.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रायगड जिल्ह्यात खरेदीखतांमधील बोगस नोंदी उघड झाल्यावर पन्नास मूळ दस्तऐवजच गायब झाले बाबत

(7) * 1863 श्री. जयंत पाटील : सन्मानीय मुख्य मंत्री पुढील बाबींचा खुलासा करतील काय :-

(1) रायगड जिल्ह्यात खरेदीजतांमधील बोगस नोंदी करुन व तो प्रकार उघडकीस आल्यावर अशा प्रकारच्या पनास खरेदीजतांचे मूळ दस्तऐवज "गायब" करण्यात आल्याचा गैरव्यवहार सहाय्यक उपनिबंधक कार्यालय, अलिबाग येथे दिनांक 10.10.2004 रोजी वा त्यासुमारास उघडकीस आला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित अधिकारी कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. राजेंद्र शिंगणे,श्री. विलासराव देशमुख यांच्या करिता:(1) हे खरे नाही.

(2) व (3) चे उत्तर

प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी चालू आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : या बाबतीत असा प्रश्न विचारण्यात आला होता की, रायगड जिल्हयात खरेदीखतांच्या कार्यालयामध्ये बोगस नोंदी झालेल्या आहेत आणि त्याचे मूळ दस्तऐवज हे गायब झालेले आहेत. याबाबतीत "हे खरे नाही," असे उत्तर देण्यात आलेले आहे. सभापती महोदय, या कार्यालयातील किर्तीकुमार, उप निबंधक, रमणलाल गुजर, विजय महादेव साळवी आणि जितेंद्र परशुराम वाईकर यांनी अटकपूर्व जामिनासाठी जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. व त्याची सुनावणी दिनांक 17 डिसेंबर, 2004 साली झाली होती हे खरे आहे काय?

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 1863 .....

श्री. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या सर्व प्रकरणामध्ये आरोपी (1) नरसिमा शंकर-नारायण राव (2) किर्तीकुमार रमनलाल गुजर, सह जिल्हा निबंधक वर्ग 2, अलिबाग (3) जितेंद्र पुरुषोत्तम वाईकर, कनिष्ठ लिपिक (4) दत्तात्रय बाळकृष्ण पाटील, शिपाई (5) विजय महादेव साळवी, दुय्यम निबंधक अलिबाग यातील अनुक्रमांक 2 ते 5 दुय्यम निंबधक यांचे कार्यालय, अलिबाग यांचे विरुध्द खटला दाखल झालेले होते. गुन्हयाच्या पुढील तपासात आरोपी क्रमांक 1 ते 3 यांना अटक करण्यात आली होती आणि त्यांच्या अटकेनंतर माननीय विद्यमान न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केलेला होता आणि आरोपी क्रमांक 4 यास माननीय सत्र न्यायाधीश, रायगड (अलिबाग) यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केलेला आहे.

उपसभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. चासकमान धरणातील पाणी सोडण्याच्या संदर्भात दैनिक सकाळमध्ये आलेल्या अहवालामध्ये अत्यंत गंभीर अशी नोंद झालेली आहे आणि आपणच त्या आसनावर बसलेला असल्यामुळे या सभागृहामध्ये आम्ही याची गंभीरतेने नोंद घेत आहोत. श्री. गाडेकर नावाचे इरिगेशन खात्याचे अधिकारी आहेत त्यांनी असे म्हटले आहे की, "श्री. डावखरे यांनी देखील रब्बी हंगामाचे पैसे भरलेले नाहीत आणि पाणी सोडण्यासाठी ते दबाव आणतात." सभापती महोदय, आपण आपल्या पदाचा दुरुपयोग करीत आहात आणि आपल्या शेतीला पाणी मिळावे याकरिता आपण दबाव आणून पाण्याचा वापर करीत आहात आणि त्याचे पैसेही न भरता आपण त्या पाण्याचा वापर करता असा एका अधिकाऱ्याने आजच्या सकाळ वर्तमानपत्रामध्ये आपल्यावर आक्षेप घेतला आहे. त्यासंदर्भामध्ये आम्ही सभागृहामध्ये जाणून घेऊ इच्छितो की, अशा प्रकारचा दबाव आपण बाहेर सुध्दा आणता काय ? आणत असाल तर हा दुरुपयोग होत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला यासबंधी थोडे बोलावयाचे आहे. या ठिकाणी आपण काय करता हा प्रश्न उद्भवत नाही. प्रश्न असा आहे की, याबाबतीत एका शासकीय अधिकाऱ्याने या सभागृहाच्या पीठासीन अधिकाऱ्याच्या बाबतीत वर्तमानपत्राच्या पत्रकाराकडे बोलत असताना अशी मुलाखत देतो की, पीठासीन अधिकारी, आमचे जे सभापती, उपसभापती आहेत ते दबाव आणतात आणि त्यांनी पैसे भरलेले नाहीत, आम्हाला आग्रह करतात की, त्या ठिकाणी पाणी सोडा, अशा प्रकारचे त्यांचे वर्तन आक्षेपार्ह आहे. सरकारी नोकर म्हणून त्यांनी कोठल्याही प्रकारे वर्तमानत्राशी बोलणे हे उचित नाही. त्यांना तो अधिकार नाही. हा पहिला मुद्दा. दुसरा मुद्दा असा की, बोलले तर बोलले पण या सभागृहातील एका ज्येष्ठ पीठासीन अधिकाऱ्याच्या बाबतीत अशा प्रकारच्या लूज कॉमेन्ट्स वर्तमानपत्राच्या पत्रकाराकडे त्यांनी केलेल्या आहेत असे या ठिकाणी दिसते. दुष्काळावरची चर्चा सुरु असताना काल आपण असे आदेश दिले की, पाणी असताना देखील गरजू शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही म्हणून याबाबतीत त्या ठिकाणी पाणी सोडण्याचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

आदेश द्यावेत आणि जे जाणुनबुजून हे काम करीत नाहीत त्यांच्यावर आपण कडक कारवाई करावी असे निदेश दिले. आपल्या निदेशाच्या अनुषंगाने सरकारने सांगितले की, त्याप्रमाणे कार्यवाही करु. आपण सांगितल्यानंतर, सरकारने कबूल केल्यानंतर हा उन्मत्त अधिकारी दैनिक सकाळच्या पत्रकारासमोर अशी प्रतिक्रिया देतो ही गोष्ट राज्य शासनाला अतिशय लाजिरवाणी आहे, लांछनास्पद आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. या विषयावर आपण काय सांगितले, काय सांगितले नाही, हा मुद्दा वेगळा आहे. परंतु एकप्रकारे या अधिकाऱ्याने आपला अपमान केला आहे. सभागृहाचा अपमान केला आहे. सरकारी नोकरीतील जे नीती-नियम आहेत त्याप्रमाणे तो वागलेला नाही. म्हणून. या सगळया गोष्टीची दखल घेऊन आज सूर्यास्त होण्याच्या आत त्यांच्या निलंबनाचे आदेश शासनाने काढले पाहिजेत आणि अशा उर्मट शासकीय अधिकाऱ्याला त्याची जागा दाखवून दिली पाहिजे अशी माझी शासनाकडे मागणी आहे. सभापती महोदय, काल आपण आदेश दिला आणि आज हा वात्रट अधिकारी वर्तमानपत्राला प्रतिक्रिया देतो याचा अर्थ म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावलेला आहे अशा प्रकारची त्याची हिंमत आहे ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे. अशा प्रकारच्या घटनेवर सभागृहात फार चर्चा होणे उचित नाही. आपण या ठिकाणी पीठासीन अधिकारी आहात. आपण यामध्ये काही बोलावे असे मी आपल्याला म्हणणार नाही. कारण आपण मनाचे मोठे आहात. कदाचित आपण या विषयावर त्यांना माफ कराल परंतु यासंदर्भामध्ये आपण कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करण्याची गरज नाही. या सभागृहातील सन्माननीय सदस्यांची अशी भावना आहे की, माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी त्या उन्मत्त अधिकाऱ्याला ताबडतोब निलंबित करावे, त्याची चौकशी करावी. याबाबतीत त्यांनी स्पष्ट आश्वासन द्यावे अशी विनंती करतो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, आपण काल केलेल्या निर्देशावर या अधिका-याने अशा कॉमेंट्स केल्या आहेत. सभागृहाचे नेते आणि मा.उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत त्यांनी ताबडतोब यासंबंधीच्या कारवाईचा निर्णय जाहीर करावा अशी माझी मागणी आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, यासंबंधी सर्व मा.सदस्यांच्या भावना तीव्र आहेत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते आणि मा.विरोधी पक्ष नते श्री.नितीनजी गडकरी यांनी मांडलेला मुद्दा अत्यंत गंभीर आहे. काल याठिकाणी आपण पीठासीन अधिकारी म्हणून दुष्काळाच्या चर्चेच्या निमित्ताने निर्देश दिले होते. ते अधिकारी उपस्थित असतील किंवा नसतील परंतु त्या निर्देशाबद्दल वर्तमानपत्रातून टीकाटिपणी करणे आणि वर्तमानपत्रातून मुलाखत देणे हे शिष्टाचाराला धरुन नाही. सरकारी कर्मचा-याने काय केले पाहिजे आणि काय करु नये यासंबंधीचे नीतिनियम त्यांना माहीत नसतील तर त्याबाबत ताबडतोब त्या अधिका-याविरुध्द कारवाई केली पाहिजे, त्यांना निलंबित केले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सभागृहाबाहेर एखादा अधिका-याशी समजा आमच्यापैकी कोणी काही बोलले तर त्याला त्यांनी दबाव म्हणणे योग्य नाही आणि सभागृहातील चर्चेला दबाव म्हणणे हे तर निषेधार्ह आहे आणि निषिध्द मानले गेले पाहिजे. येथे चर्चा करतो म्हणजे तो कोणी तरी एक बादशहा आहे आणि त्यांनी काही तरी ठरविले आहे आणि आपण येथून त्याच्यावर दबाव आणतो आहोत अशाप्रकारचे स्वरुप मुखाखतीच्या माध्यमातून देण्याचा हा प्रयत्न आहे. वास्तविक सरकारी कर्मचा-याला मुलाखत देता येत नाही हा भाग वेगळा. येथे होणारी जी काही चर्चा आहे या चर्चेचे निमित्त करुन बोलले जाते, तो कोणीतरी बादशहा आहे आणि त्याच्यावर कोणी दबाव आणतो असे स्वरुप दिले आहे. हे अत्यंत निषधार्ह आहे. विशेषत: पीठासीन अधिका-यांबद्दल ही तर फार वेगळी गोष्ट झाली. येथे ज्यावेळी आम्ही चर्चा करतो त्यावेळी त्यांच्यावर दबाव येतो अशाप्रकारची अधिकाराची भावना आहे ती अत्यंत चुकीची आहे. आपण त्यांच्यावर ताबडतोब कारवाई केली पाहिजे अशी मागणी मागणी आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सर्व सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. ज्या ज्यावेळी प्रश्नांची सभागृहामध्ये कोंडी होते त्या त्यावेळी शासनाला निर्देश दिले जातात आणि जनसामान्याच्यादृष्टीने ते योग्य असते. याठिकाणी या सदनाचे नेते मा.उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत त्यांनी ताबडतोब त्यांच्या निलंबनाचे आदेश काढावेत अशी विनंती आहे.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, सकाळ या वर्तमानपत्रामध्ये असे लिहिले आहे की, "हया विषयाबाबत आपण श्री.वसंत डावखरे यांना जाऊन विचारावे." अशाप्रकारची भाषा वापरली आहे ती अशोभनीय भाषा आहे. त्यांना निलंबित केल्याशिवाय चौकशीही होऊ नये. त्यांना प्रथम निलंबित करावे आणि नंतर त्यांची चौकशी करावी अशी माझी आपल्याकडे मागणी आहे. सभागृहाचे नेते मा.उपमुख्यमंत्री आहेत त्यांनी याच्यासंबंधीचा निर्णय जाहीर करावा अशी माझी विनंती आहे.

श्री.अनंत तरे : या सभागृहामध्ये जे कामकाज होते त्या कामकाजासंबंधी एखाद्या अधिका-याने बाहेर बोलावे आणि ते सुध्दा पीठासीन अधिका-याबद्दल फक्त श्री.डावखरे या नावाने उल्लेख करणे म्हणजे आपला, सभापतींचा आणि या सदनाचा अवमान आहे. याठिकाणी सन्माननीय उपमुख्यमंपी बसलेले आहेत. त्यांनी कोणताही विचार न करता सदनाचा अवमान झालेला असल्यामुळे त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करावी अशी माझी मागणी आहे.

श्री.आर.आर.पाटील : सन्माननीय सभापती महोदय, पीठासीन अधिका-यांचा, सन्माननीय सभापती, सन्माननीय उपसभापतींचा सन्मान, सदनातील आम्ही सगळयांनी आणि शासनाच्या सगळयाच कर्मचा-यांनी करण्याची नितांत आवश्यकता आहे. आपण दिलेल्या निर्देशावर बाहेर मुलाखती दिल्या जात असतील तर ही बाब अतिशय गंभीर आहे. या सगळया गोष्टीची चौकशी करण्यात येईल आणि तातडीने कारवाई करण्याच्या सूचना देण्यात येतील.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : त्यांना निलंबित करावे व नंतर चौकशी करावी अशी माझी प्रमुख मागणी आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्याजवळ दैनिक सकाळचा अंक आहे. या अंकामध्ये पाटबंधारे विभागाचे हे जे उपअभियंता श्री.गाडेकरसाहेब आहेत, हो त्यांना साहेबच म्हटले पाहिजे, कारण ते आमच्याहून मोठे आहेत, प्रतिक्रिया व्यक्त करीत आहेत. त्यांनी सांगितले

अशुद्धारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

की, श्री.डावखरे यांनी देखील रब्बी हंगामाचे पैसे भरलेले नाहीत. मात्र ते पाणी सोडण्यासाठी दबाव आणतात. उपअभियंता श्री.गाडेकर ऐकत नाहीत आणि शेतक-यांच्या शेतीसाठी पाणी सोडणे आवश्यक आहे म्हणून काल यासंदर्भात या सभागृहात सभापतींनी निर्देश दिले होते.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

गाडेकर नावाच्या अधिका-याने दिलेली प्रतिक्रिया वृत्तपत्रातून छापून आलेली आहे. या डेप्युटी इंजिनिअरला अशा प्रकारे वर्तमानपत्रामध्ये प्रतिक्रिया देण्याचा अधिकार आहे काय ? या सर्वोच्च सभागृहामध्ये माननीय सभापतींनी दिलेल्या आदेशावर जेथे मा.मुख्यमंत्री काही बोलत नाहीत तेथे हा अधिकारी कोण ? तो वर्तमानपत्रातून आपली प्रतिक्रिया देतो. म्हणून या गाडेकरला निलंबित केले पाहिजे अशी सभागृहातील सर्व मा.सदस्यांनी भावना आहे.या गाडेकरला निलंबित करा आणि मग चौकशी करा. हे अधिकारी डोक्यावर बसले आहेत यांना जमिनीवर आणा. आम्ही राज्यकर्ते आहोत. आम्ही म्हणून तसे राज्य चालेल हे त्यांना कळू द्या. आपल्या सरकारमध्ये हे अधिकारीच राज्य चालवित आहेत. मंत्री महोदयांचे कोणी ऐकत नाही. म्हणून गाडेकरकला निलंबित करा आणि मग चौकशी करा.

उपसभापती : मा. सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी प्रश्न विचारला त्यासंदर्भात मी स्पष्टीकरण देत आहे की, माझ्यावर कोणतीही पाण्याची थकबाकी नाही. कालचा प्रश्न हा सर्वसामान्य शेतक-यांच्या हिताचा प्रश्न येथे उपस्थित झालेला होता. त्या भागातून सातत्याने शेतक-यांची पाण्यासंबंधी मागणी होती. काल दुष्काळाच्या संदर्भात चर्चा झाली त्यानुषंगाने मा.सदस्य श्री. निकोसे यांनी अधिका-यांच्या वर्तनाच्याबाबतीत प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी, पाणी वेळेवर देण्याचे वेळापत्रक ठरलेले आहे. त्यानुसार पाणी दिले जात नाही, म्हणून हे पाणी ताबडतोबीने द्यावे, अशा प्रकारच्या सूचना मी केलेल्या होत्या. तेव्हा मी याठिकाणी स्पष्ट करु इच्छितो की, माझ यावर शासनाच्या कोणत्याही खात्याची एका नव्यापैशाचीही थकबाकी नाही तसेच माझ्या कुटुंबीयांवर देखील कोणत्या प्रकारची थकबाकी नाही.

(अनेक मा.सदस्य आपापल्या जागेवर उठून "ही गंभीर बाब आहे" असे बोलत असतात)

प्रा. बी.टी.देशमुख : "डावखरे यांनी देखील रब्बी हंगामाचे पैसे भरलेले नाहीत" असे धडधडीत खोटे विधान केलेले आहे. खरे म्हणजे अशा प्रकारे त्याने बोलण्याचे कारण नव्हते. आपण पीठासीन अधिकारी आहात हा मुद्दा जरी बाजूला सोडला तरी कोणी पैसे भरले नसतील किंवा जे कोणी थकबाकीदार असतील त्यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई होते. परंतु सभागृहामध्ये जे बोलले गेले त्यानुषंगाने बाहेर शंभर टक्के असत्य विधान करणे हे अत्यंत गंभीर आहे. या गोष्टीची गांभीर्याने दखल घेतली पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन करताना "संबंधिताची चौकशी करुन नंतर कारवाई करु" असे सांगितले. वर्तमानपत्रामध्ये जे मॅटर छापून आलेले आहे ते वर्तमानपत्र आमच्याकडे आहे आणि ते वस्तुस्थिती स्पष्ट करणारे आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या सभागृहाच्या पीठासीन अधिका-यावर एक शासकीय अधिकारी धादांत असत्य असे आरोप करतो हे योग्य नाही. तेव्हा मा.सदस्य श्री. गिडवानी यांनी सुचविल्या प्रमाणे त्या अधिका-याला प्रथम निलंबित करावे आणि मग चौकशी करावी अशी माझी सूचना आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले की, या सगळया प्रकरणाकडे सरकार अतिशय गांभीर्याने बघत आहे. मी विरोधी पक्षाच्या मा.सदस्यांच्या इतकेच लक्षात आणून देऊ इच्छितो की, निलंबन एवढ्यासाठी करीत असतो की, तो अधिकारी चौकशीत अडथळा ठरु नये, अधिकाराचा दुरुपयोग होऊ नये. शासनाच्या चौकशीमध्ये हा एक डेप्युटी इंजिनिअर कोणता अडथळा आणू शकेल हाही महत्वचाचा प्रश्न असू शकतो. आपण निलंबनाच्या बाबतीत बोलतो. परंतु निलंबन केले तर त्याबाबतीत तातडीने स्थगिती मिळते. तेव्हा कायदेशीरपणे चौकशीची प्रक्रिया पूर्ण करु द्यावी. मी सांगू इच्छितो की, या प्रकरणी सभागृहाच्या ज्या अपेक्षा आहेत त्यापेक्षाही कडक कारवाई केली जाईल.

श्री. नितीन गडकरी : मी दैनिक "सकाळ"चा अंक मा. उप मुख्यमंत्र्यांना वाचायला दिला. उपसभापती महोदय आपणावर आणि आपल्या कुटुंबीयावर एक रुपयाचीही थकबाकी नसताना थकबाकी आहे असे त्या अधिका-याने मुलाखत देऊन सांगितले आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

पलिकडे जाऊन तो अधिकारी सांगतो की, श्री. वसंतराव डावखरे हे दबाव आणतात. तो अधिकारी भयंकर असे बोलला आहे ते वर्तमानपत्रात छापून आलेले आहे. जे छापून आलेले आहे तो खरा पुरावा आहे. आता आपण कशाची चौकशी करता ? त्याने वर्तमानपत्रात मुलाखत देणे हे कायदेशीररित्या योग्य आहे काय ? सभागृहात पाटबंधारे खात्यावर झालेल्या चर्चेनंतर या उप अभियंत्याने वर्तमानपत्राशी बोलून आपली प्रतिक्रिया देणे योग्य आहे काय ? दुसरी गोष्ट अशी की, माननीय उप सभापती यांच्या बाबतीत जे वाक्य त्यांनी वापरले आहे ते माननीय उप सभापतींची बदनामी करणारे आहे. ते वाक्य माननीय उप सभापतींचा अवमान करणारे आहे. या अधिका-याने अशा प्रकारचे वाक्य वापरणे हे योग्य आहे काय ? या दोन्ही गोष्टी वृत्तपत्रात छापून आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांनी माननीय उप सभापती यांचा 99 टक्के नव्हे तर 101 टक्के अवमान केल्याचे या बातमीवरुन सिध्द होते. त्या अधिका-याची चौकशीची काही गरज नाही. सन्माननीय श्री. आर.आर.पाटील साहेब मी "सकाळ" या वर्तमानपत्राचा डयुप्लीकेट अंक आपल्याकडे दिलेला नाही. मूळ अंक आपल्याकडे दिलेला आहे. माननीय श्री. पवार साहेबांचा "सकाळ" हा अंक आहे. त्यांच्या वृत्तपत्रात ही बातमी आलेली आहे. त्या अधिका-याची संपूर्ण प्रतिक्रिया या वृत्तपत्रात छापून आलेली आहे. विनोदाचा भाग सोडा. या अधिका-यांने वृत्तपत्रात मुलाखत दिली. सिव्हील ॲडमिनिस्ट्रटिव्ह प्रोसीजरच्या कायद्याप्रमाणे कुठल्याही शासकीय अधिका-याला वृत्तपत्रात मुलाखत देता येत नाही. दुसरी गोष्ट अशी की, या अधिका-याने सन्माननीय उप सभापती श्री. वसंतराव डावखरे यांच्या संदर्भात बदनामीकारक प्रतिक्रिया दिलेली आहे. माननीय श्री. वसंतराव डावखरे यांच्याकडे कुठल्याही प्रकारची थकबाकी नाही. कुठल्याही एका पैशाची लयबिलीटी नाही. असे असताना श्री. वसंतराव डावखरे हे पैसे भरत नाही अशा प्रकारची मुलाखत या अधिका-याने या वृत्तपत्रात दिलेली आहे. ही मुलाखत वस्तुस्थितीला धरुन नाही. माननीय उप सभापतींनी माझ्याकडे वा माझ्या परिवाराकडे एकाही पैशाची थकबाकी नाही असा खुलासा त्यांनी केलेला आहे. माननीय उप सभापती श्री. वसंतराव डावखरे यांच्याकडे थकबाकी नसताना या अधिका-याने सदर वृत्तपत्रामध्ये प्रतिक्रिया का व्यक्त केल्या ? एक तर या अधिका-यास प्रतिक्रिया देण्याचे अधिकार नाही. या अधिका-याने प्रतिक्रिया दिली ती बदनामीकारक दिली. एवढे असल्यावर तुम्ही कशाची चौकशी करता ? या दोन्ही गोष्टी खोटया आहेत काय ? माननीय श्री. डावखरे साहेब यांनी सांगितले तेही

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी..

खोटे आहे काय ? त्या अधिका-याने म्हटले ते खरे वाटते आहे काय ? त्या अधिका-याने काय प्रतिक्रिया दिली ती तुम्ही वाचली आहे. माननीय उप सभापती यांनी जो खुलासा या ठिकाणी केला तो देखील तुम्ही ऐकला आहे. या सगळया गोष्टी समोर तुमच्या समोर आहे.माझ्या पूर्ण विचाराप्रमाणे, कायद्याप्रमाणे तुमच्याकडे पूर्णपणे इव्हीडन्स उपलब्ध आहेत. या बाबतीत प्रथम त्यास निलंबीत करा. या सभागृहातील सन्माननीय सभापतींचा अवमान कोणी केला तर त्याची काय गत होते हा मॅसेज महाराष्ट्र राज्यात गेला पाहिजे. मी आपल्याकडून अपेक्षा व्यक्त करतो की, या अधिका-यास आजच्या आज निलंबीत करा एवढी कठोर कारवाई केली पाहिजे अशी माझी आपिणास विनंती आहे.

श्री. मधुकर चव्हाण : माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, याबाबतीत चौकशी करतो. माननीय उप सभापती श्री. वसंतराव डावखरे यांनी सदनाला जे सांगितले आहे हेही सुध्दा खरे आहे की खोटे हे तपासून बघावे लागेल असा त्याचा अर्थ होऊ शकतो. चौकशी म्हटली तर हाही मुद्दा आला.

श्री. आर.आर.पाटील : यासंदर्भात सोयीस्कर अर्थ काढण्यात काही अर्थ नाही. सभापती महोदय, आपण ज्या भावना व्यक्त केल्या, जे मत व्यक्त केले त्याच्याशी मी सहमत आहे.बातमी वृत्तपत्रात आली आहे. कुठलीही नैसर्गिक संधी न देता सस्पेंड केले तर स्टे मिळण्याची शक्यता आहे. मी सभागृहाच्या लक्षात आणून देतो की..

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती महोदय, सर्व सदस्यांची आणि सदनाची तशी इच्छा असेल तर त्या अधिका-यास निलंबीत करुन याबाबतची चौकशी करण्यात येईल.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.व मु.शी. : पॉईंट ऑफ इन्फरमेशनसंबंधी.

डॉ.दीपक सावंत (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचीत) : सभापती महोदय, मला पॉईंट ऑफ इन्फरेशनसंबंधीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. मघाशी जो मुद्दा चर्चिला गेला तसाच स्वरुपाचा माझा मुद्दा आहे. या सदनात काल आपण सभापतीस्थानी बसला होतात. त्यावेळी मेडीकल,इंजिनिअरींग आणि फार्मसीची सी.ई.टी.परीक्षा ही 7 मे ऐवजी पुढे ढकलावी अशा विषयाची लक्षवेधी सूचना सभागृहात मांडली होती. एकाच दिवशी ब-याच परीक्षा असल्यामुळे ती परीक्षा पुढे करावी अशी मी सन्माननीय मंत्र्यांना विनंती केली होती. या राज्याचे डायरेक्टर ऑफ मेडीकल एज्युकेशन यांनी या सभागृहात झालेल्या चर्चेचा कुठलाही परामर्श न घेता वृत्तपत्रात स्टेटमेंट केलेले आहे की, "मी श्री.तायडे, असे सांगतो की, अशा अशा प्रकारे परीक्षा पुढे ढकलली गेली आहे." सभापती महोदय, लोकांच्या जिव्हाळयाचे प्रश्न आम्ही या सभागृहात आणतो. त्या प्रश्नावर या सदनात चर्चा घडवून मांडतो. वेगवेगळी आयुधे वापरुन सभागृहात प्रश्न सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो. या ठिकाणी झालेल्या चर्चेच्या संदर्भातील निर्णय संबंधीत मंत्र्यांनी घोषीत केला तर ते ठीक आहे. परंतु शासकीय अधिका-याने अशा प्रकारचे स्टेटमेंट वृत्तपत्रात छापून आणणे हे बरोबर नाही. वृत्तपत्राने त्यांचे स्टेटमेंट पहिल्या पानावर छापले आहे. जर अधिकारी परस्पर अशी माहिती वृत्तपत्रांना देत असतील तर आम्ही या ठिकाणी चर्चा उपस्थित करुन काय उपयोग आहे? सभापती महोदय, कोणाला क्रेडीट द्यावे वा कोणाला क्रेडीट देऊ नये हा प्रश्न येत नाही. हा भावनेचा प्रश्न आहे. आम्ही लक्षवेधी सूचना सभागृहात मांडतो. ती मांडण्यामागची भावना लक्षात घेतली पाहिजे. वैद्यकीय विभागाच्या वरिष्ठ अधिका-याने वृत्तपत्रात अशा प्रकारचे स्टेटमेंट देणे हे चुकीचे आहे. त्यावर आपण तोडगा काढावा अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. उपरे..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी हा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला आहे. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, काल या सदनामध्ये यावर चर्चा झाली. सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील हे या ठिकाणी होते. त्यांनी उत्तर देताना असे सांगितले की, मी आपल्याशी चर्चा करतो. इंजिनियरिंग आणि मेडिकलच्या परीक्षांचे एकाच दिवशी सहा पेपर न होता त्या वेगवेगळ्या दिवशी व्हाव्यात अशा प्रकारची सूचना होती. त्यासंदर्भात आपण चर्चा करू आणि त्यानंतर आपण निर्णय घेऊ असा शब्द दिला होता. रात्रौ 10.30 च्या अल्फा बातम्यांमध्ये मी सन्माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील यांना हे जाहीर करताना पाहिले आणि ताबडतोब डॉ.दीपक सावंत यांना फोन लावला. फोनवर मी त्यांना असे सांगितले की, मंत्री महोदय आता जाहीर करीत आहेत आणि मी स्वत: टी.व्ही.वर पहात आहे. शब्द दिल्यानंतर याचा निर्णय झालेला नाही, याची घोषणा या सभागृहात झालेली नाही. अशी घोषणा या सदनामध्ये होण्यापूर्वी सदनाच्या बाहेर होणे हे औचित्त्यालाही धरून नाही, सभागृहाच्या हक्कांचाही प्रश्न निर्माण होतो. त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे तो अधिका-यांबद्दल आहे आणि मंत्री महोदयांनीसुध्दा त्या चॅनेलच्या माध्यमातून सांगितले आहे हे मी आपल्या निदर्शनास आणून देतो.

डॉ.दीपक सावंत : सभागृहात झालेली एखादी घटना जर एखादा अधिकारी बाहेर जाऊन सांगत असेल की, आम्ही केली आणि करायच्या अगोदरच सांगितली. हे चुकीचे आहे. याबाबत हक्क भंग आणायचा असेल तर आणता येईल. कारण ते आयुध आमच्याकडे आहेच.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: श्री.नितीन गडकरी यांच्या अटक व सुटकेबाबतच्या घोषणेसंबंधी.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षाचे नेते श्री.नितीन गडकरी यांना अटक झालेली आहे आणि त्यांना ताबडतोब सोडून देण्यात आलेले आहे. पण त्यांच्या घोषणेमध्ये विधान परिषद सदस्य असा उल्लेख केलेला आहे. तरी विधान परिषदेच्या विरोधी पक्ष नेते पदाचा त्यांनी राजिनामा दिलेला आहे काय ? ते अजून विरोधी पक्ष नेते आहेत ना?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी जो प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे तो या सदनाशी संबंधित आहे. त्यांनी राजिनाम्याच्या संदर्भात जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत आम्हांलाही जाणून घ्यायचे आहे की, नेमके त्यांना काय विचारावयाचे आहे ?

श्री.नितीन गडकरी : त्यासंदर्भात मी आपल्याला सांगतो. माझ्या नंतर जे विरोधी पक्षाचे नेते बनणार आहेत त्यांनी 30 तारखेनंतरचा मुहूर्त निवडलेला आहे म्हणून मी राजिनामा दिलेला नाही. ते ज्या दिवशी म्हणतील त्या दिवशी मी राजिनामा द्यावयाला तयार आहे. ते आज म्हणाले तर आज द्यायला तयार आहे. पण त्यांची इच्छा 30 तारखेला हे पद ग्रहण करण्याची इच्छा आहे. मी विरोधी पक्षाच्या नेते पदाचा राजिनामा देण्याचे पक्के आहे.

उप सभापती : याची कामकाजात नोंद करू नका.

श्री.नितीन गडकरी : पण माझ्या विरोधी पक्ष नेते पदाचे तुम्हांला टेन्शन का ? मी केव्हा जातो ही वाट तुम्ही का पहात आहात ? माझा आपल्याला फार त्रास होत आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांचा काय फायदा आहे ? सेनेकडे विरोधी पक्ष नेते पद देण्याचे ठरले आहे काय ? याचा खुलासा झाला खुलासा झाला तर बरे होईल.

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अधिवेशन काळात येणा-या मोर्च्यांची निवेदने स्वीकारण्याबाबत.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, या ठिकाणी मला आपल्याला एक विनंती करावयाची आहे. ज्यावेळी आपले नागपूर अधिवेशन असते त्यावेळी अनेक मोर्चे त्या ठिकाणी येत असतात आणि त्या मोर्च्याना निवेदने द्यावयाची असतात. अनेक लोकांना भेटायचे असते. गेल्या वेळेला एका आदिवासी महिलेचा मृत्यूसुध्दा त्या ठिकाणी झालेला होता. गेल्या काही दिवसांमध्ये मुंबई येथील आझाद मैदानावर रोज वेगवेगळे मोर्चे येत आहे. काल अंगणवाडी शिक्षीकांचा मोठा मोर्चा आला होता. सोमवारी शिक्षकांचा मोर्चा आला होता. तरी माझी आपणामार्फत शासनाला अशी विनंती आहे की, या मोर्चेक-यांची निवेदने स्वीकारण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने विचार केला पाहिजे आणि दररोज ही निवेदने स्वीकारली गेली पाहिजेत. लोक ज्या अपेक्षेने या अधिवेशनापर्यंत येऊन पोहोचतात त्यांच्या प्रश्नांची अधिकृतपणे दखल घेण्याची व्यवस्था झाली पाहिजे.त्याबद्दलच्या योग्य त्या सूचना आपण शासनाला द्याव्यात अशी माझी आपल्याला विनंती आहे.

उप सभापती : सजेशन फॉर ॲक्शन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्त्याच्या मुद्याबाबत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्री या ठिकाणी आहेत. तरी मी जो मुद्दा उपस्थित करीत आहे त्याकडे त्यांनी लक्ष द्यावे.

श्री.जयंत पाटील : माझे लक्ष तुमच्याकडेच आहे. कारण विरोधी पक्ष नेते म्हणून आपले फार थोडे दिवस राहिले असल्यामुळे अधिक लक्ष देण्याचे मी मघापासून ऐकत आहे. तुम्ही आहात याचा आम्हांला आनंद आहे. दु:ख आणि भीती वाटत नाही. उलट तुम्ही असावे. आपल्या पक्षात दुरुस्त्या करण्यासाठी आमची मदत लागली तर सन्माननीय उप मुख्यमंत्री आर.आर.पाटील हेसुध्दा मदत करतील.

श्री.नितीन गडकरी : तुम्ही फक्त एवढेच काम करा. गेल्या दोन वर्षापासून दरवेळी आम्ही सांगतो की, आम्हाला राज्यपालांचे निर्देश, अनुपालन समितीचा अहवाल आणि तुमची इरिगेशनची जिल्हावार अलौटमेंट मिळणे आवश्यक आहे. पण यातील राज्यपालांचे निर्देश मिळाले.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ....

बाकीच्या दोन गोष्टी अजून पर्यन्त मिळालेल्या नाहीत. दरवर्षी आम्ही सभागृहाचे कामकाज यासाठी रोखून धरत असतो याही वेळा तसे केलेले आहे परंतु तरीही ती कागदपत्रे अजूनपर्यन्त आम्हाला मिळालेली नाही.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, काल हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता आणि त्यावेळी सन्माननीय वित्त राज्य मंत्र्यांनी कागदपत्रे देण्याचे मान्य केलेले आहे. चर्चा सुरु होण्याच्या अगोदर आपल्याला ही कागदपत्रे देण्याची व्यवस्था के ली जाईल.काल कमिटमेन्ट केले होते व त्याप्रमाणे काल माहिती देण्यात आली होती .उरलेली माहितीसुध्दा आज देण्यात येईल असे काल संध्याकाळी त्यांनी मला ब्रीफ केले होते. आज ती माहिती मिळेल याची आम्ही व्यवस्था करु.

श्री.नितीन गडकरी : अजून माहिती मिळालेली नाही.ती लगेच देण्यात यावी.

श्री.जयंत पाटील : आपल्याला ती माहिती आज मिळणारच आहे. आज ही माहिती तात्काळ देण्याचा आम्ही प्रयत्न करु .

उप सभापती : माननीय अर्थमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की त्यासाठी दोन दिवसाची मुदत देण्यात आलेली आहे.

श्री.जयंत पाटील :ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.मघाशी गॅझेट संबंधीचा उल्लेख करण्यात आला होता.आता दैनिक लोकमत हे दुसरे गॅझेट आहे.या लोकमत वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर अशी बातमी आली आहे की," मोहनदास करमचंद गांधी हे जीवंत असून त्यांनी नुकतचे रेशन कार्ड काढलेले आहे." नागपूर व औरंगाबादच्या रेशनिंग ऑफिसमधून महात्मा गांधी यांच्या नावाने कस्तुरबा गांधी यांच्या नावाने वा त्यांच्या मुलांच्या नावाने रेशनकार्ड 800 रुपयामध्ये उपलब्ध होते. या देशातील प्रत्येक व्यक्तीला महात्मा गांधीबद्दल माहिती आहे आणि असे असतांना त्यांच्या नावाने खोटे रेशन कार्ड बनविले जाते. गेल्या वर्षी सुध्दा त्यांच्या नावाने दारुचे परमिट मिळाले असल्याचे माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी सांगितले होते व ते परमिट येथे आणून दाखविले होते. त्याबाबत पुढे काय कारवाई करण्यात आली होती. यासंबंधीची माहिती मिळाली नाही. आता महात्मा गांधीच्या नावाने रेशन कार्ड कार्ड मिळत आहे. अशा प्रकारे 700 - 800 रुपये देऊन खोटी रेशन कार्डस दिली जातात त्यावरुन पासपोर्ट तयार केले जातात . गुन्हेगारी जगताला सहजपणे या गोष्टीची उपलब्धता होत असते.यामध्ये काही ठिकाणचे राजकीय पक्षाचे पुढारीसुध्दा गुंतलेले असतात. आपल्या मतदारसंघातील मतदार यादीमध्ये अशा प्रकारच्या व्यक्तींची नावे घुसविण्याचा प्रयत्न होत असतो.हे दुस-या कोणत्या पक्षाचे वर्तमानपत्र नाही.आपल्याच लोकांनी ही बाब निदर्शनास आणलेली आहे .तेव्हा हे लक्षात घेऊन शासनाने यासबंधीची काही माहिती घेतली आहे काय ? सभागृहाचे नेते आम्हाला याबाबतीत काही अवगत करु शकतील काय ?

उप सभापती : या संदर्भात चौकशी करण्यात यावी.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, याबाबतीत चौकशी करण्यात येईल. परंतु यानंतर दुसरे गॅझेट असा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला होता..

श्री.विनोद तावडे : मी कोणत्याही वर्तमानपत्राचा उल्लेख केला नाही. माझ्या म्हणण्याचा उद्देश तसा नव्हता.

श्री.आर.आर.पाटील : आपल्या म्हणण्याचा तसा उद्देश नसेल आणि महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसांची ही गॅझेटस आहेत अशा प्रकारे जर आपण सकाळ आणि लोकमत या वृत्तपत्रांचा उल्लेख करणार असाल तर मी आपल्याला धन्यवाद देईन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे :सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा आहे. लोकशाही आघाडीचे सरकार हे नेहमी महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव कामकाज करीत असते परंतु या राज्यात 21 व्या शतकामध्ये सार्वजनिक ठिकाणी दलितांना पाणी भरु दिले जात नाही. सातारा जिल्हयातील जावळी तालुक्यात मेरुलींग हया गावात असा प्रकार आजही घडत आहे.त्या गावाजवळ नरबदेव नावाची वाडी आहे .अत्यंत दुर्गम भागात हे गाव असून तेथे दलितांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्यास परवानगी नाही. त्यांना अजूनही वरुन पाणी दिले जाते. दलित महासंघाने याबाबत आंदोलनाचा इशारा दिला आहे.मला या बाबतीत शासनाला अशी विनंती करावयाची आहे की, यामध्ये तथ्य आहे किंवा नाही याची शासनाने चौकशी करावी व खरोखरच असे घडत असेल तर संबंधितावर कारवाई करावी.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, ही खूपच गंभीर बाब आहे. आजही पाणवठ्यावर दलितांना पाणी भरू दिले जात नसेल तर पुरोगामी महाराष्ट्राला हा कलंक आहे आणि या घटनेची चार दिवसात एस.पी. स्वत: जाऊन चौकशी करतील आणि जे कोणी दोषी असतील त्यांचेवर याबाबतीत जेवढे म्हणून कायदे आहेत त्यांचा वापर करून कडक कारवाई करण्यात येईल.

****

..... एस 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सभागृहाच्या दिनदर्शिकेचे सुधारित वेळापत्रक</u> ...

उपसभापती : सन्माननीय वित्त मंत्र्यांनी या ठिकाणी मला विनंती केली आहे की, सभागृहाच्या बैठकांची दिनदर्शिकेमध्ये थोडा बदल करून अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा जी गुरूवार, दिनांक 24.3.2005 रोजी सुरू केली जाणार आहे त्या ऐवजी सोमवार, दिनांक 28.3.2005 पासून सुरू करावी आणि 30 मार्च 2005 पर्यंत अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा संपवावी आणि 30 मार्च 2005 रोजीची शासकीय विधेयकासंबंधातील बाब गुरूवार, दिनांक 24 मार्च 2005 रोजी घेण्यात यावी. त्यांच्या या सुचनेला सन्माननीय विरोधी पक्षनेता व इतर नेत्यांनीही मान्यता दिलेली आहे.

तेव्हा माननीय वित्तमंत्र्यांच्या विनंतीनुसार मी सभागृहाच्या कामकाजाचे गुरूवार, दिनांक 24 मार्च 2005 ते बुधवार, दिनांक 30 मार्च 2005 पर्यंतचे सुधारित वेळापत्रक सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करीत आहे.

गुरूवार, दिनांक 24	:	1) सन 2004-05 चे पुरवणी विनियोजन विधेयक. 2) शासकीय विधेयके.
शुक्रवार, दिनांक 25	:	सुट्टी (गुड फ्रायडे)
शनिवार, दिनांक 26	:	बैठक होणार नाही.
रविवार, दिनांक 27	:	सुट्टी.
सोमवार, दिनांक 28	:	अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला दिवस)
मंगळवार,दिनांक 29	:	अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा दिवस)
बुधवार, दिनांक 30	:	1) अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (तिसरा व शेवटचा दिवस)
	:	2) लेखानुदान विनियोजन विधेयक.

आता मी सभागृहाचे सुधारित वेळापत्रक संमत करावे असा प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला. .... एस 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. राण जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे सन 1996-97 व 1997-98 तसेच मराठवाडा कृषी विद्यापीठाचे सन 2000-01 या वर्षांचे वार्षिक लेखे आणि लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक लेखे व लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत. उक्त अहवालाच्या प्रती खर्चाच्या बचतीच्यादृष्टीने सर्व सदस्यांसाठी छापून उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. संबंधित कृषी विद्यापीठांना तशी परवानगी देण्यात आलेली आहे. माननीय सदस्यांना ग्रंथालयामध्ये काही प्रती उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

****

नियम 93 अन्वये सूचना.....

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी "केंद्र शासनाच्या सुधारित शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनास नुकतेच प्राप्त झालेले 139 कोटी रुपये दिनांक 31 मार्च 2005 पूर्वी खर्च न केल्यास व्यपगत होतील असे भासवून सदर रकमेचे सुरू असलेले गैरवाजवी व अनावश्यक वाटप व भ्रष्टाचार." याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा विषय नियम 93 खाली येत नसल्याने मी या सुचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र बाब गंभीर असल्याने शासनाने याबाबत निवेदन करावे असे सांगतो.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री अनंत तरे व इतर यांनी "दिनांक 22.3.2005 रोजी नवी मुंबई येथील वाहतूक पोलीस निरीक्षक श्री.सुरेश खेडकर यांच्यावर अज्ञात इसमांनी गोळी झाडून केलेला जीवघेणा हल्ला." याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हाही विषय नियम 93 खाली येत नाही सबब मी या सुचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र हा विषय गंभीर असल्याने शासनाने याबाबत गांभीर्याने लक्ष घालण्यास मी सांगतो. ...

.... एस 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : अध्यक्ष महाराज, पोलीस निरीक्षकावर गोळ्या झाडण्यात आलेल्या आहेत याच प्रकारे यापूर्वी केबल ऑपरेटरवर देखील हल्ला झालेला होता. हे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत तेव्हा याबाबत शासनाकडून निवेदन होणे आवश्यक आहे.

उपसभापती : ठीक आहे. शासनाने याबाबत निवेदन करावे.

श्री. आर.आर.पाटील : ठीक आहे.

उपसभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे व इतर यांनी "राज्यातील खाजगी माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांच्या वेतनेतर अनुदानाचा उर्वरित निधी त्वरित वितरित करण्यात यावा या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक मंडळाने दिनांक 5 मार्च 2005 पासून सुरू केलेले राज्यव्यापी आंदोलन." याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा विषय नियम 93 खाली येत नसल्याने मी या सुचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र बाब गंभीर असल्याने शासनाने याबाबत निवेदन करावे असे मी सांगतो.

सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे व इतर यांनी " राज्यात शिधावाटप पत्रिकेचे वाटप करताना शिधावाटप कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दलालांच्या संगनमताने बोगस कार्ड देणे, औरंगाबाद येथे एका शिधावाटप पत्रिकेवर मोहनदास करमचंद गांधी यांचा उल्लेख आढळून येणे." या बाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हाही विषय नियम 93 खाली येत नाही. शिवाय यासंबंधात आताच येथे चर्चा झाली आहे ....तेव्हा मी या सुचनेस अनुमती नाकारीत आहे. ..

(यानंतर श्री.जागडे ....टी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, यावर निवेदन करण्यास सांगावे. कारण मुंबईत सुध्दा असे घडत आहे. 600 रुपयांना आज शिधापत्रिका मिळत आहेत.

उपसभापती : या बाबत चर्चा झाली आहे. शासन या बाबत चौकशी करणार आहे.

यानंतर माननीय सदस्या श्रीमती संजिवनी रायकर यांनी " मुंबईतील चर्नीरोड येथील बालभवनच्या मालकीच्या सुमारे 3 कोटी रुपयांच्या जागेवर सलाम बालम ट्रस्टने केलेले अनधिकृत बांधकाम तसेच सदर जागा या खाजगी ट्रस्टच्या ताब्यात जाण्याचा निर्माण झालेला धोका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा विषय नियम 93 च्या सूचनेचा होत नाही. शासनाने यावर निवेदन करावे. मी या सूचनेस अनुमती नाकारतो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, पुलगाव येथे झालेल्या बॉम्बस्फोटामुळे संपूर्ण गाव स्थलांतरीत करावे लागले आहे. त्याबद्दल मी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, मुळशी येथे कॉपी करण्याचा जो प्रकार झाला आहे, त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विषयाबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तसेच खोपोलीमध्ये विद्यार्थी आणि पालकांनी 14 आत्महत्या केल्या आहेत, त्या विषयाबाबत मी नियम 93 अन्वये सूचना दिलेल्या आहेत. हे विषय गंभीर आहेत, असे आपल्याला वाटत नाही काय ?

उपसभापती : या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

-

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुल्यवर्धीत करप्रणालीमध्ये पेट्राल आणि डिझेलचा समावेश नसणे.

मु.शी.: मुल्यवर्धीत करप्रणालीमध्ये पेट्राल आणि डिझेलचा समावेश नसणे या बाबत श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. जयंत पाटील (वित्तमंत्री) : अध्यज महोदय, श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी मुल्यवर्धीत करप्रणालीमध्ये पेट्राल आणि डिझेलचा समावेश नसणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून आपज निर्देश दिल्याप्रमाजे मला निवेदन ज्ञ रावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अजोदरच वितरीत जेलेल्या असल्यान मी हे निवेदन सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, राज्याने मुल्यवर्धीत करप्रणाली लागू केली आहे. परंतु त्यामधून पेट्राल आणि डिझेलला वगळले आहे. आज पेट्रोल व डिझेलवर 40 टक्के कर आहे. आता पुन्हा पाच रुपयाची वाढ होणार आहे. दुचाकी वापरणा-या सर्वसामान्य जनतेला याचा फटका सोसावा लागणार आहे. सर्व राज्यात सारखेपणा यावा म्हणून मुल्यवर्धी करप्रणाली लागू करण्यासाठी दोन वर्षाचा कालावधी गेला आहे. म्हणून माझा असा प्रश्न आहे की, 1 एप्रिलपासून मुल्यवर्धीत करप्रणाली सुरु करीत असताना त्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा समावेश करणार आहांत काय ? 1 एप्रिलपासून लागू होणा-या मुल्यवर्धीत करप्रणालीमध्ये सारखेंपणा येण्यासाठी सर्व गोष्टींचा समावेश करण्यात येणार आहे काय ?

(यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे आहे...

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, माझ्या आधीच्या प्रश्नाला जोडूनच मी पुन्हा विचारु इच्छितो की, मी 14 मार्चला शासनाला पत्र लिहिले आहे. त्यामध्ये होणाऱ्या नुकसानीच्या परिणामाबाबत मुद्दा उपस्थित केला आहे. हा विषय गंभीर असल्यामुळे आणि 1 तारखेपासून वॅट लागू होणार असल्यामुळे पेट्रोल व डिझेलवर 20 टक्के विक्री कर लावणार काय?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, त्याचा समावेश होऊ शकत नाही. याची दोन महत्वाची कारणे अशी की, मुंबईमध्ये सद्या डिझेलवर 34 टक्के व पेट्रोलवर 30 टक्के कर आहे व मुंबईबाहेर पेट्रोलवर 29 टक्के व डिझेलवर 31 टक्के कर आहे, त्यामध्ये 1 रुपया अधिभार आहे.

(सभापतीस्थानी मा. तालिका सभापती श्री. अनंत तरे)

आम्ही केंद्र सरकारसमोर एम्पॉवर कमिटीमध्ये हा प्रस्ताव मांडला आहे की, डिझेलवर व पेट्रोलवर 20 टक्के कर लावावा आणि जे नुकसान होईल तो कॉंपेसेशन त्यांनी वर्ग करावा. देशातील बऱ्याच राज्यांमध्ये 20 टक्क्यापेक्षा जास्त रेट आहे. काही राज्यांमध्ये कमी देखील रेट आहे. त्यामुळे 20 टक्के पेट्रोल व डिझेलवर टॅक्स लावावा अशाप्रकारची कल्पना ज्या राज्यांमध्ये 20 टक्क्यापेक्षा कमी रेट आहे त्यांना मान्य झाली नाही. ज्या राज्यांमध्ये जास्त रेट आहे त्या सर्व राज्यांनी असे सांगितले की, यामध्ये आम्हाला कॉंपेसेशन मिळणार असेल तर त्याचा विचार करु. मागच्या बैठकीमध्ये या रेटवर चर्चा होत असतांना डिझेल व पेट्रोल या दोन विषयांवर जे टॅक्सेस आहेत ते जर 20 टक्क्यापर्यंत सीमित ठेवलेतर उरलेल्या रकमेचे होणारे नुकसान तीन वर्षात कॉंपेसेट करण्याच्या फॉर्म्युल्यामध्ये स्वीकारावा अशी आम्ही आग्रहाची विनंती केली . त्याबाबत मी मघाशी सांगितलेल्या कारणांमुळे एम्पॉवर कमिटीमध्ये एकमत होऊ शकले नाही. उद्या माननीय केंद्रीय वित्त मंत्र्यांबरोबर दिल्ली येथे देशातील सर्व अर्थमंत्र्यांची बैठक होणार आहे. त्या बैठकीमध्ये हा मुद्दा पुन्हा मांडण्यात येणार आहे. मला मान्य आहे की, इतर राज्यांपेक्षा आपल्या राज्यांमध्ये जास्त टॅक्स आहे. आपल्या राज्यामध्ये इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये आपण तेवढयाच मोठया प्रमाणात गुंतवणूक यापूर्वी केली आहे. आणि त्यामुळे वाढलेली गुंतवणूक रिपे करण्यासाठी हे आपले एक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

महत्वाचे टूल आहे. त्यामुळे बॉर्डरवर असलेल्या राज्यात बाहेरच्या राज्यातून पेट्रोल व डिझेल आणण्यात येते याची देखील बऱ्याच माननीय सदस्यांना माहिती आहे. त्याबाबत अनेक वेळा आपली अनौपचारिक रित्या चर्चा झाली आहे. आणि या तेल कंपन्यांकडून डायरेक्ट टॅक्स आपण वसूल करतो त्यांच्याबरोबर बसून मी मागील वर्षी त्याचे ॲनालिसीस केले आणि किती टक्क्यांनी रेट कमी केला तर कोणतेही रेव्हेन्यूचे नुकसान न होता किती परसेटेंज कमी होईल आणि कंझम्शन वाढेल, त्याबाबत तेल कंपन्यांनी बरेचसे ॲनालिसीस केले. ते केल्यानंतर काही परसेंटेज त्यांनी कमी केलेतर लॉस भरुन निघेल याची हमी दिली नाही. यासाठी आमच्या दोन बैठका झाल्या आहेत. मला याची जाणीव आहे, आपल्यालाही त्याची जाणीव आहे. व त्या जाणीवेतून आपण ही सूचना दिलेली आहे. त्यामधील गांभीर्य आणि आशय मला मान्य आहे. आपल्या इकॉनॉमीमध्ये सोर्स ऑफ रेव्हेन्यू मोठे आहे. त्या सोर्स ऑफ रेव्हेन्यूबाबत आपण ज्यावेळी निर्णय करु त्यावेळी राज्याच्या अर्थ व्यवस्थेवर परिणाम होणार नाही अशारितीने काळजीपूर्वक हा विषय घ्यावा असाच माझा व माझ्या सरकारचा प्रयत्न आहे. म्हणून आपण मांडलेला विषय योग्य आहे त्यामध्ये कॉंपेसेशनला अद्याप वाव नसल्यामुळे त्यावर सद्या निर्णय करता येणार नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हा कर 40 टक्क्यावरुन 20 टक्क्यावर आणलातर सरकारला किती नुकसान सोसावे लागेल? मंत्रिमहोदयांनी निवेदन करतांना सांगितले की, परराज्यातून चोरट्या मार्गाने पेट्रोल व डिझेल येते त्यावर कमी विक्रीकर आकारला जातो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

तेथून चोरटया मार्गाने पेट्रोल आणि डिझेल येथे येत आहे. अशा प्रकारे चोरटया मार्गाने किती पेट्रोल आणि डिझेल येत आहे याचा शासनाने सर्व्हे केला आहे का ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी कधी असे म्हटलेले नाही की, चोरटया मार्गाने पेट्रोल आणि डिझेल येत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय म्हणाले . . . .

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, बॉर्डरवरील वाहने पलिकडे जाऊन पेट्रोल आणि डिझेल भरतात अशी माहिती किंवा अशी चर्चा माननीय विरोधी पक्षनेत्यांबरोबर झालेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण नागपूरच्या अधिवेशनामध्ये चर्चा केली होती आणि मागच्या वेळी याबाबतीत सभागृहामध्ये सांगितले होते की, अनेक वस्तू विषेषत: पेट्रोल आणि डिझेल चोरटया मार्गाने येते आणि आपण वॅट प्रणाली आणली तर हे प्रमाण कमी होईल आणि आपला लॉस जाईल असेही आपण म्हटले होते. याबाबतीत शासनाने गांभीर्याने अभ्यास करुन एकंदर किती लॉस होईल? म्हणजे चार हजार कोटी आहे की आठ हजार कोटी आहे? म्हणजे त्याप्रमाणे केंद्र शासनाकडे मागणी करता येईल. तर तसा अभ्यास, सर्व्हे किंवा पाहणी शासनाने केली आहे का ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, याबाबतीत ॲनलेसिस् काय केले ? हा प्रश्न विचारण्यापूर्वीच मघाशी मी उल्लेख केला आहे की, आपण हे ॲनलेसिस् केले आहे की, परसेंटेज रिडक्शन किती केले तर काय लॉस होईल ? त्यांनी उल्लेख केला आहे की, 40 पासून 20 पर्यंत आलो म्हणजे जवळजवळ 50 परसेंट म्हणजे आपले साधारणपणे दोन-अडीच हजार कोटी रुपये इ ाटकन कमी होऊ शकतात. त्यामुळे यावर निर्णय घेताना दोन्ही गोष्टींचा म्हणजे कन्झमशन वाढेल अशा बाबतीत विचार असणे आणि सन्माननीय सदस्य श्री.गिडवाणी यांनी जी मूळ सूचना केलेली आहे, तर कॉम्पनसेशन फॉर्म्युल्यात पेट्रोल-डिझेलचा अंतर्भाव झाला तर हा निर्णय करु शकू. पण तो निर्णय होणे एवढे सोपे नाही. मात्र आपण याबाबतीत प्रयत्न करीत आहोत. पण त्याला अजून यश मिळालेले नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शेजारील राज्यामध्ये म्हणजे आंध्र प्रदेश, गुजराथ, कर्नाटक याठिकाणी किती टॅक्स आहे ?

. . . .व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, शेजारील राज्यांमध्ये किती टॅक्स आहे याची आकडेवारी आता माझ्याकडे नाही. पण 26 टक्के, 28 टक्के, 32 टक्के याप्रमाणे आहे. गुजराथ मध्ये ब-यापैकी आहे. सन्माननीय सदस्यांना पाहिजे असेल तर मी ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची व्यवस्था करेन.

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, मी माननीय वित्तमंत्र्यांना सांगू इच्छितो की, सध्या देशामध्ये पेट्रोल, डिझेल वरील सेल टॅक्सचा दर महाराष्ट्रात सर्वात जास्त आहे. आताच असे सांगण्यात आले की, मुल्यवर्धीत करप्रणालीतून पेट्रोल आणि डिझेलला वगळण्यात आलेले आहे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, जर आपण हा दर कमी केला म्हणजे आंध्र प्रदेश, गुजराथ इ. राज्यांमध्ये जो दर आहे, अगदी 20 टक्क्यापर्यंत आणू नका. पण इतर राज्यात जे दर आहेत, तो दर येथे लागू केला तर सध्या महाराष्ट्रात बाहेरच्या राज्यातून ज्या गाडया किंवा मोठी वाहने येत असतात. पण महाराष्ट्रात जास्त दर असल्यामुळे ते आंध्र प्रदेशच्या बॉर्डरवर, गुजराथच्या बॉर्डरवर पेट्रोल आणि डिझेल भरतात आणि त्यामुळे टर्न ओव्हरवर बराच परिणाम होतो. तसेच तेल कंपन्यांनीही सांगितलेले आहे की, आपण जर हा दर कमी केला तर निश्चितच त्या कंपन्यांच्या सेलमध्ये वाढ होईल. तेव्हा गुजराथ, आंध्र प्रदेश इ.राज्यांमध्ये जो दर आहे, त्याप्रमाणे आपल्या राज्यामध्येही दर ठेवला तर निश्चितच महाराष्ट्राच्या महसुलात वाढ होईल असे मी खात्रीपूर्वक सांगतो. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी हे दर कमी करावेत अशी माझी विनंती आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी विनंती केली आहे, त्याप्रमाणे ॲनलेसिस् केले होते. आपण शेजारच्या राज्यांच्या लेव्हलवर गेलो तर लॉस ऑफ रेव्हीन्यू किती आहे ? लॉस ऑफ कन्झमशन वाढल्यामुळे लॉस ऑफ रेव्हीन्यू भरुन निघेल का ? तर याला यश येत नाही. त्यामुळे तसे होत नाही असे ऑईल कंपन्यांनी सांगितल्यामुळे आपण टॅक्स कमी केलेला नाही. माझ्याकडे शेजारच्या राज्यांमधील दराच्या बाबतीत माहिती प्राप्त झाली आहे. त्यानुसार राजस्थान मध्ये पेट्रोलवर 26.45 टक्के, डिझेलवर 18.40 टक्के कर आहे. कर्नाटकमध्ये 26.25 व आंध्रमध्ये 30.55 टक्के आहे. तामिळनाडू मध्ये 30 टक्के आहे, गुजराथ मध्ये 24 टक्के आहे, मध्य प्रदेशमध्ये 28.75 टक्के कर आहे.पण . . . .

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, हे पेट्रोलच्या बाबतीत आहे.

. . . .व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणतात, त्याप्रमाणे रिडक्शन केले तर आपल्या बॉर्डरच्या पेट्रोल पंपावरील बिझनेस वाढून आपला रेव्हीन्यू वाढेल आणि हे सहजगत्या होईल असे आपल्याला वाटत आहे. पण याबाबत ॲनलेसिस करण्यात आले असता ऑईल कंपन्यांनी त्याला होकार दिला नाही. तसे होणार नाही असे त्यांनी सांगितले.

यानंतर श्री.किल्लेदार . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश जेथलिया : आपण एक वर्ष प्रयोग करुन पहावे. निश्चितच आपल्याला उत्पन्नात वाढ झालेली दिसेल.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांचा स्वत:चा पेट्रोल पंप आहे. त्यांच्या पेट्रोल पंपावर वर्षाचे जे कन्झमशन होते, ते त्यांना कमी झाल्याचे दिसून आलेले आहे. वाहतूकदार आपल्या ट्रकमध्ये आंध्रप्रदेशमध्ये पेट्रोल भरतात आणि नंतर थेट गुजरातमध्ये भरतात. मधले जे पेट्रोल पंप आहेत, तेथून पेट्रोल कोणी भरत नाहीत. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की,पूर्वीचे आमचे एस्टॅब्लिशमेंट झाले तरी महाराष्ट्रामध्ये सगळीकडे असे होईल. इतर राज्यामध्ये 20 टक्के अधिभार आहे, म्हणून आपल्याकडेही तेवढा अधिभार लावावा असे मी म्हणत नाही.

श्री.नितीन गडकरी (बसून) : बाजूच्या गुजरात, आंध्र प्रदेश राज्यामध्ये जे दर आहेत त्या तुलनेने आपल्याकडे दर असावेत.

श्री.जयंत पाटील : इतर राज्याप्रमाणे पॅरीटी क्रिएट व्हावी म्हणून मी मघाशी सांगितले की,सगळीकडे 20 टक्के दर ठेवा आणि कॉम्पेन्सेट करावे, हा पहिला प्रयत्न आहे. परंतु त्याला यश मिळेल असे मलाही वाटत नाही. ही जी कॉम्पेन्सेशनची अमाऊंट आहे, ती फार मोठी होते. शेजारच्या राज्याप्रमाणे सोमोटो दर ठेवायचा असेल तर त्यामध्ये आपल्याला जर लॉस झाला तर तो भरुन निघणार नाही. Any reduction in our rate today, before and after VAT याचे कम्पॅरिजन करुन कॉम्पेन्सेशन मिळणार आहे. सन्माननीय सदस्यांनी तिसरा रेट कमी करुन कॉम्पेन्सेशन वाढेल असे सांगितले. सभापती महोदय, मी सभागृहाला आपल्यामार्फत विश्वास देऊ इच्छितो की, याबाबत पुन्हा ॲनेलिसेस मी करेन. पाहिजे तर सन्माननीय सदस्यांनाही त्या बैठकीला बोलाविले जाईल आणि शेवटी लॉस न होता, जे काही करता येईल ते करण्याचा आपण प्रयत्न करु, एवढाच मी विश्वास देऊ इच्छितो.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : वित्तमंत्री महोदयांनी चांगल्या पध्दतीने याबाबतीत दखल घेतलेली आहे. उद्या केंद्रीय अर्थमंत्री महोदयांनी या संदर्भात बैठक बोलाविलेली आहे. यामध्ये जे काही नुकसान होईल ते तीन वर्षामध्ये कॉम्पेन्सेट केले जाणार आहे. पहिल्या वर्षी 100 टक्के, दुसऱ्या वर्षी 75 टक्के आणि तिस-या वर्षी 50 टक्के भरपाई करण्याची मान्यता त्यांनी दिलेली आहे. केंद्रामध्ये आपले सरकार आहे. मंत्रीमहोदय स्वत: जाणकार आहेत. चार राज्यांनी या करप्रणालीला विरोध केलेला आहे. आपण सपोर्ट केलेला आहे. हा सपोर्ट करताना निदान आपल्या राज्याला काही तरी पदरात पाडून घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ही योजना कायमस्वरुपी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी (पुढे चालू...

रहाणार आहे. याबाबत आग्रही भूमिका घेऊन आपण त्या बैठकीमध्ये हा विषय मांडावा. यामुळे एकप्रकारचा चांगला मेसेज जाईल. सन्माननीय सदस्य श्री.जेथलिया हे मोटर वाहतूकदार आहेत त्यांची वाहने या राज्यातून दुसऱ्या राज्यात जातात, ते दुसऱ्या राज्यात जाऊन आपल्या वाहनामध्ये पेट्रोल भरतात. याचे कारण पेट्रोल हे आपल्याकडे महाग आहे, शिवाय भेसळयुक्त पेट्रोल मिळते. आपण विक्रीकर जास्त लावल्यामुळे यामध्ये भेसळही होते आणि त्या पेट्रोलचा खपही होत नाही. केंद्र सरकारला या करप्रणालीला सपोर्ट करतांना काही गोष्टी या आपल्या पदरात पाडून घ्याव्यात, यासाठी आग्रही भूमिका मांडावी अशी माझी विनंती आहे. 1 एप्रिलपासून पेट्रोल आणि डिझेलचा समावेश यामध्ये लवकरात लवकर करावा अशी आपल्याकडून अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, या संदर्भामध्ये एम्पॉवर्ड कमिटीमध्ये मी जी मागणी केलेली आहे ती उद्याच्या बैठकीमध्ये पुन्हा आम्ही करणार आहोत. वॅट लागू केल्यानंतर जे आपल्याला कॉम्पेन्सेशन मिळणार आहे, त्यामधून सध्या तरी हे दोन पदार्थ बाजूला ठेवण्यात आलेले आहेत. या पदार्थांचा समावेश केला तर सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे रिडक्शन पॉसीबल होईल. समजा ते झाले नाही तर मघाशी मी सांगितल्याप्रमाणे पुन्हा आपण ऑईल कंपन्यांना बोलावून त्यांच्याबरोबर बसून..त्यामध्ये सदस्यांनाही बोलाविता येईल. ॲनेलेसिस करता येईल. कारण शेवटी टॅक्सेशन कमी करणे, हेच आमचे आतापर्यन्तचे धोरण आहे. आता मोठा आकडा आणि मोठी कमिटमेंट असल्यामुळे याबाबत जवळून अभ्यास चालू आहे एवढेच मी सांगेन.

यानंतर कु.थोरात.....

अशुधारित प्रत / शुद्धीपत्र नाही

पृ. शी. : शस्त्र व दारुगोळा निर्माण करण्याचा बेकायदेशीर कारखाना.

मु. शी. : शस्त्र व दारुगोळा निर्माण करण्याचा बेकायदेशीर कारखान्याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, डॉ. अशोक मोडक व विनोद तावडे वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण, डॉ. अशोक मोडक व विनोद तावडे. यांनी शस्त्र व दारुगोळा निर्माण करण्याचा बेकायदेशीर कारखाना या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री. अनंत तरे): निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.... 2 .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, नियम 93 अन्वये मी अतिशय गंभीर गोष्ट या सभागृहासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. त्यचे उत्तर इतके सहज दिलेले आहे की, जणू काही काहीच घडलेले नाही. नागपूरला हिवाळी अधिवशन होते, त्यावेळेला महाराष्ट्र विधिमंडळात बॉंबस्फोट केला जाईल अशा त-हेचे वातावरण होते.पोलीस प्रशासनाने असे जाहीर केले होते की, आम्ही चांगली काळजी घेतलेली आहे, आणि हे सगळे फोल आहे. त्यानंतर दोन दिवसांनी नागपूरमध्ये शस्त्रांस्त्राचा नक्षलवाद्यांनी चालवलेला एक कारखाना सापडला आणि तो एक वर्षे चाललेला होता. दारुगोळा निर्माण करणे, शस्त्रास्त्र निर्माण करण्याचा हा कारखाना होता. येथे उत्तर असे दिले आहे की, "दिनांक 26.1.2.2004 रोजी मिळालेल्या गुप्त माहितीवरुन साईनगर येथे 6 नोव्हेंबर, 2003 रोजी लेथ मशीन खरेदी केली. आणि त्यानंतर 6-7 महिन्यांनी तो कारखाना सुरु झाला. बाजूलाच गडचिरोली जिल्हा आहे.मागच्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये या देशातील एका राजकीय पक्षाने केवळ मते मिळविण्यासाठी नक्षलवाद्यांबरोबर करार केला. त्यानंतर महाराष्ट्रात गडचिरोली आणि आंध्रच्या बॉर्डवर असलेल्या नक्षलवाद्यांच्या कारवाया मोठया प्रमाणात वाढल्या. नागपूरमध्ये 6-7 महिने हा कारखाना चालू होता. पण पोलिसांना या कारखान्याची काही माहिती नव्हती. त्यानंतर निवेदनामध्ये खाली असे दिलेले आहे की, "नक्षलवाद्यांच्या सर्व प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांचे होत असलेले दूरगामी परिणाम लक्षात घेऊन, पोस्टर्स, पत्रके, जनजागरण मेळावे, ग्रामभेट व अन्य जनसंपर्काद्वारे नक्षलवाद्यांच्या कारवायांची माहिती दिली." एवढे सगळे करुन नागपूरच्या गुप्त विभागाच्या पोलिसांना ही माहिती वर्षेभर कां मिळाली नाही. यासबंधात काही कारवाई करण्यात आली आहे की नाही, गुप्तचर विभाग काय करीत होता. त्यानंतर निवेदनात पुढे असेही म्हटले आहे की, "त्यांच्यकाडे अतिशय गंभीर असे शस्त्रास्त्र मिळाले. सात आरोपी होते. तिघांना पकडण्यात आलेले आहे". या नक्षलवाद्यांच्याविरुध्द देशाच्या विरोधात बंड पुकारण्याचा आरोप या कलमा खाली त्यांना कां अटक करण्यात आली नाही, ती कलमे कां लावण्यात आली नाहीत. त्यांच्या विरुध्द काय कारवाई करण्यात आलेली आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे:सभापती महोदय, नक्षलवाद्यांच्या या बंदुकीच्या कारखान्यावर छापा टाकण्यात आलेला आहे. 2004 मध्ये हा कारखाना सुरु झालेला आहे. 2003 मध्ये ते नागपूरमध्ये आले. 6.11.2003 ला त्यांनी लेथ मशीन घेतली. त्यांचा कारखाना फेब्रुवारी,2004 मध्ये सुरु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे..

झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी संगितल्याप्रमाणे ही गंभीर बाब आहे. त्याच्या विरुध्द भारतीय कायदा कलम 3,5,7,25,35,121 आणि देशविघातक कृत्य, भारत सरकार विरुध्द बंड पुकारणे आणि कलम 18 व 20 दहशतवादी कृत्य करणे या कलमाखाली त्यांच्यावर गुन्हा दखल केलेला आहे.

श्री. मधुकर चव्हाण :आठ महिने कारखाना भर वस्तीत, भर शहरात चाललेला असतांना त्यावेळी गुप्तचर विभाग काय करीत होते? त्याच्या विरुध्द काही कारवाई केली की नाही? पोलिसांना विचारले की नाही? राजकीय पक्षांच्या कुठल्या हालचाली चालतात, कुठली आंदोलने होणार आहेत याची सगळी माहिती त्यांना मिळते परंतु या देशामध्ये अशा त-हेचे बेकायदेशीर कृत्य, हिंसा घडवून आणण्यासाठी शस्त्रास्त्र निर्माण करण्याचा कारखाना सुरु होतो, निवेदनामध्ये शासनाने स्वत:च म्हटल्ले आहे की, त्यानंतर 6-7 महिन्यांनी कारखाना सुरु झाला. तो कारखाना सुरु झाल्या नंतर सात-आठ महिने मिळाला नाही, यासंबंधात काय कारवाई करण्याचे योजले आहे?

श्री. सिध्दराम म्हेत्रे :सभापती महोदय, कारखाना म्हणजे तो मोठा कारखाना नच्हता. एका लेथ मशीनरवर लोकांना दाखवण्यासाठी दरवाजे, खिडक्या करण्यात येत होत्या. त्याच्याआड बारा बोल्टच्या बंदुकीची निर्मिती करण्यात येत होती आणि ते काम उघड करण्यात येत नसल्यामुळे तसेच नागपूरमध्ये बंड करण्याची शक्यता नव्हती म्हणून तो उघड झाला नाही. तरी सुध्दा गुप्तचार विभागाच्या बातमीदाराने ती माहिती दिल्यानंतर तो पकडण्यात आलेला आहे.

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

पृ. शी. : कुळांना दिलेल्या जमिनींच्या रकमांचे हप्ते न भरणे.

मु. शी. : कुळांना दिलेल्या जमिनींच्या रकमांचे हप्ते न भरण्या बाबत श्री. जयंत प्र.पाटील वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन, राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, श्री. जयंत प्र.पाटील "यांनी कुळांना दिलेल्या जमिनींच्या रकमांचे हप्ते न भरणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, अलिबाग तालुक्यातील कुळांच्या जमिनीची रक्कम त्यांनी भरली नाही तर ती जमीन सरकारदरबारी जमा होईल असे आदेश शासनाने काढले आहेत, ही खरी गोष्ट आहे काय? अशी रक्कम न भरलेल्या कुळांची संख्या 1701 आहे. त्याची रक्कम फक्त 33 लाख आहे.

(सभापती स्थानी माननीय उपसभापती)

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

जो कूळ कायदा निर्माण झाला तो निर्माण करण्याचे काम अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांनी केलेले आहे. देशामध्ये शेतकऱ्यांचा पहिला संप अलिबाग तालुक्यामध्ये झाला. कुळाच्या जमिनी हे शासन काढून घेणार आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, कुळाची जी जमीन आहे ती शासन कोणत्याही परिस्थितीमध्ये काढून घेणार नाही. परंतु जमिनीची जी रक्कम भरावयाची आहे ती अनेक शेतकऱ्यांनी भरलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जवळपास 1724 खातेदार जिल्हयामध्ये आहेत आणि यासंदर्भात 33 लाख रुपयांची मागणी आहे. ही रक्कम त्यांनी भरली पाहिजे. ती रक्कम भरल्यानंतर 32(ब) अंतर्गत परचेस सर्टिफिकेट प्राप्त झाल्यानंतर त्यांचे नाव नमुना नंबर सातला मालकी हक्कावर लागते. त्यासाठीच आमचा प्रयत्न राहिलेला आहे. सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी सुध्दा यासंदर्भात प्रयत्न करुन, संबंधित शेतकऱ्यांची उर्वरित रक्कम ताबडतोब भरुन घ्यावी आणि त्यांना त्यांचा मालकी हक्क प्राप्त करुन द्यावा.

श्री. जयंत प्र. पाटील : अलिबाग तालुक्यातील खारेपाटणचे हे शेतकरी आहेत. त्या ठिकाणी खार जमीन जमीनदोस्त झालेली आहे. त्या ठिकाणी बांधबंदिस्ती नाही. तीन हजार एकर जमिनीची बांधबंदिस्ती नसल्यामुळे त्या ठिकाणी एक दाणा सुध्दा पिकत नाही अशी परिस्थिती आहे. आज अलिबाग तालुक्यात जमिनीच्या किंमती वाढत आहेत. शासनाकडे ही जमीन जमा करावयाची आणि मग मुंबईच्या भांडवलदारांना द्यावयाची असा घाट सरकारी अधिकाऱ्यांकडून चाललेला आहे. कोणत्याही कुळाची जमीन शासन ताब्यात घेणार नाही असे स्पष्ट आदेश शासन देईल काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, कुळाच्या जमिनीचे पैसे भरण्याच्या बाबतीत शासनाचा सातत्याने तगादा असतो. त्यासंदर्भात जी नियमावली केलेली आहे त्या नियमांची अंमलबजावणी करण्याचे काम संबंधित अधिकारी त्या ठिकाणी करीत असतात. परंतु त्या ठिकाणी ज्या कुळांना जमीन दिलेली आहे, कोकणातीलच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या शेतकऱ्यांना ही जमीन दिलेली आहे ती जमीन शासन काढून घेणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कुळाने वेळेवर हप्ता भरला पाहिजे यासाठी तगादा लावण्यात येतो. या जमिनीच्या संदर्भात कायद्यामध्ये तरतूद आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी जमीन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/ MHM/ SBT/

श्री. दिवाकर रावते .....

काढून घेणार नाही असे सांगितले. वेळेत पैसे भरले नाहीत तर त्यांच्याकडे जमीन राहणार नाही अशी कायद्यामध्ये तरतूद आहे. महाराष्ट्रामध्ये अवर्षणप्रवण परिस्थिती, दुष्काळी परिस्थिती, अतिवृष्टी अशा प्रकारची ज्या ज्या वेळी नैसर्गिक आपत्ती येते, पीक येत नाही त्यावेळी त्यांना हप्ता भरणे जमत नाही. 12 वर्षामध्ये पैसे द्यावयाचे आहेत. त्यामुळे हे जर शक्य झाले नाही तर अशा बाबतीत काय करावे असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिलेले आहेत काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : मी अगोदर सांगितले की, शासन अशा प्रकारच्या कोणत्याही जमिनी शेतकऱ्यांकडून काढून घेणार नाही. परंतु त्यासंदर्भात त्यांनी शासनाकडे जे पैसे भरावयाचे आहेत ते अनेक शेतकऱ्यांनी भरलेले नाहीत. ठराविक मर्यादेनंतर सुध्दा पैसे भरलेले नाहीत. त्या ठिकाणी 12 वर्षाचा कालखंड ठरवून दिलेला आहे. असे असताना सुध्दा सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी सांगितले की, अनेक ठिकाणी वेगळी परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे, शेतकरी अडचणीत असल्यामुळे ही रक्कम शेतकरी त्या ठिकाणी भरु शकत नाहीत. ही रक्कम भरु शकत नाहीत याची माहिती शासनाला आहे. असे असताना शासनाने शेतकऱ्यांच्याबद्दल अतिशय उदार धोरण अवलंबून त्यांच्यावर कोणतीही कारवाई करीत नाही. वाटले तर याबाबतीत निर्देश सुध्दा संबंधित अधिकाऱ्यांना दिले जातील.

श्री. जयंत प्र. पाटील : तहसिलदारांनी नोटिसेस काढून जप्ती सुरु केलेली आहे. ती कारवाई थांबविण्यात येईल काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : अशा नोटिसेस दरवर्षी संबंधित तहसिलदार काढत असतात. 31 मार्चला रक्कम जमा करण्याच्या दृष्टीने त्यांना टारगेट दिलेले आहे. अशा प्रकारे ते दरवर्षी नोटिसेस काढतात परंतु कारवाई करीत नाही. लोकांनी पैसे भरले पाहिजेत आणि पैसे भरुन त्या जमिनी त्या शेतकऱ्यांच्या नावावर झाल्या पाहिजेत असा प्रयत्न असतो.

श्री. जयंत प्र. पाटील : हे पैसे शासनाला नव्हे तर सावकाराला द्यावयाचे असतात. शासनाकडे हे पैसे जमा होणार नाहीत, ही गोष्ट खरी आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : पैसे सावकाराला द्यावयाचे नसतात. ते पैसे जमीनदाराला द्यावयाचे असतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बाळापूर पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्याने लाच मागण्याचा घडलेला प्रकार.

मु. शी. : बाळापूर पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्याने लाच मागण्याचा घडलेला प्रकार याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, नितीन गडकरी व सागर मेघे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, नितीन गडकरी व सागर मेघे यांनी "बाळापूर पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्याने लाच मागण्याचा घडलेला प्रकार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/ MHM/ SBT/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बाळापूर पंचायत समिती, जिल्हा अकोला या पंचायत समिती अंतर्गत गेल्या तीन महिन्यांपासून गट विकास अधिकाऱ्याची जागा रिक्त आहे. एका कृषि अधिकाऱ्याला त्या ठिकाणी प्रभार दिलेला आहे. या बाळापूर पंचायत समिती अंतर्गत श्री. माणिक पुनाजी जंजाळ या व्यक्तीला संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत एक घरकूल मंजूर करण्यात आले. सभापती महोदय, त्या घरकुलाच्या हप्त्याचा काही भाग शासनाकडे बाकी होता.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

म्हणून त्याठिकाणचे गटविकास अधिकारी श्री.जाधव यांच्याकडे श्री.जवंजाळ घरकुलाचा चेक मागण्यासाठी गेले असताना श्री.जाधव यांनी त्यांच्याकडे 500 रुपयांची लाच मागितली. त्यांनी सांगितले की, मी देणार नाही. लाच देणार नसेल तर तुला जीवे मारु, तू पैसे दिले पाहिजे. अशाप्रकारची धमकी या अधिका-याने दिल्यामुळे श्री.जवंजाळ यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे आणि पोलीस स्टेशनवर तक्रार केली. त्यावर मु.का.अ.यांनी थातूरमातूर चौकशी केली आणि त्या जाधवचे स्टेटमेंट घेतले आणि ज्यांनी जीवे मारण्याची धमकी दिली त्यांचे स्टेटमेंट खरे असेल असे नाही. त्या स्टेटमेंटवर विश्वास ठेवून ही चौकशी बंद करण्यात आली. ज्याला धमकी दिली त्याची पत्नी, त्याची मुले व बाजुच्या दोन व्यक्ती अशा लोकांनी स्टेटमेंट दिल्यानंतर प्रकरण गुंडाळून टाकले. दुसरे असे की, पंचायत समितीला रिपोर्ट दिला त्यावेळी तो अदखलपात्र गुन्हा म्हणून दाखल केला. एखादा माणूस जीवे मारण्याची धमकी देत असेल तर तो अदखलपात्र गुन्हा कसा होऊ शकतो ? हे संपूर्ण प्रकरण दडपून टाकण्याचा प्रकार चालला आहे. हे वर्ग-3 च्या कर्मचा-याकडे बीडीओचा चार्ज दिलेला आहे. या बीडीओबद्दल त्या पंचायत समितीमध्ये अनेक तक्रारी दाखल झालेल्या आहेत म्हणून त्यांच्या गेल्या तीन महिन्याच्या कार्यकालाची शासन चौकशी करणार आहे काय ? हे प्रकरण दाबण्याचा प्रकार चालला आहे, त्या श्री.जवंजाळ यांनी 500 रुपये दिले नाही म्हणून त्यांना घरकुलापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केला असल्यामुळे श्री.जाधव यांच्यावर दंडात्मक कारवाई शासन करणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, याप्रकरणातील श्री.जवंजाळ हे लाभार्थी आहेत. त्यांना प्रत्येकी 5 हजार रुपयांचे दोन चेक दिले गेले आहेत. त्यांनी मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे तक्रार केली नव्हती तर केवळ पोलीस स्टेशनकडे तक्रार केली होती.

श्री.पांडुरंग फुंडकर : मुख्य कार्यकारी अधिका-यांनी प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे चौकशी दिली. तक्रार गेल्याशिवाय कोणताही अधिकारी चौकशी करतो काय ? या चौकशीमध्ये श्री.जाधव यांचे स्टेटमेंट घेतले आणि त्यात त्यांनी मी असे काही केले नाही या स्टेटमेंटवर विश्वास ठेवून चौकशी बंद करण्यात आली.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : याप्रकरणाची दि.17 मार्च, 2005 रोजी चौकशी झाली. आपले निवेदन आल्यानंतर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिका-यांनी चौकशी केली. तोपर्यंत फक्त पोलीस केस झाली होती. ते एन.सी.मॅटर होते.

श्री.पांडुरंग फुंडकर : एखाद्याला जीवे मारण्याची धमकी दिली असेल ते एन.सी.चे मॅटर होऊ शकते काय ?

श्री.रणजित कांबळे : त्यांनी फक्त अर्ज दिला होता आणि ते एन.सी.मॅटर होते. जेव्हा सभागृहामध्ये हे निवेदन आले तेव्हा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिका-यांनी त्यांची चौकशी केली.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये एखाद्याला तक्रार करावयाची असेल तर ती त्याने तेथे जाऊन करावी वा ते लिहून घेतील त्याच्यावर सही करावी, अन्यथा लेखी तक्रार दिली तर ती तक्रारच असते. हीच पध्दत आहे. तुम्ही म्हणता की लेखी दिले तर ती तक्रार होत नाही.

उप सभापती : ही गोष्ट नक्की आहे की त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये साधी तक्रार केली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : एखाद्या पोलीस स्टेशनला एखादा तक्रार अर्ज दिला की, या या व्यक्तीने मला जीवे मारण्याची धमकी दिली आहे आणि हे एन.सी.चे मॅटर होते का ?

श्री.रणजित कांबळे : आमच्याकडे निवेदन आल्यानंतरच आम्ही चौकशी केली आणि त्या चौकशीमध्ये काही आढळून आले नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : माझ्याकडे निवेदनाची प्रत आहे. माझ्याकडे बी.डी.ओं.नी 500 रुपये लाच मागितले आहेत अशाप्रकारची तक्रार श्री.जवंजाळ यांनी मु.का.अ.यांच्याकडे केली आहे. या निवेदनामध्ये मात्र असे लिहिले आहे की, " त्यांनी लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडे तक्रार करणे जरुरीचे होते. हा माणूस खेडयात राहणारा आहे, अंगठेबहाद्दर, ज्याला लाचलुचपत विभाग माहीत नाही असा माणूस शेवटी त्याला देण्यात आलेल्या धमकीबद्दल त्याच्या वरिष्ठ अधिका-यांकडे तक्रार करील किंवा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करील.

नंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शुद्धीपत्रक नाही

(श्री. फुंडकर पुढे सुरु...)

असा माणूस शेवटी त्याच्या वरच्या अधिका-याकडे किंवा पोलीस स्टेशनला जिवे मारण्याची धमकी दिली अशी तक्रार करील. पैसे दिले, चेक मिळाला नाही अशी तक्रार वरच्या अधिका-याकडे तो माणूस करील. परंतु ॲन्टी करप्शनकडे तक्रार का केली नाही असा प्रश्न शासनाने विचारणे योग्य आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : या प्रकरणी वस्तुस्थिती काय आहे याची कमिशनर लेव्हलवर चौकशी करुन त्याची माहिती देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/

पृ.शी. : अकोला महानगरपालिकेमार्फत जकात वसुली व्हावी या मागणीसाठी बाजारपेठ बंद असणे

मु.शी : अकोला महानगरपालिकेमार्फत जकात वसुली व्हावी या मागणीसाठी बाजारपेठ बंद असणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदिश गुप्ता, अशोक मोडक व श्रीकांत जोशी वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदिश गुप्ता, अशोक मोडक व श्रीकांत जोशी यांनी "अकोला महानगरपालिकेमार्फत जकात वसुली व्हावी या मागणीसाठी बाजरपेठ बंद असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गेले 8 दिवस अकोल्यासारखे शहर बंद आहे. व्यापा-यांनी कडकडीत बंद पाळलेला आहे.सर्वसामान्य माण्साला भाजीपाला तसेच जीवनावश्यक वस्तू मिळत नाहीत. या बंदचे कारण असे आहे की, जकात कर वसुलीचे काम संकलन अभिकर्त्याकडे द्यावे अशा प्रकारची ऑर्डर शासनाने केली आहे. शासनाने असे सांगितले आहे की, जकात कराचे उत्पन्न वाढले पाहिजे. म्हणून खाजगीकरणाकडे निर्देश केले. सुरुवातीला महानगरपालिका जकात वसूल करीत होती. वर्षावर्षाला महानगरपालिकेचे जकात वसुलीचे उत्पन्न वाढत होते. परंतु शासनाच्या आदेशानुसार जकात वसुलीचे काम निविदाकर्त्याला देण्यासंबंधीचा महानगरपालिकेने ठराव केला. मागील वर्षी पेक्षा कमी किंमतीच्या निविदा आल्यामुळे स्थायी समितीने त्या निविदा रद्द केल्या आणि तेथील आयुक्तांनी हे प्रकरण सरकारकडे पाठविले. सरकारकडे हे प्रकरण पाठविल्यानंतर त्याबाबत शासनाला चुकीची माहिती देण्यात आली. त्यामुळे मागच्या वर्षी जितकी वसुली झाली तितक्या वसुलीच्या टेंडरला मान्यता दिली. याबाबतीत महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा ठराव जनरल सभेचा ठराव बाजूला केला आणि डायरेक्ट निविदाकर्त्याला जकात वसुलीची ऑर्डर दिली. या विरोधात महानगरपालिकेच्या स्थयी समितीने पुन्हा ठराव केला की, ही ऑर्डर रद्द करण्यात यावी. गेले 8 दिवस अकोला शहर बंद आहे. सर्वसामान्य माणसाला जीवनावश्यक वस्तू मिळेनाशा झालेल्या आहेत. या प्रकरणी शासन काही करायला तयार नाही. तेथील शिष्टमंडळ मा.मुख्यमंत्र्यांना भेटले. परंतु त्याचाही काही उपयोग झाला नाही. तेव्हा सर्व नियम बाजूला करुन अशा प्रकारे जकात वसुलीचे कॉन्ट्रॅक्ट एका खाजगी व्यक्तिला दिले गेले आहे. मागील वर्षापेक्षा 20 टक्के उत्पन्न अधिक मिळेल अशा व्यक्तीला कॉन्ट्रॅक्ट दिले गेले असते तर ते समजू शकलो असतो. परंतु मागील वर्षीच्या उत्पन्ना इतकेच उत्पन्न देणा-या व्यक्तीला शासनाने इतक्या अर्जन्सीने कॉन्ट्रॅक्ट का दिले ? महानगरपालिकेने कमी दराच्या निविदा 10 वेळा कॅन्सल केल्या. ठेकेदारा मार्फत जकात वसुली करण्यापेक्षा स्वत: महानगरपालिका वसूल करील असेही महानगरपालिकेने ठरविले. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, महानगरपालिकेचा ठराव बाजूला करुन, स्टँडींग कमिटीचा ठराव बाजूला करुन अशा प्रकारे जो निर्णय शासनाने घेतलेला आहे तो निर्णय शासन परत घेईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/

श्री. राजेश टोपे : माझ्याकडे माहिती प्राप्त झालेली आहे. 2001मध्ये ही महानगरपालिका निर्माण झाली. 2002-03मध्ये 18 कोटी 3 लाख 22 हजार रु., 2003-04मध्ये 21 कोटी आणि 2004-05मध्ये 21 कोटी 63 लाख अशा प्रकारे वसुली झालेली आहे. साधारणपणे 15.7.2002 म्हणजे दोन-तीन वर्षापूर्वी खाजगीकरणाच्या माध्यमातून, ठेकेदाराच्या माध्यमातून जकात वसुली करावी अशा प्रकारचा स्थायी समितीचा निर्णय झालेला होता.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

तेव्हा पासून 10 वेळेस निविदा काढण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने प्रत्येक वेळेला निविदा कमी असेल काही निविदा थोडया प्रमाणात जास्त असेल, परंतु अचानकपणे आज साधारण दि.29.12.04 ला स्थायी समितीने निर्णय घेतला की ही निविदा मान्य करावयाची नाही. सभापती महोदय, या ठिकाणी जी काही माहिती दिली गेलेली आहे. त्या संदर्भात सांगू इच्छितो की, 20 टक्क्यांपेक्षा जास्त रक्कमेची निविदा आलेली आहे...

श्री. पांडुरंग फुंडकर : महानगरपालिकेने टेंडर काढले होते त्या टेंडरची किंमत किती होती ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, तीच माहिती मी या ठिकाणी सांगणार आहे. 23 कोटी 16 लाख 1 हजार 131 या रक्कमेची निविदा मंजूर करण्यात आली...

श्री. पांडुरंग फुंडकर : महानगरपालिकेने ज्यावेळी टेंडर काढले त्यावेळेला निविदा 25 कोटी रुपयांची होती. ही निविदा कमी आली होती व ती महानगरपालिकेने अमान्य केली होती. अमान्य केलेली निविदा शासनाने या ठिकाणी मंजूर केलेली आहे. 25 कोटी रुपये महानगरपालिकेला उत्पन्न मिळत असताना 23 कोटी रुपयांची निविदा कशी काय मंजूर केली ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, 25 कोटी रुपयांचे टेंडर असले तरी..

श्री. नितीन गडकरी : या ठिकाणी आक्षेप असा आहे की, जनरल बॉडीने हा प्रस्ताव नामंजूर केला. तो प्रस्ताव महानगरपालिकेच्या स्टॅन्डींग कमिटीने नामंजूर केला. महानगरपालिकेत 21 कोटी रुपयांपर्यन्त जकातीची कर वसुली होत होती. तुम्ही जे टेंडर काढले त्यावेळेला एस्टीमेटेड कर वसुली तुम्ही 25 कोटी रुपये गृहीत धरली होती. प्रत्यक्ष टेंडर 23 कोटी रुपयांचे आलेले आहे. अमरावती महानगरपालिकेमध्ये 16 कोटी रुपये मिळत होते. त्या ठिकाणी 26 कोटी रुपयांचे टेंडर आलेले आहे. ज्या ठिकाणी खाजगीकरणातून जकात वसुली होते त्या ठिकाणी टेंडरमध्ये 10 ते 12 कोटी रुपयांची वाढ होते. म्हणून या ठिकाणी देखील पुन्हा टेंडर काढले पाहिजे. त्या ठिकाणी चांगले रेट आले पाहिजे याकरिता विरोध म्हणून ती निविदा रिजेक्ट केली. महानगरपालिकांमध्ये जकात वसुलीसाठी जेथे जेथे खाजगी अभिकर्ता आपण नेमतो. त्यावेळी संबंधीत महानगपालिकेच्या उत्पन्नाच्या तुलनेत खाजगीकरणाच्या माध्यमातून येणारे टेंडर्स 30 टक्के,40 टक्के जास्तीचे असतात. येथे नॅचरल ग्रोथ 25 कोटी रुपये एवढी आहे. म्हणून अकोला

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

शहरामध्ये वेगळया प्रकारची चर्चा सुरु झालेली आहे. अकोला येथील एका वृत्तपत्रात "तोड झाली"मुख्य हेडींग आलेले आहे. मुंबईत तोड काय झाली ? या महानगरपालिकेस कमित कमी 25 कोटी रुपये मिळावयास पाहिजे होते. महानगरपालिकेची स्टॅन्डींग कमिटी या गोष्टीस नाही म्हणत आहे. जनरल बॉडी नाही म्हणते आहे. मग तुम्हाला कोणता अट्टाहास आला ? 23 कोटी रुपयांचे टेंडर स्वीकारलेच पाहिजे. असा लोभ, असे प्रेम तुमच्या मनामध्ये कसे काय निर्माण झाले ? तुम्हाला यामागचे आकर्षण काय आहे ? तुम्ही जे केले त्याचा सगळा अर्थ महाराष्ट्रातील जनतेला कळलेला आहे. माझी विनंती आहे की, या ठिकाणी 30 कोटी रुपयांपर्यन्त हे टेंडर जावू शकते असा तेथील अंदाज आहे. त्या टेंडरला स्थगिती देऊन रिटेंडर करण्याचा निर्णय शासन घेईल काय ?

श्री. राजेश टोपे : माननीय विरोधी पक्ष नेते म्हणतात त्याप्रमाणे टेंडर जरुर 25 कोटी रुपयांचे होते. परंतु 10 वेळा टेंडर मागवून अपेक्षे एवढया रक्कमेचे टेंडर मिळत नाही. अशा वेळी साधारण वसुलीची जी रक्कम आहे. त्या ठिकाणची दर वर्षी वसुलीच्या रक्कमेची रेंज 18 ते 21 कोटी रुपयांपर्यन्त आहे. 21 कोटी पेक्षा जास्त म्हणजे 23 कोटी रुपयांचे टेंडर आल्यामुळे वसुलीपेक्षा दींड कोटी रुपयाने जास्त आहे. महानगरपालिकेच्या दरवर्षीच्या वसुलीपेक्षा जास्त टेंडरचा रेट या निविदेत कोट केलेला आहे. त्यामुळे ती निविदा स्वीकारण्यात आली आहे. यामध्ये इतर फायदे देखील होणार आहेत. 183 कर्मचा-यांचे पगार वाचणार आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय,कै.राजीव गांधी यांनी महानगरपालिका, नगरपालिका यांना स्वायत्तत्ता दिलेली आहे. यांना स्वायत्तता दिल्यानंतर त्या महानगपालिका आपले भविष्य ठरविण्यास लायक झालेल्या आहेत. तुम्ही मंत्रालयातून महानगरपालिका चालविता काय ? त ही निविदा स्वीकारु नका म्हणून जनरल बॉडी नाही म्हणते आहे, स्टॅन्डींग कमिटी नाही म्हणते आहे. तुम्हाला त्या अभिकर्त्याविषयी कोणते प्रेम आलेले आहे ?

यानंतर श्री. उपरे..

अशुधारित प्रत / परिशुद्धीसाठी नाही

(श्री.नितीन गडकरी)

त्यांनी मुंबईत येऊन तुम्हांला काय चमत्कार दाखविला ? तुम्ही आज मंजूर करीत आहात. हे कारण महाराष्ट्रातील जनतेला कळत नाही काय ? तुम्ही असे का करीत आहात ? तुमची बरीच कामे आहेत. त्यामध्ये तुम्हाला जेवढे लक्ष्मीदर्शन घ्यायचे आहे तेवढे घ्या. येथे महानगर पालिकेमध्ये तुम्ही कशाला तोंड घालता ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी लक्ष्मीदर्शनचा कोठलाही विषय नसतो. मी परत एकदा सांगू इच्छितो की, दरवर्षी वसुली होत होती ती आपण लक्षात घ्या. मागच्या वर्षाची वसुली आपण लक्षात घेतली तर ती 21 कोटी आहे. आता 23 कोटी 16 लाख रुपयांचे टेंडर इ ालेले आहे आणि हे फक्त एका वर्षासाठी आहे. जेथे आपण 20 टक्क्यांची अपेक्षा करता तेथे.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, यासाठी अकोला येथील आमदारांचा विरोध आहे. नगरपालिकेतील सगळ्या पक्षांचा विरोध आहे. स्टॅण्डींग कमिटीचा विरोध आहे. महानगरपालिकेतील काँग्रेस, शिवसेना , बहुजन महासंघ वगैरे पक्षांच्या सगळ्या सदस्यांचा विरोध आहे. सगळ्यांचा विरोध आहे आणि अकोला शहर कडकडीत बंद आहे. तरी या अभिकर्त्याचे एवढे कोणते प्रेम तुम्हांला आले होते ? तो एकदम मुंबईत धावत येतो आणि तुम्ही मंजूरी देता. महानगरपालिकेचे अधिकार बाजूला ठेवून तुम्ही हे का करीत आहात ? अकोलामधील स्थानिक लोकांचा विरोध आहे. सगळ्या पक्षांचा विरोध आहे. तरी तुम्ही याला ताबडतोब स्थगनादेश द्याल काय ? तुम्हांला हा स्थगनादेश देण्याचा अधिकार नाही हे मला माहिती आहे. कारण तुमचा या प्रकरणाशी काही संबंध नाही. तुम्हांला अधिकार नसेल तर तुम्ही हे रोखून धरा. पुन्हा माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करा आणि त्यानंतर उत्तर द्या.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, यामध्ये कोर्ट केस देखील झालेली आहे आणि महानगरपालिकेने कोर्टामध्ये देखील अशाच पध्दतीची विनंती केलेली आहे. पण कोर्टाने देखील कोणतीही स्थगिती दिलेली नाही. परंतु सन्माननीय विरोधी पक्षाची विनंती आणि सूचना लक्षात घेता पुढील आठवड्यात जरूर यासंदर्भात बैठक घेऊन त्याबाबतचा फेरविचार करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापति महोदय, यह बहुत ही गंभीर विषय है. पिछले 15 दिन से अकोला शहर के व्यापारी आंदोलन कर रहे हैं. साढ़े चार लाख की आबादी के अकोला शहर का पूरा का पूरा बाजार बंद है. लोगों को आवश्यक वस्तुएं नहीं मिल रही हैं, पीने का पानी पूरे शहर को नहीं मिल रहा है. इसका कारण यह है कि अकोला महानगरपालिका की जकात की निविदा का खाजगीकरण किया गया है. अकोला महानगरपालिका को जितना ऑक्ट्रॉय मिलता था, उसके आधार पर बेसिक कॉस्ट 25 करोड़ रुपए तय की गई थी. अकोला महानगरपालिका द्वारा 10 बार ऑक्ट्रॉय की निविदा बुलाई गई, उसके बाद भी हर बार 25 करोड़ रुपए से कम की निविदा प्राप्त हुई. निविदा कम आने के बाद कमिश्नर ने स्थायी समिति के सामने प्रस्ताव रखा और उसके ऊपर स्थायी समिति ने निर्णय लिया कि अब इस बारे में निविदा नहीं देनी है और महानगरपालिका खुदा ज्यादा ऑक्ट्रॉय वसूल कर सकती है. उसके बाद में आयुक्त ने शासन की तरफ निविदा भेजी और शासन ने दिनांक 04.02.2005 को निविदा के खाजगीकरण का निर्णय लेकर स्थायी समिति के निर्णय को खंडित कर दिया. शहर के व्यापारी लोग हाईकोर्ट के पास स्टे लेने के लिए गए तो हाईकोर्ट ने ऐसा कोई विशेष डायरेक्शन तो नहीं दिया. हाईकोर्ट ने केवल इतना ही कहा कि इस बारे में 4 हफ्ते के अन्दर याचिका दाखिल की जाए और इस बीच में अगर कुछ निर्णय हुआ तो वह सरकार और महानगरपालिका दोनों के ऊपर लागू होगा. हाईकोर्ट द्वारा ऐसा डायरेक्शन देने के बाद भी आयुक्त ने एग्रीमेंट किया. महानगरपालिका की आमसभा में आयुक्त ने यह निर्देश दिया कि यह प्रकरण हाईकोर्ट के अन्दर पेन्डिंग है, इसलिए आमसभा के अन्दर यह विषय नहीं ले सकते हैं. मेरा प्रश्न यह है कि आयुक्त जब आमसभा को ऐसा निर्देश देता है कि यह प्रकरण नहीं ले सकते, क्योंकि यह प्रकरण हाईकोर्ट के अन्दर पेन्डिंग है तो आयुक्त निविदा देने का एग्रीमेंट कैसे कर सकता है ?

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय,याबाबतीत मी आताच सांगितल्याप्रमाणे कोणत्याही परिस्थितीमध्ये .....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, कॉग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री.लक्ष्मणराव तायडे तसेच श्री. सुधाकरराव गणगणे यांनी या गोष्टीला विरोध केलेला आहे...

श्री.राजेश टोपे :सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की ,मी आपल्या प्रश्नाला सविस्तर उत्तर दिलेले आहे. त्याचबरोबर आपल्याला हवे होते तसे उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.बाजोरिया यांच्या प्रश्नाच्या बाबतीत मला एवढेच सांगावयाचे आहे की 21 कोटी रुपयांची वसुली असतांना त्या पेक्षा किती तरी जास्त किंमतीची निविदा आपण मंजूर केलेली आहे.या ठिकाणी पारदर्शकतेचा प्रश्न आला त्यामुळे मी आपल्याला सांगू इच्छितो कीलोकशाही आघाडीचा कारभार निश्चितपणे पारदर्शक आहे...

श्री.नितीन गडकरी : पारदर्शक कारभारकरण्यासाठी ही निविदा रद्द करावी.

श्री.राजेश टोपे : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगतो की या संदर्भात बैठक घेऊन सर्वाचे समाधान झाल्याशिवाय ...

श्री.नितीन गडकरी :सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे या बाबतीत का बोलत नाही?

श्री.सुधाकर गणगणे : त्या बाबतीत निर्णय झाला आहे.

श्री.गोपीकिसन बाजोरिया :सभापती महोदय, ही महानगरपालिका अस्तित्वात येऊन तीन वर्षे झालेली असताना माननीय मंत्रिमहोदयांनी चार वर्षाची आकडेवारी कशी काय काढली आहे ?,एकूण बेरीज जी दाखविण्यात आलेली आहे ती जकात व अमानत वगैरेची रक्कम धरुन दाखविण्यात आलेली आहे काय ही रक्कम मागच्या वेळची असून 16 मार्च पर्यन्त ही रक्कम घेण्यात आलेली आहे.21 कोटी 81 लाख 35 हजार 594 रुपये एवढी रक्कम दाखविण्यात आलेली आहे म्हणजे 22 कोटी रुपयापेक्षा ही रक्कम जास्त आहे 16 मार्च पर्यतची ही रक्कम असून मार्च महिन्यातील पंधरा दिवस शिल्लक आहेत.अजूनही पंधरा दिवसाची रक्कम दाखवावयाची बाकी आहे.तेव्हा ही एकूण रक्कम विचारात घेतली तर या महानगरपालिकेला 23 कोटी रुपये कसे येतात त्यांनी 23 कोटी रुपयांची निविदा दिलेली आहे यामध्ये ॲडव्हान्स रक्कम आहे ही गोष्ट खरी आहे काय ?

उप सभापती : या संदर्भात फेर विचार करण्याच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी मघाशी सागितलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तेथील व्यापा-यांनी संप पुकारलेला आहे.चार दिवसांनी होळीचा सण आहे. सणासाठी लागणा-या वस्तू सर्वसामान्य माणसाला त्या ठिकाणी मिळत नाही.साखर 40 रुपये किलो या दराने विकली जात असतांना शासन यासबंधीचा निर्णय पुढील आठवडयात घेणार आहे. हा निर्णय लवकर घेतला पाहिजे.

(उत्तर दिले नाही)

श्री.नितीन गडकरी :याबाबतीत सर्व संबंधितांची आपण बैठक बोलवा. ॲडव्हॉन्स घेण्याची काही भानगड असेल तर ती मिटवून टाका.परंतु या बैठकीमध्ये जो काही निर्णय होईल तो निर्णय आपण आम्हाला सभागृहात सांगा तो निर्णय आपण सभागृहात जाहीर करा. त्याचा आम्हाला उपयोग होईल..सन्माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, आपला या प्रकरणाशी काही सबंध् नाही परंतु बाहेर जी काही चर्चा चालू आहे ती फार भयंकर आहे. पारदर्शक प्रणालीचा धज्जियॉ उडविणारी ती चर्चा आहे.23 कोटी रुपयांच्या निविदा अग्रहक्काने देण्यासाठी शासनाने महानगरपालिकेवर आक्रमण केलेले आहे. त्याबाबतीत बाहेर बरीच चर्चा चालू आहे सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे हे आपल्याला खाजगीत सांगतील.त्यांना यासंबंधीची माहिती आहे. तेव्हा ही चर्चा चांगली नाही. आपण हे टेन्डर रद्द करावे आणि पुन्हा निविदा मागवाव्यात .तसेच या बैठकीत जो निर्णय होईल तो आपण सभागृहात येऊन सांगावा अशी माझी विनंती आहे.

श्री.राजेश टोपे :सभापती महोदय, जो निर्णय होईल घेण्यात येईल तो आपल्याला निश्चितपणे् सांगण्यात येईल. या संदर्भातील बैठक पुढील आठवडयात होईल आणि आपले समाधान कारक निर्णय होईल असा मी आपल्याला विश्वास देऊ इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी :मुंबईतील जागेश्वरच्या महात्मा फुले मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना मिळणारे निकृष्ट जेवण

मु.शी :मुंबईतील जागेश्वरीच्या महात्मा फुले मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना मिळणारे निकृष्ट जेवण या संबंधी श्री. अनिल परब डॉ.दीपक सावंत,सर्वश्री अरविंद सावंत,विलास अवचट,श्रीमती कांता नलावडे,डॉ.अशोक मोडक, श्री.शांताराम करमळकर,श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री प्रतापसिंह मोहिते - पाटील, विनायक मेटे,जितेन्द्र आव्हाड,प्रा.फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे,श्री.सदाशिवराव पोळ यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. अनिल परब (विधान सभेने निवडलेले) : अध्यज महोदय, मी □ाम 101 अ□ये पुढील तातडीच्या व सार्वजा□ज महत्वाच्या बाबीज डे आपल्या अ□मती□ स□मा□□य सामाजिक न्याय.. मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां□ □ाबेद□ ज रावे. अशी वि□ती ज रतो.

" मुंबईतील जोगेश्वरी येथील महात्मा फुले मागासवर्गीय वसतीगृहातील शेकडो विद्यार्थ्यांनी ठेकेदारांतर्फे देण्यात येत असलेल्या निकृष्ट दर्जाच्या जेवणासंबंधीच्या निषेधार्थ दि..2 मार्च 2005 रोजीपासून सुरु केलेले उपोषण, विद्यार्थ्यांना जेवणात जळलेले अन्नपदार्थ खावे लागणे, आदल्या दिवशी जेवणात अळया सापडल्याने आणि नेहमीच्या निकृष्ट दर्जाच्या जेवणामुळे सहनशक्ती संपलेल्या विद्यार्थ्यानी सामुहिक उपोषण करण्याचा घेतलेला निर्णय, ठेकेदारांस त्वरित बदलणे व प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जेवणाचे दर महिन्याला देण्यात येणारे 750 रुपये ठेकेदारांला न देता विद्यार्थ्यानी स्थापन केलेल्या भोजन समितीस देण्यात येऊन समितीतर्फे खाणावळीचे व्यवस्थापन करण्यास परवानगी देण्याबाबत विद्यार्थ्यांनी शासनाकडे केलेली मागणी, एक महिन्यापूर्वी वरळी येथील वसतिगृहातील गैरसोयीविरुध्द विद्यार्थ्यांनी उपोषण करणे, खाणावळीत स्वच्छता नसणे, पाण्याची टाकी साफ नसणे, सांडपाण्याची योग्य व्यवस्था नसणे, नेहमीचे अशुध्द पाणी आणि जेवणामुळे विद्यार्थ्यांना आजारपणास तोंड द्यावे लागणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीविताला □ाम□ज झालेला गंभीर धोका, मुंबईतील तसेच राज्यातील सर्व वसतिगृहातील व्यवस्थापनास विद्यार्थ्यांच्या सोयी, सुविधा व होणाऱ्या गैरसोयीच्या तक्रारी दूर करण्यास आलेले अपयश, योग्य नियोजनाअभावी विद्यार्थ्यांचे होत असलेले हाल, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे व संपाताचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.चन्द्रकांत हंडोरे (सामाजिक न्याय मंत्री) : अध्यज महाराज, लजवेधी सूच□सबंधीच्या □ाबेद□च्या प्रती मा□□य सदस्यां□ आधीच वितरीत जे ल्या असल्यामुळे मी ते □ाबेद□ आपल्या अ□मती□सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : □ाबेद□सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यांत आले आहे.

□ाबेद□

(प्रेस : येथे सोबतचे □ाबेद□छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री. अनिल परब : सभापती महोदय, मुंबईतील या वसतिगृहाच्या दुरावस्थेसंबंधीची लक्षवेधी सूचना मी मांडली असून अत्यंत वाईट अवस्थेत हे विद्यार्थी त्या ठिकाणी राहत आहेत. शासनाच्या जी.आर.प्रमाणे 1984 ला 75 रुपये ,1989 ला 150 रुपये आणि 2005 त्यात 50 रुपये वाढ करुन आता या विद्यार्थ्यांना 200 रुपये निर्वाह भत्ता देण्यात येत आहे.या विद्यार्थ्यांना अत्यंत निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जात आहे.त्यांना अत्यंत वाईट प्रकारची वागणूक दिली जात आहे. या सर्व गोष्टींचा उद्रेक होऊन जोगेश्वरी येथील महात्मा फुले वसतिगृहातील मुलांनी मागे उपोषण केले होते.तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी त्या ठिकाणी जाऊन भेट दिली होती त्याचबरोबर बरळी येथील वसतिगृहालासुध्दा त्यांनी भेट दिली होती.मंत्रिमहोदयांनी भेट दिल्यानंतर काही दिवस परिस्थिती चांगली राहते आणि नंतर पुन्हा.. येरे माझ्या मागल्या.. सारखी स्थिती होते. जो शासकीय निर्वाह भत्ता 200 रुपये भत्ता दिला जातो तो महागाईचा विचार करता अत्यंत कमी आहे.

नंतर श्री.सुबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अतिशय वाईट पध्दतीचे जीवन तेथे या मुलांना जगावे लागत आहे. या वसतीगृहांमधून मुलांना जळके अन्न दिले जात होते. शेवटी या सगळ्यांचा उद्रेक झाला आणि त्या मुलांनी आंदोलन सुरू केले. त्यानंतर मंत्र्यांनी तेथे भेट दिली आणि केवळ तेथील ठेकेदार बदलला. मंत्री महोदयांना त्या मुलांना जी आश्वासने दिली होती, ज्यामुळे त्या विद्यार्थ्यांनी आपले आंदोलन-उपोषण मागे घेतले ती किती पूर्ण केली गेली ? आजही डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांच्या वसतीगृहातील मुलांना गेल्या तीन महिन्यांपासून केवळ 100 रुपये निर्वाह भत्ता दिला जातो आणि मीराबाई मुलींचे वसतीगृहाचे ठिकाणी तीन महिने केवळ 35 रुपये निर्वाह भत्ता दिला जात आहे. हा निर्वाह भत्तादेखील या मुला-मुलींना पूर्णपणे दिला जात नाही. तसेच आपल्या शासन निर्णयानुसार या मुलांची आरोग्य तपासणी केली जाते असे या निवेदनात म्हटले आहे पण तेही चुकीचे आहे. तर अशी जी चुकीची माहिती या निवेदनातून आलेली आहे ती आपण दुरूस्त करणार आहात काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : अध्यक्ष महाराज, मुंबईच्या जोगेश्वरी येथील महात्मा फुले मागासवर्गीय वसतीगृहातील मुलांनी उपोषण केले ही गोष्ट खरी आहे आणि त्यामध्ये त्यांची मुख्य मागणी होती की, तेथील ठेकेदार बदलावा. त्याप्रमाणे शासनाने निर्णय घेऊन मुलांची ती मागणी मान्य केली असून तेथील ठेकेदार बदलण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी निर्वाह भत्त्या संबंधीचा जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे त्याबाबत निश्चितपणे चौकशी करून तो भत्ता पूर्णपणे देण्यासाठी तातडीने प्रयत्न केले जातील.

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महाराज, मुंबईच्या या वसतीगृहांमध्ये शिकलेली मुले ही कालांतराने देश घडवितात हा इतिहास आहे. या मागासवर्गीयांच्या वसतीगृहामध्ये ज्या काही हाल अपेक्षा तेथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांना भोगाव्या लागतात त्याची चर्चा न करणेच योग्य ठरेल असे माझे मत आहे. ज्या पध्दतीने काल या ठिकाणी चर्चा झाली त्यावेळी मुक-बधीर विद्यार्थ्यांचा प्रश्न होता, आश्रमशाळांचा प्रश्न आला होता आणि आज दलित विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाबद्दल आपण बोलत आहोत, चर्चा करीत आहोत. अध्यक्ष महाराज, मुंबई शहरामध्ये बाहेरून येणा-या गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी आपण काही उपाय योजना केल्या. त्यांच्यासाठी वसतीगृहे उभारली आहेत. माझा या ठिकाणी स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या वसतीगृहांमध्ये बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जेव्हा ही वसतीगृहे बांधली गेली त्यावेळची आणि आताची तुलनात्मक पाहता ही वसतीगृहे आज

..... इइ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुरेशी आहेत काय ? ही वसतीगृहे बांधून किती वर्षे झाली आहेत ? येथे राहणाऱ्या दलित विद्यार्थ्यांना नीट आणि चांगल्या सोयी सुविधा मिळाव्यात या दृष्टीने चांगल्या सोयी-सुविधा असलेली वसतीगृहे बांधली जाणार आहेत काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : अध्यक्ष महाराज, मुंबई शहरामध्ये जी वसतीगृहे आहेत त्यातील जोगेश्वरी येथील हे जे वसतीगृह आहे त्यामध्ये 67 लाख रुपयांच्या निविदा मागवून दुरूस्तीचे काम सुरू केलेले आहे आणि ते आता पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. त्याचबरोबर वरळी येथील दोन इमारती आहेत त्या ठिकाणी 49 लाख रुपयांच्या निविदा मागवून काम आपण सुरू केलेले आहे. तसेच त्या इमारतींच्या बाजूला बरीच मोकळी जागा पडलेली आहे. ती इमारत 1924 ची असून तिचे आयुष्य आता संपुष्टात आलेले आहे परंतु आपण तेथे दुरूस्तीसाठी 49 लाख रुपयांचे काम सुरू केलेले आहे आणि त्यामध्ये संडास-बाथरूम पासून लाईटफिटींगस सगळ्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा आपला प्रयत्न आहे. तसेच त्याच्या सभोवताली जी मोकळी जागा आहे त्या ठिकाणी मुंबई शहरामध्ये बाहेरून येणाऱ्या दलित तसेच दुर्बल घटक - ओबीसी वगैरे, विद्यार्थ्यांसाठी अत्यंत चांगल्या पध्दतीचे मुलींसाठीसुध्दा हॉस्टेल निर्माण करण्याचा आपला प्रयत्न आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महाराज, 1924 साली ही वसतीगृहाची इमारत बांधली गेली तेव्हाची तेथे येणाऱ्या आपल्या गोरगरीब विद्यार्थ्यांची संख्या काय होती हे लक्षात घेऊनच ती इमारत तेव्हा बांधली गेली. परंतु आता मुंबईमध्ये शिकण्यासाठी येणाऱ्यांची संख्या वाढते आहे. खास करून ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात या शहरात येतात त्यांची त्यामुळे गैरसोय होत असते. 1924 साली बांधलेली ही इमारत आता जीर्ण झालेली आहे. ....

(यानंतर श्री. जागडे .... एफएफ 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड...

नवीन इमारतींची आवश्यकता आहे. अमुक अमुक विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह असे काही नॉर्म्स ठरविण्यात आले आहेत काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : 100 विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह आहे. माननीय सदस्य सांगत आहे त्याप्रमाणे मुंबई बाहेरुन येणा-या विद्यार्थ्यांची संख्या तशी जास्त नाही. कारण तालुका, जिल्हा आणि विभागीय स्तरावर मोठ्या प्रमाणात वसतिगृहे बांधण्यात आली आहेत.

श्री. जितेंद्र आव्हाड : 1924 साली आपण हे वसतिगृह बांधले आहे. त्यानंतर मुंबईत नवीन वसतिगृह बांधलेले नाही.

श्री. चंद्रकांत हंडोरे : हे वसतिगृह 1924 साली बांधले आहे. परंतु त्यानंतर म्हणजे 1970 साली सुध्दा वसतिगृह बांधले आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, 50 ते 60 वर्षापूर्वी बांधलेली ही वसतिगृहे आहेत. त्यांच्या दुरुस्तीची कामे न केल्यामुळे ती सर्व मोडकळीस आली आहे. म्हणून समाजकल्याण खात्याअंतर्गत जी जी वसतिगृहे आहेत, त्यांचे आधुनिकीकरण करण्याच्या बाबतचा आराखडा राज्य स्तरावर तयार केला आहे काय ? तसा आराखडा तयार केला असल्यास तो मा. मंत्रिमहोदय स्वीकारणार आहेत काय ? दुसरी बाब या वसतिग्रहातील विद्यार्थ्यांच्या तक्रारी समाजकल्याण अधिकारी ऐकत नाहीत. म्हणून स्थानिक लोकांची एक दक्षता समिती आपण निर्माण करणार आहांत काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, वसतिगृहांच्या बाबतीत समाजकल्याण विभागाने एक प्लॅन तयार केला आहे. 200 ठिकाणी नवीन वसतिगृहे निर्माण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. आता जवळ जवळ 18 वसतिगृहांच्या दुरुस्तीचे काम सुरु करण्यात आलेले आहे. 10 वसतिगृहांचे श्रेणीवर्धन करण्याचे काम सुरु झाले आहे. 18 वसतिगृहाच्या दुरुस्तीसाठी 2 कोटी 06 लाख रुपये लागणार आहेत. तसेच 200 वसतिगृहांची प्लॅन आणि एस्टीमेटस् तयार झाली आहेत. भविष्यकाळात विद्यार्थ्यांना सर्व सुविधा मिळतील या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये चांगली मानसिकतचा निर्माण होईल, या दृष्टीने ही वसतिगृहे निर्माण करण्यात येत आहेत. 200 नवीन वसतिगृहे निर्माण करणार आहोत, त्यामध्ये मुंबई आणि नवी मुंबईचा सुध्दा यामध्ये समावेश आहे. माननीय सदस्यांनी दुसरा एक महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. समाजकल्याण अधिकारी विद्यार्थ्यांच्या तक्रारीकडे लक्ष देत नाहीत. पूर्वी या बाबत एक कमिटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे.....

होती. त्याप्रमाणे स्थानिक आमदार आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून यावर देखरेख ठेवण्यासाठी एक समिती लवकरात लवकर गठीत करण्यात येईल. पूर्वी जी कमिटी होती, तिचे पुनरुज्जीवन करण्याची कारवाई करु.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्व वसतिगृहांना माननीय मंत्रिमहोदयांनी भेट दिली आहे काय ? तसेच आता विद्यार्थ्यांना 200 रुपये निर्वाहभत्ता देण्यात येतो. त्यामध्ये वाढ करण्यात येईल काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, महाराष्ट्रात 271 शासकीय वसतिगृहे आणि 2283 अनुदानीत वसतिगृहे आहेत. मी मंत्री होऊन फक्त साडेतीन महिन्याचा कालावधी उलटून गेला आहे. मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद आणि नागपूर या शहरातील वसतिगृहांना मी भेट दिलेली आहे.

(यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे...

सभापती महोदय, दोन वर्षापूर्वी विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता 150 रुपयांवरुन 200 रुपये केला, 25 रुपयांचा 50 रुपये केला आणि 50 रुपयांचा 75 रुपये केला. तरीसुध्दा आपल्या आणि विद्यार्थ्यांच्या भावना लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे पॉकेट मनी निश्चितपणे वाढविण्याबाबत विचार करु.

प्रा. जोगेंद्र कवाडे : शासकीय वसतिगृहांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागासवर्गीय विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांचे पालकत्व शासनाने स्वीकारले आहे. त्यामुळे पालक म्हणून नैतिक जबाबदारी इमाने इतबारे पाळण्याचे अभिवचन हे शासन देईल काय? मागासवर्गीय विद्यार्थी या वसतिगृहांमध्ये रहातात त्यांचे शैक्षणिक वातावरण टिकविण्यासाठी काही विशेष प्रयत्न शासनातर्फे केले जाणार आहेत काय?

श्री. चंद्रकांत हंडोरे : माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर "होय" आहे. शासनाने निश्चितपणे या विद्यार्थ्यांचे सर्व प्रकारचे पालकत्व स्वीकारले आहे. माझ्यासारखा विद्यार्थी चळवळीतून आलेला कार्यकर्ता आहे. म्हणून निश्चितपणे जे जे कुणी चुकारपणा करीत असतील तर त्यांच्यावर कडक कारवाई सुरु केली आहे. मागील महिन्यात वरळीच्या वसतिगृहाला विधानसभेचे माजी अध्यक्ष मा. श्री. दत्ताजी नलावडे यांच्यासमवेत भेट दिली व पहाणी केली. त्याठिकाणी जे चुकार अधिकारी होते त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविले व काहींची बदली करण्यात आली आहे.

श्री. अरविंद सावंत : महाराष्ट्राच्या अनेक भागामध्ये वसतिगृहे आहेत, रायगड जिल्हयातील महाड येथेही वसतिगृह आहे. या वसतिगृहांची अवस्था जनावरांच्या गोठयापेक्षा वाईट आहे. वडाळयाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेजच्या बाजूला असलेल्या वसतिगृहाची दुरावस्था झाली आहे. त्याठिकाणी विद्यार्थ्यांऐवजी अनेक मंडळी वर्षानुवर्षे ठाण मांडून बसली आहेत. अशा लोकांना त्या ठिकाणाहून हुसकावून लावून गरजू विद्यार्थ्यांनाच वसतिगृह उपलब्ध केले पाहिजे. ही वसतिगृहे व्यवस्थित ठेवण्यासाठी आपण ठोस पाऊले उचलणार काय?

श्री. चंद्रकांत हंडोरे : माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. वरळी व जोगेश्वरी येथील वसतिगृहांमध्ये असे प्रकार घडावयाचे म्हणून तेथून काही विद्यार्थ्यांना जबरदस्तीने हुसकावून काढले आहे. काही भागातील वसतिगृहांमधील लोकांना हुसकावून काढणे थोडेसे अडचणीचे आहे. तरी सुध्दा याबाबतीत शक्य असेल ते करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या सुरुवातीच्या मजकुरामध्ये "निकृष्ट दर्जाच्या जेवणासंबंधीच्या निषेधार्थ दिनांक 2 मार्च 2005 रोजीपासून सुरु केलेले उपोषण" असे स्पष्टपणे म्हटले आहे. आणि निवेदनामध्ये "दिनांक 15.2.2003 अन्वये माहे जून 2002 पासून रु.200/- निर्वाह भत्ता दिलेला आहे, वसतिगृहातील विद्यार्थ्यांना मंजूर निविदाधारक भोजन ठेकेदारामार्फत भोजन देण्यात येत आहे. भोजन चांगले रुचकर स्वादिष्ट व पोटभर देण्यात येते" असे म्हटले आहे. म्हणजे भोजन चांगले मिळत नाही म्हणून विद्यार्थी उपोषणाला बसले तो विषय बाजूला राहिला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

आणि याठिकाणी ज्या अधिका-यांनी उत्तरामध्ये असे लिहीलेले आहे, त्या अधिका-यांना घेऊन आपण प्रत्यक्ष तेथे जावे आणि खरे म्हणजे तेथे न सांगता जावयास पाहिजे. हा आमच्या लोकसभा मतदार संघातील महत्वाचा जो विभाग आहे, त्याठिकाणी असलेल्या वसतीगृहातील ही मुले आहेत. पण या मुलांचे हाल होत आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन आपण त्यांना सर्व सुविधा देतो. पण प्रत्यक्षात या सर्व सुविधा निकृष्ट दर्जाच्या असतात आणि त्यातून आपण कोणाचा अवमान करीत आहोत ? तेव्हा या बाबतीत योग्य ती कारवाई करुन येथील मुलांना चांगले जेवण मिळेल यादृष्टीने कधीपासून व्यवस्था सुरु करणार आहात ?

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, या वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी उपोषण केल्यानंतरच लक्षात आले की, त्याठिकाणी दिल्या जाणा-या जेवणामध्ये काही गडबड आहे. म्हणून विद्यार्थ्यांच्या मागणीवरुन आता तातडीने तेथील कॉन्ट्रॅक्टर बदललेला आहे. तेथे जो नवीन कॉन्ट्रॅक्टर आलेला आहे, तो विद्यार्थ्यांना रुचकर आणि चांगले जेवण देत आहे.

. . . .2 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 2 बाबत</u>

उप सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली दुस-या क्रमांका वरील लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे. आता ही लक्षवेधी सूचना मंगळवारी घेण्यात येईल.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना मंगळवारी घेण्याबद्दल काही हरकत नाही. पण आम्ही जेव्हा लक्षवेधी सूचना देतो, तेव्हा त्यामध्ये संबंधित विभागाच्या नावाचा उल्लेख केलेला असतो. पण याबाबतीत असे समजले आहे की, ही लक्षवेधी सूचना चुकून दुस-याच विभागाकडे गेली आहे, त्यामुळे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, आम्ही लक्षवेधी सूचना देताना त्याच्या विषयावर नगरविकास विभागाचा उल्लेख केलेला आहे. तसेच टाऊनशीप बाबतचा क्रमांक दिलेला आहे. नगरविकास विभागाच्या संदर्भात सेक्शनचा उल्लेख केलेला आहे.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, आमचे म्हणणे असे आहे की, या लक्षवेधी सूचना संबंधित विभागाकडे पाठवत असताना चुकीच्या विभागाकडे पाठविल्या जाऊ नयेत. असे करणे म्हणजे वेळकाढूपणाचा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा लक्षवेधी सूचना दिल्यानंतर त्या योग्य विभागाकडे पाठविण्यात याव्यात अशी आपण कार्यालयाला सूचना द्यावी.

. . . .2 एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: संजय गांधी योजनेमधील लाभार्थींना चार/चार महिने अनुदान न मिळणे.

मु.शी.: संजय गांधी योजनेमधील लाभार्थींना चार/चार महिने अनुदान न मिळणे यासंबंधी सर्वश्री.संजय दत्त, धनाजी साठे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय विशेष सहाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"संजय गांधी योजनेमधील लाभार्थींना चार/चार महिने अनुदान न मिळणे तसेच नवीन तयार केलेल्या नियमांमुळे ख-या लाभार्थींना देखील वारंवार तहसिलदार कार्यालयात हेलपाटे घालावे लागणे, त्यामुळे अनेक विधवांवर व वृध्दांवर आलेली उपासमारीची पाळी, त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत त्वरीत कार्यवाही करुन संजय गांधी योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना त्वरीत अनुदान देण्याबाबत राज्य शासनाने करावयाची उपाययोजना व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सुरेश शेट्टी (विशेष सहाय्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 एच-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, 1080 मध्ये माननीय मुख्यमंत्री श्री.ए.आर.अंतुले साहेब यांनी पुढाकार घेऊन संजय गांधी यांच्या नावाने निराधारांना अर्थसहाय्य देण्याच्या दृष्टीने योजना सुरु केली. पण सध्या या योजनेच्या मूळ हेतूपासून शासन दूर जात आहे असे वाटते. या योजनेअंतर्गत मिळणारे अर्थसहाय्य गरीबांपर्यंत पोहोचविण्यासाठी अजून शासन काही व्यापाक यंत्रणा उभी करणार आहे का ? तसेच संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत राज्यात एकूण किती लाभधारक आहेत ? त्यांना लाभ देण्यासाठी वार्षिक किती रकमेची गरज आहे आणि त्यासाठी किती रकमेची तरतूद केलेली आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आपल्याला सर्वांना माहिती आहे की, संजय गांधी निराधार योजना गरीब लोकांसाठी सुरु करण्यात आलेली आहे. त्यासंदर्भात 14 जानेवारी 2004 रोजी नवीन जी.आर.काढून नियमांमध्ये बदल केलेला आहे, त्यामध्ये सुधारणा केलेली आहे. राज्यात या योजनेअंतर्गत किती लाभधारक आहेत ? असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. याबाबतीत सांगावयाचे तर 2004-2005 मध्ये 3 लाख 8700 लाभार्थींनी या योजनेचा फायदा घेतलेला आहे आणि यासाठी आपण 92.6 कोटी रुपये एवढा निधी खर्च केलेला आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, ही गरीबांसाठी असलेली योजना आहे. एका बाजूला आपण असे म्हणतो की, माहितीचा अधिकार आहे. पण खरे सांगावयाचे तर, "आम्ही तुम्हाला या योजनेचा फायदा मिळवून देतो असे सांगून यामधून कमिशन घेणारे एजन्ट बहुतेक कार्यालयांच्या आसपास फिरत असतात असे आमच्या लक्षात आले आहे. लाभार्थींची निवड करण्यासाठी सॉफ्टवेअर तयार केले आहे, त्यामध्ये बोगस लाभार्थींची संख्या 800 च्यावर असल्याचे निदर्शनास आले आहे का ? तसेच ग्राम सभेमध्ये आणि ज्या सभेला आमदारांची उपस्थिती असते त्या आम सभेमध्ये या लाभार्थींची माहिती त्यांना कळली तर जेणेकरुन त्यांच्या-त्यांच्या भागातील लाभार्थींपर्यंत कोणते फायदे मिळालेले आहेत हे स्पष्ट होईल. तेव्हा संजय गांधी निराधार योजनेच्या संबंधातील माहिती आम सभेमध्ये आणि ग्राम सभेमध्ये पोहोचण्याच्या दृष्टीने तुमच्याकडे काही व्यवस्था आहे का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यापूर्वी महाराष्ट्रातील काही जिल्हयांमधून तक्रारी आल्या होत्या की, या योजनेअंतर्गत बोगस लाभार्थींना पैसे मिळत आहेत. त्याबाबत शासनाने डिव्हीजनल लेव्हलवर हाय पॉवर कमिटी आणि जिल्हा स्तरावर कमिटी नेमून तपासणी केली होती.

. . . .2 एच-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामध्ये अंदाजे 15 लाख लाभार्थी असे होते की, जे नियमात बसत नव्हते आणि त्यांना या योजनेमध्ये समाविष्ट केले होते.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (पुढे चालू....

त्यांना काढले गेले आणि जे अधिकारी आहेत, त्यांच्यावर कारवाई करतो आहोत. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न तालुका लेवलवरील समित्यांमध्ये स्थानिक आमदारांना सहभागी करणार आहात काय, असा प्रश्न विचारला. खालच्या सभागृहाच्या अध्यक्ष महोदयांनी आदेश दिलेले आहेत, त्याप्रमाणे 25 मार्चपर्यन्त आपल्याला या समित्या नेमावयाच्या आहेत. 25 तारखेपर्यन्त या समित्या गठित होणे शक्य नाही. याबाबत अध्यक्ष महोदयांना पत्र लिहून एक महिन्याची मुदतवाढ देण्याबाबत कळविलेले आहे. आम्ही स्थानिक लेवलवरील आमदारांना या समितीचे अध्यक्ष करणार आहोत.

श्री.विलास अवचट : स्थानिक आमदार त्या समितीचे अध्यक्ष होणार असतील तर विधानपरिषदेच्या सदस्यांच्याबाबतीत कोणता निर्णय घेणार आहात ?

उपसभापती : त्यांना त्या समितीचे सह अध्यक्ष म्हणून नेमले जाईल.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, याबाबतचा जी.आर. काढून रुपरेषा आखलेली आहे. त्यामध्ये स्थानिक आमदार हे त्या समितीचे अध्यक्ष असतील आणि बाकीचे सदस्य असणार आहेत. आता श्री.सावंत आयोगाचा अहवाल आलेला आहे. त्यानंतर काही सन्माननीय आमदार माझ्याकडे आले आणि त्यांनी सांगितले की, या समितीचे अध्यक्ष आम्हाला करु नका. याबाबत सांगू इच्छितो की, हे अधिवेशन संपल्यानंतर त्या ठिकाणी नव्याने समित्या स्थापन कराव्या लागतील. बहुतेक विधानसभेच्या आमदारांनी या समितीचे अध्यक्ष करु नका, असे सांगितलेले आहे. आपल्याला अध्यक्ष व्हायचे असेल तर आम्ही तयार आहोत.

श्री.धनाजी साठे : निवेदनामध्ये दारिद्र्य रेषेखालील यादीत नाव समाविष्ट होण्यासाठी आवश्यक असलेली शहरी व ग्रामीण भागातील केंद्र शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या उत्पन्न मर्यादेपर्यन्त असल्यास अशा लाभार्थ्यास पात्र ठरविण्यात येईल. ज्या पात्र व्यक्तीचे नाव दारिद्र्य रेषाखालील यादीमध्ये नाही अशा पात्र व्यक्तीलाही आपण अनुदान देणार आहात काय ?

श्री.सुरेश शेट्टी : त्या पात्र व्यक्तीचे नाव दारिद्र्य रेषेखाली नाही, त्यांनाही या योजनेचा फायदा घेता येईल.

श्री.एन.पी.हिराणी : संजय गांधी निराधार योजना आहे, त्यामध्ये इतर सर्व शासकीय योजनांप्रमाणेच त्याही ठिकाणी गडबड चालते. प्रेताच्या टाळूवरील लोणी खाणारी जमात आहे, ती या योजनेमध्ये गुंतलेली आहे. प्रत्येक ठिकाणी बोगस लाभार्थी खूप मोठयाप्रमाणावर आहेत. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एन.पी.हिराणी (पुढे चालू...

बोगस लाभार्थींना आळा घालण्यासाठी नागपूरच्या जिल्हाधिका-यांनी राबविलेली आहे. लाभार्थींच्या अंगठ्याचा ठसा डिजिटल पध्दतीने रेकॉर्ड करून त्यांना कार्डे दिलेली आहेत. त्या डिझिटल यंत्रामध्ये कार्ड घातले की, लाभार्थीची ओळख पटते आणि त्याला सहाय्य मिळू शकते. अशाप्रकारची कलेक्टरनी व्यवस्था प्रायोगिक तत्वावर नागपूरला केलेली आहे. यामुळे बोगस लोकांचे काही चालू शकत नाही तेव्हा अशाच प्रकारची योजना महाराष्ट्रामध्ये कार्यान्वित करण्याचा विचार करणार आहात काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली ती खरी आहे. नागपूरमध्ये अशाप्रकारचा प्रायोगिक तत्वावर प्रयोग सुरु केलेला आहे. हा प्रयोग आता एक-दोन महिन्यामध्ये विभागीय पातळीवर सक्सेस झाल्यानंतर मग खाली तालुका स्तरापर्यन्त ही योजना लागू करण्यात येईल.

--

3...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

पृ. शी. : शेतकऱ्यांकडून अडतशुल्क वसूल करणे.

मु. शी : "शेतकऱ्यांकडून अडतशुल्क वसूल करणे,"यासंबंधी स-मा-न-ीय सदस्य श्री.विनोद तावडे, डॉ.अशोक मोडक, श्री.रामनाथ मोते यां-ी दिलेली लजवेधी सूच-ा.

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : अध्यज महोदय, मी आपल्या अ-ुमती-े नियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनिज महत्वाच्या बाबीज डे स-मा-न-ीय पणन मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी नि-वेद-ा ज रावे, अशी वि-ंती ज रतो.

"राज्य शासन पणन संचालकांनी शेतकऱ्यांकडून अडतशुल्क वसूल करण्यात येऊ नये असे निर्देश वेळोवेळी देऊनही राज्यातील अडीचशेहून अधिक बाजार समित्यांमधील अडत्यांकडून अशी वसुली अद्यापही चालू असणे, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे दररोज अंदाजे 20 कोटी रुपयांचे नुकसान होणे, अडत्यांकडून शेतकऱ्यांच्या होणाऱ्या लुटीसंदर्भात अखिल भारतीय किसान संघाने दिनांक 15,16 फेब्रुवारी 2005 रोजी तीव्र आंदोलनाचा इशारा देणे, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार व पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लजवेधी सूच-ेसंबंधीच्या नि-वेद-ाच्या प्रती मा-न-ीय सदस्यां-ा आधीच वितरीत ज ेलेल्या आहेत,आपल्या परवानगीने मला त्यामध्ये अधिक माहिती पुढीलप्रमाणे समाविष्ट करावयाची आहे :-

"शेतकऱ्यांकडून अडत वसुली करण्यात येऊ नये, यासाठी बाजार समिती कायद्याच्या नियम 20 मध्ये दिनांक 17-3-1997ा रोजी अधिसूचना जारी केली. तथापि, मूळ कायद्यातील कलम 31 (2) मध्ये अनुषंगिक दुरुस्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. याबाबत कृषि उत्पन्न बाजार समित्या, व्यापारी, अडते व शेतकरी प्रतिनिधींशी चर्चा करून पुढील कार्यवाही करण्यात येईल". अधिकच्या माहितीसह मी ते सुधारीत नि-वेद-ा आपल्या अ-ुमती-े सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : अधिकच्या माहितीसह सुधारीत नि-वेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

नि-वेद-ा

(प्रेस : येथे सोबतचे नि-वेद-ा छापावे.)

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक :सभापती महोदय, मला वाटते आम्ही दिलेल्या सूचनेमध्ये जो उल्लेख आहे तो तुम्ही वाचला असेलच. सूचनेमध्ये असे म्हटले आहे की, "राज्यातील शेतक-यांचे दररोजचे अंदाजे 20 कोटी रुपयांचे नुकसान होत आहे", ही माहिती आम्हाला मिळाली आहे ती बरोबर आहे की, नाही, हा माझा पहिला प्रश्न समजून त्याचे उत्तर द्यावे. दुसरा त्याहून महत्वाचा प्रश्न आहे. शेवटच्या परिच्छेदाकडे मी आपले लक्ष वेधतो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "खरेदी विक्री (नियमन) अधिनियम,1963 चे कलम 39 आणि 48 अन्वये" सभापती महोदय, 48 व्या कलमामध्ये वस्तुत: शिक्षेची तरतुद आहे, हे आपल्याला माहीत आहे. ते कलम स्वच्छपणे असे सांगते की, "व्यापारी **कसर दि**ल्या बद्दल किंवा जी कोणतीही व्यक्ती कलम 39 च्या उपबंधाचे उल्लंघन करुन, कोणतीही व्यापारी **कसर** देईल किंवा घेईल, त्याला दोषी ठरविण्यात आल्या नंतर तीन महिने मुदतीपर्यंत कैदेची शिक्षा होईल किंवा 500 रुपयापर्यंत दंडाची शिक्षा होईल." यासंदर्भात माझा दुसरा प्रश्न स्वाभाविकपणे असा आहे की, याची अंमलबजावणी झाली आहे काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कायद्यामध्ये कलम 39 ची तरतूद आहे आणि त्या तरतुदीचे उल्लंघन झाले तर त्याला कलम 48 लागू करण्यात येतो. त्यामुळे आम्ही एक परिपत्रक काढून 23 मे 2003 ला सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांना सर्व ए.पी.एम.सीं.ना कळविलेले आहे की, आपल्या पेरीफेरीमध्ये जर कोणी 1963 च्या कलम 39 च्या तरतुदींचे उल्लंघन केले असेल तर कलम 48 प्रमाणे कारवाई करण्यात येईल".

डॉ. अशोक मोडक : आपण पहिला प्रश्न ऐकलेला आहे. कलम 39 चे प्रत्यक्षात उल्लंघन झालेले आहे अशी आमची माहिती आहे. शेतक-यांची लूटमार होते. म्हणून मी आपल्याकडून क्लॅरिफिकेशन मागितले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील :कलम 48 चे उल्लंघन झालेले आहे अशी आपल्याकडे माहिती असेल तर जरुर ...

डॉ. अशोक मोडक : कलम 39 चे उल्लंघन झालेले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : कलम 39 चे उल्लंघन झाल्या नंतर कलम 48 लागू होतो. कलम 48 मध्ये शिक्षेची तरतुद आहे. म्हणून आपल्याकडे तशी माहिती असेल तर ती जरुर माझ्याकडे द्या. त्या संबंधितावर कलम 48 प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, भारतीय किसान संघाने माजलगाव जिल्हा बीड येथील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सभापतींना दिनांक 21.3.2005 ला एक पत्र दिले आहे. त्यात असे म्हटले आहे की, व्यापा-यांनी आंदोलन केले, त्यावर स्थगिती घेतली , ही स्थगिती कशावर घेतली तर खरेदीदारांकडून रक्कम वसुल केली जावी. म्हणजेच व्यापा-यांकडून वसुली केली जावी अशा त-हेचा आदेश दिनांक 4 ऑक्टोबर, 1995 रोजी सैना-भाजपचे राज्य होते तेव्हा निघालेला होता. व्यापा-यांनी त्याला कौशल्यांनी स्थगिती मिळविली. शासनाने ती स्थगिती दिनांक 21 नोव्हेंबर, 1996 ला उठविली. ती स्थगिती उठवून 8 वर्षे झालेले आहेत. तरीही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. म्हणजे व्यापा-यांकडून जी वसुली व्हावयला पाहिजे ती वसुली व्यापा-यांकडून न होता ती शेतक-यांकडून होत आहे, याबद्दल मंत्रिमहोदयांनी सांगावे?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, 1995 साली याप्रमाणे कारवाई करा असे आदेश तत्कालीन पणन मंत्री श्री. मुंदडासाहेब यांनी दिलेले होते. आडत्याकडे शेतक-यांच्या आलेल्या मालाची रक्कम वसुल करतो, ती शेतक-यांकडून वसूल करतो त्याच्याऐवजी ती व्यापा-यांकडून वसुली करावी या संदर्भातील आदेश पारित करण्यात आले. डायरेक्टर ऑफ मार्केटिंगच्या माध्यमातून ते आदेश सर्क्युलेटही झाले. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात 10 ते 15 दिवस हा व्यापार बंद झाला, फार मोठे अराजक माजले. त्यानंतर तत्कालीन मंत्र्यांनीच पुन्हा स्थगिती दिली. की, या संदर्भातील आपली कारवाई थांबवावी. त्याप्रमाणे ती थांबली गेली. त्यानंतर विधानसभेमध्ये त्यासंदर्भातील एक विधेयक सादर केले, ते संयुक्त सिमतीकडे गेले. संयुक्त समिती सर्व सदस्यांची एक समिती असल्यामुळे त्या समितीमध्ये त्यावर चर्चा झाली. सुदैवाने त्यावेळेस मी त्या समितीमध्ये सदस्य हातो. मी मंत्री झाल्यानंतर मी त्या समितीचा अध्यक्ष झालो. आणि ते विधेयक आणतांना. त्या संदर्भात एकमताने विचार झाला आणि त्याबाबतीत आजही आपल्याकडे तशाच प्रकारचे आदेश आहेत. परंतु आपल्याला हा निर्णय करावयाचा असेल आणि तो निर्णय करण्यासाठी शासन वचनबध्द आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील .....

या बाजार समितीच्या कायद्यातील नियम 20 मध्ये स्पष्ट तरतूद आहे. त्याची अंमलबजावणी होऊ शकलेली नाही. त्यामुळे यासाठी कृषि उत्पन्न बाजार समित्या, व्यापारी, अडते आणि शेतकरी यांच्याबरोबर आपल्याला पुन्हा एकत्र बसावे लागणार आहे आणि याबाबतीमध्ये नियम 20 मध्ये जी तरतूद आहे त्याप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी एकत्रिपणे बसून हा निर्णय आपल्याला करावा लागणार आहे.

डॉ. अशोक मोडक : दुर्दैव म्हणजे गेली आठ वर्षे व्यापारी किंवा शेतकरी यापैकी शेतकऱ्याचा छळ होत आहे हे आपण मान्य केलेले आहे. दुर्दैवाने याचे उत्तर मिळत नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : महाराष्ट्र कृषि माल खरेदी विक्री नियमन अधिनियम, 1963 खालील नियमातील नियम 20 मधील अडत कमिशन शेतकऱ्यांकडून वसूल करता येणार नाही याबद्दलची तरतूद शासनाने अधिसूचना काढून रद्द केली होती. त्यानंतरच्या काळामध्ये ज्यावेळी हा प्रश्न उपस्थित झाला त्यानंतर संयुक्त समितीमध्ये सुध्दा यासंदर्भात चर्चा झाली. आता याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सर्वांची एकत्रितपणे बैठक घ्यावी लागेल. मध्यंतरी असेच झाले. आपण आदेश काढला. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातील मार्केट 12 ते 13 दिवस बंद होते. अडत्या जर मार्केटमध्ये आला नाही तर शेतकऱ्यांच्या आलेल्या मालाचा लिलाव कोण करणार आणि तो लिलाव कोण घेणार ? आता परवा एक नवीन विधेयक केंद्रीय कृषि मंत्र्यांनी घोषित केले आहे. मला असे वाटते की, याबाबतीत आपण एक बैठक बोलवू आणि त्या पध्दतीने आपल्याला पुढची कार्यवाही करता येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : शासनाने ही तरतूद केल्यानंतर त्या तरतुदीची अंमलबजावणी होते की नाही ? त्याप्रमाणे त्या ठिकाणच्या बाजार समित्या काम करीत आहेत की नाही यादृष्टीने डीडीआर मार्फत किती बाजार समित्यांचा आढावा घेतला ? किती बाजार समित्यांनी याचे उल्लंघन केलेले आहे ? कायदा मोडून व्यापाऱ्याकडून वसुली होते. सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक या ठिकाणी सांगत आहेत. याचा आढावा आपल्या शासनामार्फत किंवा पणन खात्यामार्फत किंवा डायरेक्टर ऑफ मार्केटिंगकडून घेतला गेला काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये हे दिलेले आहे. परिपत्रकच काढलेले आहे. सर्व डीडीआरला कळविले आहे. डीडीआरवर सुध्दा जबाबदारी आहे. त्यांनी यासंदर्भात त्यांच्या ज्युरिसडीक्शनमध्ये एपीएमसीच्या या कायद्याप्रमाणे पुढची कार्यवाही करावी.

डॉ. अशोक मोडक : 1996 च्या 21 नोव्हेंबरला राज्य शासनाने स्थगिती उठविली. त्याला प्रत्यक्षात आठ वर्षे होऊन गेलेली आहेत. त्याची अंमलबजावणी झाली नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी तो मुद्दा मांडला. आता स्वाभाविकपणे आम्ही ते सांगतो तेव्हा शेतमाल विक्री खर्च शेतकऱ्यांच्या ऐवजी खरेदीदादाकडून वसूल केला जाईल असा निर्णय आपण का करीत नाही ? तरच मग त्याची अंमलबजावणी होईल आणि शेतकऱ्यांची जी लूट होते ती थांबेल.

श्री. हर्षवर्धन पाटील : मी मघाशी सांगितले की, स्थगिती दिली होती ती उठविली. परंतु त्या ठिकाणी बंद पुकारला होता त्यामुळे हे करता आले नाही. परंतु आता आपल्याला एकत्र बैठक घ्यावी लागेल. शेवटी वस्तुस्थितीच्या खोलामध्ये जाऊन पाहिले तर शेतकऱ्याकडून सेस वसूल केला किंवा व्यापाऱ्यांकडून सेस वसूल केला, आज शेतकऱ्यांकडून सेस वसूल करतो, उद्या जर व्यापाऱ्यांकडून वसूल करण्याचा निर्णय केला तर शेवटी ते एकच होणार आहे. परंतु याबाबतीत जे आंदोलन झाले, सगळे मार्केट बंद झाले, पुन्हा शेतकरी पुढे आले आणि ते म्हणाले की आमचा माल नाशवंत आहे, त्याचे मार्केट पूर्णपणे बंद झालेले आहे, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला त्यामुळे आपण ते थांबविले. परंतु मी सांगितल्याप्रमाणे आपण एक बैठक घेऊ. त्यांची असोसिएशन आहे, एपीएमसीज आहेत, या सगळयांना एकत्र बोलवून याची इफेक्टीव अंमलबजावणी कशी करता येईल यासाठी निश्चितपणे शासनामार्फत प्रयत्न केले जातील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ SBT/ MAP

पृ. शी. : आदिवासी उपयोजना क्षेत्रातील खाजगी माध्यमिक शाळेतील शिक्षक-कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान मंजूर न करणे.

मु. शी. : आदिवासी उपयोजना क्षेत्रातील खाजगी माध्यमिक शाळेतील शिक्षक-कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान मंजूर न करणे यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी. एल. अैनापूरे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, जगदीश गुप्ता, श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, डॉ. अशोक मोडक, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विहित मूल्यांकनानुसार अनुदानासाठी पात्र ठरलेल्या राज्यातील सुमारे 92 खासगी माध्यमिक शाळा व वर्ग 5 ते 12 वीच्या तुकड्यांवरील शिक्षक-कर्मचाऱ्यांना भेदभावपूर्वक वागणूक देऊन शाळांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांना आठ महिन्यापासून वेतन अनुदान मंजूर केले असले, दिनांक 5 ऑगस्ट व 18 ऑगस्ट 2004 च्या शालेय शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार विदर्भ विभागातील 26 शाळा 100 टक्के अनुदानास पात्र ठरलेल्या असले, वर्ग 5 ते 12 वी च्या शेकडो तुकड्या या निर्णयापूर्वी अनुदानास पात्र ठरल्या असले, शालेय शिक्षण विभागाने अनुदान अदा करण्यास मंजूरी दिली असतांना आदिवासी विभागाने निर्णयबाह्य अटी लादून अडथळे निर्माण केले असले, मात्र उपरोक्त दिनांकाचे शासन निर्णयानुसार बिगर आदिवासी विभागातील शेकडो माध्यमिक शाळांना यापूर्वीच अनुदान अदा केले असले, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाने दिनांक 5 मार्च, 2005 रोजी राज्यातील सर्व शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर केलेले आंदोलन, अन्यायग्रस्त शाळांमधील शिक्षक-कर्मचाऱ्यांनी दिनांक 9 ते 14

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ SBT/ MAP/

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे ...

मार्च, 2005 पर्यंत आयोजित केलेले साजळी आंदोलन व दिनांक 15 मार्च,2005 पासून बेमुदत आंदोलन करण्याबाबत मा. आदिवासी विकास मंत्र्यांना सरकार्यवाहक, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांनी दिनांक 28 फेब्रुवारी,2005 रोजी दिलेली नोटीस, वेतन अनुदानापासून वंचित ठेवल्यामुळे या शाळेतील शिक्षकांत पसरलेले असंतोषाचे व नैराश्याचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई."

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ SBT/ MAP/

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, आदिवासी विभागातील अनुदानावर येणाऱ्या किंवा आलेल्या शाळा आणि तुकडयांच्या संदर्भात हा प्रश्न आहे. 18 ऑगस्ट, 2004 ला जो शासन निर्णय निर्गमित झाला त्यामध्ये बिगर आदिवासी विभागातील 740 आणि आदिवासी विभागातील 105 शाळांना अनुदान मंजूर केले. जुलैपासून बिगर आदिवासी विभागातील शाळांना अनुदान लागू केले परंतु आदिवासी विभागामध्ये ज्या माध्यमिक शाळा होत्या आणि इयत्ता 5वी ते 12वी पर्यन्तच्या तुकडया आहेत त्यांना दोन विभागाच्या वादामुळे हे अनुदान स्थगित राहिले. आठ महिने झाले. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी चंद्रपूर, यवतमाळमध्ये 5 तारखेपासून बेमुदत उपोषण सुरु केले आहे. उपोषणाचा आजचा नववा दिवस आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे....

परवा मात्र या सभागृहामध्ये लक्षवेधी लागल्यानंतर दि.18 मार्च, 2005 रोजी शासनाने जी.आर.काढला. हा जी.आर.काय काढला आहे ? आदिवासी विभागाच्या 105 शाळांच्या केवळ 1 महिन्याच्या वेतनेतर अनुदानासाठी हा जी.आर.काढला. या 72 तुकडयांमध्ये इयत्ता 5 वी ते 7 वीच्या तुकडया आहेत त्यांच्यासाठी 84 लाख रुपयांचा निधी मंजूर केला. आदिवासी विभागावर अन्याय करु नका. तुम्ही 740 शाळांना जुलैपासून अनुदान दिले आहे त्यामुळे याही 105 शाळांना सुध्दा जुलै, 2004 पासून अनुदान द्यावे लागेल. खरे म्हणजे तुम्ही चांगला निर्णय घेतला आहे त्याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. आपल्याकडे हे खाते आल्यामुळे आमच्या आशा पल्लवित झाल्या आहेत, कारण यासंबंधी काही तरी होईल असे वाटते. याठिकाणी मा.शालेय शिक्षण राज्यमंत्रीही उपस्थित आहेत. मा.शिक्षण राज्यमंत्र्यांनी आणि मा.डॉ.गावितसाहेबांनी आदिवासी व बिगर आदिवासी भागातील शाळांना वेगवेगळे न ठेवण्याचा निर्णय घेतला. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, यापुढे आदिवासी उपयोजनेऐवजी सर्वसाधारण योजनेतून निधी उपलब्ध केला जाईल." शासनाने या 72 तुकडयांसाठी 84 लाखाचा निधी उपलब्ध केला, परंतु हा तात्पुरता निर्णय झाला. या तुकडयांकरिता 2004-005 या वर्षासाठी 12 कोटीची आवश्यकता आहे हया निधीची 31 मार्चपर्यंत तरतूद करणार काय ? कोणत्याही खात्याने ही तरतूद करावी, कारण मंत्रिमंडळ एकच आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.अशोक मोडक)

डॉ.विजयकुमार गावित : सन्माननीय सदस्य व्ही.यू.डायगव्हाणे यांनी सांगितलेले हे प्रकरण गेल्या दोन वर्षापासून सातत्याने चालू आहे. या विभागामध्ये ट्रायबल ॲडव्हायजर कमिटी आहे. त्या समितीसमोर हा विषय आल्यानंतर असे ठरले होते की, प्रामुख्याने एखादा प्रकल्प राबवित असताना ज्याठिकाणी मोठया प्रमाणावर आदिवासी आहेत तो प्रकल्प तेथे न राबविता ज्याठिकाणी 50 टक्क्यापेक्षा कमी आदिवासी आहेत त्याठिकाणी प्राधान्याने राबविला जावा. त्यामुळे अतिदुर्गम भाग असेल आणि मोठया प्रमाणावर आदिवासी असतात त्याठिकाणी ज्यापध्दतीच्या सवलती मिळाल्या पाहिजे त्या उपलब्ध होऊ शकल्या नाही. आदिवासी सल्लागार समितीने ज्याठिकाणी 50 टक्क्यापेक्षा कमी लाभार्थी असतील त्याठिकाणी पुढील काळामध्ये निधी द्यावयाचा नाही असा निर्णय घेतल्याप्रमाणे ते परिपत्रक निघाले. त्यामुळे निश्चितपणे अडचणी निर्माण झाल्या. यासंबंधी मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित...

सातत्याने प्रयत्न करीत होतो. हे कोठेतरी मिटले पाहिजे अशी भावना होती. आदिवासी विकास खात्याचा मंत्री झाल्यानंतर मी जवळजवळ 3-4 बैठका घेतल्या आणि त्याच्यातून मार्ग काढलेला आहे. आता प्रश्न एवढाच आहे की, मागील जे राहिलेले पैसे आहेत ते आदिवासीमधून द्यावयाचे की कशामधून द्यावयाचे ? मग शेवटी निर्णय घेतला की, मंत्रिमंडळासमोर जाऊन एकदाचे मागील देणे असेल किंवा मंजुरी देण्याच्या राहिल्या असतील त्या एक तर आदिवासी विभागाने द्यावयाच्या की शिक्षण विभागाने द्यावयाच्या हे ठरवावयाचे. मंत्रिमंडळासमोर गेल्यानंतर राहिलेले देणे ते देतील किंवा आम्ही देऊ. परंतु जे काय असेल ते मंत्रिमंडळासमोर पटवून दिले पाहिजे. ओपनला जुलैपासून दिले आहे आणि काहींना डिसेंबरपासून दिले आहे. यात बिगर आदिवासीच्या 8 वी ते 10 वीच्या तुकडया आहेत त्यांना जुलैपासून दिले आहे. 5 वी ते 7 वीला डिसेंबर, 2003 पासून दिलेले आहे. ही तफावत आहे, कोणावर अन्याय होऊ नये अशी आमची भूमिका आहे. म्हणून मागील देणे कसे देता येईल यासाठी मंत्रिमंडळासमोर पटवून देण्यासाठी निश्चितपणे विचार करु.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, या निवेदनाच्या शेवटून दुस-या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, "सर्वसाधारण योजनेतून निधी उपलब्ध केला जाईल असे ठरले आहे."

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. व्ही.यू.डायगव्हाणे पुढे सुरु...

या निर्णयास शासनाने मान्यता दिलेली आहे. आता महाराष्ट्र शासना शिवाय दुसरे शासन आहे काय ? सर्वसाधारण योजनेतून यास मान्यता दिली. ही सर्वसाधारण योजना कोणती ? 12 कोटी रुपये शासनाला द्यावयाचे आहेत. ते द्यावे लागतील. त्याशिवाय पुढे सरकता येणार नाही. बिगर आदिवासींना जुलै् पासून पैसे दिले गेले आहेत मग आदिवासींवर अन्याय का करता ? हा आदिवासी विभागाचा प्रश्न आहे 31 मार्च पर्यन्त 12 कोटी रुपये शासन देईल काय ? तसेच जुलै पासून हे वेतन अनुदान देण्यात येईल काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सर्वसाधरपणे जेव्हा पासून आपण मंजुरी देतो तेव्हा पासून आपण अनुदान देत असतो...(अडथळा).. या प्रकरणी टोलवाटोलवी झाली. त्यामध्ये शिक्षकांची काहीही चूक नाही. याबाबतीत निश्चित धोरण घेणे आवश्यक होते. पण ते धोरण घेतले गेले नाही.. यामध्ये मार्ग काढण्यासाठी मी मंजुरी दिली. पण मंजुरी देत असताना त्यावर लिहिले गेले की, शालेय शिक्षण विभागाने पैसे द्यावेत. त्यामुळे थोडीशी अडचण निर्माण झालेली आहे. आता यापासून पुढे पैसे द्यावयाचे असे धोरण आपण स्वीकारलेले आहे. परंतु मागचे पैसे द्यावयाचे असतील तर ते कोणत्या विभागाने द्यावयाचे असा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा हे पैसे शिक्षण विभागाने द्यावयाचे की आदिवासी विकास विभागाने द्यावयाचे यासंदर्भात मंत्रिमंडळापुढे जाण्याचे आम्ही ठरविले. मंत्रिमंडळ जो निर्णय देईल त्याप्रमाणे आदिवासी विकास विभाग किंवा शिक्षण विभाग पैसे देईल आणि ते पैसे देण्याची आमची बांधिलकी आहे. त्यामुळे निश्चितपणे तो निधी उपलब्ध करुन देऊ.

प्रा. बी.टी.देशमुख : हा मोठा गंमतीशीर प्रश्न आहे. ट्रायबल सब प्लॅनच्या बाहेर ज्या जनरल शाळा आहेत त्यांना शालेय शिक्षण विभागा मार्फत अनुदान दिले जाते. ट्रायबल सब प्लॅनमध्ये ज्या शाळा आहेत त्यांना ट्रायबल सब प्लॅन मधून पैसे येतात. जनजाती सल्लागार समितीने निर्णय घेतला की, जेथे 50 टक्क्या पेक्षा कमी आदिवासी लोकसंख्या असेल त्या ठिकाणी ट्रायबल सब प्लॅनमधून पैसे द्यावयाचे नाहीत. जर ट्रायबल सब प्लॅनमधून पैसे द्यावयाचे नसतील तर ते शालेय शिक्षण विभागाने द्यावयास पाहिजेत. हाच घोळ वर्षभर चालला. मी मा.मंत्रिमहोदयांचे आभार मानतो की, त्यांनी शेवटी याबाबतीत निर्णय घेतला . यापुढे आदिवासी उप योजने ऐवजी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/

(प्रा. बी.टी.देशमुख पुढे सुरु...)

सर्वसाधारण योजनेतून निधी उपलब्ध केला जाईल असे ठरले होते. परंतु हे कोणी ठरविले? आदिवासी विकास विभाग आणि शालेय शिक्षण विभाग यांच्या बैठकीत एकमताने निर्णय झाला. त्यानुसार हे ठरले. पुढे असे म्हटलेले आहे की, या निर्णयास शासनाने मान्यता दिली. आता फक्त 74 लाखाची तरतूद केलेली आहे. ट्रायबल सबप्लॅनच्या बाहेर ज्या शाळा आहेत आणि अन्य शाळा यांच्या संदर्भात एकच शासन निर्णय आहे. तेव्हा हे जे मधले आहेत त्यांना पैसे कोण देणार ? निवेदनामध्ये शासनाने पैसे द्यावयाचे आहेत असे म्हटलेले आहे. मग ते शालेय शिक्षण विभागाने द्यावयाचे की आदिवासी विकास विभागाने द्यावयाचे हा वाद लवकर मिटवा. कारण हे असे चित्र चांगले दिसत नाही. शासनाला ते शोभनीय नाही. जनरलला शालेय शिक्षण विभागामार्फत पैसे दिले जातात आणि ट्रायबल सब प्लॅनला आदिवासी विकास विभागा मार्फत पैसे दिले जातात. कालपर्यन्त ज्यांना ट्रायबल सबप्लॅनमधून पैसे देण्यात येत होते त्यांना बाहेर काढण्याचा निर्णय झाला. मग त्यांना पैसे कोणी द्यायचे याचा निर्णय होत नाही. हे अशा प्रकारचे चित्र बाहेर जाणे इष्ट नाही. प्रश्न असा आहे की, इतरांना जेव्हा पैसे दिले तेव्हा पासून पैसे देण्याचा निर्णय झालेला आहे. हे पैसे कोणता विभाग देणार यासंबंधीचा निर्णय आपण किती दिवसात करणार आहात ?

डॉ. विजयकुमार गावित : मा.सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आणि मा.सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांना जेवढी चिंता आहे तेवढीच ती मला देखील आहे. जो प्रश्न दोन वर्षे सुटला नाही तो प्रश्न ताबडतोबीने सोडवण्याचा मी प्रयत्न केला. महिनाभरामध्ये सर्व प्रश्न मी सोडवतो. फाईच्या माध्यमातून मा. मुख्यमंत्र्यांकडून आम्ही तशा पध्दतीचे आदेश घेतलेले आहेत. परंतु "याच्या पुढे" हा भाग देखील त्यामध्ये आहे. त्यामुळे त्यासंदर्भात मंत्रिमंडळासमोर जावे लागेल. आम्ही मंत्रिमंडळासमोर जात आहोत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजकुमार गावीत...

आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये आणि ओ.टी.एस.पी. याच्यामध्ये पैसे देण्यासंदर्भात नऊ महिन्यांचा खंड पडलेला आहे. हा विषय मंत्रिमंडळाच्या समोर निर्णय घेण्यासाठी निश्चितपणे उपस्थित करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : यासंदर्भात एक महिन्यात पॉझिटिव्ह निर्णय घेतला जाईल काय?

डॉ.विजयकुमार गावीत : मी सांगतो की, एक महिन्यात निर्णय घेऊ.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आदिवासी क्षेत्रातील शाळांना अनुदान न देण्याचे धोरण आहे हे शासनाच्या मूळ धोरणाला छेद देणारे आहे. शासनाने मान्यता देण्याचे जे धोरण ठरविलेले आहे. त्याप्रमाणे शाळांना अनुदान देण्याचे शासनाने जे काही सुत्र ठरविलेले आहे ते अगदी ठरलेले आहे की, बिगर आदिवासी क्षेत्रामध्ये चार वर्षापर्यन्त अनुदान दिले जात नाही. त्यापुढे मात्र वीस,चाळीस, साठ,ऐंशी आणि शंभर टक्के प्रमाणे अनुदान मिळेल. आदिवासी क्षेत्रामध्ये ज्या शाळा सुरु होतात, त्या मुल्यांकनानंतर अनुदानास पात्र ठरतात. त्या शाळांना हा टप्पा लागून नसून पाचव्या वर्षापासून शंभर टक्के अनुदान आहे. मुल्यांकनानुसार ज्या शाळांना मान्यता मिळालेली आहे, त्या शाळा अनुदानास पात्र ठरलेल्या आहेत. त्या शाळांची यादी जाहीर झालेली आहे. त्यांना अनुदानही मंजूर झालेले आहे. परंतु त्या शाळांना अजून अनुदान मिळालेले नाही. मंत्री महोदयांनी या ठिकाणी जे काही उत्तर दिलेले आहे की, आदिवासी विभाग आणि शालेय शिक्षण विभाग या दोन मंत्रालयांच्या वादामुळे अद्यापही या भागातील शिक्षकांना अनुदान मिळालेले नाही. या शिक्षकांनी भरपूर त्रास सहन केला आहे. त्यांचा अधीक अंत न पाहता शिक्षकांचे जे उर्वरित वेतन बाकी आहे त्या वेतनाची रक्कम 31 मार्च,05 पर्यन्त देण्याची शासन व्यवस्था करणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावीत : आदिवासी विभाग आणि शालेय शिक्षण विभागात वाद निर्माण झालेला नाही. समन्वयाचा अभाव निर्माण झाला होता. त्यामुळे हे घडले आहे. माझ्यात आणि शालेय शिक्षण मंत्री यांच्यामध्ये चांगल्या प्रकारे समन्वय ठेवला जात आहे. मी आपल्याला मघाशी सांगितले की, या संदर्भात ज्या काही अडचणी निर्माण झाल्या होत्या त्या महिन्याभरात सोडविल्या जातील.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : काही भागामध्ये इयत्ता 8 वी ते 10 वी पर्यन्त अनुदान दिले जात आहे.इयत्ता 11 वी 12 वी ला अनुदान आहे.इयत्ता 5 वी ते 7 वी च्या शिक्षकांना मात्र पगार मिळालेला नाही. यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांकडे मी या शिक्षकांना स्वत: घेऊन गेले होते. त्यांनी सांगितले की, इयत्ता 5 वी ते 7 वी मध्ये 50 टक्के मुले असतील तरच अनुदान दिले जाईल. इयत्ता 8 वी ते 10 वी पर्यन्त विद्यार्थी भरपूर असतात. इयत्ता 11 वी आणि 12 वी मध्ये मुले मोठया प्रमाणात असतात. इयत्ता 5 वी ते 7 वी मध्ये विद्यार्थी नसतात. या वर्गांना शिकविणा-या शिक्षकांचे आपण नेमके काय करणार आहात ?

डॉ.विजयकुमार गावीत : इयत्ता 5 वी ते 7 वी च्या संदर्भात देखील जी.आर. निघालेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : मंत्री महोदयांनी जो निर्णय घेतला त्यांचे मी अभिनंदन करतो. या निर्णयामध्ये इयत्ता 11 वी आणि 12 वी च्या तुकडयांचा समावेश होईल काय ?

डॉ. विजयकुमार गावीत : होईल.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी. : घाटकोपर (मुंबई) येथील बी.एस.आर.सी.च्या वसाहतीमध्ये एका फ्लॅटमध्ये घुसून महिलेवर केलेला प्राणघातक हल्ला.

मु. शी. : घाटकोपर (मुंबई) येथील बी.एस.आर.सी.च्या वसाहतीमध्ये एका फ्लॅटमध्ये घुसून महिलेवर केलेला प्राणघातक हल्ला याबाबत सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□□य सदस्य डॉ.नीलम गो-हे यां□ एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गो-हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडते.

" दिनांक 21 मार्च,2005 रोजी वा त्या सुमारास घाटकोपरच्या बी.ए.आर.सी.च्या वसाहतीमध्ये महिलेवर तिच्या फ्लॅटमध्ये घुसून तिच्यावर जीवघेणा हल्ला करुन तिचे दागिने हिसकावून घेऊन तिच्यावर बलात्कार करण्याचा करण्यात आलेला प्रयत्न, सदर महिला हि दोन महिन्याची गर्भवती असल्याने हल्लेखोरांच्या जबार माहरहाणीने तिचा झालेला गर्भपात,सदर आरोपींना पोलिसांनी अटक केली असता तो आपली खरी माहिती पोलिसांना देत नसून सदर आरोपी माथेफिरु असल्याचा पोलिसांनी काढलेला निष्कर्ष, असे प्रकार मुंबईत दिवसाढवळया होत असून जनतेचे जीवन धोक्यात आल्याने याबाबत शासनाने केलेली कार्यवाही, याबाबत शासनाने निवेदन करावे."

सभापती महोदय, घाटकोपर येथील बी.एस.आर.सी. वसाहतीतील स्वत: इलेक्ट्रानिक इंजिनिअर असलेल्या महिलेचा विवाह गेल्या वर्षीच बी.ए.आर.सी. मधील इंजिनिअर बरोबर झालेला आहे. शुक्रवारी घडलेल्या संध्याकाळी घडलेल्या घटने नुसार सायंकाळी 5.30 वाजता एक लुटारु या वसाहतीमध्ये शिरला आणि त्याने त्या महिलेस मारहाण करुन दागिने हिसकाविण्यास सुरुवात

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केली. त्या महिलने घाबरुन जाऊन दागिने देण्याच्या तयारीत असताना त्याने त्या महिलेवर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. ती महिला दोन महिन्याची गर्भवती होती. त्या महिलेस त्या व्यक्तीने मारहाण केल्यामुळे तिचा गर्भपात झाला. संबंधीत लुटारुला बाथरुममध्ये कोंडण्यात आले.

पोलीस आणि अग्निशमन दलाचे लागलीच बंब येऊन त्या लुटारु व्यक्तीस बाहेर काढले.अटक करण्यात आलेल्या व्यक्तीने आपले नाव श्री. चंद्रकांत घोंगडे असे सांगितले आहे आणि त्याने मुंब्रा,कसारा, कर्जत, शहापूर अशा वेगवेगळया रहाण्याच्या जागा सांगितलेल्या आहेत. या विशेष उल्लेखाच्या व्दारे महिलेच्या सुरक्षिततेबाबत किती गंभीर प्रश्न राज्यात निर्माण झालेला आहे. एका निष्पाप महिलेला होणा-या बालकाला गमाविण्याची वेळ आलेली आहे.कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीज जेंव्हा जेंव्हा प्रश्न उपस्थित करतो. त्यावेळी उगाच मुद्दे उपस्थित करतात असे सांगितले जाते..

यानंतर श्री. उपरे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ.नीलम गो-हे)

जे सामान्य नागरीक आहेत ते भयभीत होतात. त्या भयभीत झालेल्या लोकांच्या संदर्भात मात्र घाटकोपर पोलीस स्टेशनकडून सध्या तपास चालू असून आरोपी माथेफिरू आहे या प्रकारची उत्तरे दिली जात आहेत. तरी यासंदर्भात कडक कारवाई होऊन संबंधित महिलेला संरक्षण देणे आवश्यक आहे याकडे मी विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे लक्ष वेधू इच्छिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषद,माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा शिक्षक-कर्मचा-यांच्या प्रलंबित समस्या.

पृ.शी.:भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषद,माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा शिक्षक-कर्मचा-यांच्या प्रलंबित समस्यांविषयी श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे ती त्यांनी मांडावी.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतों :

"भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषदे अंतर्गत चालविल्या जाणा-या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक-कर्मचा-यांच्या 2/3 वर्षापासून प्रलंबित पुढील समस्यांवर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग व व्यवस्थापनाने अक्षम्य दुर्लक्ष केलेले आहे. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हा प्रतिनिधी व नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे विधान परिषद सदस्य यांनी वारंवार मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्त अधिकारी, शिक्षणाधिकारी यांचेशी गेल्या दोन/तीन वर्षात अनेक वेळा चर्चा केली. चर्चेत लेखी आश्वासनेही दिली. परंतु प्रत्यक्षात समस्यांचे निराकरण झाले नाही. समस्या पुढीलप्रमाणे - मासिक वेतन नियमित मिळणे, क. महाविद्यालयीन शिक्षकांच्या सुधारित वेतनश्रेणीबाबत सभागृहात दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करणे, संपकालीन 42 दिवसांचे वेतन मिळणे, शिक्षकांना कायम करणे, मुख्याध्यापक, पर्यवेक्षकांची रिक्त पदे भरणे, पाचव्या वेतन आयोगाच्या थकबाकीवर 1 मार्च 1999 पासून व्याजाची आकारणी करणे, हमीपत्रावर वरिष्ठश्रेणी लागू करणे, जी.पी.एफ. स्लीप देणे, शिक्षण सेवकांना उन्हाळी सुटीचे वेतन अदा करणे, शिक्षक-कर्मचा-यांच्या दुय्यम सेवा पुस्तिका देणे, पदवीधर वेतनश्रेणीस पात्र शिक्षकांना वेतनश्रेणी मंजूर करणे, शिक्षकांना वरिष्ठ व कनिष्ठ सहाय्यक शिक्षक निरिक्षक म्हणून पदोन्नती देणे, वैद्यकिय व एल.टी.सी.ची थकित देयके मंजूर करणे, झेड.पी.एफ.ची परतावा ना परतावा लोनची प्रकरणे मंजूर करणे, आदिवासी/नक्षलग्रस्त घोषित विभागातील शाळा शिक्षक-कर्मचा-यांना 15 टक्के प्रोत्साहन भत्ता, एकस्तर पदोन्नती, अतिरिक्त घरभाडे भत्ता मंजूर करणे, आंतर जिल्हा बदली व विकल्पानुसार जिल्हा बदली प्रकरणे निकाली काढणे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.व्ही.यू.डायगव्हाणे)

या सर्व समस्यांची प्रकरणे वेळीच निकाली काढण्यास व संबंधीतांना न्याय देण्यास अधिकारी वर्ग विलंब करतात. या बाबत विभागाने उच्च स्तरीय समिती नेमावी किंवा प्रचलीत पध्दतीत सुधारणा करुन तातडीने न्याय द्यावा."

सभापती महोदय, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषदे अंतर्गत ज्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आहेत त्यांच्यामध्ये बरीचशी अनियमितता आहे. ती अनियमितता म्हणजे तेथे सर्विस बुक नाही. त्यांची सेवा ज्येष्ठता यादी नाही, त्यांना पगार रेग्युलर मिळत नाही. त्यांना वेतनवाढ मिळालेली नाही, प्रमोशनसुध्दा त्यांना दिले गेले नाही, अशा स्वरुपाच्या बाबी अंतर्भूत असलेली माझी विशेष उल्लेखाची सूचना मी मांडज असून एका विशेष समितीच्याव्दारे किंवा विशेषत: मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या माध्यमातून या सर्व मागण्यांच्या संबंधात चर्चा करून त्यांनी एक-दीड महिन्यात तोडगा काढावा अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मालाड येथील श्री.यादव यांना मुंबई हत्यारी पोलीस दलातील उपनिक्षकानी मारहाण करणे.

मु.शी.: मालाड येथील श्री.यादव यांना मुंबई हत्यारी पोलीस दलातील उपनिक्षकानी मारहाण करण्याबाबत श्री.विनोद तावडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे ती त्यांनी मांडावी.

श्री.विनोद तावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारे निर्वाचित) : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतों :

"मालाड पश्चिम येथील निवासी श्री.यादव यांना दिनांक 24.2.2005 रोजी सकाळी 11.00 वा. मुंबई हत्त्यारी पोलीस दलातील उपनिरीक्षक संजय पाटील यांनी रस्त्यामध्ये अमानुष मारहाण करणे, श्री. यादव यांना भगवती रुग्णालयात दाखल करण्यात येणे, स्थानिक जनतेने मोर्चा काढल्यानंतर सदर पोलीस प्रशासनाने श्री.पाटील यांना अटक न करणे, सदर विषयामुळे स्थानिक जनतेमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, त्यामुळे हा विषय सार्वजनिक दृष्ट्या महत्वाचा असल्यामुळे मी विशेष उल्लेखाव्दारे मांडू इच्छितो."

सभापती महोदय, या विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे जो प्रश्न मी उपस्थित करीत आहे त्यामधील श्री.संजय पाटील नावाचे पोलीस उपनिरीक्षक मालाड येथे रहातात त्यांच्या घराच्या कंपाऊंडच्या बाहेरची एक भींत आहे. त्यावर एक आईस्क्रिम विक्रेता लघुशंका करीत होता. त्यामुळे त्यांनी त्याला इतका बेधम मारला की, त्याला भगवती रुग्णालयात दाखल करावे लागले. अनेक दिवस त्याला रुग्णालयात काढावे लागले. तेथले स्थानिक युवक नेते श्री.विनोद शेलार आणि बाकीच्या मंडळीनी त्याच्या विरोधात मोर्चा काढला. तरीही त्या ठिकाणच्या स्थानिक पोलीस स्टेशनमधून त्याला संरक्षण देण्याचा प्रयत्न त्या ठिकाणी सुरू होता. तो एक पोलीस अधिकारी आहे. पण तो मालाड पोलीस स्टेशनचा नाही. पोलीस अधिकारी असल्याने त्याने या प्रकारे दादागिरी केली. त्यांनी त्या माणसाला हटकले असते, दम दिला असता तर मी समजू शकतो. पण लाथाबुक्क्यांनी त्या माणसाला 20-25 मिनिटे मारहाण करीत राहणे,आजूबाजूचे लोक सोडविण्याचा

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.विनोद तावडे)

प्रयत्न करीत असतानाही आपण पोलीस अधिकारी असल्याची मगरूरी त्याच्या डोक्यात फार मोठ्या प्रमाणात होती. त्यासंदर्भात टाईम्स ऑफ इंडिया आणि इतर वर्तमानपत्रामध्ये सविस्तर माहितीसुध्दा आलेली आहे. पण यासंदर्भातील कारवाईबाबत अद्याप काहीही प्रगती न झाल्यामुळे विशेष उल्लेखाच्या माध्यमातून हा विषय मला उपस्थित करावासा वाटला. माननीय उपमुख्य मंत्री आज या ठिकाणी उपस्थित आहेत. मला असे वाटते की, त्यांनी या प्रकरणात नीट लक्ष घालून कारवाई केली तर लोकांचा विश्वास बसेल. माननीय उप मुख्यमंत्र्यांची मी अनेक वेळा भाषणे ऐकली आहेत की, पोलीस हा शेवटी माणूस आहे. पण समोरचासुध्दा माणूस आहे हा विचार पोलिसांनी केला तर बरे होईल. अर्थात सगळेच पोलीस असे वागत नाहीत. काही पोलीस असे वागतात, पण त्यामुळे पोलिसांची प्रतिमा खराब होते. ती जर वेळीच दुरुस्त केली नाही तर जे काही चांगले प्रयत्न मागच्या पेक्षा पुढचे म्हणून आपण करीत आहात त्याला काही तरी फळ येईल असे मला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना बी.एड.च्या परीक्षेत उत्तर पत्रिका उर्दूमध्ये लिहिण्याची परवानगी देणे.

मु.शी.: उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना बी.एड.च्या परीक्षेत उत्तर पत्रिका उर्दूमध्ये लिहिण्याची परवानगी देण्याविषयी प्रा.फौजिया खान यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे ती त्यांनी मांडावी.

प्रा.फौजिया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतें :

"उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना बी.एड.च्या परीक्षेत उत्तर पत्रिका उर्दूमध्ये लिहिण्याची शासनाने परवानगी दिली असली तरी ज्या बी.एड.महाविद्यालयातील किमान 20 विद्यार्थी या सवलतीचा लाभ घेऊ इच्छितात त्याच महाविद्यालयांना ही सूट देण्यात येईल अशी अट घातली आहे. परिणामी ज्या महाविद्यालयात 20 पेक्षा कमी विद्यार्थी उर्दू भाषेत उत्तरे लिहू इच्छितात असे विद्यार्थी या सवलतीपासून वंचित राहत आहेत. परिणामी उर्दू भाषिक विद्यार्थ्यांमध्ये नाराजी पसरली असून त्यांच्या भावनांची कदर करीत यावर वेळीच निर्णय घेण्याची आवश्यकता आहे."

सभापती महोदय, बी.एड.महाविद्यालयामध्ये किमान 20 विद्यार्थी उत्तरपत्रिका उर्दूमध्ये सोडवू इच्छितात त्यांना तशी सवलत देण्याचे शिक्षण संचालकांनी राज्यातील सर्व विद्यापीठांना निर्देश दिले आहेत. परंतु दोन विद्यापीठे वगळता इतर विद्यापीठांमध्ये या निर्देशांचे पालन होताना दिसून येत नाही. त्यामुळे नव्याने निर्देश देण्याची गरज आहे. याशिवाय किमान 20 विद्यार्थ्यांची जी अट घालण्यात आली आहे ती जाचक आहे. यामुळे ज्या महाविद्यालयात 20 पेक्षा कमी विद्यार्थी उर्दू भाषेत उत्तरे लिहू शकतात त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून किमान 20 विद्यार्थ्यांची अट रद्द करून जेवढे विद्यार्थी उर्दू भाषेत उत्तरे लिहू इच्छितात त्यांना तशी परवानगी देण्याचे निर्देश संबंधितांना तातडीने देण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अनुसूचित जातीच्या महिला श्रीमती बेबी वाघमारे व त्यांच्या परिवारास मारहाण होणे.

मु.शी.: अनुसूचित जातीच्या महिला श्रीमती बेबी वाघमारे व त्यांच्या परिवारास मारहाण होण्याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे ती त्यांनी मांडावी.

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो :-

"अनुसूचित जातीच्या महिला श्रीमती बेबी दिपक वाघमारे व त्यांच्या परिवारावर सर्वश्री गंगाराम विठ्ठल पोखरकर, रामचंद्र विठ्ठल पोखरकर व सौ.लक्ष्मीबाई विठ्ठल पोखरकर, रा.पिंपळगाव (खडकी), ता. अंबेगाव, जि.पुणें या जातीयवादी धनदांडग्यांनी मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केली. मंचर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक श्री.कल्याणराव पवार यांनी दखल घेवून आरोपींवर कारवाई न करता, श्रीमती वाघमारे यांनाच दमदाटी करून आरोपींना साथ देवून जातीयवादी अत्याचार कर्त्या सवर्णांना पैशाच्या बळावर साथ देत आहेत. पीडित दलित महिला श्रीमती बेबी वाघमारे यांनी तक्रार मागे घेण्याबाबत पोलीस निरीक्षकांनी दबाव टाकण्याचे काम केले आहे.

या अत्त्याचाराला व पो.निरिक्षकांनी जातीयवाद्यांविरुध्द कोणतीही कारवाई केली नाही याच्या निषेधार्थ प्रजासत्ताकदिनी श्रीमती बेबी वाघमारे यांनी आत्मदहनाची शासनाला नोटीस दिली होती,

वरील अन्यायग्रस्त दलित महिला व तिच्या परिवारास न्याय मिळावा व आरोपींना पाठिशी घालणा-या पोलीस निरीक्षकांवर कारवाई व्हावी यासाठी सदर बाब विशेष उल्लेखाव्दारे सभागृहात सादर करीत आहे."

सभापती महोदय, पिंपळगाव खडकी, तालुका अंबेगाव, जिल्हा पुणे येथील एक दलित महिला श्रीमती बेबी दिपक वाघमारे आणि त्यांच्या परिवारावर त्याच गावातील श्री.गंगाराम विठ्ठल पोखरकर, त्यांचे नातेवाईक आणि इतर सवर्णांनी हल्ला करून या श्रीमती बेबी वाघमारे यांचे वयोवृध्द सासरे ज्यांचे वय 70 वर्षाचे आहे त्यांना मारहाण केली.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ...

त्यांना मारहाण केली एवढेच नव्हे तर त्यांच्या सासूबाईनासुध्दा मारहाण करण्यात आली होती. त्यापरिवाराची गावामध्ये जी जमीन आहे ती जमीन बळकाविण्यासाठी श्री.पोखरकर परिवाराचा अत्यंत भयानक अत्याचार स्वरुपाचा सुरु आहे. घरामध्ये शिरुन, गुंड लोकांना सोबत घेऊन त्यांचे अत्याचार सुरु आहेत. श्री.वाघमारे यांच्या घराची भिंत फोडून हे लोक त्यांच्या घरात शिरले होते व श्रीमती बेबी वाघमारे यांच्या पतीला,सासू -सास-यांना त्यांनी अत्यंत बेदमपणे मारहाण केली होती तसेच श्रीमती बेबी वाघमारे हिचा विनयभंग करण्याचासुध्दा त्यांनी प्रयत्न केला होता.यासंबंधी मंचर पोलीस स्टेशनला तक्रार करण्यात आल्यानंतर त्या पोलीस स्टेशनने कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही.तसेच या कुटूंबियाला कोणत्याही प्रकारचे संरक्षण दिलेले नाही. या दलित महिलेकडे जी थोडीशी जमीन आहे ती जमीन बळकविण्यासाठी अनन्वित प्रकारचा अत्याचार सुरु असून संबंधित पोलीस स्टेशन मात्र संबंधिताविरुध्द कोणतीही कारवाई करीत नाही असे प्रतिज्ञापत्रावर लिहून ते प्रतिज्ञापत्र त्यांनी सादर केलेले आहे.याबाबतीत माझ्याकडे तक्रार करण्यात आल्यानंतर मी पोलीस जिल्हयाच्या अधिक्षकांना विनंती करणारे एक पत्र लिहिले होते.मंचर पोलीस स्टेशनने संबंधिताच्या विरुध्द कारवाई केली की नाही . तसेच दलित महिलेवर सवर्णाकडून जो अत्याचार चालू आहे. त्याबाबतीत कारवाई का केली नाही ? तसेच अत्याचार करणा-या व्यक्तींना पोलीस स्टेशनमधील कर्मचारी अधिकारी साथ तर देत नाहीत ना ? याबाबतीत चौकशी करुन सबंधिताविरुध्द योग्य ती कारवाई करावी अशा प्रकारचे पत्र मी पुणे जिल्हयाच्या अधिक्षकांना पाठविले होते.त्याबाबतीत आतापर्यन्त काय कारवाई करण्यात आली हे मला कळलेले नाही. परंतु सबंधित पोलीस स्टेशनमधील पोलीस निरीक्षक श्री. कल्याण पवार यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. त्यामुळे दलितांवर अत्याचार करणारा जो सवर्ण पोखरकर परिवार आहे त्यांची हिंमत वाढली आणि श्री.वाघमारे परिवाराची जमीन बळकाविण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला जात आहे.माननीय उपमुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत व. ते गृहमंत्री आहेत .तेव्हा त्यांनी या बाबीची दखल घेऊन योग्य ती कारवाई करुन या परिवाराला त्यांनी योग्य ते संरक्षण द्यावे.तसेच त्यांची जमीन बळकाविली जाणार नाही यासंबंधी त्यांनी लक्ष घालावे अशा प्रकारची मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करतो. धन्यवाद .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. महाड जिल्हा रायगड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या स्मारकाचे योग्य प्रकारे जतन करणे

मु.शी : महाड जिल्हा रायगड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे योग्य प्रकारे जतन करणे याबाबत श्री.जयंत प्र. पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती (डॉ.अशोक मोडक) : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो .

सभापती महोदय, रायगड जिल्हयातील महाड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रीय स्मारक 17 कोटी रुपये खर्च करुन उभारलेले आहे. स्मारकातील बांधकाम अपूर्ण असतांनाच, तसेच त्याची देखभाल - दुरुस्ती व अन्य प्रश्नांबाबत निर्णय प्रलंबित असतांनाच सात महिन्यापूर्वी तत्कालिन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी घाईगर्दीने स्मारकाचे उद्घाटन केले.

या स्मारका अंतर्गत 72 लाख 50 हजार रुपये खर्चून 25 मीटर बाय 13 मीटर आकाराचा 1 मीटर व 1.8 मीटर खोली असणा-या अद्ययावत तरण तलाव बांधण्यात आला आहे. प्रसाधनगृह,शुध्दीकरण तलाव अशा सुविधाही यात आहेत. या तलावाचे काम पूर्ण झाले आहे परंतु तलाव वापरात का नाही यासाठी जबाबदारी कोणी घ्यावी, देखभाल - दुरुस्ती कोणी करावी असे प्रश्न निर्माण झाले असल्याने तलाव तसाच पडून आहे.स्वच्छता व सफाईसाठी कामगार नसल्याने तलावातील पाण्यात शेवाळ जमून शेवाळांचा तलाव झाला आहे. या शिवाय प्लॅस्टिक पिशव्या व पालापाचोळा यामुळे हा परिसर खराब झाला आहे.

याशिवाय वाचनालयात ग्रंथ, कपाटे व संग्रहालयात संग्रही वस्तू अद्यापही न आल्याने हे स्मारक केवळ एक वास्तू म्हणून उभे आहे. तरी या स्मारकाचे योग्य त-हेने जतन व्हावे व यासाठी शासनाचे या महत्वाच्या बाबीकडे लक्ष वेधावे म्हणून मी विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2005.

L.C. BILL NO.I OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994)

श्री. सुरेश शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 1 - महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (डॉ.अशोक मोडक) : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. सुरेश शेट्टी : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 1 मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

****

..... क्यूक्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : सन 2004-2005 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

तालिका सभापती : आता सन 2004-2005 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा व्हावयाची आहे. या चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्यांवरील चर्चा आता घेण्यात येईल. पूरक मागण्या आणि त्या खालील बाबी या संबंधीची माहिती पत्रक भाग 2 द्वारे प्रसृत करण्यात आलेली आहे. प्रत्येक सदस्यांने भाषण करताना बाब क्रमांक आणि पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा संबंधित बाबीपुरती मर्यादित असून मूळ बाबीवर सदस्यांना चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच.

श्री. अरविंद सावंत : अध्यक्ष महाराज, कृपा करून मध्यंतर घेण्यात यावे.

तालिका सभापती : ठीक आहे. सर्वांनुमताने मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येईल. सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होऊन दुपारी 4.45 वाजता पुन्हा भरेल.

(4.32 ते 4.45 मध्यंतर)

(यानंतर श्री.जागडे ....आरआर 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

सभापतीस्थानी : तालिका सभापती डॉ. अशोक मोडक

तालिका सभापती (डॉ. अशोक मोडक) : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील.

1) उप मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - बी 1, बी 4, बी 5, बी 9.
2) ग्रामविकास व पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - एल 3.
3) परिवहन बंदरे व विमुक्त , भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - बी 3, बी 4, एन 4.
4) उद्योग खनिकर्म, सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - ए 4, के 3, के 6, के 7, के 9, एन 1, एन 3.
5) राज्य उत्पादन शुल्क पर्यावरण व कामगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक- के 4, यू 2.
6) शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - ई2, ई 3.
7) उर्जा (अपारंपारिक उर्जा वगळून) वैद्यकिय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - के 1, डब्लू 1, डब्लू 2, डब्लू 3, डब्लू 4, एस 1.
8) पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय व औकाफ मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - डी 4.
9) कृषी, जलसंधारण व खार जमीन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - डी 1ए, डी 2, आय 1.
10) सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक- एन 4.
11) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - टी 1, टी 3, टी 4, टी 5.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, पान क्र. 8 वरील बाब क्र. 9 वर मी बोलत आहे. विषारी गावठी दारु प्याल्यामुळे मुंबई शहरातील 200 माणसे मृत्यूमुखी पडली आहेत. मुंबई शहरात जी गावठी दारु येते, ती मुंबई बाजुच्या जिल्ह्यातून म्हणजेच रायगड आणि ठाण्यातन येत आहे. म्हणून या ठिकाणी पोलिसांनी जास्त दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. विषारी गावठी दारु प्याल्यामुळे 200 लोकांचा मृत्यू झाला. ही दारु रायगड जिल्ह्यातील पनवेलमधून आली होती. पनवेलमधील सर्व संबंधीत लोकांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याविरुध्द गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी त्यांना दोन महिने चौकशीसाठी आतमध्ये घेतले होते. नंतर त्या सर्व लोकांना न्यायालयाने जामिनावर सोडले आहे. आता त्या ठिकाणी पुन्हा गावठी दारु राजरोसपणे पाडली जात आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जी मोहिम उघडली त्यामळे गावठी दारुचे प्रमाण कमी झाले. परंतु अजूनही काही ठिकाणी गावठी दारु पाडली जात आहे, ती विकली जात आहे. तेव्हा याबाबत गृहखात्याने विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पनवेल आणि पेण भागात आज दरोड्याचे प्रमाण वाढले आहे. त्या भागात गेल्या वर्षात 8 ते 10 दरोडे पडले आहेत. बँकाचे पैसे दरोडेखोरांनी लुटले आहेत. या बाबत शासन असे सांगत आहे की, सदरहू बँकेने तसेच सदरहू पतसंस्थेने स्वत:च्या खर्चाने बंदोबस्ताची कार्यवाही केली पाहिजे. ज्या बँकेचे डिपॉझीट एक कोटी किंवा दोन असते, त्या बँका सरंक्षणासाठी 25 लाख रुपये खर्च करु शकणार नाही. म्हणून शासन जे काही सांगत आहे, ते बरोबर नाही. आज त्या परिसरात पोलिसांची जरब संपली आहे की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

सभापती महोदय, पनवेलमधील रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेवर दोन वेळा दरोडा पडला. त्यामध्ये 8 ते 10 लाख रुपये लुटून नेण्यात आले. माननीय आमदार श्री. विवेक पाटील चेअरमन असलेल्या कर्नाळा बँकेवर ऐन निवडणुकीच्या काळात 8 लाखाचा दरोडा पडला. तेव्हा या परिसरातील बँकावर व मुंबईच्या परिसरातील बँकांवर पडणारे दरोडे लक्षात घेता पोलीस यंत्रणेने अतिशय दक्ष राहून यामध्ये सुधारणा कशी आणता येईल हे पाहिले पाहिजे. पनवेल तालुक्यामध्ये खारघर हा एक नवीन विकसित होणारा भाग आहे. त्याठिकाणी सद्या एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या झाली आहे. त्या भागासाठी एक स्वतंत्र पोलीस स्टेशनची आवश्यकता आहे. देशाच्या वेगवेगळया प्रांतातील लोक मुंबईमध्ये कामधंद्यासाठी येतात व रहावयास खारघरच्या परिसरात येतात. विशेषत: मध्यमवर्गीय कर्मचारी हे खारघरमध्ये मोठया प्रमाणात रहातात त्यांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस स्टेशन झाले पाहिजे. या राज्यातील कायदा व सुव्यवस्था अतिशय गंभीर आहे. एका मंत्र्याला आज दुसऱ्या मंत्र्यापासून संरक्षण मागण्याची परिस्थिती राज्यात निर्माण झाली आहे. माझे परममित्र नामदार श्री. सुनिल तटकरे यांना माननीय मंत्री श्री. रविशेट पाटील यांनी माननीय मुख्यमंत्र्यांसमोर "तुझी तंगडी तोडीन" अशाप्रकारची धमकी दिल्याचे वृत्त वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहे. त्याबाबत शासनाने देखील खुलासा केला आहे. त्यानंतर माननीय श्री. तटकरे साहेब आपल्याला कुबडया कुठे मिळतील याच्या विचारात आहेत. अशी परिस्थिती राज्यात निर्माण होत असेलतर सर्वसामान्य जनतेने कसे जगायचे हा प्रश्न निर्माण झाला आहे.

श्री. विनोद तावडे : या वर्षीच्या बजेटमध्ये मा. अर्थमंत्र्यांनी सर्व मंत्र्यांची मेडिक्लेम पॉलीसी उतरविली आहे...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, असे प्रकार पुन्हा होऊ नयेत अशी माझी मागणी आहे...

श्री. गणेश नाईक (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी पूरक मागण्यांवरील चर्चेला चांगल्या प्रकारे सुरुवात केली आहे. परंतु आता त्यांचे राजकीय भाषण होत आहे. "तंगडया तोडीन" अशाप्रकारच्या वक्तव्याबाबत वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आल्यानंतर माननीय मंत्री श्री. रविशेट पाटील यांनी "मी फिजिकली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक....

नाहीतर राजकीय तंगडी तोडीन" असा खुलासा केला. तेव्हा माननीय सदस्यांनी त्या गोष्टीचा उल्लेख टाळावा अशी माझी विनंती आहे.

डॉ. दीपक सावंत : राजकीय तंगडी कशी असते, जरा आम्हाला सांगा?

श्री. गणेश नाईक : ती माननीय श्री. रविशेट पाटील यांना माहीत आहे...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, या मध्ये महत्वाचा भाग असा की, शासन म्हणून लोकप्रतिनिधी म्हणून जनतेमध्ये असलेली आमची प्रतिमा मलीन होत आहे. म्हणून मी याठिक्राणी राजकारण करावयास मागत नाही, या विषयाचे राजकीय भांडवल करायला मागत नाही. परंतु राज्यात सुरु असलेले वातावरण गैर आहे. राज्याचे मंत्रीच जर सुरक्षित रहाणार नसतील तर या ठिकाणी आपण काम कसे करावयाचे हा प्रश्न निर्माण होईल.

सभापती महोदय, उद्योग विभागाच्या बाब क्र. 80 व पान क्र. 90 मध्ये उद्योग खात्यातर्फे रेट कॉट्रॅक्ट ठरविले जाते. हे रेट कॉट्रॅक्ट ठरवितांना कंत्राटदारांना किंवा उद्योगांना सवलती दिल्या जातात. किंवा शासकीय, निम शासकीय कार्यालयांमध्ये रेट कॉट्रॅक्टने साहित्य पुरविले जाते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ते ठरविण्याचा दर्जा आता पाहण्याची वेळ आपल्यावर आलेली आहे. म्हणून रेट कॉन्ट्रॅक्ट ठरवताना जे उद्योजक आहेत, जे कंत्राटदार आहेत त्यांचे काळजीपूर्वक निरीक्षण झाले पाहिजे. कारण या शासकीय कार्यालयांमध्ये कॉम्प्युटर, सायक्लोस्टाईल मशीन वगैरे गोष्टी पुरविल्या जातात. पण त्यांचा दर्जा खालावलेला आहे.

सभापती महोदय, ग्रामविकासाच्या संदर्भात बाब क्र.90, पान क्र.97 बाबत सांगावयाचे आहे. याठिकाणी आताचे माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील हे पूर्वी जेव्हा ग्रामविकास विभागाचे मंत्री होते, तेव्हा त्यांनी सदनामध्ये आश्वासन दिले होते की, एक ग्राम पंचायत- एक ग्रामसेवक. पण आज आमच्या जिल्हयामध्ये एकेका ग्रामसेवकाकडे 5-6 ग्राम पंचायती आहेत आणि विशेषत: आमच्या रायगड जिल्हयामध्ये औद्योगिकीकरण झालेले आहे, त्यामुळे तेथील ग्रामपंचायतींचा भौगोलिक परिसर, त्यांचा कारभार आणि त्यांचे उत्पन्न वाढलेले आहे. त्यामुळे एकेका ग्रामसेवका कडे पाच-पाच ग्रामपंचायती असल्यामुळे त्यांना योग्य प्रकारे काम करता येत नाही. तेव्हा एक ग्राम पंचायत-एक ग्रामसेवक या शासनाच्या ठरविलेल्या धोरणाप्रमाणे याची अंमलबजावणी केव्हा केली जाणार आहे ? असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, बाब क्र.131, पान क्र.150 यामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भातील मागणी आहे. जी कॉलेजेस् आहेत, तेथे प्रभारी प्राचार्य ठेवण्याच्या बाबतीत शासनाचे नियम आहेत का ? माझ्या माहितीप्रमाणे आणि ज्ञानाप्रमाणे प्रभारी प्राचार्यांना सहा महिन्यापेक्षा जास्त ठेवता येत नाही. पण अशी अनेक कॉलेजेस् आहेत की, ज्या कॉलेजमध्ये 4-4, 5-5 वर्षे प्रभारी प्राचार्य काम करीत आहेत. अलिबागमध्ये जे.एस.पी.एम.कॉलेजमध्ये सहा वर्षे प्रभारी प्राचार्य आहेत याची शासनाने निश्चितपणे दखल घेतली पाहिजे आणि याबाबतीत कायद्यातील तरतूदीप्रमाणे अंमलबजावणी केली पाहिजे.

सभापती महोदय, सहकार विभागाच्या पान क्र. 144, बाब क्र.124 बाबत सांगावयाचे तर एन.सी.डी.सी.मार्फत आपल्याला कर्ज पुरवठा मंजूर केला जातो. पण कर्ज मंजूर झाल्यानंतर त्याचा पहिला हप्ता संबंधित संस्थेला मिळाल्यानंतर दुसरा हप्ता मिळण्यास 2-3 वर्षे लागतात. एन.सी.डी.सी.कडून अर्थ विभागाकडे किंवा शासनाकडे पैसे येतात. पण ते पैसे शासन इतरत्र वापरते. त्यामुळे एन.सी.डी.सी.च्या पैशावर जो प्रोजेक्ट हाती घेतलेला आहे, त्याला निधी मिळत

. . . .2 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

नाही. त्यामुळे त्या प्रोजेक्टचा कालावधी वाढतो आणि तो प्रोजेक्ट व्हाएबल होत नाही. या बाबीच्या निमित्ताने मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की, एन.सी.डी.सी.कडून पैसे मंजूर झाल्यानंतर, ते केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे प्राप्त झाल्यावर संबंधित संस्थेला देण्याची कार्यवाही करीत असताना, त्या संस्थेने काम पूर्ण केले आहे की नाही याची खात्री करुन मग ताबडतोब त्यांना दिले पाहिजेत अशी मी यानिमित्ताने मागणी करतो. या सभागृहामध्ये कापूस एकाधिकार खरेदीच्या बाबतीत शेतक-यांचे पेमेंट थांबले होते. त्याबाबतीत येथे चुकीची माहिती आली म्हणून मी शासनाकडून खुलासा मागितला होता. मला सांगण्यास आनंद होतो की, यामध्ये माननीय उप मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेतला, त्यांनी मोठी भूमिका बजावली. या विषयाच्या बाबतीत माननीय विरोधी पक्षनेते श्री.नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, मी, आम्ही तीन दिवस सभागृहामध्ये भांडून खुलासा मागितला. दोन पक्ष एकत्र आल्यानंतर या सदनात काय होऊ शकते याचे चित्र आपण उभे केले आहे आणि आज महाराष्ट्रातील शेतक-यांना दिलासा मिळालेला आहे, मला सांगण्यास आनंद होतो की, आजपर्यंत 800 कोटी रुपयांचे पेमेंट झालेले आहे. सकाळी बँकेच्या कर्ज समितीमध्ये गेलो होतो आणि 1200 कोटी रुपये नव्हे तर 1600 कोटी रुपये रिझर्व बँकेच्या परवानगीने आता राज्य शासन शेतक-यांना देणार आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री.जयंत प्र.पाटील (पुढे चालू..

शासनाने एखादी योजना जाहीर केली, एखादे शेतकऱ्यांच्यादृष्टीने धोरण जाहीर केले तर त्यासाठी पैशाची तरतूद ही ताबडतोब केली पाहिजे. पुरोगामी शासन म्हणायचे आणि योजना, धोरण जाहीर करावयाचे आणि त्यासाठी काही तरतूद करायची नाही, असा प्रसंग या शासनावर येऊ नये म्हणून या निमित्ताने मला सुचवावयाचे आहे. यानंतर सहकार विभागाच्या मागण्यांवर बोलावयाचे आहे.

तालिका सभापती : काल सहकार विभागावर चर्चा झालेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : काल मी मोर्चामध्ये गेलो असल्यामुळे येथे उपस्थित राहून मला सहकार विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या चर्चेमध्ये भाग घेता आला नाही. ठीक आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

--

UU-2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ MAP/ KGS/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर जास्त बोलणार नाही. पृष्ठ क्रमांक 66 बाब, क्रमांक 56. रायगड जिल्ह्यातील थेरॉडा येथे समुद्र धूप प्रतिबंधक बांधकाम करण्यासाठी अतिरिक्त अनुदान रुपये 1 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. ही रक्कम धूप प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी खर्च केलेली आहे. त्सुनामी लाटांमुळे समुद्र किनाऱ्याचे मोठयाप्रमाणात नुकसान झालेले आहे. गेल्या आठवड्यामध्ये सर्व राज्यांना भूकंपाचे धक्के जाणवलेले आहेत. समुद्रकिनाऱ्यावर मोठ्याप्रमाणात धक्का जाणवलेला आहे. अजस्त्र लाटांमुळे देवबाग, तोंडवली, तळाशील, मालवण येथील समुद्र किनाऱ्याला दणका बसलेला आहे. त्याबाबतची वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली आहे. जवळजवळ 50 मिटर म्हणजे दीडशे फूट त्या भागातील जमीन खचून खाली गेलेली आहे. रायगड जिल्हयामध्ये धूप प्रतिबंधक योजना राबविली जाते. पावसाळ्यामध्ये मालवण देवबाग समुद्र किनारपट्टीत भरतीच्यावेळी समुद्राच्या लाटेमुळे मोठ्याप्रमाणावर नुकसान होते. त्या ठिकाणी धूप प्रतिबंधक योजना का राबविण्यात येत नाही ? आज संरक्षक भिंती बांधल्या जातात, मोठमोठे पूल बांधले जातात, रस्ता रुंदीकरण करत असताना प्रतिबंधात्मक भिंती बांधल्या जातात. अशाप्रकारचे संरक्षणाचे काम केले जाते. धूप प्रतिबंधक योजना राबविणे आवश्यक आहे. मालवण किनारपट्टीचे नुकसान झालेले आहे, त्या ठिकाणी धूप प्रतिबंधक योजना राबवावी अशाप्रकारची विनंती आहे.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

सभापती महोदय, बाब क्रमांक 54 बद्दल मी काल याठिकाणी संगितले होते. राजापूर तालुक्यात नाटे-जैतापूर येथे एक ब्रिज बांधलेला आहे. कोकणात विशेषत: सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटण जिल्हा म्हणून जाहीर झाला. श्री. पवार साहेब 1985-86 ला मुख्यमंत्री होते त्या वेळी सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केला. त्यानंतर युतीचे शासन आले. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी सुध्दा सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जहीर झाल्यानंतर. त्यावेळी जे जे प्रकल्प हाती घेण्यात आले होते त्यामध्ये दोन-चार पंचतारांकित हॉटेलही होते. मोचेमाडला पंचतारांकित हॉटेल तयार करण्याचा निर्णय झाला होता. देवबाग, शिरोडा येथे पंचतारांकित हॉटेलसाठी 130 एकर जमीन घेऊन ती टाटाच्या ताब्यात देण्यात आली होती. मुरबाडच्या पंचताराकित हॉटेलसाठी 200 एकर जमीन घेऊन त्या हॉटेलला दिली होती. तरी सुध्दा हे प्रकल्प राबविण्यासाठी कुठल्याही प्रकारचे काम झालेले नाही. पर्यटण हा महत्वाचा विषय आहे. राज्यामध्ये पर्यटनाच्या माध्यमातून लोाकांना नोक-या उपलब्ध करुन देता येतात. राज्य शासनाने या संदर्भात पुरक मागणी सादर केलेली नाही म्हणून मी या अनुषंगाने काल बाब क्रमांक 56 वर चर्चा केली होती. त्या अनुषंगाने पर्यटनाच्या संदर्भात शासनाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. कोकण पॅकेजच्या अंतर्गत जवळ जवळ 20 कोटी रुपये सिंधुदुर्ग जिल्हयाच्या पर्यटण विकासासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आज पर्यटनाची मागणी नाही. सनमाननीय सदस्यांना पर्याटनाबद्दल जो काही मुद्दा मांडावयाचा आहे, तो अंदाजपत्रकावर जेव्हा चर्चा असेल तेव्हा त्यांना तो मांडता येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, काल मी ज्यावेळेला चर्चा करीत होतो. त्या वेळेला मला सांगितले की, पर्यटनचा विषय असणार आहे. त्यावर तुम्हाला बोलता येईल. सिंधुदुर्गच्या संदर्भातील पर्यटनाचा महत्वाचा विषय आहे. शासनाने तो विषय गांभीर्यान घेतला पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

तालिका सभापती : आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर जो विषय आहे त्यावर आपण बोलावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी पर्यटनाविषयीचा मुद्दा उपस्थित केला म्हणून दिलगिरी सुध्दा व्यक्त केली आणि माझे भाषण पूर्ण केले. सन्माननीय श्री. गरुनाथ कुलकर्णी पर्यटनावर बोलत असतील तर हे बरोबर नाही. त्यांना दिलगिरी व्यक्त करावयाला सांगावे.

तालिका सभापती :श्री. गुरुनाथ कुलकर्णी आपण बोलावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मला या ठिकाणी जास्त बोलावयाचे नाही. सन 2004-2005 च्या पुरवणी मागण्यांचे मी समर्थन करतो आणि मला बोलण्याची संधी दिली त्या बद्दल धन्यवाद देतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, आपल्या अनुमतीने पुरवणी मागण्यांबद्दलची माझी मते या ठिकाणी मांडते. पृष्ठ क्रमांक 9,बाब क्रमांक 12. गृह विभाग. बेस्ट बेकरी प्रकराणाच्या संदर्भात ही अतिरिक्त मागणी केलेली आहे. या ठिकाणी मला सुचवावयाचे आहे की, दोन महिन्यापूर्वी मांढरदेवीची दुर्घटना घडली. त्या दुर्घटच्यासंदर्भात शासनाकडून जाहीर करण्यात आले होते की, याची न्यायालयीन चौकशी करु. ही न्यायालयीन चौकशी घोषित केली आहे. पण आतापर्यंत न्यायाधीशांची नेमणूक केलेली नाही. त्याची तरतुद पुरवणी मागणीमध्ये कुठे दिसून आलेली नाही, याच्या बद्दल शासनाकडून खुलासा व्हावा. बाब क्रमांक 16, पान क्रमांक 10. कारागृह सुधारणा. खरे म्हणजे कारागृह सुधारणा करण्यासाठी योगा, लघुद्योग प्रशिक्षण, कौन्सिलिंग या सारख्या गोष्टींचा अंतर्भाव करावा. सभापती महोदय, मला एक गोष्ट सुचवावयाची आहे की, महिला व बालकल्याण समिती एकदा सगळे करागृह पाहण्यासाठी गेलो होते. आम्ही त्या ठिकाणी महिला कैद्यांना भेटल्यानंतर महाराष्ट्रा बाहेरच्या महिला कैद्यांच्या आणि महाराष्ट्रातील महिला कैद्यांच्या जेवणामधे फरक असल्याचे आम्हाला दिसून आले. महाराष्ट्रा बाहेरील महिला कैद्यांना अंडी, ब्रेड असे देण्यात येते.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ....

ज्या महाराष्ट्रातील महिला कैदी आहेत त्यांना साधी भाजी-पोळी दिली जाते. त्या ठिकाणी हा फरक का केला जातो ? याकडे सुध्दा शासनाने लक्ष द्यावे. बाब क्रमांक 18, पृष्ठ क्रमांक 11 यामध्ये पोलीस गृहनिर्माण बांधकामाची चालू असलेली बांधकामे आणि दुरुस्ती याकरिता मागणी केलेली आहे. 16 प्रकल्पाचे बांधकाम अत्यंत आवश्यक आहे. हे करीत असताना पोलिसांच्या मुलांचा विकास करण्याचा किंवा त्यांना इतर सुविधा योग्य प्रकारे देण्याचा प्रयत्न करावा. सभापती महोदय, कृषि पशुसंवर्धन विकास विभागाच्या बाबतीत पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे त्यासंदर्भात मला सांगावयाचे आहे. कृषि क्षेत्रामध्ये उत्पादन वाढविण्याठी कोरडवाहू शेतीला पोषक वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. पशुसंवर्धनच्या बाबतीत यामध्ये तरतूद केलेली आहे. पशुसंवर्धनाच्या बाबतीत सांगावयाचे तर पशुंची जी गणना केली जाते त्यानुसार महाराष्ट्रामध्ये पशू चिकित्सालये दिसत नाहीत. दुष्काळ पडला त्यावेळी आपण गुरांच्या छावण्या उभ्या केल्या होत्या. त्या ठिकाणी डॉक्टर्स येत नव्हते. किती तालुक्यांमध्ये अशी पशू चिकित्सालये सुरु केलेली आहेत ? पशू चिकित्सालये ही अत्यंत गरजेची गोष्ट आहे. याकडे शासनाने लक्ष द्यावे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 21, बाब क्रमांक 25 यामध्ये पांढऱ्या लोकरी मावा रोगाने बाधित झालेल्या शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य यासाठी तरतूद केलेली आहे. हे अर्थसहाय्य प्रामाणिकपणे खऱ्या अर्थाने जे बाधित शेतकरी आहेत त्यांना मिळाले पाहिजे. नाही तर पोलीस पाटील यांच्यामार्फत किंवा घरी बसून सर्व्हे केला जातो त्यामुळे जे खरे बाधित शेतकरी आहेत त्यांना मात्र मदत मिळत नाही. असे होता कामा नये. त्याचबरोबर हा जो लोकरी माव्याचा रोग आहे त्यावर रोगप्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी सुध्दा पावले उचलली पाहिजेत. पृष्ठ क्रमांक 119, बाब क्रमांक 107 यामध्ये सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेसाठी तरतूद केलेली आहे. तसे पाहिले तर सन 2000 पासून या लाभार्थ्यांना खऱ्या अर्थाने लाभ मिळालेला नाही. तो लाभ योग्य प्रकारे कसा मिळेल याकडे शासनाने लक्ष द्यावे. पृष्ठ क्रमांक 26, बाब क्रमांक 34 यामध्ये शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या अल्पसंख्यांकासाठी सघन प्रक्षेत्र कार्यक्रमासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये मालेगाव, भिवंडी व औरंगाबाद या तालुक्यात प्रत्येकी एक याप्रमाणे मुलींच्या वसतिगृहांचे बांधकाम करण्यासाठी तरतूद केलेली आहे. परवा शनिवारी सन्माननीय सदस्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्रीमती कांता नलावडे .....

डॉ. नीलमताई गोऱ्हे यांच्या संस्थेच्या वतीने एका परिसंवादाचे आयोजन केले होते. त्या ठिकाणी विविध संस्थांच्या मुली आल्या होत्या. त्यांनी वसतिगृहांना भेटी दिल्या. त्यांनी सांगितले की, 50 मुली असल्या तरी एकच टॉवेल, एकच साबण अशी परिस्थिती असते. त्यांच्यासाठी बाथरुम वगैरे व्यवस्थेकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. पृष्ठ क्रमांक 27, बाब क्रमांक 36 यामध्ये महाराष्ट्र छात्रसेना योजनेतील तालुका समादेशकांना नियमित वेतनश्रेणी लागू करणे याकरिता तरतूद केलेली आहे. खरे म्हणजे माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी छात्रसेना योजना सुरु केली आहे ही चांगली गोष्ट आहे. पी.टी. च्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी या ठिकाणी तरतूद केलेली आहे. राज्यामध्ये अशी 64 पथके कार्यरत आहेत त्यातील बहुतेक पथके भाडयाच्या जागेमध्ये आहेत. त्यांची जी दुरावस्था आहे किंवा त्यांच्या ज्या काही समस्या आहेत, ज्या काही मागण्या आहेत त्याकडे लद्या द्यावे. पृष्ठ क्रमांक 97, बाब क्रमांक 90 यामध्ये ग्रामविकास विभागाची पुरवणी मागणी आहे. ग्रामविकास अंतर्गत संत गाडगे महाराज ग्राम स्वच्छता अभियान हा स्तुत्य उपक्रम आहे. परंतु या उपक्रमामध्ये सुध्दा अधिकारी भ्रष्टाचार करतात आणि सत्ताधारी पक्षाचे लोक त्यांना पाठिंबा देतात. भाईंदरचे उदाहरण देता येईल. संत गाडगे महाराज ग्राम स्वच्छता अभियानात अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला त्याच्या विरोधात तेथील नगरसेविका श्रीमती रिटा शहा उपोषणाला बसलेल्या होत्या. पृष्ठ क्रमांक 157, बाब क्रमांक 141 यामध्ये महिला व बालकल्याण विभागाच्या संदर्भात पुरवणी मागणी केलेली आहे. कालच अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांनी घंटानाद केला होता. त्या महिलांकरिता यामध्ये तरतूद केलेली दिसत नाही. बालभवनची दुरावस्था आहे. लातूरला एका रिकाम्या कारखान्यात 100 विद्यार्थ्यांना ठेवले आहे. तेथील अधिक्षिका त्यांना मारतात. त्यांना नीट जेवण दिले जात नाही. त्यांना उपाशी ठेवले जाते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

सभापती महोदय, बाब क्रमांक 112 आणि पान क्र.132 वर मंजूर अनुदानाहून अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त निधीची मागणी केलेली आहे. आश्रमशाळा आणि पोस्ट बेसिक आश्रमशाळा यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाच्या ठेवींवरील व्याजाचे प्रदान केल्यामुळे हा खर्च झाल्याचे म्हटले आहे. मला याठिकाणी सुचवावयाचे आहे की, नंदुरबार जिल्हयामध्ये बर्डी येथील प्रकरण झाले होते ते प्रकरण गाजले होते. त्या प्रकरणामध्ये तदर्थ समिती नेमली होती. त्या समितीने आश्रमशाळांना भेट देऊन विधिमंडळाला आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालानंतर शासनाने सांगितले होते की, प्रत्येक आश्रमशाळेमध्ये महिला अधीक्षिकेची नेमणूक केली जाईल. प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे. मी नंदुरबार जिल्हयातील उदाहरणे देईन. तळोदा तालुक्यामध्ये 53 आश्रमशाळा आहेत त्यापैकी फक्त 4 आश्रमशाळांमध्ये महिला अधीक्षिका नेमल्या आहेत. 19 वसतिगृहे आहेत त्यापैकी फक्त 3 वसतिगृहांमध्ये महिला अधीक्षिकाच नाहीत. 42 आश्रमशाळांपैकी केवळ 3 मुलींचे वेगळे वसतिगृहे आहेत. त्याठिकाणी 4750 मुलींसाठी फक्त 50 शेड्स आहेत, अशा कमी जागेमध्ये 4750 मुलींनी कसे रहावयाचे ? त्याठिकाणी अगदी छोटया छोटया खोल्या आहेत. हया खोल्या म्हणजे अगदी कोंडवाडा आहे. बोरद या गावामध्ये दोन शेडमध्ये आश्रमशाळा चालविली जाते, त्याठिकाणी 190 मुली आहेत, शहाणा येथे दोन खाजगी घरांमध्ये आश्रमशाळा आहे. त्याठिकाणी 131 मुली आहेत. त्यांना बाकीच्या सवलती पुरविल्या जात नाहीत. शौचालयाची अवस्था भयानक आहे. 17 आश्रमशाळांमध्ये शौचालये नाहीत. यापैकी 6 माध्यमिक विद्यार्थीनींच्या आश्रमशाळा आहेत. वय वर्षे 12 ते 18 पर्यंतच्या वयोगटातील मुलींसाठी शौचालयाची सोय नाही. यामध्ये शासनाने लक्ष घालावे.

यानंतर बाब क्र.118, पान क्र.134 वर मी बोलणार आहे. शासनाने अनेक ठिकाणी आश्रमशाळा सुरु केल्या आहेत, तर काही ठिकाणी वसतिगृहे बांधली आहेत. बारद येथे 438 मुली वसतिगृहामध्ये राहतात. तेथे अस्वच्छ वातावरण आहे. तेथे दोन हातपंप आहेत, परंतु पाणी साठविण्याची काही व्यवस्था नाही. मग बाकीच्या बाबी कशा उपलब्ध होणार ? अमोनी या गावामधील आश्रमशाळेमध्ये 397 मुलेमुली राहतात, तेथेही पाणी साठविण्याची सोय केलेली नाही.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

रोषमाळ या गावातील वसतिगृहामध्ये 307 मुलेमुली राहतात, त्याठिकाणी हातपंप नाही. त्यामुळे अर्धा कि.मी.अंतरावर असलेल्या विहिरीवरुन पाणी आणावे लागते. तेथेही पाणी नसते. पाणी साठविण्याची व्यवस्था नाही. हातधुई येथील वसतिगृहामध्ये 484 मुलेमुली राहतात त्यांच्यासाठी 3 हातपंप आहेत परंतु पाणी साठविण्याची व्यवस्था केलेली नाही. सरई या गावामधील वसतिगृहामध्ये 405 मुलेमुली एक कि.मी.अंतरावरील गावातून पाणी आणावे लागते. तेथेही एकच हातपंप आहे. परंतु पाणी साठविण्याची व्यवस्था केलेली नाही. धडगावच्या वसतिगृहांना व आश्रमशाळांना बैलगाडीने पाणीपुरवठा केला जातो. हे मी त्या विभागातील काम करणा-या कार्यकर्त्यांबरोबर प्रत्यक्षात फिरुन पाहिलेले आहे.

सभापती महोदय, या आश्रमशाळा आणि वसतिगृहांतील विजेची अत्यंत वाईट अवस्था आहे. 42 आश्रमशाळांपैकी 18 आश्रमशाळांना विद्युतपुरवठाच होत नाही. त्यामुळे सायंकाळी 6 वाजता जेवण घेऊन झोपावे लागते. दिवसाशिवाय काही करता येत नाही, वीज नसल्यामुळे सायंकाळी 6 वाजता सर्व कामे, अभ्यास उरकून घ्यावा लागतो. धडगावसाठी शासनाने कृती आराखडा तयार केलेला आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती कांता नलावडे पुढे सुरु....)

अक्कलकुवासाठी कृती आराखडा तयार केलेला आहे. 1989मध्ये अशाच प्रकारचा आराखडा तयार केलेला होता. त्यावेळी श्री. शरद पवार हे राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यांनी 20 कोटीचा आराखडा तयार केलेला होता. त्या कृती आराखड्यामध्ये ज्या गोष्टी करायच्या ठरविल्या त्या पूर्ण झाल्या नाहीत. जेव्हा एखादा आराखडा तयार करण्यात येतो त्यावेळी आधीच्या आराखड्यामधील किती गोष्टी पूर्ण झाल्या किती अपूर्ण राहिलेल्या आहेत यासंबंधी माहिती घेतली जाते. परंतु आता जो आराखडा तयार केला गेला त्याबाबतीत स्थानिक मंत्रीमहोदयांनी देखील नाराजी व्यक्त केली होती. हा आराखडा तयार करीत असताना लोकप्रतिनिधींना, मंत्र्याना विश्वासात घेणे गरजेचे होते. त्याठिकाणी लिफ्ट इरिगेशन करण्याचे ठरविले. निधीही मंजूर झालेला आहे. परतु जागा ठरविलेली नाही. जलविद्युत केन्द्रासाठी निधी उपलब्ध केलेला आहे. परंतु अजून जागा ठरलेली नाही. तेव्हा या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मी मांडलेले मुद्दे शासनाने विचारात घेऊन त्यानुसार करवाई करावी एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

--

...2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय सन 2004-2005च्या पुरवणी मागण्यांचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. सामाजिक न्याय विभागाच्या पृ.क्र.107 वरील बाब क्र.98वर बोलत असताना स्वयंसेवी संस्थाद्वारे अनुसूचित जातीच्या मुला-मुलींकरिता जी वसतिगृहे चालविली जातात त्यामध्ये काम करणारे स्वयंपाकी, मदतनीस,चौकीदार यांचे मानधन अनुक्रमे 2500रु. आणि 2000 रु. देण्याचे प्रस्तावित केले आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. राज्यामध्ये गव्हर्न्मेंट एडेड 2287 वसतिगृहे आहेत. एनजीओ मार्फतही वसतिगृहे चालविली जातात. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून एक गोष्ट शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, स्वयंसेवी संस्थाद्वारे जी वसतिगृहे चालविली जातात त्यामध्ये जे अधीक्षक म्हणून पूर्णकालीन काम करतात त्यांना अत्यंत अल्प असे मानधन दिले जाते. सरकार तर्फे 600 रु. आणि संस्थेतर्फे 600रु. असे 1200 रुपये मानधन मिळावयास पाहिजे. सरकारकडून मिळणारे 600 रु. त्या अधीक्षकांना मिळतात. परंतु संस्थेचे कॉन्ट्रीब्यूशन मात्र त्यांना दिले जात नाही. त्यामुळे त्यांची अत्यंत भयानक अशी अवस्था झालेली आहे. म्हणून 600 ते 3000 रु.पर्यन्त जी वाढ करण्यात आली त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. शासकीय अर्थसहाय्य प्राप्त होणा-या एनजीओ मार्फत जी वसतिगृहे चालविली जातात त्या वसतिगृहातील अधीक्षकांना देखील पुरेसे मानधन देण्याची व्यवस्था करावी अशी माझी विनंती आहे.

बाब क्रमांक 99 मध्ये विद्यानिकेतन शाळा चालविण्याकरिता स्वयंसेवी संस्थांना द्यावयाच्या अनुदानाची तरतूद केलेली आहे. भटक्या, विमुक्त जाती जमातीच्या गरीब परंतु गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांकरिता 1996 पासून नांदेड याठिकाणी स्वयंसेवी संस्थेद्वारे चालविण्यात येणारी जी शांती निकेतन शाळा आहे त्या शाळेतील विद्यार्थ्यांची जेवण, गणवेष, लेखनसामग्री तसेच अंथरुण, पांघरुण व कॉट इत्यादीची सोय करण्यात आलेली आहे. यामुळे आमच्या भटक्या, विमुक्त जाती जमातीच्या गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा फायदा होईल हे अगत्यपूर्वक सांगावेसे वाटते.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे..

सभापती महोदय, विशेष सहाय्य विभागाची बाब क्रमांक 100 चालू वित्तीय वर्षामध्ये राज्यात श्रावण बाळ सेवा योजना कार्यान्वयित करण्याचे ठरविण्यात आले आहे. या योजने अंतर्गत 65 वर्षावरील वृध्द व निरश्रित व्यक्तींना रुपये 175 रुपये सहाय्य देण्यात येत आहे.

तालिका सभापती : विशेष सहाय्य विभागाच्या मागण्या कालच सभागृहात मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे तुम्ही या मागणी ऐवजी आजच्या कार्यक्रम पत्रिकेत दर्शविलेल्या कोणत्याही विभागाच्या मागण्यांवर बोलू शकता.

प्रा.जोगेंद्र कवाडे : ठीक आहे. सभापती महोदय, उच्च आणि तंत्र शिक्षण, पृष्ठ क्रमांक 150, बाब क्रमांक 131,132 विद्यापीठातील उच्च शिक्षण यासाठी अतिरिक्त अनुदानाची मागणी करण्यात आली आहे. मी आपल्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधू इच्छितो की, नागपूर विद्यापीठामध्ये "डॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट" हा विषय पदवीत्तर अभ्यासक्रमासाठी सुरु करण्यात आलेला आहे व त्यासाठी शासन अनुदान देखील उपलब्ध करुन देत आहे. त्या ठिकाणी पूर्ण व्यवस्था शासनातर्फे करण्यात आलेली आहे. अमरावती विद्यापीठाचे नाव "संत गाडगेबाबा " विद्यापीठ व्हावे अशी अनेक दिवसापासूनची मागणी होती. ती मागणी शासनाने पूर्ण केली. या अमरावती विद्यापीठात "डॉ.बाबासाहेब आंबेडकर थॉट" हा विषय सुरु करण्यासाठी लागणारी आर्थिक मदत मिळावी म्हणून उच्च शिक्षण संचालनालयाकडे प्रस्ताव पाठविला आहे. मी माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करतो की, मागील अर्थसंकल्पीय चर्चेच्या वेळी ही बाब मी त्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावेळी त्यांनी ही बाब मंजूर केली. यासाठी तरतूद करण्याचे आश्वासन दिले होते. नागपूरच्या अधिवेशनात देखील ही बाब त्यांच्याकडून अनावधानाने सुटली होती. त्यावेळी पूरक मागण्यांची चर्चा संपल्यानंतर मी पुन्हा माननीय श्री. जयंत पाटील यांच्या ही बाब निदर्शनास आणून दिली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, मला यासंदर्भात पत्र द्या. त्याप्रमाणे मी त्यांना पत्र दिले. त्या पत्रावर त्यांनी आकस्मिकता निधीमधून तरतूद उपलब्ध करुन द्यावी असा शेरा लिहीला होता. परंतु या वर्षाच्या पूरक मागण्यांमध्ये यासाठी काहीही तरतूद करण्यात आल्याचे दिसून येत नाही. या संदर्भात शासनाने योग्य ती कार्यवाही करावी अशी माझी शासनास विनंती आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे..

पृष्ठ क्रमांक 153, बाब क्रमांक 137 ही " गरीबांचे सक्षमीकरण करणे " यासंबंधीची आहे. जागतिक बँकेच्या प्रकल्पांतर्गत जपानचा सामाजिक विकास निधी शासनास प्राप्त झालेला आहे. केंद्र सरकार योजना राबवित आहे. त्यामध्ये बारामतीमधील व्ही.आय.आय.टी. ही जी संस्था आहे. "गरीबांचे सक्षमीकरण करणे" ही केंद्र सरकारची योजना या संस्थेच्या माध्यमातून राबविली जात आहे. सदर योजना राबविण्यासाठी वित्तीय सहाय्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. ही संस्था चांगल्या प्रकारचे काम करीत असल्यामुळे त्या संस्थेचे मी अभिनंदन करतो.

पृष्ठ क्रमांक 154,बाब क्रमांक 139- ग्रंथालयीन चळवळीचा विस्तार करण्यासाठीची ही मागणी आहे. यासंबंधीचा जो निर्णय घेण्यात आला त्याचे निश्चित अभिनंदन केले पाहिजे.या राज्यामध्ये जिल्हा स्तरावर, राज्य स्तरावर आणि पंचायत स्तरावर देखील या ग्रंथालय चळवळीचा विस्तार झाला पाहिजे.आमच्या ग्रामीण भागातील अंधश्रध्दा, बुवाबाजीचे जे प्रकार आहेत ते दूर झाले पाहिजेत. नवीन नवीन संकल्पना, नवीन नवीन बाबी जनतेस कळल्या पाहिजेत. यासंबंधीचे प्रबोधन झाले पाहिजे. त्यामुळे ग्रंथालय चळवळीस खूप महत्व आहे. राज्यातील 16 जिल्हयांमध्ये शासकीय ग्रंथालय स्थापन करण्यात आले. मुंबई, सातारा, बीड व नांदेड या जिल्हा ग्रंथालयांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. यामध्ये लागणारे ग्रंथपाल, तंत्र सहाय्यक, कनिष्ठ लिपीक, आणि शिपाई अशा प्रकारच्या प्रत्येक जिल्हयातील चार पदांना शासनाकडून प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे.

यांनतर श्री. उपरे..

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे)

महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांऐवजी सर्वच्या सर्व जिल्ह्यांमध्ये ग्रंथालय चळवळ आपण सुरू केली तर त्याचा फायदा जनतेला होईल.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 10, बाब क्रमांक 15, महाराष्ट्रातील संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमांच्या संदर्भात विशेष न्यायालयाची स्थापना करण्याबाबत आहे. येरवडा मध्यवर्ती तुरुंग पुणे येथे जी व्हिडियो कॉंफरन्सिगची व्यवस्था करण्यात आली ती निश्चितपणे चांगली आहे. आमच्या पोलीस खात्यावर मुद्रांक घोटाळ्याच्या प्रकरणामध्ये मानसिक दडपण आले. अनेक पोलिसांना आणि पोलीस अधिका-यांना अटक करण्यात आली. त्यामुळे पोलीस डिपार्टमेंटचे मानसिक खच्चीकरण होण्याची प्रक्रिया सुरू झाली होती.पण जी व्यवस्था आता करण्यात आली आहे त्यातून आमच्या पोलीस खात्याला निश्चितपणे आधार मिळू शकेल आणि एका चांगल्या वातावरणामध्ये पोलीस कार्यक्षमतेने काम करू शकतील असे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 11 बाब क्रमांक 18, पोलीस गृहनिर्माण बांधकामाची चालू असलेली बांधकामे व दुरुस्ती यासंदर्भात आहे. सभापती महोदय, पोलिसांवर अनेक प्रकारच्या जबाबदा-या आहेत. या सर्व जबाबदा-या पार पाडीत असताना त्यांची कौटुंबिक जबाबदारीसुध्दा महत्वाची असते. ही कौटुंबिक जबाबदारी पार पाडीत असताना पोलीस ज्या ठिकाणी ते रहातात ते ठिकाणसुध्दा चांगले असले पाहिजे. म्हणून पोलीस गृहनिर्माण बांधकामासाठी जी तरतूद करण्यात आली आहे त्यामध्ये सध्या चालू असलेली बांधकामे आणि दुरुस्ती यासाठी जी काही व्यवस्था करण्यात आली आहे ती चांगली आहे. त्यासोबतच मला एका गोष्टीचा आनंद वाटतो की, गोंदिया सारख्या नवीन जिल्ह्यामध्ये नवीन कारागृह बांधण्यासाठी जी तरतूद करण्यात आली तीसुध्दा स्वागतार्ह आहे हे मला नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 91, बाब क्रमांक 83, अतिरिक्त कामगार न्यायालय, भंडारा येथून गोंदिया येथे हलवण्यासंबंधी आहे. भंडारा जिल्ह्याचे विभाजन झाले आणि गोंदिया जिल्ह्याची निर्मिती झाली. त्यामध्ये अनेक विभाग हे भंडारा जिल्ह्यातून गोंदिया जिल्ह्यात जायला पाहिजे होते त्यामध्ये कामगार न्यायालयही होते. गोंदिया जिल्ह्यातील कामगारांची दुरावस्था लक्षात घेऊन शासनाने अतिरिक्त कामगार न्यायालय भंडारा येथून गोंदिया येथे स्थलांतरीत करण्यासाठी जी सोय केली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 94, बाब

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा.जोगेंद्र कवाडे)

क्रमांक 89, मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित याची जी दुय्यम कंपनी एयलोरा दुग्ध पदार्थ मर्यादित ही आहे. या कंपनीचे समापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने या एलोरा दुग्ध पदार्थ कंपनीच्या समापनाला स्थगिती दिली. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्रचना मंडळ हे संदर्भ दाखल करण्यात आले आणि त्यासाठी तरतूद करण्यात आली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. पृष्ठ क्रमांक 125, बाब क्रमांक 110, शासकीय वैद्यक/ दंत वैद्यक महाविद्यालये आणि रुग्णालये यामध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून अद्यावत यंत्रसामुग्री आणि साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. उत्कृष्ठ अशा प्रकारच्या आधुनिक शिक्षणाची सोय व्हावी यासाठी जी तरतूद करण्यात आली आहे याबद्दल मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. गेल्या दोन-तीन वर्षापासून सातत्याने मी एका गोष्टीचा पाठपुरावा करीत आहे. एकेकाळी आशिया खंडातील सर्वात मोठे मेडिकल कॉलेज हॉस्पीटल म्हणून ज्याचा गौरव होत होता ते.....

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्राजोगेन्द्र कवाडे ...

नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे रुग्णालय हे अत्यंत दुर्लक्षित झालेले आहे.छत्तीसगड,आंध्रप्रदेश,मध्यप्रदेश या राज्यातून तसेच महाराष्ट्राच्या विदर्भातून कॅन्सर पेशंटस या नागपूर मेडीकल कॉलेजमध्ये कोबाल्ट युनिटच्या माध्यमातून उपचार घेण्यासाठी येतात.त्या मेडीकल कॉलेजला आम्ही जी.एम.सी.एच. असे म्हणतो. परंतु दुर्देवाने गेल्या काही वर्षापासून हे कोबाल्ट युनिट बंद आहे त्यामुळे रोग्यांची दुरावस्था होत आहे.कॅन्सरवरील उपचारपध्दती खर्चिक असल्यामुळे सर्व सामान्य कॅन्सर पेशंटस खाजगी रुग्णालयात जाऊन ही उपचार पध्दती घेऊ शकत नाही.तेव्हा मला माननीय मंत्रिमहोदयांना असे सांगावयाचे आहे की, त्यांनी कोबाल्ट युनिट पुन्हा सुरु करण्याच्या बाबतीत घोषणा करावी. अशी घोषणा ते करतील असा मला विश्वास वाटतो.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागातील बाब क्रमांक 30 पान नंबर 25 संबंधी मला बोलावयाचे आहे. अशासकीय माध्यमिक शाळांचा विकास व विस्तार करण्यासाठी अनुदान देण्याकरता ही व्यवस्था करण्यात आलेली आहे. ती योग्य प्रकारची आहे.पाचवी ते सातवी पर्यन्तच्या 141 तुकडया आहेत व त्यांना योग्य प्रकारची आर्थिक तरतूद करण्यासाठी जी पूरक मागणी करण्यात आलेली आहे ती अत्यंत महत्वाची आहे असे मला सांगावयाचे आहे.यानतर मला पान नंबर 26 बाब क्रमाक 34 संबंधी मला बोलावयाचे आहे. शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या अल्पसंख्यकासाठी सधन प्रक्षेत्र कार्यक्रम(केन्द्र पुरस्कृत योजना) असे या योजनेचे नाव असून या योजनेच्या माध्यमातून मदरशांचे आधुनिकीकरण केले जाणार आहे.राज्यातील अल्पसंख्याक समाज हा शैक्षणिकदृष्टया मागासलेला आहे.तेव्हा हा समाज शैक्षणिकदृष्टया मागासलेला राहू नये यासाठी ही योजना तयार करण्यात आलेली आहे . तेव्हा सधन प्रक्षेत्र व मदरशांचे आधुनिकीकरण या योजनेच्या माध्यमातून औरंगाबाद,भिवंडी व मालेगाव या तीन शहरात ही योजना लागू करण्यात आलेली आहे परंतु राज्यातील इतरही भागात आणि इतरही जिल्हयात अल्पसंख्याक समाज हा शैक्षणिक दृष्टया मागासलेला आहे. तेव्हा त्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्या ठिकाणीसुध्दा ही योजना सुरु करण्याची नितांत आवश्यकता आहे असे मला या निमित्ताने आपल्याला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला बाब क्रमांक 36 व पाननंबर 27संबंधी बोलावयाचे आहे.राज्यातील विद्यार्थ्यामध्ये सैनिकी शिस्त निर्माण व्हावी यासाठी बाब क्रमांक 36 पृष्ठ क्रमांक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ...

27 मध्ये छात्र सेना योजनेसाठी तरतूद करण्यात आलेली आहे.अनेक जिल्हयातील शाळांमध्ये मी जेव्हा जातो तेव्हा पाहतो की महाराष्ट्राची छात्र सेना ही नॅशनल कॅडेट कोअरची आवृत्ती आहे. तेव्हा यामध्ये सैनिकी शिक्षण आणि प्रशिक्षण जेव्हा शालेय विद्यार्थ्यांना दिली जात असते. तेव्हा सिनिअर डिव्हीजन एन.सी.सी आणि ज्युनिअर डिव्हीजन एन.सी.सी असे पूर्वी दोन प्रकार होते. ज्युनिअर डिव्हीजन छात्र सेनेची आज काय अवस्था आह ? हे काही कळत नाही.तेव्हा या संदर्भात खुलासा करण्यात यावा तसेच याबाबतीत योग्य तो समन्वय साधला जावा आणि महाराष्ट्र छात्र सेनेच्या माध्यमातून शाळेतून शिकणा-या विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षणाचा प्रसार कसा होईल याचा विचार करण्यात यावा असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला आदिवासी विकास विभागाची बाब क्रमांक 114 पान नंबर 132 संबंधी मला बोलावयाचे आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्यांची तसेच माध्यमिक शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्यांची थकबाकीची रक्कम देण्यासाठी जी पूरक मागणी करण्यात आली आहे त्याबद्दल शासनाचे मी निश्चितपणे अभिनंदन करतो.अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्यांची .तसेच माध्यमिक शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्यांची जी रक्कम होती त्याची लक्षावधी रुपयांची थकबाकी राहिली होती.त्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे.त्यामुळे 2003-2004 च्या शिष्यवृत्तीच्या दरामध्ये आणि निर्वाहभत्यात वाढ करण्यात आल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा सुधारेल आणि त्यांना चांगल्या शिक्षणाची संधी प्राप्त होईल असे मला सांगावेसे वाटते.

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा. कवाडे ....

अध्यक्ष महाराज, पृ.133, बाब क्रमांक 115 - आदिवासी विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख व्यवसायिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याची योजना आहे ती राबविण्यासाठी या ठिकाणी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे आमचे आदिवासी विद्यार्थी आहेत ते हे व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन बाहेर पडतील तेव्हा त्यांनी रोजगाराभिमुख शिक्षण घेतलेले असल्याने नोकरीच्या मागे लागण्यापेक्षा स्वत:चा उद्योग-धंदा उभा करून स्वत:च्या पायावर उभे राहतील.

अध्यक्ष महाराज, पृ.124, बाब क्रमांक 118 - अनुसूचित जाती आणि जनजाती व जनजातीतर क्षेत्र उपयोजनेमध्ये वीजपंपांसाठी 100 टक्के अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यांच्या देयकांची पूर्तता करण्यासाठी ही जी तरतूद करण्यात आली आहे त्यामुळे निश्चितच आमच्या अनुसूचित जाती आणि जनजाती व जनजातीतर क्षेत्रातील लोकांना लाभ मिळणार आहे.

अध्यक्ष महाराज, यानंतर कृषी, पशुसंवर्धन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्यांवर मी बोलणार आहे. पृ.21, बाब क्रमांक 27 - मागील 3-4 वर्षामध्ये पावसाच्या अनियमितपणामुळे भूजलाची पातळी खोल गेलेली आहे आणि परिणामत: संत्र्याच्या बागा अत्यंत धोक्यामध्ये आलेल्या आहेत. त्या परिसरातील संत्र्याची झाडे सुकली आहेत त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नागपूर, अमरावती भागातील असे जे बाधित संत्रा उत्पादक शेतकरी आहेत त्यांना आपल्या संत्र्याच्या बागा सुकल्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. हा संत्रा उत्पादक शेतकरी जो सहाय्य मिळण्यापासून वंचित राहिला होता त्याला अर्थसहाय्य देण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महाराज, पृ.22, बाब क्रमांक 29 - रोजंदारीवर काम करणाऱ्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची अवस्था कशी आहे हे या ठिकाणी केलेल्या निवेदनावरून लक्षात येईल. आपल्या नागपूरामध्ये रोजंदारीवर काम करणारी जनाबाई भांगे या चतुर्थ श्रेणी कर्मचारी महिलेस कामावरून काढून टाकण्यात आले होते. परंतु नागपूरच्या औद्योगिक न्यायालयाने तिला परत कामावर घेण्याचा आणि नोव्हेंबर 1987 ते नोव्हेंबर 2002 या कालावधीतील फरकाची रक्कम रुपये 1 लाख 41 हजार सुमारे तिला देण्याचे आदेश शासनाला दिले आणि शासनाने देखील मागेपुढे न पाहता या चतुर्थ श्रेणी कर्मचारी महिलेला उशीरा का होईना न्यायालयाच्या माध्यमातून न्याय देण्याचे काम केलेले आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. धन्यवाद.

**** (यानंतर श्री.जागडे...3डी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पृ.क्र. 9 वरील बाब क्र. 12 वर मी बोलणार आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांना मांढरादेवी यात्रेतील दुर्घटनेचा उल्लेख केला आहे. अशी कोणतीही दुर्घटना घडल्यानंतर इतर यात्रांच्या वेळी शासनाचे निर्बन्ध प्रचंड प्रमाणात वाढतात. सभापती महोदय, एकविरा देवीची यात्रा हे पुढील महिन्यात होणार आहे. तेव्हा आता तेथील प्रांत अधिका-यांनी एक बैठक घेतली आहे. गेल्या 60 ते 70 वर्षापासून त्या ठिकाणी असलेली घरे आणि दुकाने या वर्षी हटविण्यात येणार आहे. आता त्या ठिकाणी एकसुध्दा घर आणि दुकान राहणार नाही. ही दुकाने आता एक किलोमीटरच्या बाहेर जाणार आहेत. एकविरा देवीच्या यात्रेला येणा-या भक्तांनी आपल्या गाड्या देवळापासून एक कि. मी. अंतरावर ठेवावयाच्या आहेत आणि तेथून चालत यावयाचे आहे. अशा प्रकारचे फर्मान प्रांत अधिका-यांनी काढले आहे. शासनाच्या माध्यमातून या बाबत विशेष लक्ष देण्याची गरज आहे, लोकांना सहकार्य करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, यानंतर मी पान क्र. 84 वरील बाब बाब क्र. 73 वर बोलणार आहे. अकोट, जिल्हा अकोला येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. आज ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या सर्व जिल्ह्यापेक्षा जास्त आहे. अशा परिस्थितीत ठाणे जिल्ह्यात को-ऑपरेटिव्ह न्यायालय नाही. या जिल्ह्यातील सगळ्या लोकांना यासाठी मुंबईला यावे लागते. अलिबाग महसूल विभागामध्ये मात्र ही सोय आहे. त्या भागातील लोकांसाठी ही सोय आहे. ठाण्याची लोकसंख्वया 14 लाखाच्या वर गेले असताना को-ऑपरेटिव्ह न्यायालय नाही. ठाणे जिल्ह्यात ठाणे, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर ही मोठमोठी शहरे आहेत. या भागात अनेक को-ऑपरेटिव्ह सोसायट्या रजिस्टर्ड झालेल्या आहेत. अशा परिस्थितीमुळे या भागात को-ऑपरेटिव्ह न्यायालय निर्माण करण्याची शासनाने व्यवस्था करावी.

यानंतर नंतर पान क्र. 132 वरील बाब क्र. 114 वर बोलणार आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्यांची व माध्यमिक शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्यांच्या थकबाकीची रक्कम प्रदान करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात बी.एड. पास झालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र दिले नाही. कास्ट सर्टिफिकेट वेरिफिकेशन केल्यानंतर हे सर्टिफिकेट देण्यात येणार आहे. हे विद्यार्थी पास झाल्यानंतरही या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र दिले जात नाही. सभापती महोदय, परदेशातून आलेल्या लोकांना तसेच परप्रांतांतून आलेल्या लोकांना आज आपण पोसत आहे. परंतु या राज्याची नाळ ज्यांची जुळली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे....

आहे, त्यांच्यावर मात्र अन्याय केला जात आहे. तेव्हा या विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र त्वरीत देण्याची शासनाने व्यवस्था करावी.

यानंतर मी पृ.क्र. 90 वरील बाब क्र. 79 बोलणार आहे. मी हा प्रश्न नागपूरच्या अधिवेशनातही मांडला होता. भिवंडीतील 600 कोटी रुपयाची विजेची थकबाकी आहे. मा.मंत्रिमहोदय श्री. दिलीप वळसे-पाटील हे या ठिकाणी बसले आहे. त्यांनी या गोष्टीकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी फक्त घोषणा केली आहे, परंतु प्रत्यक्षात काहीच कारवाई केलेली नाही. या ठिकाणी वेगळी पोलीस यंत्रणा निर्माण करण्याची गरज आहे. कारण या भागातील वीज तोडण्यासाठी विद्युत खात्यातील कर्मचारी गेला तर त्याला मारहाण केली जाते. तोच प्रकार मुंब्रा येथे घडत आहे. तेथील विजेची थकबाकी 100 कोटी रुपये आहे. कोट्यावधी रुपयाची विजेची चोरी आजही होत आहे. तेव्हा याकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर मी बाब क्र. 11 वरील बाब क्र. 18 वर बोलणार आहे. कुर्ला-नेहरुनगर भागात पोलीस परिवारांचा तीन इमारती आहेत. या ठिकाणी राहणा-या लोकांचे प्राण धोक्यात आले आहेत. आज या पोलिसांचा एचआरए कापला जातो. परंतु ते राहत असलेल्या इमारतींची शासन कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करीत नाही. तेव्हा याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, रिमांड होममधून मुले पळाली आहेत, जेलमधून कैदी पळाले आहेत. पोलीस कस्टडीतून कैदी पळाले आहेत.

(यानंतर श्री. सरफरे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी टीप

श्री. अनंत तरे....

सभापती महोदय, ठाण्याच्या जेलमधील स्मारकाकरिता माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व माननीय उप सभापती श्री. वसंतराव डावखरे यांनी दहा लाखांचा निधी स्थानिक विकास निधीमधून उपलब्ध करुन दिला आहे. त्या जेलच्या भिंती आज व्यवस्थित नसल्यामुळे तेथून कैद्यांचे पलायन होत आहे. तेव्हा त्या भिंतीकडे शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, ठाण्यातील तुळशीधाम या विभागामध्ये 200 लोकांची वस्ती आहे. त्या विभागामध्ये 40 वर्षापासून 200 कुटुंबे रहात आहेत. त्याठिकाणी त्या लोकांना शौचालयाची व्यवस्था नसल्यामुळे ते आजूबाजूच्या मोकळया जागेमध्ये प्रातर्विधी उरकतात. महानगरपालिकेने त्या ठिकाणी संडास बांधण्यास परवानगी दिल्यानंतर महानगरपालिकेने त्याठिकाणी सुलभ शौचालयाचे काम सुरु झाले. परंतु कापूरबावडी पोलीस स्टेशन अंतर्गत असलेले पोलीस इन्सपेक्टर श्री. घरटे हे त्याठिकाणी जाऊन त्यांनी शौचालयाचे बांधकाम करीत असलेल्या ठेकेदाराला मारले, व तेथील जेसीबी यंत्र घालवून दिले, महानगरपालिकेच्या एका इंजिनिअरला दम दिला. त्यांचे म्हणणे असे की, पोलीसांच्या गृह संकुलासाठी त्यांनी या जागेची मागणी केली आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, शासनाने पोलीसांच्या गृह संकुलासाठी ही जमीन दिलेली नाही. तेव्हा त्याठिकाणी 200 कुटुंबांचे होणारे हाल थांबविण्यासाठी तातडीने त्यांना जागा उपलब्ध करुन देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, रायगड जिल्हयातील तळोजा तालुक्यामध्ये श्री. दत्ता गोंधळी यांची हत्या झाली त्याबाबत मयत श्री. दत्ता गोंधळीच्या कुटुंबियांनी ही हत्या कुणी केली यासंबंधी एफ.आय.आर. मध्ये नावे सांगितली आहेत. परंतु अद्यापि आरोपींना पकडण्यात आलेले नाही. यासंबंधी 21 डिसेंबर 2004 रोजी माननीय उप मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन या खून प्रकरणाची सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्याची मागणी केल्यानंतर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी 21 डिसेंबर 2004 रोजी सी.आय.डी. चौकशीचे आदेश दिले. परंतु खेदाची गोष्ट अशी की, माननीय उप मुख्यमंत्री हे तडफदारपणे काम करीत असतात. त्यांनी साध्या शिपायापासून महाराष्ट्राच्या महासंचालकांना आत टाकण्यास मागेपुढे पाहिले नाही. असे असतांना त्यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी कां होत नाही? तेव्हा माननीय उप मुख्यमंत्र्यांचे आदेश न पाळणारे हे झारितील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे....

शुक्राचार्य कोण आहेत? डिसेंबर महिन्यात आदेश देऊन सुध्दा कारवाई कां होत नाही हे पहाण्याची आवश्यकता आहे, व यामध्ये जातीने लक्ष घालून त्या प्रकरणी सी.आय.डी. मार्फत चौकशी करावी अशी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी माझ्या नावाचा उल्लेख करुन याठिकाणी जी बाब मांडली आहे त्यामध्ये थोडी चूक राहिली असल्यामुळे मी खुलासा करु इच्छितो. ठाण्याच्या जेलमध्ये श्री. अनंत कान्हेरे यांची शेवटची फाशी झाली. मी मुंबईचा महापौर असतांना त्या जेलमध्ये जाऊन त्यांची समाधी शोधली. त्याठिकाणी त्या तारखेपासून आजपर्यंत त्या समाधीची पूजा अर्चा व्यवस्थित होत आहे. ज्याठिकाणी त्यांना फाशी झाली त्या फाशीच्या तख्तावर अनेक क्रांतिकारकांना चढविले गेले आहे. त्याची सर्वांना आठवण असावी. स्वातंत्र्य आंदोलनामधील अनेक क्रांतिकारकांना ब्रिटीशांनी पकडल्यानंतर त्यांना अंदमानला नेण्यापूर्वी ठाणे जेलमध्ये ठेवले जात असे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कारण तीच एक सुविधा होती. क्रांतीकारकांची आणि स्वातंत्र्यवीरांची शेवटची आठवण नीट रहावी यासाठी, जेव्हा मी ठाणे जेलला भेट दिली तेव्हा ते तसेच्या तसे रहावे यासाठी दहा लाखाचा निधी दिला आहे. माननीय उप सभापती महोदयांनीही निधी दिलेला आहे. पण ते काम अजून पूर्ण झालेले नाही. लोकांना दर्शनासाठी ते उपलब्ध व्हावे यासाठी सर्व काही केलेले आहे. जर तेथील काम अपूर्ण राहीले असेल तर ते पूर्ण करावे. याठिकाणी एवढयाचसाठी उल्लेख करावयाचा आहे की, अनंत कान्हेरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, त्यांची लोकांना आठवण रहावी यासाठी मी फंड दिला होता. याठिकाणी तेथील भिंतींच्या बाबतीत जो उल्लेख केलेला आहे, तर त्याच्याशी आमच्या फंडाचा काही संबंध नाही.

. . . .3 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पान क्र.11, बाब क्र.18 बाबत मला बोलावयाचे आहे. यातील ब-याचशा गोष्टींचा उल्लेख माननीय सन्माननीय सदस्य प्रा.कवाडेसाहेब यांनी केलेला आहे. मी दोन-तीन गोष्टींचा उल्लेख करु इच्छितो. पोलीस गृहनिर्माण संबंधी मुंबई शहरामध्ये शाहुनगर, नायगाव, भोईवाडा येथे अशा पोलीस वसाहती आहेत की, जेथे पूर्ण चटई क्षेत्र कन्झ्युम झालेले नाही. 40 कोटी रुपये दुरुस्तीसाठी ठेवलेले आहेत. साधारणत: म्हाडाने एक असा निर्णय घेतलेला आहे आणि तो योग्य आहे की, एखाद्या इमारतीची दुरुस्ती करीत बसण्यापेक्षा तिची पुनर्रचना करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण मुंबई शहरामध्ये नायगावचे जे पोलिसांचे छोटे हॉस्पीटल आहे, त्याच्यासमोर भोईवाडा स्मशान भूमी आहे. तेथील पोलीस वसाहत सोडली आणि माहीमची शाहूनगरच्या बाजूची वसाहत सोडली तर मुंबईमध्ये पोलिसांसाठी कुठेही घरे बांधण्यात आलेली नाहीत. नायगाव असेल, भोईवाडा असेल, परंतु वरळीच्या टेकडीवरील जमिनींचे काय झाले ? पण मी येथे पोलीस वसाहतीच्या बाबतीत चर्चा करीत नाही. परंतु मला असे वाटते की, याठिकाणी आपण त्यांना अतिशय चांगल्या प्रकारची घरे दिली नाहीत. आज आपण जर नायगाव येथील घरे पाहिली तर ती 10x10 ची घरे आहेत किंवा कुठेही पोलीस स्टेशनला संलग्न अशा ज्या इमारती आहेत, तेथे दोन-चार, दोन-चार घरे असतात. मग ती अधिका-यांसाठी असतील, सब इन्स्पेक्टरसाठी असतील, इन्स्पेक्टरसाठी असतील, तर त्या सगळया वसाहती अतिशय निकृष्ट दर्जाच्या झालेल्या आहेत. म्हणून याबाबतीत सर्वंकश विचार करणे आवश्यक आहे. पण मध्यंतरी महासंचालक पदावर असलेल्या, ज्यांच्याकडे गृहनिर्माण खाते होते, त्यांना कशाप्रकारे अटक झाली वगैरे विषयामध्ये मी जात नाही. यावर अनेक वेळा येथे चर्चा झाली आहे. परंतु त्याठिकाणी जणुकाही शिक्षा झाली म्हणजे ते पद दिले जाते असे समजण्यात येते. याठिकाणी हे पद असे हवे की, ज्यांनी पूर्णपणे कीन इंटरेस्ट घेतला पाहिजे. त्यांनी महाराष्ट्रामध्ये दौरा केला पाहिजे. आता तेथे फक्त गृहनिर्माण अधिकारी असतो, म्हणजे गृहनिर्माण पोलीस महासंचालक, एक मोठा उच्च अधिकारी तेथे असतो, सिनिअर आय.पी.एस.अधिकारी असतो. परंतु त्यांच्या हाताखाली असलेले अधिकारी हे आर्कीटेक्ट हवेत, इंजिनिअर हवेत. करोडो रुपये खर्च करुन ज्या वसाहतींची पुनर्बांधणी किंवा दुरुस्ती केली जाते, ती नीट केली जाते की नाही ? आता येथे 40 कोटी रुपये ठेवलेले आहेत आणि मला असे वाटते की, हे 40 कोटी रुपये दुरुस्ती आवश्यक आहे का ? जर 70 टक्के दुरुस्ती आवश्यक आहे, तर साधारणत: बांधकाम

. . . .3एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

शास्त्राचा नियम असा आहे की, त्याची दुरुस्ती करीत नाहीत. तर डिमॉलिशन करुन त्याची पुनर्बांधणी करतात, पुनर्रचना करतात. कारण आपण कितीही जुन्या इमारतींची दुरुस्ती केली तरी वरवरची कॉस्मॅटीक रिपेअरींग होते, परंतु ज्याला आपण स्ट्रक्चरल रिपेअरींग म्हणतो, ती त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची होत नाही. आपण त्या इमारतीचे दुरुस्तीमुळे आयुष्य वाढवू शकत नाही. परंतु त्या इमारती मेन्टेन करु शकतो. म्हणून मला असे वाटते की, जसे बँकांमध्ये किंवा आम्हा आमदारांना सुध्दा माझ्या माहितीप्रमाणे, कदाचित माझी माहिती चुकीची देखील असू शकेल. चार टक्के, पाच टक्के दराने कारसाठी लोन मिळते. मग पोलिसांसाठी बजेटमध्ये अशी काही वेगळी प्रोव्हीजन करता येईल का ? की, अल्प दरामध्ये, जसे तीन टक्के, चार टक्के व्याजाने, मुंबई शहरामध्ये, प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्र, कोकण, तुरळक मराठवाडा आणि विदर्भातील माणूस पोलीस खात्यामध्ये आहे. त्याने 30-40 वर्षे सेवा केल्यानंतरही त्याला मुंबईमध्ये घर मिळत नाही, घर खाली करावे लागते. मग निदान आयुष्यातील 30-40 वर्षे तो ज्या घरामध्ये राहतो, साधारणपणे दहा-बारा वर्षे झाली की त्या पोलिसाला क्वॉर्टर मिळते. सुरुवातीला क्वॉर्टर मिळत नाही. हल्ली ही संख्या दहा टक्के, वीस टक्क्यांनी वाढली असेल. म्हणून याठिकाणी अतिशय काळजीपूर्वक, लक्ष देणारा, इंटरेस्ट घेणारा माणूस हा येथे प्रमुख अधिकारी म्हणून नेमला पाहिजे. आज नायगाव पोलीस वसाहतीमध्ये 0.75 एफ.एस.आय. सुध्दा कन्झ्युम झालेला नाही आणि जर पोलिसांनी आपली वसाहत बांधावयाची ठरविली तर मुंबईच्या डी.सी.रुल्स् प्रमाणे 1.33 एफ.एस.आय.मिळू शकतो. आपण बिल्डरनां किंवा एस.आर.ए योजनेला 4 पॉईंट एफ.एस.आय. देतो. तो तेथील मूळ लोकांचे पुनर्वसन करतो. परंतु मला असे म्हणावयाचे नाही की, तो काही सन्यासी नाही.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे चालू.....

त्यांनी पुनर्वसन फुकट केले म्हणून सेलेबल एफएसआय दिला जातो . परंतु त्याला इतका सेलेबल एफएसआय दिला जातो की, त्याने चार आणे खर्च केले असतील तर किती तरी पटीने अधिक त्यांना पैसा मिळतो. म्हणून जे शासन अशात-हेने एसआरअे योजनेमध्ये मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाला इमारतींची पुनर्रचना करण्यासाठी 2.5 एफएसआय देते. जर स्वत:च बांधकाम करायचे असेल तर 4 एफएसआय दिला जातो. पोलीस खात्याला त्या ठिक्राणी 1.33 एफएसआय ऐवजी 2.5 एफएसआय द्यावा, म्हणजे त्या ठिकाणी अधिक चांगल्या इमारती बांधता येतील. निदान पोलिसांना असे वाटेल की, मी 24 तास बाहेर असतो. पोलीस कर्मचारी 22-22 तास, 24-24 तास बाहेर असतात. सणासुदीला ते रजाही घेऊ शकत नाहीत. होळी, गणपतीच्या सणाला पोलीसांपैकी 10 ते 12 टक्के पोलीसांना रजा मिळते. पोलीस त्यासाठी निषेधही करु शकत नाही. यामुळे पोलिसांमध्ये अनेकवेळेला खोट्या प्रवृत्ती निर्माण होतात. मग आजारी असल्याबाबतचे खोटे सर्टिफिकेट देण्याकडे त्यांचा कल असतो. अशाप्रकारे काम करत असणाऱ्या या खात्यातील कर्मचाऱ्यांना त्या ठिकाणी चांगले घर दिले पाहिजे. मुंबई शहरामधील 80 टक्के पोलीस वसाहती अशा आहेत की, 10x12, 10x15 अशाप्रकारचे त्यांचे घर असते. त्यांची मुले त्या ठिकाणी राहून शिक्षण घेतात, महाविद्यालयामध्ये जातात. ते त्या ठिकाणी कोठे अभ्यास करणार,असा प्रश्न पडतो. पोलीस विभागाने गृहनिर्माण विभाग वेगळा केलेला आहे. त्यासाठी वेगळे महासंचालक पद निर्माण केलेले आहे. परंतु त्यासाठी आर्थिक तरतूद किती दिलेली आहे, हे पहाणे आवश्यक आहे. निवृत्त झाल्यानंतर मुंबई-डोंबिवली पर्यन्त स्वत:चे त्यांना घर घ्यावयाचे असेल तर त्यासाठी त्यांना कर्ज मिळण्याची व्यवस्था नाही. त्यांना कर्ज उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते.

त्यानंतर पान क्रमांक 25, बाब क्रमांक 31 वर बोलणार आहे. माध्यमिक शिक्षण देण्याची बृहन्मुंबई महानगरपालिकेची जबाबदारी आहे. वास्तविकपणे जास्त जबाबदारी ही या संस्था उचलतात. मुंबई, नवी मुंबई अशी मोठी शहरे आहेत, त्या ठिकाणी महानगरपालिकेमार्फत माध्यमिक शाळा चालविल्या जातात. त्यासाठी 16 कोटी 27 लाख रुपये दिलेले आहेत. खरे म्हणजे मुंबई महानगरपालिकेची अगोदरच थकबाकी खूप आहे. पण शासनाचे अभिनंदन करू इच्छितो की, शासनाने याच कामासाठी ते दिलेले आहेत. माझी अशी विनंती आहे की, आपण मुंबई महानगरपालिकेला अट घातली पाहिजे की, हे पैसे आस्थापनेवर वर्ग करता कामा नयेत. उद्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे चालू.....

कर्मचाऱ्यांचे संप झाले, त्यांना पगार द्या, काहीही करा. पण दुसरीकडे हे पैसे वर्ग करु नका. गेल्या पाच-दहा वर्षामधील अनुभव असा आहे की, बजेटमध्ये तरतूद केलेली असते. शासनाकडून जी मदत मिळते, त्या कामासाठी खर्च न करता इतर हेडखाली ती रक्कम वर्ग केली जाते. मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांच्या इमारतींबद्दल एक रिटपिटीशन झाले होते. मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर धनुका समिती स्थापन झाली. आज मुंबई महानगरपालिकेच्या शाळेमध्ये कोणी जात नाही. त्या ठिकाणचे शिक्षण चांगले असतात, मुंबई महानगरपालिकेच्या शाळांचा 80 टक्के 90 टक्के निकाल लागतो. पाच दहा वर्षापूर्वी तर पहिले मेरिट लिस्टमध्ये मुंबई महानगरपालिकेच्या दहा-बारा शाळांमधील विद्यार्थी 50-60 क्रमांकामध्ये आलेले आहेत. त्या ठिकाणी उत्तम दर्जाचे शिक्षक आहेत. परंतु त्या ठिकाणच्या इमारतीच्या वस्तुस्थितीची पहाणी केल्यानंतर पालक आपली मुले त्या शाळेमध्ये घालत नाहीत. धनुका समितीच्या शिफारशींची कशी अंमलबजावणी करावी, यासाठी मुंबई महानगरपालिकेने दुसऱ्या दोन समित्यांची स्थापना केली. म्हणून आज मुंबई महानगरपालिका ज्या शाळा बांधते. त्याचे बजेट लाखो कोटीच्या घरामध्ये जाते. या बाजूच्या शिवसेना आणि बीजेपीच्या सन्माननीय सदस्यांनी मुंबई महानगर पालिकेमध्ये सदस्य म्हणून काम केलेले आहे,त्यांना माहिती आहे की, दहा-दहा, बारा-बारा वर्षांनी पुन्हा त्याच शाळांच्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी तेवढाच खर्च करावा लागतो. म्हणून मला असे वाटते की, आपण जे 16 कोटी 47 लाख 55 हजार रुपये दिलेले आहेत. ते पैसे त्याच कामावर खर्च होण्याच्यादृष्टीने मुंबई महानगरपालिकेतील प्रशासनाला स्पेशिफिक सूचना द्याव्यात. कोणी असे म्हणेल की, मुंबई महानगरपालिकेमध्ये बीजेपी-शिवसेनेची सत्ता आहे. महानगरपालिकेत नगरसेवकांनी एकमताने 100 टक्के एखादी शिफारस केली तर त्याची अंमलबजावणी करायची की नाही, हे पूर्णत: महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या अखत्यारितील बाब असते. त्यामध्येसुध्दा महानगरपालिकेच्या आयुक्तांना सर्व सभागृहाच्या अनुमतीने एखादी गोष्ट केली तर ती देखील एका विशिष्ट कलमाद्वारे त्यांना बदलता येते. म्हणून मी या माध्यमिक शिक्षणासाठी मुंबई महानगरपालिकेच्याबाबतीतील सूचना केली. ज्या खाजगी शैक्षणिक संस्था या शाळा चालवितात, त्यांना गेली पाच वर्षे इमारतींचे भाडेदेखील मिळालेले नाही, वेतनेतर अनुदान मिळालेले नाही. आपल्यापैकी अनेक सन्माननीय सदस्य शिक्षणसंस्था चालवितात. या ग्रामीण भागातील शाळा या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे चालू.....

लोकांनी लोकवर्गणीतून बांधलेल्या आहेत. कोणी त्यासाठी जमीन दिलेली असते, कोणी स्वत: श्रम केलेले असतात. आमच्या कोकणातील शाळा या कौलारू आहेत. त्या शाळांना आपण तीन-तीन वर्षे वेतनेतर अनुदान दिले नाही, त्यामुळे त्या मेंटेन होत नाहीत. आता आपण सांगाल की, शाळांनी 20 हजाराची पुस्तके घेतलीच पाहिजेत. लायब्ररी असायला पाहिजेत. लायब्ररी ठेवलीच पाहिजे. आजकाल शहरी भागातील मुलांना वाचनाची आवड नाही. परंतु गंथालयाची तर अट असते. माध्यमिक शाळेची ती अट आहे.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

महाविद्यालयाची अट असते आणि माध्यमिक शाळेची सुध्दा अट आहे. आज या ग्रामीण भागातील माध्यमिक शाळातील ग्रंथालयाची पाहणी केली तर आपल्याला अतिशय दयनीय अवस्था पाहावयास मिळेल.दुसरी गोष्ट अशी की, काळ बदललेला आहे. शहरांच्या ठिकाणी माध्यमिक शाळांमध्ये बदलेल्या काळानुरुप प्रयोग शाळांमध्ये अतिशय अत्याधुनिक अशी यंत्रे आणली जातात, देणग्यांच्या माध्यमातून ती मिळवली जातात. परंतु ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी जे वेगवेगळे सायन्सचे विषय असतात त्यांच्या संबंधातील प्रयोग शाळेची दयनीय अवस्था आहे. या शाळांना जिल्हयाचे शिक्षण अधिकारी अट घालताता की, सॅनिटरी व्यवस्था व्यवस्थित केली पाहिजे. शौचालय बांधले पाहिजेत. पण ग्रामीण भागात पाणी वाहन्यासाठी पाण्याची गटार नाही. त्यांना बोअरवेल करावी लागते, त्यांना विहीर बांधावी लागते. शासन फतवा काढणार की, वेगळी सॅनेटरी व्यवस्था पाहिजे. मुलींसाठी वेगळे शौचालय पाहिजे.मुलांसाठी वेगळे शौचालय पाहिजे. ते दररोज धुण्यासाठी पाणी लागते. मला सांगावयाचे आहे की, गेली तीन-चार वर्षे झाले एक-एका शाळेचे चौदा-चौदा, पंधरा-पंधरा लाख रुपये वेतनेत्तर अनुदान राहिलेले आहे. माझी शासनाला विनंती आहे की, मुख्यअर्थसंकल्पात ज्या काही तरतुदी केल्या आहेत त्याच्यावर या ठिकाणी विचार होईल. परंतु या निमित्ताने विनंती करावयाची आहे की, खाजगी शिक्षण संस्थांकडून ज्या माध्यमिक शाळा चालविल्या जातात, त्या एखाद्या शिक्षण संस्थंचे चार लाख रुपये वेतनेत्तर अनुदान दिले नसेल, ते पूर्वलक्षीप्रभावाने द्यायचे असेल तर त्यापैकी एक लाख रुपये द्या, दोन लाख रुपये द्या, पन्नास हजार रुपये द्या. त्या पैशा शिवाय त्यांनी इमारात मेंन्टेन कशी करायची?. ग्रामीण भागातील बहुतांशी विद्यार्थी हे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असतात, त्यांना फ्री-शीप मिळते, मागासवर्गीय विद्यार्थी असतात, अन्य मागसवर्गीय विद्यार्थी असतात फक्त दहा-पाच विद्यार्थी असे असतात की, जे रेग्युलर त्यांची फी देत असतात. बाकी जवळ जवळ सर्व विद्यार्थी फी माफीच्या सवलतीखाली शिकत असतात.महाराष्ट्राचे 40 टक्के शहरीकरण झालेले आहे हे सोडून द्या. पण 60 टक्के ग्रामीण भागातील शाळा आहेत. त्या सगळयाच शाळा काही श्रींमतांच्या किंवा साखर कारखान्यांच्या नाहीत. म्हणून या निमित्ताने मला शासनाला विनंती करावयाची आहे की, मुंबई महानगरपालिकेला आपण 16 कोटी रुपये दिले आहेत. त्यांचे मागचे पैसे पण त्यांना द्यावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

त्याचबरोबर स्पेसिफिक इन्स्ट्रक्शन द्याव्यात की, हे पैसे त्याच कारणासाठी खर्च होतील. ते दुसरीकडे कुठेही वर्ग करता येणार नाहीत. शेवटी अर्धा मिनिटात माझा एक मुद्दा पुन्हा सांगून मी माझे भाषण पूर्ण करणार आहे. ग्रामीण भागातील ज्या खाजगी शिक्षण संस्था माध्यमिक शाळा चालवित आहेत त्यांची शिक्षणेत्तर अनुदानाची जी थकबाकी असेल त्यापैकी किमान 25, 30 टक्के रक्कम तरी त्यांना अदा करावी ही विनंती. धन्यवाद.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान (नामनियुक्त): सभापति महोदय, मैं वर्ष 2004-05 की पूरक मांगों पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ी हूं.

सामान्य प्रशासन विभाग - बाब क्रमांक 7

सभापति महोदय, सदियों से ही देश भक्ति और देश सेवा के क्षेत्र में महाराष्ट्र राज्य अग्रणी रहा है. देश के लिए जिन्होंने रणभूमि में अपने शौर्य का प्रदर्शन किया है, उन्हें भारत सरकार ने परमवीर चक्र, महावीर चक्र, वीर चक्र प्रदान किया है .....

तालिका सभापति (श्री. अनंत तरे): आज की पूरक मांगों के अन्तर्गत सामान्य प्रशासन विभाग पर चर्चा नहीं है. सामान्य प्रशासन विभाग पर कल चर्चा हो चुकी है.

श्रीमती फौजीया खान : सभापति महोदय, ठीक है. मैं पर्यावरण विभाग के संबंध में बोलना चाहूंगी.

तालिका सभापति (श्री अनंत तरे): पर्यावरण विभाग के अन्तर्गत कोई बाब नहीं रखी गई है.

श्रीमती फौजीया खान : ठीक है.

पर्यावरण विभाग : बाब क्रमांक 123

सभापति महोदय, भारत सरकार में वन एवं पर्यावरण एक ही विभाग है और यह विभाग एक ही मंत्री के अधीन है. इस कारण से भारतीय वन सेवा अधिकारियों की ओर से इस विभाग में अत्यंत उत्कृष्ट तरीके से पर्यावण संबंधी इशू में योगदान होता रहता है. आज की हायर ब्यूरोक्रेसी में भारतीय वन सेवा के अधिकारी ही इस टेक्नीकल सर्विसेस के लिए रिसोर्स ऑफिसर के रुप में है. इसलिए उनके पास ये रिसोर्स ऑफिसर उपलब्ध है. जिस तरह से एम.एस.ई.बी. में विजीलेंस सेल होता है तथा वहां आई.पी.एस. अधिकारी नियुक्त किया जाता है, उसी तरह से क्या मंत्री महोदय भारत सरकार की तर्ज पर अपने विभाग में आई.एफ.एस. अधिकारी को नियुक्त करेंगे ? ताकि उनकी एक्सपर्टीज विभाग के उपयोग में आए. मैं यह बात इसलिए कह रही हूं कि वर्तमान मंत्री महोदय महाराष्ट्र सरकार के वन मंत्री रह चुके हैं और उन्हें आई.एफ.एस. के बारे में पूरी जानकारी है, ऐसा मैं समझती हूं.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांस्कृतिक कार्य विभाग - बाब क्रमांक 97 :

सभापति महोदय, मराठवाड़ा की राजधानी समझे जाने वाला औरंगाबाद शहर इस वर्ष चतुर्थ शताब्दी समारोह मना रहा है. महाराष्ट्र के जिन गिने-चुने शहरों को सांस्कृतिक और ऐतिहासिक पृष्ठभूमि है उनमें से एक औरंगाबाद शहर है. प्रति ताजमहल, बीबी का मकबरा, एलोरा, अजंता, भुवनेश्वर का मंदिर, दौलताबाद का किला, चारमीनार जैसे गहनों से अलंकृत यह एक ऐतिहासिक शहर है. हिन्दू,मुसलिम,बौध्द एवं जैन कल्चर को इस शहर ने बढ़ावा दिया है. ऐसे राष्ट्रीय एकात्मता के प्रतीक इस शहर का चतुर्थ शताब्दी समारोह बड़े धूमधाम से मनाने की जरुरत है. इससे भाई-चारे का नया संदेश पूरे राज्य में जा सकता है.इसलिए इस बात को ध्यान में रखते हुए चतुर्थ शताब्दी समारोह पूरे एक साल तक मनाने के लिए पर्याप्त आर्थिक प्रावधान किया जाए, ऐसा मेरा सरकार से अनुरोध है. मराठवाड़ा की राजधानी औरंगाबाद का इन्टरनेशनल मॅप पर नाम है और हजारों साल से ही औरंगाबाद शहर अपने दौर का आधुनिक शहर रह चुका है. ऐसे शहर का सम्पूर्ण विकास हो सके ओर देश के टॉप टेन सीटी में यह शहर आ सके, इसके लिए सरकार की तरफ हर संभव कोशिश की जाए, ऐसी में मांग करती हूं

शालेय शिक्षण विभाग - बाब क्रमांक 30 :

सभापति महोदय, राज्य में स्थानिक स्वराज्य संस्थाओं के अन्तर्गत चलने वाले स्कूलों में बहुत सारे शिक्षक अतिरिकत हो चुके हैं. परभणी नगरपालिका में 39 शिक्षकों को जिला परिषद स्कूलों में प्राधान्य से समायोजन करने का धोरण शासन का होने के बावजूद इसमें कार्यवाही नहीं हो रही है. जिला परिषद के शिक्षकों के कुल कितने पद रिक्त है और राज्य में कुल कितने शिक्षक अतिरिक्त हो चुके हैं, इसकी फीगर जब तक सामने नहीं आएंगी, तब तक शासन के धोरण पर कोई अमल नहीं हो सकता है. इसलिए ये फीगर वर्कआऊट करके अधिकारिक तौर पर घोषित होनी चाहिए और शिक्षकों के समायोजन के लिए जरुरी आर्थिक प्रावधान की जरुरत है तो वह भी किया जाना चाहिए, ऐसा मैं विनती करती हूं.

सभापति महोदय, बाब क्रमांक 34 के अन्तर्गत 1986 के राष्ट्रीय शैक्षणिक धोरण के अन्तर्गत कृति कार्यक्रम 1992 एवं माननीय प्रधानमंत्री के 15 सूत्रीय कार्यक्रम के अनुसार सन 1993-1994 से शैक्षणिक दृष्टि से पिछड़े अल्पसंख्यकों के लिए सघन प्रक्षेत्र कार्यक्रम की योजना

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कार्यान्वित की जा रही है. इस का जिक्र कई सदस्यों ने किया है. इस योजना के अन्तर्गत मालेगांव, भिवंडी और औरंगाबाद में प्रत्येक जगह पर एक लेडीज होस्टल बनाने के लिए इन शहरों का चयन किया गया है. मैं शासन से यह कहना चाहती हूं कि गवर्नमेंट ऑफ इंडिया का अगर यह नियम है कि किसी क्षेत्र में 25 प्रतिशत अल्पसंख्यक आबादी होनी चाहिए और तभी वह डिक्लेअर हो सकता है तो और शहरों का भी अभ्यास होना चाहिए, क्योंकि मुझे लगता है कि परभणी शहर की आबादी में 30 प्रतिशत से ज्यादा अल्पसंख्यक है. इसलिए इसकी मांग शासन की तरफ से हो, ऐसा मैं समझती हूं.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग - बाब क्रमांक 131 :

सभापति महोदय, उर्दू भाषिक विद्यार्थियों की संख्या राज्य में लक्षणीय होने के बावजूद राज्य में एक भी स्वतंत्र शासकीय उर्दू महाविद्यालय नहीं है. इस बात को ध्यान में रखते हुए तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री सुशीलकुमार शिंदे जी ने राज्य में 4 स्वतंत्र उर्दू महाविद्यालय के निर्माण के लिए प्रिंसीपली मंजूरी दी थी. लेकिन इस पर जरुरी प्रोसेस के बावजूद भी इस विषय की फाईल अर्थ मंत्रालय में पेंडिंग है.जून-जुलाई 2005 से ये महाविद्यालय शुरु हो, इसके लिए पर्याप्त आर्थिक प्रावधान करने की जरुरत है. मैं उम्मीद करती हूं कि उर्दू भाषिक विद्यार्थियों को और इंतजार नहीं करना पड़ेगा.

वैद्यकीय शिक्षा विभाग - बाब क्रमांक 110 :

सभापति महोदय, परभणी में परिचारिका महाविद्यालय निर्माण का प्रस्ताव शासन के विचाराधीन होने के बावजूद आज तक इस पर कोई कार्रवाई नहीं हो रही है. इस प्रस्ताव को बिना विलंब मंजूरी देकर, इसके लिए जरुरी आर्थिक प्रावधान किया जाए, ऐसी मैं मांग करती हूं. और उसी तरह से एम.बी.बी.एस. और बी.ए.एम.एस. की तरह यूनानी यानी बी.यू.एम.एस. डिग्री के जो ग्रेज्युएट है उनको मेडिकल ऑफिसर की नौकरी नहीं मिलती है, उनको मान्यता नहीं है. मैं इस डिसक्रिमिनेशन को दूर करने के लिए दो साल से यहां पर मांग कर रही हूं. मैं चाहती हूं कि मंत्री महोदय इस ओर ध्यान दें और इसका जवाब आज ही मुझे यहां पर दें, ऐसी मेरी विनती है.

..4

श्रीमती फौजीया खान .....

गृह विभाग - बाब क्रमांक 15 :

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदय, इन्फर्मेशन टॅक्नॉलॉजी के बढ़ते प्रचार और प्रसार के कारण राज्य में सायबर क्राईम में लक्षणीय वृध्दि हुई है. ऐसे अपराधों का सही और जल्दी इनवेस्टीगेशन करने के लिए एक्सपर्टीज की जरुरत है. इस बात को ध्यान में रखते हुए हर डी.एस.पी. के कार्यालय में एक सायबर सेल का निर्माण किया जाए. यह मांग मैं दो साल से करती आ रही हूं लेकिन उस पर गंभीरता से विचार नहीं हुआ. इसके पहले की पूरा राज्य सायबर क्राईम की चपेट में आज जाए, इस प्रकार के सायबर सेल को तुरंत स्थापित करने का निर्णय लेने की जरुरत है.

कृषि विभाग - बाब क्रमांक 25 :

सभापति महोदय, सूखे का सामना कर रहे मराठवाड़ा में जनवरी और मार्च में बड़े पैमाने पर गारपीट हुई है. यहां् के किसानों के हाथ से पहले ही ख़रीफ़ हंगाम निकल चुका है, इस गारपीट की वजह से किसान पूरी तरह बर्बाद हो चुका है. उनकी यह बर्बादी देखी नहीं जाती. ऐसे बेबस किसानों को तुरन्त पर्याप्त आर्थिक सहायता की जरुरत है. इसलिए तत्काल उन्हें आर्थिक सहायता दी जाए, ऐसी मैं शासन से विनती करना चाहती हूं और यहीं पर अपनी बात खत्म करती हूं. धन्यवाद.

.....

इसके बाद श्री सावंत का भाषण

अशुध्दीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2004-2005 च्या पुरवणी मागण्यांवर मी माझे विचार मांडण्यासाठी याठिकाणी उभा आहे.

बाब क्र.9, पान क्र.8 जिल्हा पोलीस दल या उपशीर्षाखाली ही मागणी केलेली आहे. महागाई भत्याच्या दरामध्ये वाढ करणे असा या मागणीचा आशय आहे. आपण पोलीस दलाचा महागाई भत्ता वाढविणार आहात. परंतु त्यांचे आर्थिक जीवनमान, कौटुंबिक जीवनमान उंचावण्यासाठी शासनाकडून कोणतेही प्रयत्न झाले नाहीत ही चुकीची बाब आहे. पोलीस दल व्हीआयपीं.चे संरक्षण करते, व्हीव्हीआयपींचे संरक्षण करते परंतु त्यांचे संरक्षण कोणी करीत नाही. त्यांच्या आरोग्याचे रक्षण कोणी करीत नाही. त्यामुळे कोणाला कामावर असताना हार्ट ॲटॅक येतो, कोणी कार्यालयातच कोसळतो असे प्रकार घडत आहेत. मी पोलिसांच्या नागपाडा येथील हॉस्पिटलचा मुद्दा अनेकवेळा उपस्थित केलेला आहे. या हॉस्पिटलमध्ये ईसीजीची सुध्दा सोय नाही ही अतिशय दु:खाची गोष्ट आहे. आपल्याकडे पंचतारांकित हॉटेल्स आहेत त्याप्रमाणे पंचतारांकित हॉस्पिटल्स देखील आहेत. हे पोलीस मुंबईच्या नागरिकांचे रक्षण करतात एखाद्यावेळी हार्ट ॲटॅकसारखा प्रसंग येतो त्यावेळी त्यांना सुपर स्पेशालिटी, नॉर्मल ट्रीटमेंटची आवश्यकता भासते, ॲन्जीओग्राफी, बायपास वा किडणीवर उपचार करावयाचे असतील तेव्हा हया पोलिसांना हया पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये प्रवेश मिळाला पाहिजे. आपल्याकडे ब्रीड कॅण्डी, लीलावती, जसलोक सारखी पंचतारांकित हॉस्पिटल्स आहेत, या लोकांना तेथे प्रवेश मिळाला पाहिजे. हया हॉस्पिटल्सना शासनाने अनेक सवलती दिलेल्या आहेत. They are exempted from contributing 2% from their annual gross income. They are also exempted from income-tax, octroi and given additional FSI. हे पोलीस दल मुंबईच्या नागरिकांची सेवा करीत आहे त्यामुळे त्यांना श्रीमंत व्यक्तींना ट्रीटमेंट मिळते त्याप्रमाणे हया पंचतारांकित हॉस्पिटल्समध्ये अल्पदरामध्ये ट्रीटमेंट मिळण्याचा हक्क आहे. हया हॉस्पिटल्सनी 10 टक्के खाटा सामान्य रुग्णांसाठी राखून ठेवाव्यात असे शासनाचे निकष आहेत. त्याप्रमाणे पोलिसांना हया हॉस्पिटल्समध्ये ट्रीटमेंट मिळवून देऊन शासनाने पोलिसांचा आशीर्वाद घ्यावा.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या बाब क्र.34, पान क्र.26 वर मी बोलणार आहे. शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या अल्पसंख्यांकांच्या सधन प्रक्षेत्र कार्यक्रमाकरिता ही मागणी केलेली आहे. ही मागणी मदरशांसाठी आहे. आता कोणाला अल्पसंख्यांक म्हणावयाचे असा आज विचार करण्याची वेळ आली आहे. आज महाराष्ट्रातील अल्पसंख्यांकांची लोकसंख्या पाहिली तर कोणाला अल्पसंख्यांक म्हणावयाचे हा महत्वाचा आणि वादाचा, विवादाचा मुद्दा होऊ शकतो.

नंतर श्री.शिगम...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत पुढे सुरु...)

या मदरशांमध्ये नेमके काय चालते याची पाहणी आपण करणार आहात काय ? आपण या मदरशांसाठी पैसे देणार आहात. या मदरशांमध्ये ज्या काही अतिरेकी कारवाया चालतात त्यावर आपणाला बंधन आणले पाहिजे. कारण शिक्षणाच्या माध्यमातून तेथील विद्यार्थ्यांपर्यन्त जे काही पोहोचविले जाते ते देशाच्या एकात्मतेला हानीकारक आहे असे माझे मत आहे. म्हणून या मदरशांची चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. आपण या मदरशांना पैसे देता त्याबद्दल आमचे काहीही म्हणणे नाही.

पृ.क्र. 124 वरील 109 आणि 110 क्रमांकाच्या बाबी जितकी मेडिकल कॉलेजेस आणि त्यांना ॲटॅच असलेली हॉस्पीटल्स आहेत त्या संदर्भातील आहेत. या राज्यामध्ये मेडिकल कौन्सिल अस्तित्वात नाही. या राज्यातील संपूर्ण डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन अजून झालेले नाही. आज कित्येक वर्षापासून कोणीही रजिस्ट्रार नाही. कौन्सिल प्रमुख हा शासनाने नेमलेला ॲडमिनिस्ट्रेटर आहे. माझा प्रश्न आहे की, या निवडणुका का होत नाहीत ? अजून याद्या नाहीत. कारण बोगस डॉक्टरांची संख्या जास्त आहे. 1999 पासून यासबंधातील प्रकरण कोर्टात प्रलंबित आहे. शेवटी ज्या राज्यामध्ये मेडिकल कौन्सिल अस्तित्वात नाही त्या राज्यामध्ये मेडिकल एज्युकेशन काय मिळणार ? जे.जे. सारखे रुग्णालय हे टिचिंग इन्स्टिट्यूट आहे. तशा प्रकारचे रुग्णालय वेस्टर्न सबर्ब आणि सेंट्रल सबर्बमध्ये होण्याची आवश्यकता आहे. याचे कारण वेस्टर्न सबर्बची लोकसंख्या वाढलेली असल्यामुळे तेथे अशा प्रकारचे मेडिकल टिचिंग इन्स्टिट्यू होणे आवश्यक आहे. कुपर हॉस्पीटल हे पोस्टग्रॅज्युएट टिचिंग इन्स्टिटयूट आहे. परंतु या कुपर हॉस्पीटची परिस्थिती काय आहे हे आपणास माहीत आहे. जर वेस्टर्न आणि सेंट्रल सबर्बमध्ये पोस्टग्रॅज्युएट टिचिंग इन्स्टिट्यूट केले तर त्यामुळे तेथील वाढत्या लोकसंख्येला काही दिलासा मिळेल. या बाबीमध्ये आपण काही साधनांची मागणी केलेली आहे. ही अगदी बेसिक साधने आहेत. मग ही साधने आपल्याकडे नव्हतीच का ? जे. जे. हॉस्पीटलमध्ये आजही सोनोग्राफी मशिनचा दुष्काळ आहे. तेथील रुग्णांना आपण सोनोग्राफीसाठी, सिटीस्कॅनसाठी बाहेर पाठवतो. अन्य काही टेस्ट करण्यासाठीही रुग्णांना बाहेर पाठविले जाते. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, जेव्हा एखाद्या पेशंटला सुई टोचली जाते त्यावेळी त्याची चाचणी करणे आवश्यक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत पुढे सुरु...)

असते आणि त्याला ॲन्टी व्हायरल ट्रीटमेंट द्यावी लागते. कारण तो पेशंट एचआयव्ही पॉझिटीव्ह आहे की निगेटीव्ह आहे हे माहीत नसते. हे नॉर्म्स आहेत. अशी सुई जेव्हा एखाद्या हाऊसमनला लागते त्यावेळी त्याची मानसिक परिस्थिती काय होत असेल ? तो माणूस 24 तास त्याला एडस् होईल की काय अशा द्विधा मन:स्थितीत असतो. ज्या पेशंटला इन्जेक्शन दिले जात त्याची सुई इन्जेक्शन देणा-याच्या हाताला लागली तर एडस्बाबत मनात शंका निर्माण होते. ही टेस्ट करण्यासाठी बाहेर जावे लागते. ही फॅसिलिटी इनहाऊस पाहिजे. आज एडस्च्या टेस्टसाठी जे.जे. हॉस्पीटलच्या बाहेर असलेल्या खाजगी लॅबोरेटरीजमध्ये जावे लागते आणि त्या रिपोर्टवर अवलंबून रहावे लागते.

सभापती महोदय, गॅन्ट मेडिकल महाविद्यालयामध्ये 2 बॉडीज् मॉच्युरी कॅबिनेट आणि 4 बॉडीज् मॉर्च्युरी कॅबिनेट करण्यात येत आहेत. आज जे.जे. रुग्णालयातील मॉर्च्युरीची काय अवस्था आहे ? तेथील अे.सी.प्लॅन्ट कित्येत दिवसापासून अर्धवट स्थितीमध्ये चालू आहे. कधी एक अे.सी. चालतो तर कधी दोन चालतात. अशी तेथील अवस्था आहे.

सभापती महोदय, विशेषोपचार हा शब्द आपण नेहमी वापरतो. आपल्या मार्फत मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, गोकुळदास तेजपाल येथील अतिविशेषोपचार विभागाबद्दल 1977मध्ये निर्णय झाला, त्याचे काय झाले ? तेथे आता कोंबड्याची खुराडी आहेत, तेथे कबुतरे रहातात, कुत्रे राहतात. 2000 सालामध्ये वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव श्री. गिल यांनी एका पत्राद्वारे कॉन्ट्रॅक्टरकडून ती इमारत ताब्यात घेतली. त्या बिलिडंगमध्ये काहीही केलेले नाही. खाजगीकरणाच्या नावाखाली तेथील 144 व्यापारी संकुले व्यापा-यांना दिली गेली. ते व्यापारी धंदा करीत आहेत. डॉक्टरांची निवासी इमारत आणि नर्सिंग क्वार्टर बांधूनही त्या इमारती तशाच पडलेल्या आहेत. तेथे विशेषोपचार वगैरे काही नाही. ज्यावेळी जागतिक बँकेची मदत येते त्यावेळी त्याठिकाणी आम्ही काही तरी करतोय असे दाखवून तो पैसा दुसरीकडे वापरला जातो. तेव्हा या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांना माननीय मंत्री महोदय उत्तर देतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

--- नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, या सभागृहात पूरक मागण्या मांडण्यात आलेल्या आहेत. त्यावर माझे विचार व्यक्त करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. पृष्ठ क्रमांक 8,9,11 व 13 यावर गृह विभागाच्या मागण्या आहेत. बाब क्रमांक 8 ही मूळ वेतनामध्ये 50 टक्के महागाई भत्ता विलीन केल्यामुळे आणि महागाई भत्त्यात वाढ झाल्यामुळे 39 लाख 28 हजार रुपयांची मागणी केलेली आहे. त्याच प्रमाणे बाब क्रमांक 9 ही देखील अशीच मागणी असून त्यासाठी 16 कोटी 60 लाख 81 हजार रुपयांची मागणी केलेली आहे.बाब क्रमांक 13 ही अशीच मागणी असून 20 लाख 28 हजार रुपयांची मागणी केलेली आहे. त्याच प्रमाणे बाब क्रमांक 11 ही देखील अशाच प्रकारची मागणी असून त्यासाठी 7 लाख 32 हजार रुपयांची मागणी सभागृहासमोर मंजुरीसाठी ठेवण्यात आलेली आहे. सभापती महोदय, शिक्षण विभागाच्या मागण्या सादर करण्यात आल्या आहेत त्यात असे आढळून आले आहे की, शिक्षकांचे दर महिन्याचे वेतन मिळण्यास विलंब लागल्यामुळे ही रक्कम अदा करण्यासाठी मागण्या सभागृहापुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आलेल्या आहेत. काही ठिकाणी अजूनही दोन-दोन,तीन तीन महिने शिक्षकांना पगार मिळालेला नाही. या पुढे तरी अशा प्रकारची वेतनाची थकबाकी होणार नाही याचा खुलासा सन्माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी करावा. शालेय शिक्षण विभाग, पृष्ठ क्रमांक-25, बाब क्रमांक 30 ही अशासकीय माध्यमिक शाळांचा विकास व विस्तार-अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्यक अनुदान यासाठी 80 लाख 30 हजार रुपयांची मागणी सभागृहापुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आलेली आहे. आज लक्षवेधी सूचनेमध्ये या मागणीचा थोडासा उल्लेख झालेला आहे. आदिवासी क्षेत्रातील 5 वी 7 वी च्या इयत्तांना त्यांच्या सचिवांनी आडमुठेपणाची भूमिका धेतली त्यामुळे शासन त्यांच्यापुढे नमले असा आमचा समज इ ालेला आहे. ही बाब सरकारला शोभनीय नाही. शालेय शिक्षण विभागाने उदात्त अंत:करणाने इयत्ता 5 वी ते 7 वी वर्गास अनुदान देण्याचे ठरविले आहे. परंतु त्यासाठी वित्त विभाग यांनी आडकाठी आणल्यामुळे अद्यापपर्यंत अनुदान देण्यात आलेले नाही. मघाशी आदिवासी विकास विभागाच्या मंत्र्यांना मघाशी जाहीर केले की, 5 वी 7 वी च्या इयत्तेस अनुदान दिलेले आहे. माझे असे म्हणणे आहे की, या महिन्यापासून ते नका आहे. मागची जी थकबाकी आहे ती 8 वी ते 10 वी च्या शिक्षकांना जशी थकबाकी मिळाली आहे तशीच थकबाकी 5 वी ते 7 वी च्या शिक्षकांना मिळाली पाहिजे हे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. मुंबई महानगरपालिका आणि संस्था

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर...

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आहेत. मुख्य म्हणजे मुंबईला महापालिकेच्या 52 माध्यमिक शाळा आहेत. त्यांना शासन वेळेवर अनुदान देत नाही. मुंबई महानगरपालिका श्रीमंत आहे असे शासनाची भावना झाली असल्यामुळे त्या शाळांमधील शिक्षकांना थकबाकी मिळत नाही. पेन्शन मिळत नाही, आता कुठे शासनाने 16 कोटी 87 लाख 55 हजार एवढया रक्कमेची शासन तरतूद करीत आहे. ही रक्कम पुरेशी होईल काय याबाबत शासनाने खुलासा करावा. बाब क्रमांक-32 प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मोफत शिक्षण यासाठी 2 कोटी 45 लाख 59 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच बाब क्रमांक 33 अंतर्गत 9 कोटी 50 लाख 89 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे त्यामुळे थोडासा दिलासा शिक्षक वर्गास मिळणार आहे. ही 1995 साली योजना सुरु केलेली आहे. परंतु काही शिक्षकांची मुले इंजिनिअर झाली आहेत. त्या शिक्षकाच्या मुलांना मोफत शिक्षणाचा लाभ मिळाला नाही. या तुटपुंज्या तरतूदीमध्ये सगळया शिक्षकांच्या मुलांचा मोफत शिक्षणाचा प्रश्न सुटणार आहे काय याचा आपण खुलासा करावा. उच्च व शिक्षण विभाग, बाब क्रमांक 133, नागपूर विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयामध्ये कार्यरत असणारे श्री.एन.एम.निमदेवकर व इतर प्र-पाठक हे पी.एच.डी.पदवी धारक असून त्यांना आगाऊ तीन वेतनवाढी पाहिजे होत्या. त्या शासनाने दिल्या नाहीत. संबंधित कर्मचारी उच्च न्यायालयात गेले आणि उच्च न्यायालयाने 12 फेब्रुवारी,2002 ला निकाल दिला. परंतु त्या निकालाप्रमाणे या कर्मचा-यांची थकबाकी उदार अंत:करणाने दिली नाही. मग हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. तेथे पण शासनाच्या विरुध्द निकाल दिला गेला. त्यामुळे अर्जदाराला दिनांक 1 जानेवारी,1986 ते 31 ऑक्टोबर,2003 या कालावधीच्या फरकाची थकबाकी शासनाला द्यावी लागली. ही रक्कम 17 लाख 89 हजार 825 रुपये इतकी आहे. ही तर थकबाकीची रक्कम आहे. परंतु त्यासाठी शासनाचा हायकोर्टात गेल्यामुळे तसेच सुप्रीम कोर्टात गेल्यामुळे शासनाचा बराच खर्च झाला असेल, त्या प्राध्यापकांचा देखील खर्च झाला असेल. हा ताप शासनाने शिक्षकांना कशासाठी दिला ? विनाकारण शासनाने या कर्मचा-यांना त्रास दिलेला आहे. आणि शासनाला देखील त्रास झालेला आहे. यावर विनाकारण खर्च झालेला आहे. तर याबाबतीत शासनाने कुठे तरी विचार करावा. यापुढे कोर्टबाजी न करता शिक्षकांना जे देय आहे ते वेळेवर देऊन टाकावे.

यानंतर श्री.उपरे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती संजीवनी रायकर)

कोर्टाचा निकाल लागल्यानंतरसुध्दा त्यांना संस्था चालक हजर करून घेत नाहीत. थकबाकी देत नाहीत, याचा आपण विचार करा आणि या संस्था चालकांविरुध्द कडक कारवाई करा. तसा जी.आर.सुध्दा निघालेला आहे. पण प्रत्यक्षात मात्र शिक्षणाधिकारी काहीही करीत नाहीत. ते हतबल का असतात ? हे मला कळत नाही. तरी मी अशा अनेक केसेस आपल्याकडे घेऊन येणार आहे.

पृष्ठ 154, बाब क्रमांक 139, शासकीय मध्यवर्ती, विभागीय व जिल्हा ग्रंथालयांना पदे निर्माण करण्यासाठी अनुदाने यासंदर्भात आहे. या ठिकाणी आपण नवीन पदे निर्माण केली आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. पण शालेय शिक्षण विभागामध्ये नवीन ग्रंथपालांच्या नेमणुका आपण करीत नाही. त्या ठिकाणी तुम्ही मुलांना पुस्तकांची गोडी लावली नाही, त्यांना नवीन पुस्तके देऊ शकला नाहीत तर पुढे त्यांची गोडी वाढणार नाही. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांप्रमाणेच येथेसुध्दा ग्रंथपालांच्या नेमणुकांवर बंदी घातली आहे ती तात्काळ उठवावी असे या निमित्ताने मला सांगावयाचे आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, बाब क्रमांक 15 कडे मी सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमासाठी विशेष न्यायालयाची स्थापना करण्यासाठी आपण या ठिकाणी तरतूद केली आहे. ही पुरवणी मागणी मान्य करताना मी आपणा समोर मुलभूत प्रश्न मांडीत आहे. या संघटित गुन्हेगारीचा स्त्रोत कोठे आहे ? याला अनुसरून मी नव्या मुंबईतील एक उदाहरण या ठिकाणी देणार आहे. सी.बी.डी.बेलापूर येथील सेक्टर 8 आणि 9 येथे बांगला देशी लोकांच्या झोपडपट्ट्या आहेत. त्या झोपडपट्ट्यांमध्ये रहाणा-या लोकांनी आपले नाव मतदार यादीत नोंदविले आहे. त्यांचे नाव मतदार यादीत नोंदविण्यासाठी त्यांना जी कागदपत्रे सादर करावी लागली त्यासाठी रेशनकार्डही होते. त्या ठिकाणी झोपडपट्टीमधील 200ते 250 लोकांनी बोगस रेशन कार्डस् तयार करून सादर केली. मी तेथील महानगरपालिकेला यासंदर्भात पत्र लिहिले आणि असे सांगितले की, यामधील पात्र आणि अपात्र लोकांची नावे मला कळवा. त्यांनी मला असे विचारले की, अपात्र लोकांचीच नावे पाहिजेत काय ? म्हणजे त्यांना कळते की यामध्ये अपात्र माणसे आहेत. अशी अपात्र माणसे त्या ठिकाणी राहत आहेत. माहितीच्या अधिकारानुसार मी त्यांच्याकडे माहिती मागविली होती आणि त्याचे उत्तर मला आले आहे. म्हणून मी आपले लक्ष या गोष्टीकडे वेधू इच्छितो की, प्रिव्हेन्टीव्ह मेझर्स जास्त महत्वाची असतात. यामध्ये महसूल खाते आणि अन्य खात्यांचा संबंध असला तरी पोलीस खात्याने लक्ष दिले तर यावर आपोआप नियंत्रण बसेल. अशाच प्रकारचे एक प्रकरण मी एस.आर.एस.स्किममधील सांगितले. फ्रँकिंग मशिनचे बोगस स्टॅम्पसचे हे प्रकरण आहे. एकच स्टॅम्प वापरून एकाच फ्लॅटवर 10 कोटी रुपये लोन घेतले. इतके बोगस काम करणारी माणसे आहेत आणि त्यांना पकडली तरी ती जामिनावर सुटतात. बांद्रा येथील पोलीस स्टेशनमध्ये त्यांची तक्रार आहे. ते पुन्हा जामीनावर सुटले. म्हाडाच्या केसेसमधून सुटले. त्यानंतर ग्राहक संरक्षण कक्षाच्या न्यायाधिशानींही त्यांना सोडले. तरी प्रिव्हेन्टीव्ह मेझर्स घेण्याच्या दृष्टीने आपण विचार केला पाहिजे. तसा केला तर अधिक बरे होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 34, मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी आपण पैसे दिले आहेत. यासाठी आपण जरूर पैसे द्या. कालपरवा बोगस शाळांचा उल्लेख करण्यात आला. ज्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.अरविंद सावंत)

शाळेला इयत्ता चौथी पर्यंत प्राथमिक शाळेची परवानगी आहे त्या शाळेची मुले दहावीच्या परीक्षेला बसायला गेली. त्यांना परीक्षेला बसता आले नाही. त्यामुळे एवढ्या मुलांचे नुकसान झाले. मदरशांचे प्रकरणसुध्दा तसेच आहे. तुम्ही जाहिराती दिल्या हे आम्हाला मान्य आहे. यामध्ये सरकारचे चुकले असे नाही. जाहिरात दिली असे तुम्ही त्रागा करून म्हणालात. पण जाहिराती देऊनसुध्दा पालक त्या ठिकाणी मुलांना कसे घालतात ? पण मदरशांमध्ये कोणते शिक्षण दिले जाते ? जर विद्वेशाचे शिक्षण दिले जात असेल तर काळजी घेण्याची गरज आहे.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ..

.मदरशामध्ये काय सापडते हे सुध्दा पाहिले पाहिजे.मस्जिदी व मदरशे एका दिवसात कसे उभे राहतात त्याकडे कोणाचेही लक्ष नाही. मी या ठिकाणी धर्म म्हणून बोलत नाही.त्यांचा समाजसुध्दा किती तरी गरीब आहे.हा समाजसुध्दा मागासलेला आहे. तेव्हा या समाजासाठी कोठे तरी एखादी शाळा उभी राहिली आहे, त्यांच्यासाठी हॉस्पिटल्स उभे राहिले आहे, एखादी गृहनिर्माण वसाहत उभी राहिली आहे असे आपल्याला दिसणार नाही.फक्त मस्जिदी उभ्या राहतात आणि त्यासाठी संगमरवरचा वापर केला जातो. त्याकरता त्यांच्याकडे कोठून पैसे येतात हे माहीत नाही.मस्जिदी किती असाव्यात आणि या मदरशांमध्ये कोणते शिक्षण दिले जावे या बाबतीत मात्र कोणत्याही प्रकारचे बंधन नाही. मदरशामध्ये शिकवत असतांना काही अभ्यासक्रम आहे किंवा नाही.? त्या ठिकाणी धर्माचे आणि विद्वेषाचे शिक्षण दिले जाते. या मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पैसे दिले जात आहेत. आधुनिक विचार यावेत ही त्या मागची अपेक्षा आहे परंतु ती अपेक्षा जर फोल ठरली तर या तरतुदीचा उपयोग होणार नाही असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत बोलत असताना ते असे म्हणाले की मदरशामध्ये विव्देषाचे शिक्षण दिले जाते.तेव्हा हे वाक्य रेकॉर्डवर येणे मी उचित मानत नाही.धर्माच्या बाबतीत बोलले तर ते ठीक आहे परतु त्या ठिकाणी विद्वेषाचे शिक्षण दिले जाते हे वाक्य रेकॉर्डवर येणे, त्याचबरोबर असे पुराव्याशिवाय असे आरोप करणे व सरसकट सर्वावर आरोप करणे मी उचित मानत नाही.

श्री.अरविंद सावत :सभापती महोदय, मी तसे बोललो नाही.विद्वेषाचे राजकारण शिकवले जाते काय याची दक्षता घ्यावी असे मी म्हटले होते. मी असे म्हणालो नाही की,तेथे असे शिकवले जाते.परंतु जर शिकवत असतील तर त्याची दक्षता घेण्यात यावी.

सभापती महोदय, यानंतर मला उर्जा विभागाची बाब क्रमाक 79 पान नंबर 90 सबंधी बोलावयाचे आहे.माननीय उर्जा मंत्र्यांनी या ठिकाणी पूरक मागणी केलेली आहे ते पाहून मला खूप बरे वाटले .गेल्या अनेक वर्षापासून मी सातत्याने अपारंपारिक उर्जेवर बोलत आहे..उर्जेच्या बाबतीत मला असे म्हणावयाचे आहे की अपारंपारिक उर्जेच्या बाबतीत पूरक मागणी करण्यात आलेली आहे त्याबद्दल मी आपले खरोखर कौतूक करतो. महाराष्ट्राला जेवढी विजेची गरज आहे तेवढी वीज निर्मिती होत नाही हे आपणा सर्वानाच माहीत आहे .याबाबतीत मी काही नवीन बोलत आहे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावत ...

अशातला भाग नाही.परतु अपारंपारिक उर्जेचा वापर आदिवासी भागात आपण अधिक प्रमाणात करावा अशी माझी आपल्याला एक विनंती आहे.पारंपारिक उर्जा निर्मिती अधिक झाली व ती वीज इतरांना देण्याची वेळ आली तरी त्यासाठी दूरवर खांब घालावे लागतील दूरवर तारा आढूनप न्याव्या लागतील. त्यापेक्षा अपारंपारिक उर्जा त्या त्या वाडयापुरती दिली गेली तर ते अधिक चांगले राहील असे मला वाटते. या बाबतीत केन्द्र शासनाची मोठया प्रमाणावर मदत सुध्दा मिळते तेव्हा या दृष्टीने आपण पावले उचलावीत .ही अपारंपारिक उर्जा स्वस्त कशी राहील.हे सुध्दा पाहिले पाहिजे. मी कोकणामध्ये गेलो होतो तेव्हा तेथील लोकांना मी असे सांगितले की,भार नियमनाचा विषय सातत्याने येतो. तेव्हा अपारंपारिक उर्जेची व्यवस्था एखाद्या वाडी पुरती करण्यात यावी.तेव्हा मला असे सांगण्यात आले की ,त्यासाठी मोठया प्रमाणावर खर्च येतो व तो खर्च परवडणारा नाही. तेव्हा हा खर्च कमी झाला पाहिजे. अपारंपारिक उर्जेवर एखादा लाईट व पंखा जरी चालविण्यात आला तरी पुष्कळ फरक पडतो. परंतु अपारंपारिक उर्जा निर्मिती साठी इन्स्टॉलेशनचा खर्चच जास्त येतो.सुदैवाने आज आपण अशा भागात राहत आहोत की तेथे 365 दिवस भरपूर सूर्य प्रकाश आहे.त्यामुळे या अपारंपारिक उर्जेचा, सौर उर्जेचा आपण अधिकाधिक वापर केला पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.आपल्याकडे जी रिमोट प्लेसेस आहेत त्या ठिकाणी या उर्जेचा अधिक वापर कसा करता येईल या दृष्टीने आपण पावले उचलावीत.असे मला वाटते या साठी आज जी पूरक मागणी करण्यात आली आहे ती कमी आहे परंतु नंतर ती वाढविण्यात यावी.अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, यानंतर मला कामगार विभागबाच्या बाब क्रमांक 84,पान नबर 92 संबधी बोलावयाचे आहे.ही पूरक मागणी केल्याबद्दल मी आपणाला धन्यवाद देतो.औद्योगिक न्यायालयाच्या न्यायाधीशांची वेतनश्रेणी इतकी कमी होती की त्यामुळे त्यांना त्याचे स्टेटसही वाटत नव्हते.त्याच बरोबर एक गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणतो की, औद्योगिक आणि कामगार न्यायालयात किती वर्षे किती केसेस पेन्डीग आहेत. त्या न्यायाधीशांना वेतनश्रेणी चागली नाही. त्यांना इतर सोयी सुविधा नाहीत. तेव्हा त्यांना या प्रलंबित प्रकरणाच्या बाबतीत काय वाटणारआहे? आता त्यामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे व त्यामुळे आता त्यांच्याकडून आपण अशी अपेक्षा

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावत ....

करण्यात यावी की,वर्षानुवर्षे केसेस प्रलंबित राहतात तेव्हा त्या केसेस त्यांनी लवकरात लवकर निकाली काढाव्यात.कामगार न्यायालयाच्या बाबतीत आपण निर्णय घेतला आहे.ही चांगली गोष्ट आहे. महाराष्ट्राचा आर्थिक पहाणी अहवाल आम्हाला काल देण्यात आला होता.त्यात असे म्हटलेले आहे की," औद्योगिक गुंतवणुकीत महाराष्ट्र अग्रेसर आहे" - असे सांगून महाराष्ट्र सरकार पाठ थोपटून घेत आहे.परंतु किती कामगार बेकार झालेले आहेत ? गेल्या वर्षात 2 हजार 566 लघू आणि 5 हजार 368 मोठे उद्योग बंद पडल्यामुळे तब्बल 94 हजार कामगारांवर बेकारीची कु-हाड कोसळली आहे . गेल्या तीन चार वर्षातील जर आकडेवारी आपण पाहिली तर आपल्याला असे दिसून येईल की, 2000 ते 2001 मध्ये 78 हजार,2001-2002 मध्ये 58 हजार,2002-2003 मध्ये 72 हजार आणि 2003-2004 मध्ये 81 हजार कामगार बेकार झालेले आहेत.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

कामगार बेकार झाले. एकीकडे उद्योग आणण्याच्या गोष्टी आपण करतो आणि दुसरीकडे असलेले उद्योग बंद होत आहेत, झालेले आहेत. त्यामुळे कामगार बेकार होत आहेत. उद्योग जगले तर कामगार जगेल असे आपण म्हणतो. परंतु दुर्दैवाने हे उद्योग आज जगत नाहीत आणि तरीही आपण स्वत:ला प्रगतीशील असे म्हणवून घेतो. यातून कोणाची प्रगती होत आहे ते पहा. तेव्हा कामगार बेकार होत आहे आणि तरीही दुसरीकडे उद्योग वाढत आहे असे होता कामा नये. अध्यक्ष महाराज, परवाच्या दिवशी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये भाग घेताना माननीय राज्यपालांच्या भाषणातील दोन परस्पर विधानांचा मी उल्लेख केला होता. त्यांनी म्हटले होते की, राज्यात उद्योग वाढत आहेत आणि दुसऱ्या बाजूला आम्ही तरुणांना नोकऱ्या देऊ शकत नाहीत असेही त्यांनी म्हटलेले आहे. तेव्हा आपण औद्योगिक न्यायालयाच्या न्यायाधीशांचे पगार वाढविले आहेत ही या पार्श्वभूमीवर आनंदाची गोष्ट आहे. त्याच बरोबर उद्योग वाढवून ते जगविण्याची गरज आहे त्यासाठी देखील आपण प्रयत्न करावेत इतकेच मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

अध्यक्ष महाराज, पृ.106, बाब क्र. 97 - चित्रपटांच्या संदर्भातील ही बाब आहे. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात निवडलेल्या उत्कृष्ट चित्रपट व निर्देशकांना पुरस्कार देण्यासाठी ही बाब आणलेली आहे. खरे तर या कामासाठी खूप मोठ मोठ्या संस्था आहेत. आपण हे काम आपल्याकडे घेण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. माझी मागणी आहे की, मराठी चित्रपट महोत्सव वाटल्यास आपण घ्यावा आणि त्यांना पारितोषिके द्या. जेणे करून मराठी चित्रपटांना प्रोत्साहन मिळू शकेल. आता आंतरराष्ट्रीय चित्रपटांमध्ये आपल्या 'श्वास'ला पारितोषिक मिळाले नाही, पण हा एक अतिशय अप्रतिम चित्रपट होता. अलिकडच्या काळामध्ये असे अनेक चांगले मराठी चित्रपट येऊ लागले आहेत आणि त्या दृष्टीने आपण काही योजना आणली तर ते अधिक उचित होईल. सध्या आपण मराठी चित्रपटांसाठी 15-20 लाख रुपये देत आहात. पण त्याही पलिकडे जाऊन मी म्हणने की, प्रादेशिक चित्रपटांच्या आपण स्पर्धा का घेत नाही ? मराठी चित्रपटांच्या स्पर्धा होत नाहीत. तेव्हा या अशा स्पर्धा व्हायच्या असतील तर देशातील इतर भाषिक चित्रपटांमध्ये स्पर्धा कराव्यात. त्यासाठी आपण पैसा द्यावा. हे पैसे यांना न देता आपल्या चित्रपटांसाठी द्यावेत हे मला येथे सांगावयाचे आहे.

..... 3ओ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अध्यक्ष महाराज, पृ.107, बाब क्र.98 - मुलींच्या वसतीगृहासाठी ही मागणी केलेली आहे. त्यामध्ये दलित, मागासवर्गीय मुलांसाठी हे वसतीगृह आहे. स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविली जाणारी ही वसतीगृहे अनुसूचित जाती-जमातीच्या मुलींसाठी आहेत. खरे तर आपण या वसतीगृहांसाठी जे निकष लावता त्याबद्दल मला सांगावयाचे आहे. या वसतीगृहांमध्ये मोजून 8-10 मुली असतात. त्यासाठी जे निकष असतात त्यांचेबाबत मला सांगावेसे वाटते. आपण यासाठी केवळ अनुसूचित जाती जमाती पुरताच विचार न करता एकंदरच सर्व मुलींच्या शिक्षणाचा विचार करावा. जो कोणी मुलींसाठी वसतीगृह चालविणार असेल त्याचेसाठी निकष कमी करावेत जेणे करून तेथे अधिकाधिक संख्येने मुली राहू शकतील. अन्यथा तेथे 10 वा त्यापेक्षा कमी मुली असतील तर त्यांना अनुदान आपण देणार नाही. तसे न करता केवळ मुलींसाठी वसतीगृह असेल तर त्यांना अनुदान दिले जावे.

पृ.139, बाब क्रमांक 123 - अध्यक्ष महाराज, पर्यावरण विषयक ही बाब आहे. पर्यावरणाच्या बाबतीत बोलावयाचे तर सध्या मोठ्या प्रमाणात होत असलेली वृक्षतोड आपण थांबविणार आहात की नाही ? ही वृक्षतोड थांबविण्याची आवश्यकता आहे आणि मोठ्या प्रमाणात वनीकरण करण्याची आवश्यकता आहे. आज बिल्डर्स आणि दगडखाणीसाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली जाते आणि उभे डोंगर सपाट केले जात आहेत हे दृश्य अनेकदा रस्त्याने प्रवास करताना दिसते आणि त्यामुळे मनामध्ये मोठे शल्य निर्माण होते. मी या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले होते, महापालिका अधिकाऱ्यांना देखील पत्र दिले होते पण तरीही हे काही थांबत नाही. तरी आपण याकडे लक्ष द्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

पृ. 150, बाब क्र. 131 - अध्यक्ष महाराज, आता आपण सीइटीच्या परीक्षा घेत आहात. आता या परीक्षांच्या तारखा बदलत आहात. कृपा करून मुलांच्या जीवनाशी आपण अशा प्रकारे खेळू नका. इंजिनिअरींग आणि मेडिकलच्या सीइटीच्या परीक्षा या दोन्ही वेगवेगळ्या दिवशी आणि त्या दोन्हीमध्ये किमान आठवड्याची गॅप असेल अशा प्रकारे ठेवाव्यात. शेवटी हा मुलांच्या भवितव्याचा प्रश्न आहे हे आपण लक्षात घ्यावे इतकीच माझी विनंती आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. सावंत ....

शेवटी माननीय राज्यपालांनी पीएचडीच्या बाबतीत उल्लेख केला होता. हा सगळा द्राविडी प्राणायाम का करता आपण ? स्वत:चे पैसे का वाया घालविता ? पीएचडीची खिरापत वाटली जाते अशा प्रकारे राज्याच्या माजी राज्यपालांनी उल्लेख या संदर्भात केला होता. पीएचडीला काही मूल्ये आहेत तेव्हा त्याचाही विचार शासनाने करावा एवढेच मी या प्रसंगी सांगतो. धन्यवाद.

****

(यानंतर श्री.जागडे ....3पी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सदाशिव पोळ (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, पान क्र. 22 वरील बाब क्र. 28 वर मी बोलणार आहे. दुग्ध उत्पादन सहकारी संस्थांना अर्थसहाय्य देण्याची ही तरतूद आहे. सभापती महोदय, शासनाच्या अनेक चांगल्या योजना आहेत. परंतु ग्रामीण भागात आज वेटरनरी डॉक्टर्स नाही. दोन- दोन वर्षे झाली तरी जनावरांच्या दवाखान्यांत डॉक्टर उपलब्ध होत नाही. या बाबत मी माननीय मंत्रिमहोदयांना अनेक पत्रे लिहिली आहेत. मोही, वडजल या ठिकाणी डॉक्टर्स नाहीत. तेव्हा या बाबतचा शासनाने योग्य तो विचार करुन त्वरीत कार्यवाही करावी, अशी विनंती मी या निमित्ताने करीत आहे.

यानंतर मी पान क 25 वरील बाब क्र. 30 वर बोलणार आहे. माध्यमिक शाळांना अनुदान देण्याबाबतची ही बाब आहे. महाराष्ट्रात शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले 103 तालुके आहेत. या तालुक्यातील मुलांची शिक्षणाच्या बाबतीत गैरसोय होत आहे. या तालुक्यांना इतर तालुक्यांच्या बरोबरीने आणण्यासाठी योग्य ती कार्यवाही शासनाने करण्याची आवश्यकता आहे. विशेषत: या तालुक्यातील मुलींच्या शिक्षणाचा शासनाने विचार केला पाहिजे. या तालुक्यांना विशेष अनुदान देऊन शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत.

यानंतर मी पान क्र. 78 वरील बाब क्र. 70 वर बोलणार आहे. ही तरतूद भू-संपादनाकरिता करण्यात आली आहे. वर-मलवडी येथील काळओढा हा मायनर इरिगेशन टँक 1972 साली मंजूर झाला आहे. त्याचे भू-संपादनही झालेले आहे. वन जमिनीचा प्रश्न निर्माण झाल्यामुहे अनेक वर्षे यातून मार्ग निघाला नाही. परंतु या टँकला लागणा-या जमिनीचे पैसे देण्यात आले आहेत. तेवहा आता हा मायनर टँक लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने त्वरीत पावले उचलावीत.

यानंतर मी पान क्र. 150 वरील बाब क्र. 131 वर बोलणार आहे. दहिवडी येथे आयटीआय सुरु करण्यात आले आहे. परंतु येथील मुले ही खाजगी इमारतीत बसत आहेत. तेव्हा आयटीआयसाठी दहिवडी येथील नवीन इमारत त्वरीत शासनाने बांधावी. एवढे बोलून आणि शासनाने मांगुण्यांना पाठींबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नतिकोद्दीन खतिब (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, शालेय शिक्षण विभाग से संबधित बाब क्रमांक 30, पेज क्रमांक 25 के माध्यम से मैं माननीय मंत्री महोदय से विनंती करता हूँ कि ग्रामीण विभाग में जो स्कूल परमानेंट नॉन ग्रान्ट बेसिस पर दिए जाते हैं, उनको ग्रान्ट देकर ग्रान्ट स्कूलों में बदला जाए, ताकि वहां के विद्यार्थियों की अच्छी तरह से पढ़ाई हो सके. मॉयनॉरिटीज लँग्वेज के स्कूल परमानेंट नॉन ग्रान्ट बेसिस पर दिए गए हैं. इन स्कूलों को चलाने वाले लोग परमानेंट नॉन ग्रान्ट बेसिस पर इन स्कूलों को नहीं चला सकते हैं. इससे बच्चों का नुकसान हो रहा है, इसलिए इन स्कूलों के लिए जल्दी से जल्दी ग्रान्ट मंजूर की जाए, ऐसी विनंती मैं शासन से करता हूँ. इसी तरीके से ओ.बी.सी. और मॉयनॉरिटीज के विद्यार्थियों के लिए जो स्कॉलरशिप घोषित की है, यह पैसा इस्तेमाल नहीं हुआ है, जिसकी वजह से विद्यार्थियों को स्कॉलरशिप नहीं मिल रही है. मैं माननीय मंत्री महोदय से विनंती करता हूँ कि जल्दी से जल्दी यह स्कॉलरशिप दी जाए.

सभापति महोदय, पुरवणी मांगणी के माध्यम से मैं माननीय मंत्री महोदय को बताना चाहता हूँ कि अकोला जिले के बालापूर तालुके में एक ऐतिहासिक किला है और इस किले में 2002 में पहली बार बाढ़ आई थी. इस किले की दीवार गिर चुकी है. इसी किले के अन्दर रेवेन्यू कोर्ट और पंचायत समिति के ऑफिस हैं. ऐतिहासिक किलों का जतन करना हमारी परम्परा है, इसलिए मैं माननीय मंत्री महोदय से विनंती करता हूँ कि इस किले को दुरुस्त करने के लिए फंड का प्रोवीजन करें. पुरवणी मागणी का समर्थन करते हुए मैं अपना भाषण पूर्ण करता हूँ.

.....

(यानंतर श्री. सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आज पाच ते सहा विभागाच्या मागण्यांवर माझे विचार मांडणार आहे. नेहमीपेक्षा मी आज यादीतल्या शेवटच्या विभागापासून माझे विचार मांडण्यास सुरुवात करणार आहे. प्रथमत: उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्र. 154 व बाब क्र. 140 मध्ये ग्रंथालयांना अनुदान देण्यासंबंधीची मागणी केली आहे, ती स्वागतार्ह आहे. परंतु एशियाटीक लायब्ररीबाबत वारंवार व्यथा शासनासमोर व समाजासमोर मांडलेली आहे. एशियाटीक लायब्ररीला अनुदान देण्याबाबत आपण या पुरवणी मागणीमध्ये समावेश केला आहे काय? नसेल तर त्यासाठी त्यांच्याकडून प्रस्ताव आला नाही काय? आणि आला असेल तर त्यांना किती प्रमाणात मदत केली आहे याची मला माहिती मिळाली पाहिजे. कारण एशियाटीक ग्रंथालय हे जागतिक स्तरावरील ग्रंथालय असून त्याच्या दुर्दशेची दखल घेतली गेली आहे. या ग्रंथालयातील पुस्तकांच्या मेंटेनन्ससाठी पुरेसे पैसे नाहीत असे वर्तमानपत्रामध्ये वारंवार छापून आले आहे. ग्रंथालयाच्या इतर सभासदांकडून सुध्दा हा मुद्दा मांडण्यात आलेला आहे. मी स्वत: या ग्रंथालयाची आजीव सभासद आहे. तेव्हा याबाबत विभागाने सभागृहाला माहिती द्यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्र. 27 वरील बाब क्र. 37 मध्ये जनजातीच्या बोलीभाषेतील पुस्तकांच्या निर्मितीचा निर्णय घेतला आहे, ते स्वागतार्ह आहे. जनजातीच्या बोलीभाषेतील पुस्तके आपण मराठीमध्ये छापणार असालतर ती कशी समजून घेता येतील? असा प्रश्न आहे. त्यासाठी जर ऑडिओ कॅसेटचा उपयोग केला तर फार उत्तम होईल. व बोलीभाषेसाठी त्याचा चांगल्या प्रकारे उपयोग होईल असे मला वाटते. सभापती महोदय, बाब क्र. 35 मध्ये बालवीर व वीरबाला यासाठी युवक कल्याण विभागामार्फत निधीची व्यवस्था केली आहे. त्याकडे मी आपले लक्ष वेधते. आपल्या देशामध्ये त्सुनामीचे संकट येऊन गेले, त्याबाबत पाच देशातील सामाजिक संस्थांनी मी न्यूयॉर्कला गेले असतांना त्याठिकाणी प्रेझेंटेशन केले होते. त्याठिकाणी एक मुद्दा वारंवार मांडण्यात आला की, खासकरुन असे संकट जेव्हा येते त्यावेळी महिलांना मागे टाकले जाते. कारण आलेल्या संकटामध्ये ज्या महिला शेकडयांनी मरण पावल्या आहेत. त्यात प्रामुख्याने लहान मुलांना कवटाळलेल्या अवस्थेमधील आहेत. त्या गावांमध्ये आज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

एकही महिला जीवंत राहिलेली नाही. अशाप्रकारची आपत्ती जेव्हा येते त्यावेळी कसे वागले पाहिजे याचे शिक्षण मुलांना आणि मुलींना दिले गेले पाहिजे. माणसाचे जीवन वाचविण्याचा जो मार्ग आहे त्याचा आपण यामध्ये अंतर्भाव केला पाहिजे. म्हणून आपत्कालीन व्यवस्थापनामध्ये कसे वागले पाहिजे याचे ट्रेनिंग बालवीर आणि वीरबालांना आपण दिले पाहिजे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या संदर्भात एक अतिशय भीषण प्रश्न मी आपल्यासमोर मांडू इच्छिते. पुणे जिल्हयातील दौंड तालुक्यातील फिरंगूट या गावामध्ये दहावीच्या परिक्षेमध्ये शिक्षकाच्या मदतीने सामूहिक कॉपी करण्याचा प्रकार घडला. त्याबाबत पोलीसात तक्रार नोंदविण्यात आली. असे अनेक ठिकाणी सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार होत असतात. हे प्रकार थांबविण्याकरिता व्हिडिओ शूटींगची यंत्रणा असलेले भरारी पथक किंवा टास्क फोर्स निर्माण केले व त्यांनी अचानक भेट देऊन कारवाई केलीतर सामूहिक कॉपीचे प्रकार थांबविण्यासाठी या यंत्रणेचा आपल्याला उपयोग करुन घेता येऊ शकेल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तर तुम्ही वेळेवर लोकांचा उपयोग घेऊ शकाल, म्हणजे एका अर्थाने बाहेरचे लोक शासनाचा "तहलका" करतात, त्याऐवजी तुम्ही स्वत:च स्वत:च्या देखरेखीसाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन घेतला तर कॉपी रोखण्याच्या दृष्टीकोनातून पुरावे मिळतील आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी त्याचा उपयोग होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, कृषी, जलसंधारण आणि खार जमीन यासंदर्भात पान क्र.21, बाब क्र.25 मध्ये आपण टंचाईग्रस्त भागांसाठी मदत देऊ केलेली आहे. परंतु मघाशी सदनात उल्लेख इ ाला होता की, महाराष्ट्रात अकाली आणि अवेळी पाऊस झालेला आहे आणि खास करुन मराठवाडयात हा पाऊस झालेला आहे. गारपिटीमुळे पिकांचे नुकसान झालेले आहे, तशाच प्रकारचे नुकसान कोकणामध्येही झालेले आहे. सगळया महाराष्ट्रात नुकसान झालेले आहे. मध्यंतरी शासनाने संत्र्याचे नुकसान झाले, त्याबद्दल काही मदत जाहीर केलेली आहे. सोलापूर जिल्हयामध्ये डाळींबाच्या बाबतीत मदत जाहीर केलेली आहे. परंतु गारपिटीमुळे व अकाली पावसामुळे जवळजवळ 250 कोटीचे नुकसान झालेले आहे, त्यासंदर्भात आमच्यासमोर तरी काहीही मदत जाहीर झालेली नाही. यादृष्टीकोनातून मी आपले लक्ष या बाबीकडे वेधू इच्छिते.

सभापती महोदय, याठिकाणी बाब क्र.28 मध्ये दुग्ध व्यवसायाच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. काल सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक सूचना केली होती की, या दुग्ध संस्थांमध्ये महिलांना "सहयोगी सदस्यत्व" व बिले त्यांच्या नावाने फाडली जावीत. तर त्याचा विचार आपल्या विभागाने करावे असे मला वाटते.

सभापती महोदय, यानंतर मी राज्य उत्पादन शुल्क व पर्यावरण विभाग, तसेच माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या विभागांबाबत बोलू इच्छिते. काल सामाजिक न्याय व सांस्कृतिक विभागाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित झालेले आहेत. परंतु मला एका मुद्याकडे माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधावयास पाहिजे की, आपण जानेवारीला फार मोठा गाजावाजा करुन नायगाव येथे सावित्रीबाई फुले यांना आदरांजली व्यक्त करण्यासाठी त्यांच्या जयंतीचा कार्यक्रम केला. परंतु 10 मार्च रोजी सावित्रीबाई फुले यांचा स्मृती दिवस असतो आणि त्यादिवशी शासनाच्या वतीने पुरस्कार देण्याचा एक कार्यक्रम पुणे येथे आयोजित केला होता. ज्या भगिनींना महाराष्ट्र शासनाने "सावित्रीबाई फुले पुरस्कार" आणि "अहिल्याबाई होळकर पुरस्कार" दिले होते, तळागाळात काम

. . . .3 आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे . . . .

करणा-या अनेक सामान्य महिला या पुरस्काराने आपण सन्मानित होणार या अपेक्षेने तेथे आल्या होत्या. या कार्यक्रमपत्रिकेमध्ये आदरणीय मंत्री श्री.पुरकेजींचे नाव होते, माननीय उप मुख्यमंत्र्यांचे नाव होते. पण 10 मार्च रोजी पुणे येथे झालेल्या शासनाच्या पुरस्कार कार्यक्रमाला एकही मंत्री उपस्थित नव्हते. याबाबतीत पुण्यातील सर्व वर्तमानपत्रांमध्ये मोठमोठया बातम्या छापून आलेल्या आहेत. तेथे अनेक सदस्या गेल्या होत्या आणि मी आपल्याला दाखला देईन की, शेवटी पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुंच्या हस्ते हा पुरस्काराचा कार्यक्रम करण्यात आला. ही गोष्ट शासनाला शोभा देणारी नाही आणि मला असे वाटते की, तुम्ही असा पुरस्कार देता, तर त्या पुरस्कारांची अवहेलना करु नका. माझे असे म्हणणे आहे की, सन्मान करता येतो की नाही हे सन्मान करणा-याच्या नियतीवर आणि भूमिकेवर अवलंबून असते. परंतु ज्याचा तुम्ही सन्मान करता, त्या माणसाच्या दृष्टीने आयुष्यातील तो एकच प्रसंग असतो. माननीय उप मुख्यमंत्र्यांना याचा तपशील हवा असेल तर त्याची कात्रणे मी त्यांच्याकडे पाठविते. त्यांनी आता त्या महिलांची एक बैठक बोलवावी आणि आपणच त्यांना विचारावे. त्यांना फार आनंद होईल की, आपल्याला यानिमित्ताने माननीय उप मुख्यमंत्र्यांना भेटावयास मिळाले. पण या पुरस्काराच्या कार्यक्रमाला शासनाचा एकही मंत्री उपस्थित नव्हता हे मी तुम्हाला 200 टक्के खात्रीने सांगू शकते आणि ही गोष्ट योग्य नाही. यातून राजकीय इच्छाशक्तीचा अभाव दिसतो आणि आम्ही या कार्यक्रमाला का येऊ शकलो नाही ? याबद्दलची तुमच्याकडून त्या महिलांना दिलगिरीची पत्रे सुध्दा गेली नाहीत. ज्या गावातून या महिला सांगून आल्या होत्या की, आमच्या कामाचे कौतुक होत आहे. त्या महिलांचा असा अपमान झाल्यानंतर परत त्या गावात गेल्यावर त्यांना काय वाटले असेल ? त्यांचा आवाज येथपर्यंत पोहोचत नाही याचा अर्थ असा नाही की, आपण तो प्रश्नच अस्तित्वात नाही अशा पध्दतीने त्याची हेळसांड करावयाची. म्हणून सामाजिक न्यायाच्या संदर्भात या पुरस्कारांच्या प्रश्नावर शिक्षण विभागानेही स्वत: यामध्ये लक्ष घालावे असे मला सांगावेसे वाटते. येथे काही प्रश्न अदृश्य दिसत आहेत.

सभापती महोदय, राज्य उत्पादन शुल्क व पर्यावरण विभागाच्या बाबींबाबत सांगावयाचे तर केवळ सेक्रेटरीएट साठी मदत मागितलेली आहे. पण माझा एक प्रश्न आहे, माननीय मंत्री श्री. गणेशजी नाईक आणि आम्ही एका कार्यक्रमाला एकत्र उपस्थित होतो. महिलांच्यादृष्टीने अतिशय ज्वलंत असा जो प्रश्न आहे, तो म्हणजे हातभट्टी रोखणे. दारुच्या संदर्भात जास्तीतजास्त

. . . .2 आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे . . . .

नियंत्रण आणून आपण कशाप्रकारे व्यसन मुक्तीचा कार्यक्रम करणार आहात आणि यासाठी आपल्या विभागातर्फे त्यावेळी आपण अगदी राणा भीमदेवी थाटात दूरदर्शनच्या वाहिन्यांवरुन सांगितले आहे की, "मी एक भाऊ म्हणून महाराष्ट्रातील महिलांना आश्वासन देतो की, दारुचे नियंत्रण करण्याची आमची भूमिका राहील." तर त्याचे प्रत्यंतर आम्हाला आले पाहिजे अशी मला आपल्याला खास करुन विनंती करावीशी वाटते.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे चालू....

त्याचबरोबर कारागृहे सुधारणांच्याबाबत व्हीडिओ कॉन्फरन्सींगची व्यवस्था केलेली आहे, त्याचे मी स्वागत करते. गेली तीन-चार दिवस सातत्याने वर्तमानपत्रांमधून बातम्या येतात की, श्रीमती स्वाती साठे यांच्या बदलीमुळे 'कैद्यांमध्ये आनंदोत्सव'. कारागृहाच्या प्रश्नासंबंधात महिला आमदारांची जी समिती नेमलेली आहे, त्या समितीने सादर केलेला ॲक्शनटेकन अहवाल वाचला तर असे दिसेल की, कारागृह म्हटले म्हणजे फक्त मुंबईचे कारागृह आणि पुण्याचे येरवडा येथील कारागृह समजले जाते. कारागृहामध्ये सुधारणा करावयाच्या म्हटल्या म्हणजे या दोन कारागृहांमध्ये होतात. ह्यूमन राईट कमिशनचे लोक भेट देण्यासाठी येतात, तेव्हा त्यांना ही दोन कारागृहे मॉडेल म्हणून दाखविली जातात. अमरावती, विसापूर असे इतर ठिकाणचे महिलांची कारागृहे आहेत, त्या ठिकाणी महिला डॉक्टर देखील नाहीत. त्या ठिकाणच्या कैदी महिला आजारी पडल्या तर त्या ठिकाणच्या सिव्हील सर्जनशी बोलून डॉक्टरांना जेलमध्ये बोलवावे लागते. बऱ्याचशा जेलमध्ये 1994 साली मा.श्री.शरद पवार यांनी बैठका घेतल्या होत्या. त्यावेळेला आम्ही कृष्णा अय्यर समितीचे अहवाल केंद्र सरकारने वारंवार दिले होते. त्यातील काही अहवालांची अंमलबजावणी झालेली आहे. पण माझी आपल्याला विनंती आहे की, महिला आमदारांच्या समितीने कारागृहाच्या संबंधात दिलेल्या अहवालाची अंमलबजावणी होते की नाही, हे पहाणे अत्यावश्यक आहे. या दृष्टीने या कारागृहातील महिला कैद्यांची स्थिती सुधारण्याच्या संदर्भामध्ये गृहमंत्री म्हणून आपल्याकडून काही अपेक्षा आहेत. अजून एक महत्वाची बाब म्हणजे पोलीस रिफॉर्म होण्यासाठी सातत्याने केंद्र सरकार राज्याला निधी देत असते. परंतु बऱ्याचशा पोलीसस्टेशनमध्ये महिला अधिकाऱ्यांसाठी आणि महिला पोलीस कॉन्टेबलसाठी स्वच्छतागृहच नाहीत. ही परिस्थिती शोभादायक नाही. ही स्वच्छतागृहे बांधली जाण्याच्यादृष्टीकोनातून सकारात्मक भूमिका अपेक्षित आहे. नुकतीच कऱ्हाड तालुक्यात घडलेली घटना आहे. तेथील महिलांनी स्वत: जाऊन दारूच्या भट्टया बंद केलेल्या आहेत. दारुच्या नियंत्रणासाठी आपण वारंवार जाहीर करता आहात, डान्सबारवर नियंत्रण आणणार म्हणून आपण जाहीर केले ते स्वागतार्ह आहे. परंतु या दारुच्या संबंधामध्ये गावोगावच्या किती महिला मंडळांनी अर्ज केले आहेत, याची माहिती घेतलेली आहे काय ? त्या अर्जांचा जिल्हाधिकाऱ्यांनी का पाठपुरावा केला नाही ? या संदर्भामध्ये अजून काही ठोस भूमिका अपेक्षित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ MAP/ KGS/ SBT/

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे चालू....

आहेत. पोलीस रिफॉर्मच्या कार्यक्रमामध्ये महिला पोलीस अधिकाऱ्यांच्याबरोबरच महिला दक्षता समित्यांचे सक्षमीकरण करण्याच्यादृष्टीने त्या निधीचा उपयोग करावा, अशी मी आपल्याला विनंती करते आणि माझे मनोगत संपविते. जयमहाराष्ट्र.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ MAP/ KGS/ SBT/

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या पुस्तिकेतील पान क्रमांक 22, बाब क्रमांक 30. पाचवी ते सातवीच्या 141 तुकड्यांना अनुदान देण्यासाठी जी तरतूद केलेली आहे,त्याबद्दल मी शासनाचा अत्यंत आभारी आहे. परंतु याच पध्दतीने मागच्यावर्षी पाचवी ते सातवीच्या वर्गांना अनुदानावर मान्यता देताना दिनाक 5-2-2004 च्या शासन निर्णयान्वये अनेक शाळांमधील पाचवी ते सातवीच्या वर्गांना टप्प्याटप्प्याने अनुदान मंजूर करण्यात आले. पाचवीचा वर्ग 20 टक्क्यापेक्षा पुढच्या टप्प्यावर आला असेल, म्हणजे अनुदानास पूर्वीच पात्र ठरलेला होता पण आता अनुदान दिल्यानंतर पाचवीचा वर्ग जर 60 टक्के अनुदानावर ठरला तर सहावीला 40 टक्के आणि सातवीला किमान 20 टक्के अनुदान मिळायला हवे. काही जिल्ह्यांमध्ये हे अनुदान दिलेले आहे. पण रत्नागिरी जिल्ह्यातील आठ शाळा अशा आहेत की, त्यांना पाचवीचे अनुदान 60 टक्के, 80 टक्के दिलेले आहे परंतु सहावी आणि सातवीचे अनुदान देण्यात आलेले नाही. अशाप्रकारे अनुदान देण्याची पध्दती सुरु झालेली आहे,त्यामध्ये सुधारणा झाली पाहिजे. आज तीन प्रकारचे भाग एकाच शाळेमध्ये पहायला मिळतात. काही वर्ग अनुदानित आहेत, काही वर्ग विनाअनुदानित आहेत आणि त्याच शाळेमध्ये काही वर्ग कायम विनाअनुदानित आहेत. अशाप्रकारे तीन भाग असलेली शाळा कशाप्रकारे चालू शकेल याबाबत शासनाने विचार करणे गरजेचे आहे.

पान क्रमाक 25, बाब 31. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या 16 कोटी 55 हजाराची ही सगळी तरतूद मुंबई महानगरपालकेच्या माध्यमिक शाळांसाठी केलेली आहे. या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अन्य माध्यमिक शाळा आणि उच्च माध्यमिक शाळा आहेत, याही शाळांतील शिक्षकांना चार-चार, पाच पाच महिने वेतन मिळालेले नाही. या संदर्भत मंदर्भात मंत्री महोदयांची भेट घेतली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात....

श्री. रामनाथ मोते..

या संदर्भात सन्माननीय मंत्रिमहोदयांची भेट घेतली. त्यांना पत्रही दिलेले आहे. अंबरनाथच्या माध्यमिक शाळेमध्ये पाच महिन्यापासून पगार मिळालेला नाही.ठाणे शहरात महानगरपालिकेच्या अनुदानित शाळा क्रमांक एक, दोन आणि तीन यांनाही गेल्या महिन्यापासून पगार मिळालेला नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक शाळां मंजूर करतांना जर मुंबई सारख्या महानगरातील माध्यमिक शाळांना अनुदान मंजूर होऊ शकते तर अंबरनाथ आणि ठाण्याच्या माध्यममिक शाळांसाठी अनुदान मंजूर होणे आवश्यक होते. त्यां शाळेतील शिक्षकांचे चार-पाच महिन्यापासून पगार झालेले नाहीत. या संदर्भात शासनाने तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे.

पृष्ट क्रमांक 25 बाब क्रमांक 32. प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मोफत शिक्षण या साठी 2 कोटी 45 हजार 59 रुपयाची तरतुद केलेली आहे. त्याबद्दल मी आभार व्यक्त करतो.पण हे दहा वर्षांनी केले आहे. मला वाटते वर्षाच्या-वर्षाला अशा प्रकारचे नियोजन झाले आणि निशुल्क योजनेअंतर्गत शिक्षकांनी आपल्या पाल्याची भरलेली फी जर त्यांना वेळेवर परत मिळाली तर त्यांना त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल.

पृष्ठ क्रमांक 26 बाब क्रमांक 33 मध्ये माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांना निशुल्क योजनेंअतर्गत 9 कोटी 50 लाख 89 हजार रुपयाची तरतुद केलेली आहे. ही रक्कम अत्यंत उशिरा मिळत आहे. यासंबंधीची तरतुद सुध्दा अत्यंत अपूर्ण आहे.सर्वात महत्वाची गोष्ट अशी की, ही थकबाकी 1995-96 पासूनची आहे. ही ग्रॅन्ट रिलिज झाल्या नंतर किंवा हे पैसे संबंधित विभागाकडून जिल्हयाकडे गेल्या नंतर किमान एवढी तरी अपेक्षा आम्हाला कराविशी वाटते की, जी जुनी 1995-96 ची देयके आहेत, ती आगोदर द्या. त्यांनतर 1996-97 ची द्या. त्यानंतर 1997-98 ची द्या. म्हणजे साधारणत: जुनी देयके शिक्षकांच्या पाल्यांना मिळू शकतील. दुसरा एक मुद्दा या ठिकाणी मला मांडावासा वाटतो. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांच्या संदर्भात नियोजन करण्यात येत आहे. पण त्याचबरोबर प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांच्या संदर्भात शासनाची भुमिका संशयास्पद आहे. प्राथमिक शिक्षकांना जिल्हा पुरस्का देतो, राज्य पुरस्कार देतो. आता पर्यंत प्राथमिक आणि माध्यमिक दोन्ही विभागातील शिक्षकांना जिल्हा पुरस्कार देण्यात येत होते. गेल्या वर्षापासून फक्त प्राथमिक शिक्षकांना जिल्हा पुरस्कार दिला जात आहे आणि माध्यमिक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

शिक्षकांना या जिल्हा पुरस्कारातून वगळलेले आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, राज्याकडूनही आता शिक्षकांना राज्य पुरस्कार दिला जातो. सन्माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख हे शिक्षण मंत्री होते, त्यावेळी त्यांनी स्वत: जाहीर केले होते की, या पुढे शिक्षकांना अशा प्रकारचा राज्य पुरस्कार किंवा राष्ट्रीय पुरस्कार मिळण्यासाठी आपल्याला फाईल सादर करावी लागणार नाही. पण आजही अशा प्रकारची फाईल सादर केल्या शिवाय हा पुरस्कार मिळत नाही. म्हणून या योजनेमध्ये काही बदल करता येईल काय, याचाही विचार होणे अत्यंत गरजेचे आहे.

पृष्ठ क्रमांक 27. बाब क्रमांक 36. महाराष्ट्र छात्रसेना समादेशकांची पदे निर्माण करण्यासाठी शासनाने जवळ जवळ 32 लाख 54 हजार रुपयाची तरतुद केली आहे. समादेशकांची पदे वेतनश्रेणीमध्ये निर्माण करण्याची ही योजना आहे. पण ही सगळी निवृत्त मंडळी आहे. लष्करामध्ये काम करणारी, सैन्यामध्ये काम करणारी निवृत्त झालेली मंडळी आहे. त्यांना 3200 च्या वेतनश्रेणीत नेमणूक देण्यात येणार आहे. शिक्षण क्षेत्रात शिक्षण सेवक योजना ही शासनाने वेठबिगारी आणलेली आहे.याचा शासन कधी तरी विचार करणार आहे काय? आदरणीय उपमुख्यमंत्री माहेदय या ठिकाणी आहेत. श्री. अजितदादा पवार साहेबांनी सुध्दा अनेक वेळा आपले मनोगत व्यक्त केलेले आहे की, आम्ही शिक्षण सेवक योजना रद्द करणार आहोत. एका विशष्टि परिस्थितीमध्ये शासनाची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन तसेच शासनाला एकंदरीत जी पदे भरावयाची होती, त्याचा विचार करुन खास बाब म्हणून शिक्षण सेवक योजना राबवायला परवानगी दिलेली होती. पण आता शासनाची आर्थिक परिस्थिती सुधारलेली आहे. जेवढी पदे त्यावेळी भरावयाची होती, तेवढी पदे आता भरण्यासारखी नहीत. त्यामुळे शिक्षण सेवक योजनेबद्दल शासनाने विचार करावा आणि शिक्षण क्षेत्रामध्ये जी वेटबिगारी सुरु झालेली आहे, ती बंद करावी. डी.एड. झालेल्या शिक्षकाला तीन हजार रुपये मिळतात. बी.ए.बी.एड. झालेल्या शिक्षकाला चार हजार रुपये मिळतात आणि एम.ए.बी.एड.झ ालेल्या उच्च माध्यमिक अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना शिकविणा-या शिक्षकांना पाच हजार रुपये मिळतात. शिपाईसुध्दा आमची अवहेलना करतो. शिपायाचा पगार सात हजार रुपये आहे आणि इयत्ता अकरावी, बारावी ज्युनियर कॉलेजला शिकविण-या शिक्षकाला पाच हजार रुपये देतो. त्यामुळे त्या शिपायाला पाणी आणायला सांगितले तर तो सांगतो, आवाज करायचा नाही. तुमच्यापेक्षा माझा पगार जास्त आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

अशा प्रकारची व्यवस्था आज शिक्षण क्षेत्रामध्ये आहे. यासंदर्भात शासनाने विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. प्राथमिक शिक्षकांच्या संदर्भात गेली अनेक वर्षे आम्ही शासनाकडे विषय मांडीत आहोत. प्राथमिक शिक्षकांसाठी केंद्र शासनाने जी सुधारित वेतनश्रेणी दिलेली आहे. साडेचार हजार,पाच हजार आणि साडेपाच हजार रुपयां ऐवजी साडेचार हजार, साडेपाच हजार आणि साडेसहा हजार अशा प्रकारची त्री-स्तरिय वेतनश्रेणी केंद्र शासनाने लागू केलेली आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

आणि त्या पध्दतीने आम्ही लागू करणार आहोत. हा प्रश्न आमच्या विचाराधीन आहे असे अनेक वेळा ऐकतो. परंतु शासनाने प्राथमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणीबद्दल कोणताही निर्णय घेतलेला नाही. उच्चमाध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत साधा प्रश्न गेल्या तीन वर्षापासून मांडत आहोत. पाचव्या वेतन आयोगामध्ये ज्या शिक्षकांकडे उच्च माध्यमिकचा पूर्ण कार्यभार नाही परंतु काही कार्यभार आहे आणि माध्यमिकचे वेतन मिळते त्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार 250 रुपये विशेष वेतन दिले जाते. परंतु रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन जिल्हयांमध्ये उच्चमाध्यमिक शिक्षकाचे काम करणाऱ्या शिक्षकाला 125 रुपये विशेष वेतन मिळते. राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये अशा शिक्षकांना 250 रुपये विशेष वेतन मिळते . यासंदर्भात आम्ही संबंधित उपशिक्षण संचालकांबरोबर चर्चा केली. या ठिकाणी कोटयवधी रुपयांच्या तरतुदी होत असताना आमच्या शिक्षकांसाठी 125 रुपयांची तरतूद होऊ शकत नाही. याचा शासनाने गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. पृष्ठ क्र.132, बाब क्र.112, आदिवासी विभाग यामध्ये चांगल्या प्रकारची तरतूद केलेली आहे. भविष्यनिर्वाह निधीवरील व्याजाची रक्कम देण्यासाठी 68,82,000 रुपयांची तरतूद केली आहे. परंतु आदिवासी विभागातील आश्रमशाळेतील शिक्षकांना भविष्यनिर्वाह निधीच्या पावत्या तीन-चार वर्षे मिळत नाहीत. त्यांना हिशेब कळत नाही. आदिवासी भागामध्ये काम करणारे शिक्षक आपल्या घरापासून दूर राहतात, त्या ठिकाणी वेगळया मानसिकतेमध्ये काम करतात, सर्व गोष्टींचा त्याग करुन आदिवासी भागामध्ये राहून काम करतात. शासनाचा 6 ऑगस्ट, 2002 चा जी.आर. आहे. त्यानुसार अशा भागामध्ये, अतिसंवेदनशील भागामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना 15 टक्के प्रोत्साहन भत्ता द्यावयास पाहिजे. मी माननीय मंत्रिमहोदयांशी चर्चा केली. त्यांनाही मान्य आहे. 6 ऑगस्ट, 2002 च्या जी.आर. नुसार अशा भागामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना 15 टक्के प्रमाणे प्रोत्साहन भत्ता मिळाला पाहिजे असे असताना अद्याप त्यासंदर्भात शासनाने कार्यवाही केलेली नाही. त्यासंदर्भात कोणत्याही प्रकारची तरतूद या पुरवणी मागण्यांमध्ये केलेली नाही. 3 जून 2000 चा जी. आर आहे. या जी.आर. प्रमाणे महाराष्ट्रातील उच्च माध्यमिक शिक्षकांना रु. 6500-10500 वेतनश्रेणी मिळते परंतु इतर शिक्षकांना रु. 7225 ची वेतनश्रेणी मिळते आणि आदिवासी विभागात रु. 6500 ची वेतनश्रेणी मिळते. याबाबत शासनाने विचार करावा. एवढी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. आर. आर. पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, गृह विभागाच्या आणि अन्य विभागाच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने पाठिंबा द्यावा अशी विनंती करण्यासाठी मी उभा आहे. बाब क्रमांक 8 मध्ये मंजूर अनुदानापेक्षा अधिकचा खर्च भागविण्यासाठी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. प्रामुख्याने या पुरवणी मागण्यांमध्ये बेस्ट बेकरी प्रकरणाच्या संदर्भात एखादे वाहन खरेदी करणे, कोर्टाच्या आदेशानुसार द्यावयाची देणी अशा अत्यंत जुजबी स्वरुपाच्या पुरवणी मागण्या यामध्ये मागण्यात आलेल्या आहेत. या पुढच्या काळामध्ये अनेक निमित्ताने होणाऱ्या चर्चेच्या माध्यमतून गृह खात्यावर चर्चा होणारच असल्यामुळे आणि आता उशीरही झालेला असल्यामुळे मी अधिक वेळ घेतला पाहिजे असे मला वाटत नाही. सन्माननीय सदस्यांवरही तो एक प्रकारचा अन्याय होईल आणि अन्याय करण्याचा माझा स्वभाव नाही. तरी सुध्दा काही सन्माननीय सदस्यांनी खूप चांगल्या सूचना केलेल्या आहेत आणि काही उणिवाही दाखवून दिलेल्या आहेत. संधी मिळेल त्या वेळी आणि लवकरात लवकर या सूचनांवर आम्ही विचार करु. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आता या ठिकाणी उपस्थित नाहीत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

त्यांनी सुरुवात करतानाच राज्यामध्ये दरोडयाचे प्रमाण वाढले आहे अशाही पध्दतीच्या भावना व्यक्त केल्या आहेत. विशेषत: ठाणे व रायगड जिल्हयामध्ये दरोडयाचे प्रमाण वाढले आहे असेही मत व्यक्त केले आहे. सन्माननीय सभापती महोदय, ज्यावेळेस एखादा छोटा दरोडा पडतो आणि देण्यासारखी महत्वपूर्ण बातमी नसते त्यावेळी दरोडा हीच महत्वपूर्ण बातमी नाईलाजास्तव होते. आज राज्यामध्ये दुस-या काही घटना घडत नाहीत, किंबहूना, कमी घडत आहेत म्हणून पडलेले दरोडे हे मोठे वाटत आहेत. दरोडे वर्षभरात विखरुन झाले तरीही त्याचे गांभीर्य लक्षात येत नाही पण सलग काही दरोडे पडले तर त्याने तीव्रता व भीतीदायक वातावरण निर्माण होते. पण ही गोष्ट खरी आहे की, काही बँकांवर आणि काही परिसरामध्ये सातत्य ठेवून थोडे जास्त दरोडे पडले आहेत. विशेषत: महाराष्ट्राच्या सीमेवर जे जिल्हे आहेत अशा जिल्हयामध्ये दरोडयाचे प्रमाण थोडेसे अधिकच दिसत आहे. तपासामध्ये जे आरोपी सापडले त्यावरुन अशा निष्कर्षाप्रत पोलीस दल आले आहे की, सीमेवरील गुन्हेगार, दुस-या प्रांतातील गुन्हेगार महाराष्ट्रामध्ये येत आहेत, आधुनिक वाहने वापरत आहेत आणि दरोडा घालून पटकन निघून जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. मध्यंतरी रेल्वेत जे मोठे 7-8 दरोडे पडले, ज्या मोठया चो-या झाल्या आहेत त्याही संदर्भामध्ये गुजराथ राज्यातील आरोपी सापडले आहेत. आंध्र प्रदेशमधून येऊन काहींनी असा उपद्व्याप केला होता. आपल्या विधान भवनाच्या परिसरामध्ये जो खून झाला त्यामुळे भीतीचे आणि साशंकतेचे वातावरण निर्माण झाले, त्याचाही गुन्हेगार सापडला आहे. लखनौहून आल्यानंतर पहिल्या 15 दिवसातच काम मिळत नाही या नाराजीतून एक खून केला पण तोही खून उघडकीस आला. परप्रांतातून चांगली माणसे महाराष्ट्रात येतात त्याचप्रमाणे काही गुन्हेगार माणसेही असतात. एकूण राज्यातील महत्वपूर्ण गुन्हयांमध्ये पाहिले तर गुन्हयाचे प्रमाण घटत आहे ही वस्तुस्थिती सुध्दा नाकारता उपयोगाची नाही. महिलांवरील, दलितांवरील अत्याचारांत, अन्यायाच्या बाबतीत घट व्हावयास लागलेली आहे हे मी चांगले चिन्ह मानतो. मा.सदस्य श्री.जयंत पाटील यांनी त्यांच्या परिसरामध्ये हातभट्टीच्या दारुची अजूनही विक्री होते आणि दारु काढली जाते अशीही तक्रार केलेली आहे. मी मा.उत्पादन शुल्क मंत्री श्री.गणेश नाईकसाहेबांना धन्यवाद देईन.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

त्यांनी मोठा निर्धार केला आहे की, जेवढया हातभट्टया असतील तेवढया उद्ध्वस्त केल्या पाहिजेत. त्यांच्यावर गुन्हे दाखल केले पाहिजेत. अवैध दारुमुळे या राज्यामध्ये माणसांचे मृत्यू पडता उपयोगी नाही म्हणून उत्पादन शुल्क खात्याने चंग बांधला आहे आणि गृह विभागाने त्याला पूर्णपणे साथ देण्याची भूमिका ठेवली आहे. त्याचा अनुकूल परिणाम म्हणून मागील 3 महिन्यामध्ये अवैध दारुच्याबाबतीत जेवढे गुन्हे नोंद करण्यात आले तेवढे महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये आजपर्यंत कधीही नोंदविले गेले नव्हते. जेवढा मुद्देमाल उद्ध्वस्त केला तेवढा कधीही उद्ध्वस्त करण्यात आलेला नव्हता. आज अवैध दारुबंदीमुळे काही अस्सल पिणारे होते ते सरकारमान्य दारुकडे वळले आहेत. त्यामुळे उत्पादन शुल्क खात्याचे 64 कोटीने उत्पादन वाढले आहे. याचा अर्थ अवैध दारु कमी होत आहे हे स्पष्ट आहे. मी वाढलेले उत्पन्न म्हणजे फार चांगली बाब आहे असे मानत नाही. गरीब माणसाला दारु परवडत नाही म्हणून दारुच्याबाबतीत उत्पादन शुल्क विभागाने जी भूमिका घेतली आहे तिला ठामपणे पाठिंबा आणि समर्थन व शक्ती देण्याची भूमिका घेतली जाईल आणि जी मोहिम आज सुरु आहे ती भविष्यामध्ये सुध्दा एवढयाच शक्तीने राबविली जाईल. उलट कायद्यामध्ये काही बदल करुन या राज्यातील महिला अवैध दारुबाबत ज्या भूमिका घेत आहेत आणि भावना व्यक्त करीत आहेत त्या भावनांची कदर महाराष्ट्रात केली जाईल.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...)

एवढीच गाव्ही मी मा.सदस्य डॉ. नीलम गो-हे यांना देऊ इच्छितो. फार चांगल्या सूचना याठिकाणी करण्यात आलेल्या आहेत. मा.सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी पोलीस गृहनिर्माण मंडळाकडे ज्या जागा आहेत त्या जागांचा योग्य पध्दतीने वापर झाला पाहिजे आणि पोलीस गृहनिर्माण मंडळ सक्षम बनले पाहिजे, तसेच पोलिसांच्या घरांची जी अवस्था आहे त्यामध्ये बदल झाला पाहिजे असे सांगितले. अनेक वर्षानंतर नवीन बजेटमध्ये चांगल्या पध्दतीची तरतूद करण्यात आलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, आज पोलिसांना दिलेली घरे छोटी आहेत. तसेच त्या घरांच्या दुरुस्तीसाठी पैसे न दिल्यामुळे पोलिसांना वाईट अवस्थेमध्ये राहावे लागत आहे. ही वस्तुस्थिती मी प्रांजळपणे कबूल करीत आहे. परंतु केवळ वस्तुस्थिती कबूल करुन आम्ही थांबणार नाही. छोट्या घरांचे चांगल्या घरामध्ये रुपांतर केले जाईल म्हणून महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण मंडळाच्या ताब्यामध्ये ज्या पोलिसांच्या जागा आहेत त्या जागांचा बीओटी तत्वावर वापर करुन, भांडवल उभे करुन आजच्या पेक्षा दुप्पट जागा असलेली घरे सगळया पोलिसांना उपलब्ध होतील यादृष्टीने येत्या 5 वर्षात कालबध्द कार्यक्रम आखला जाईल. अनेक ठिकाणी पोलीस स्टेशनच्या इमारती नाहीत, काही ठिकाणी अतिक्रमित जागेवर पोलीस स्टेशन आहे. पोलीस स्टेशनलाच जागा नाही तर मग सुविधांचा अभाव स्वाभाविकच असणार. ही गोष्ट खरी आहे की, अनेक ठिकाणी महिला पोलिसांसाठी स्वच्छतागृहांचा अभाव आहे, किंबहुना तेथे स्वच्छतागृहे नाहीत अशी वस्तुस्थिती आहे. परंतु पोलीस गृहनिर्माण मंडळाकडून काही जागा खाजगीकरणात वापरल्यानंतर तसेच केन्द्राकडून आधुनिकीकरणासाठी प्राप्त होणारे अनुदान यातून या इतक्या मोठ्या कामाला किती पैसा मिळू शकेल यासंदर्भात गृह विभागाने आराखडा तयार केलेला आहे. हळूहळू पोलीस दलामध्ये महिलांची संख्या 30 टक्के आरक्षणामुळे वाढत आहे. या गोष्टीकडेही लक्ष देण्यासंबंधीची भूमिका मी विशद करतो. मा.सदस्य श्रीमती फौजिया खान यांनी फार चांगली सूचना केली. पोलीस दलाला आधुनिक तंत्रज्ञान प्राप्त होते. परंतु त्याच्या आधी ते चोर, दरोडेखोर अशा गुन्हेगारांना प्राप्त होते. त्यांच्याकडे वेगावे धावणा-या गाड्या, आधुनिक, इलेक्ट्रानीक्स, शक्तिशाली आणि स्वयंचलित अशी हत्यारे आहेत. आज प्रत्येक पोलिसाला त्याही पेक्षा चांगली शस्त्रास्त्रे उपलब्ध झाली पाहिजे. हा दुरावा नष्ट झाला पाहिजे. म्हणून आधुनिक उपकरणे, शस्त्रे असणा-या गुन्हेगाराबरोबर सक्षमतेने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...)

लढण्यासाठी आधुनिकीकरणाची खूप चांगली भूमिका महाराष्ट्र शासनाने घेतलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, सायबरमध्ये क्राईम वाढत आहेत. त्यामधील तंत्रज्ञान पोलिसांना माहीत नसेल तर गुन्ह्याचा तपास कसा लावायचा असा प्रश्न पडू शकेल. गुन्हेगार कायद्याच्या बाहेर पडतील आणि न सापडणारे गुन्हेगार समाजाचे अधिक नुकसान करतील. म्हणून सायबर क्राईमच्या बाबतीत मा.सदस्यांनी चांगली सूचना केलेली आहे. प्रत्येक जिल्हयामध्ये एक ब्रँच असली पाहिजे असे त्यांनी सांगितले. तेव्हा प्रत्येक जिल्ह्यामध्ये सायबर क्राईमची ब्रँच निर्माण करण्याची भूमिका स्वीकारली जाईल आणि तेथील अधिकारी आणि कर्मचा-यांना आवश्यक असणारे तंत्रज्ञान उपलब्ध करुन दिले जाईल. येत्या सहा महिन्यामध्ये महाराष्ट्रातील निम्या जिल्ह्यामध्ये अशी ब्रँच चालू ठेवण्याची भावना मी या निमित्ताने व्यक्त करीन. मा.सदस्य श्रीमती कांता नलावडे यांनी सांगितले की, परराज्यातील महिला कैद्यांना वेगळा आहार दिला जातो आणि महाराष्ट्रातील महिला केद्यांना वेगळा आहार दिला जातो. या सदनाच्या माननीय सदस्यांनी ही माहिती दिलेली आहे. त्यामुळे याबाबतीत चौकशी केली जाईल. अशा प्रकारे दुजाभाव करण्याची कोणतीही आवश्यकता नाही आणि शासनाच्या अप्रत्यक्षपणे तशा सूचनाही नाहीत. असे प्रकार कोठे घडणे शक्य नाही आणि कोणी ते घडविले असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. भविष्यात असे प्रकार घडणार नाहीत याकडे लक्ष ठेवले जाईल.

मांढर देवी याठिकाणी घडलेली घटना राज्याच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी होती.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील..

आज तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी खूप गर्दी जमते आहे. तेथे नियोजन करण्यासाठी मनुष्यबळ कमी पडते आहे. महाराष्ट्राला शिकविणारी ही घटना होती. त्यापासून काही शिकण्याची आवश्यकता आहे. काही बोध घेण्याची आवश्यकता आहे. राज्यात यात्रेच्या निमित्ताने, उत्सवाच्या निमित्ताने गर्दी जमते अशा ठिकाणी काही उपाययोजना केल्या पाहिजेत. जी घटना घडली तिचे विश्लेषण योग्य पध्दतीने झाले पाहिजे. म्हणून श्री. आर.के.कोचर यांच्या अध्यक्षतेखाली एक सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या मार्फत संपूर्ण घटनेची चौकशी करण्यात येईल.त्या न्यायाधीशांची नियुक्ती 6 मार्च,2005 रोजी करण्यात आलेली आहे. त्यांना आवश्यक असणारी सगळी साधने उपलब्ध करुन दिली जातील. त्यांना आवश्यक असलेले मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले जाईल. कालबध्द वेळेत हा अहवाल शासनास प्राप्त होईल त्यामुळे राज्यामध्ये अशा घटना घडू नये असे प्रयत्न राज्य सरकारला करणे शक्य होईल. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी गोंदीया येथे राज्य सरकारने तुरुंग बांधण्याचे काम हाती घेतले आहे. त्या ठिकाणी तरुंगाची फार मोठी आवश्यकता होती. अशा पध्दतीच्या भावना त्यांनी व्यक्त केलेल्या आहेत. या कामासाठी केंद्र शासन काही प्रमाणात निधी प्राप्त करुन देणार आहे असे मी त्यांना सांगू इच्छितो.सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी पोलिसांना पंचतारांकित रुग्णालयांमध्ये सुविधा मिळाल्या पाहिजेत अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त केलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, खूप कष्टामध्ये दिवसाला 18-18 तास, 15-15 दिवस एकही सुटी न घेता, 3-3 महिने एकही रजा न उपभोगता आज राज्यातील पोलीस दलाला काम करावे लागत आहे. 1961 साली पोलिसांची संख्या किती असावी यासंदर्भात काही मानके निश्चित करण्यात आली होती. त्या मानकाप्रमाणे सुध्दा आज 89 हजार पोलिसांची पदे भरण्याची आवश्यकता आहे. आज राज्यातील टोटल मनुष्यबळ 1 लाख 40 हजार आहे. न भरलेल्या 89 हजार पोलिसांचे काम आज सेवेत असलेले 1 लाख 40 हजार माणसे काम करीत आहेत. याचा अर्थ असा आहे की, आज दुप्पट काम पोलीस दल करीत आहे. 1961 साली मानके निश्चित करीत असताना या राज्यातील नेत्यांना पोलीस संरक्षणात फिरावे लागेल असे त्यावेळच्या तज्ञ समितीला निश्चित वाटले नसेल. राज्यात सण, जयंती साजरी करताना पोलिसांना वापरावे लागेल हेही त्यावेळी तज्ञ समितीला वाटले नसेल. सायबर सारखे गुन्हे राज्यात वाढतील हेही त्यांच्या निदर्शनास आले नसेल, त्यावेळच्या परिस्थितीला अनुसरुन जे निर्णय घेण्यात आले होते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

त्याप्रमाणे सुध्दा 89 हजार पोलीस कमी आहेत. आज बदललेल्या परिस्थितीमध्ये वाढलेल्या जबाबदा-या लक्षात घेता आणखी किती पोलीस दल आपल्याला नेमावे लागेल याची कल्पनाच आपण करु शकत नाही. पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवून घेतली नाही म्हणून छोटीशी तक्रार येते. एखाद्या गुन्हयाचा लवकर तपास लागला नाही तर अशाही पध्दतीची तक्रार येण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकंदरीत या दलावर खूप मोठा ताण पडतो आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या रुग्णालयांची नावे घेतली त्या रुग्णालयांमध्ये पोलीस दलातील जवान गेलेले दिसता आहेत ते औषधोपचारासाठी जात नाहीत. आत कोणी तरी व्ही.आय.पी. ॲडमीट असतो, त्याच्या संरक्षणासाठी, त्या ठिकाणच्या बंदोबस्तासाठी पोलीस हा दरवाज्यामध्ये उभा असतो. पण स्वत: किंवा त्याच्या कुटुंबातील कोणी आजारी पडले तर पोलिसांना मात्र नगरपालिकेचे दवाखाने शोधावे लागतात. दुस-यांना बंदोबस्त देण्यासाठी आणि बघण्यासाठी हे दवाखाने आहेत. या सगळया गोष्टींचा विचार करुन कर्नाटक राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रामध्ये डॉक्टर योजना आम्ही सुरु केलेली आहे. यापुढच्या काळामध्ये महिन्यातून 40 रुपये वर्गणी घेऊन त्यासंदर्भात काही हिस्सा शासन सोसणार असून पोलीस दलातील प्रत्येक कर्मचारी वर पासून ते खालपर्यन्त तसेच त्याचे कुटुंब महाराष्ट्रातील कुठल्याही चांगल्या रुग्णालयाची सेवा उपलब्ध करुन घेऊ शकतील. आता या मोठया हॉस्पीटलमध्ये बंदोबसतासाठीच नाही तर औषधोपचारासाठी साधतले साधे पोलीस शिपाई त्या रुग्णालयात जाऊ शकतील. त्यांची मुले जाऊ शकतील अशी योजना आम्ही हातामध्ये घेतली आहे...

यानंतर श्री. उपरे..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(श्री.आर.आर.पाटील)

या योजनेचा शुभारंभ तर आम्ही केला आहे. येत्या काही दिवसातच या योजनेची सुरूवात होईल आणि प्रत्यक्षात हॉस्पिटलमध्ये ट्रिटमेंट मिळायला सुरूवात होईल. त्यामुळे आपण केलेली सूचना सरकारने यापूर्वीच कार्यवाहित आणण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ.दीपक सावंत : या योजनेमध्ये आपण प्रवेश फी ठेवली आहे आणि रुग्णालयामध्ये इतर औषधांचा खर्च आहे तो त्यांनी स्वत: करावयाचा आहे. एखाद्याचे ऑपरेशन करावयाचे असेल आणि त्याला ब्लड प्रेशर असेल तर त्यासाठी लागणा-या गोळ्या त्याने बाहेरून घ्यावयाच्या आहेत. तरी तो खर्च आणि प्रवेश फी आपण काढून टाका.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, योजना आता सुरू केलेली आहे. यातील अडचणी, उणिवा हळू हळू लक्षात येत जातील. जसजशा त्या लक्षात येत जातील तसतशा त्या भविष्यामध्ये आपण कमी करीत जाऊ. पण कोणतीही योजना अंतिमत: ज्या उद्दिष्टासाठी आपण केलेली आहे ते उद्दिष्ट मात्र आपण निश्चितपणे साध्य करू. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी असा उल्लेख केला की, राज्यामध्ये आपण मोक्का न्यायालये नेमत आहोत, अन्य बाबींसाठी आपण खर्च करीत आहोत. पण एकंदरीतच या संघटीत गुन्हेगारीची मुळे शोधण्याची आवश्यकता आहे आणि असे गुन्हेगार हे समाजाच्या विविध क्षेत्रामध्ये वावरत आहेत ही वस्तुस्थिती आहे. बोगस रेशनिंग कार्डाच्या बाबतीत आपण उल्लेख केला आहे. सरकारने यापूर्वीच यावर लक्ष केंद्रित केले आहे. मुंबईमध्ये 1200 ते 1500 रुपये घेऊन अशी बोगस रेशन कार्डे पुरविणारी इन्सपेक्टरची एक टोळी पकडण्यात आलेली आहे. या टोळीमध्ये जवळजवळ 25 कर्मचा-यांचा समावेश आहे. आपण वस्तुस्थिती सांगितली आहे. पण खोटे दस्तऐवज उपलब्ध करून देणे आणि त्याच्या आधारावर पुन्हा हक्क सांगणे ही एक दुष्ट परंपरा सुरू आहे आणि ती खंडीत करण्याची आवश्यकता आहे. तरी निश्चितपणे मुळावरच घाव घातले जातील एवढीच ग्वाही मी या निमित्ताने दईन. गृह विभागाच्या अत्यंत छोट्या मागण्या आहेत. खरे तर या खात्यावर चर्चा फार कमी व्हावी आणि खात्याच्या अडचणींच्या संदर्भात चर्चा अधिक व्हावी. पण दुर्दैवाने आजपर्यंत नेमके उलटे घडले. या खात्यातील त्रुटी शोधण्याच्यादृष्टीने फार कमी चर्चा झाली, पोलीसांच्या अडीअडचणींवर फार कमी चर्चा झाली. गृह विभागावर चर्चा म्हणजे जो कोणी गृह मंत्री असेल तो आरोपीच्या पिंज-यात आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ KGS/ MAP

(श्री.आर.आर.पाटील)

राजकिय अभिनिवेषातून टीका होत गेल्यामुळे त्याचा पोलिसांच्या मनोधैर्यावरसुध्दा विपरीत परिणाम होत आहे. आज पोलिसांचे मनोधैर्य कमी व्हावे अशा अनेक घटना घडत आहेत. त्यात किमान आपल्याकडून भर पडू नये, एवढी जरी दक्षता आपण सगळ्यांनी घेतली तरी निर्भीडपणे पोलीस दल काम करू शकेल. राज्याचा विकास झाला पाहिजे. गरिबांचे प्रश्न सुटले पाहिजेत. पण कोणताही विकास शांततेच्या, कायदा आणि सुव्यवस्थेच्या वातावरणातच होत असतो. जर जनतेला जीविताची आणि मालमत्तेची हमी नसेल तर विकास शून्यवत राहत असतो. म्हणून सगळ्या खात्यांचा कारभार चांगला चालावयाचा झाला तर कायदा आणि सुव्यवस्था चांगली राहू शकेल आणि बाहेरचे उद्योंगपती या राज्यात येऊन भांडवली गुंतवणूक करू शकतील, संघर्ष तंटे कमी होतील आणि आज त्या दिशेने राज्य सरकार प्रामाणिकपणे जाण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यासाठी आपल्या सगळ्यांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. म्हणून या मागण्या आपण मान्य कराव्यात अशी मी या सदनाला विनंती करून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक (पर्यावरण, उत्पादन शुल्क व कामगार मंत्री) :सभापती महोदय, सन 2004-2005 च्या पूरक मागण्याच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क, पर्यावरण आणि कामगार या विभागांच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेताना प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी बाब क्रमांक 83 चा उल्लेख केला. गोंदिया येथील कामगार न्यायालयाच्या खर्चाला मंजूरी घेण्यासाठी आम्ही येथे आलो असताना त्यांनी आपले विचार मांडले. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी कामगार न्यायालये, औद्योगिक न्यायालयांची कमतरता आणि त्या अनुषंगाने होणा-या अडचणी, राज्यामध्ये बेकारी वाढत आहे अशा अनेक मुद्यांबाबत त्यांनी मत व्यक्त केले असून त्यांच्या मताशी मी सहमत आहे. खुली अर्थ व्यवस्था, जागतिक स्पर्धा आणि एकूण आऊट डेटेड टेक्नॉलॉजी या अनुषंगाने आपला उद्योगपती परकीय कंपन्या किंवा परकीय उत्पादनाशी स्पर्धा करू शकला नाही आणि खुल्या स्पर्धेमध्ये आपला माल विकण्यास तो असमर्थ ठरला. अशा अनेक अडचणींमुळे ब-याचशा कंपन्या बंद पडल्या आहेत.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक..

माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे औद्योगिक न्यायालयात 27 हजार 192 आणि कामगार न्यायालयात 72 हजार 270 अशा प्रकारे दोन्ही मिळून एकूण एक लाखाच्यावर प्रकरणे प्रलंबित आहेत.या प्रकरणाच्या बाबतीत लोक न्यायालये भरविता येतात तसेच जुनी प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्यासाठी माननीय उच्च न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत.त्याचप्रमाणे न्यायालयाच्या कामकाजाची वेळ एक तासाने वाढविण्यात आलेली आहे.अशा परिस्थितीत 5 कामगार आणि 6 औद्योगिक न्यायालये स्थापन करण्याचा तत्वत: निर्णय शासनाने घेतलेला आहे.अशा प्रकारची भूमिका घेऊन राज्यात युनियन आणि युनियनचे प्रतिनिधी व मालक यांच्यात सामंजस्य निर्माण व्हावे. दोघांनाही कर्तव्याची जाणीव व्हावी, त्याचबरोबर आपले हक्कसुध्दा त्यांना समजावे परतु तंटे बखेडे न होता ,लॉक आऊट - स्ट्राईक या गोष्टीपासून त्यांना दूर ठेवण्याचा कामगार मंत्रालयातून प्रयत्न केला जाईल. हा प्रयत्न करीत असतांना ती युनियन कोणत्या पक्षाची आहे कोणत्या नेतृत्वाची आहे याचा विचार केला जाणार नाही.सर्वांना समान वागणूक दिली जाणार आहे.या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी पर्यावरणाच्या संदर्भात बोलत असतांना काही सूचना केलेल्या आहेत.वन संरक्षण करीत असतांना पर्यावरणाचीसुध्दा त्याला साथ असली पाहिजे आणि वनाच्या संरक्षणासाठी आय.ए.एस. आणि आय.पी.एस.अधिका-यांची गरज आहे असे त्यांनी सांगितले आहे. त्यांनी केलेल्या सूचनांचा मी निश्चितपणे विचार करीन तसेच माननीय वन मंत्र्यांना सुध्दा त्या अनुषंगाने मी सूचना करीन. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी या ठिकाणी चर्चेत भाग घेत असतांना असे सांगितले की ,या राज्यात हातभट्टयाचे प्रमाण मोठे आहे आणि ती गोष्ट खरी आहे.मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण एका टी.व्ही.चॅनलच्या मुलाखतीच्या कार्यक्रमात सहभागी झालो होतो त्यानंतर आमच्या खात्याने माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या पोलीस खात्याच्या मदतीने प्रामाणिकपणे प्रयत्न चालविलेला आहे.त्याचे पडसाद आज उमटत असून जनसामान्यांमध्ये आपुलकीची भावना निर्माण झालेली आहे.याखात्यामध्ये सुधारणा घडली असून वृत्तपत्रानेसुध्दा त्याची दखल घेतली आहे.दारुच्या उत्पादनातून राज्य चालावे असे शासनाला वाटते काय असे सन्माननीय सदस्यांनी विचारले. परंतु अशी शासनाची अजिबात इच्छा नाही. ही काळिमा आणणारी बाब आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपला पती दारु पिऊन घरी यावा असे कोणत्याही सौभाग्यवतीला आवडणार नाही, आपला मुलगा दारु पिऊन घरी यावा असे कोणत्याही आईला आवडणार नाही, आपला भाऊ दारु पिऊन घरी यावा असे कोणत्याही बहिणीला आवडणार नाही.कारण दारु प्यायल्यामुळे त्या व्यक्तीचा संसार उध्वस्त होतो, घरातील व्यक्तीची मानसिकता बिघडते आणि दारुचे दूरगामी परिणाम होत असतात तसेच मुलांच्या शिक्षणावर परिणाम होत असतो. त्यामुळे टप्याटप्याने समाज हा दारुमुक्त व्हावयाला पाहिजे असे राज्य शासनालासुध्दा वाटते आणि त्यासाठी येत्या अर्थसंकल्पामध्ये एका योजनेचा समावेश केला आहे. ज्या संस्था दारुमुक्तीचे काम करतात, ज्या संस्था रजिस्टर्ड आहेत आणि ज्याचा इतिहास चांगला आहे अशा संस्थाना मदत देण्याचा राज्य सरकार निश्चितपणे पावले उचलणार आहे. आज या चर्चेमध्ये सन्मानीय सदस्यांनी अत्यंत आत्मीयतेने सहभाग घेतला त्या सर्वाना धन्यवाद देतो आणि आमच्या विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील(उर्जा मंत्री) : सभापती महोदय, उर्जा,उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण आणि वैद्यकीय शिक्षण या सर्व विभागाच्या पूरक मागण्यांच्या चर्चेत ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्या सर्वाचे मी मनापासून प्रथम आभार मानतो. वैद्यकीय शिक्षण, तंत्र शिक्षण आणि उच्च शिक्षण या विभागाच्या पूरक मागण्यांच्या चर्चेला माझे सहकारी श्री.सुरेश शेट्टी हे उत्तर देणार आहेत.मी प्रामुख्याने उर्जा विभागाच्या मागण्यांच्या संदर्भात उत्तर देणार आहे. उर्जा विभागाच्या मांगण्यावरील चर्चेत फारशा सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला नाही.या विभागाच्या मागण्या जुजबी स्वरुपाच्या आहेत

सभापती महोदय,.बाब क्रमांक 78 ही इलेक्ट्रीकल इजिनिअरच्या कार्यालयातील कर्मचां-याच्या वेतनात वाढ झाल्यामुळे 26 लाख 63 हजार रुपयांचा जो अतिरिक्त खर्च करावा लागला त्याखर्चाच्या पोटी ही बाब असून ती विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देण्याच्या दृष्टिकोनातून ही मागणी विधानमंडळासमोर सादर करण्यात आलेली आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वळसे-पाटील ...

बाब क्रमांक 79 मध्ये जी मागणी आहे तिचा ओझरता उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी केला. अपारंपारिक ऊर्जा निर्मितीसाठी आपल्याला मदत करण्याची आवश्यकता आहे असे त्यांनी सांगितले. मी आपल्याला सांगू इच्छितो की, राज्य सरकारने मध्यंतरी एक निर्णय घेतला आणि जे जे ग्राहक वीज वापरत आहेत त्यांना 4 पैसे इंडस्ट्रीयल कंझ्युमर सेस म्हणून कर बसविला. जेव्हा आपण अपारंपारिक ऊर्जा निर्मितीसाठी जातो तेव्हा जगामध्ये सर्वत्रच या अपारंपारिक ऊर्जेची किंमत थोडी जास्त आहे. त्यामुळेच या माध्यमातून बऱ्याच वेळेस या प्रकल्पांना मदत करण्याची भूमिका राज्य सरकारची असायला लागते. परदेशामध्ये जेव्हा एखादा प्रदूषण निर्माण करणारा कारखाना निघतो तेव्हा त्या कारखानदाराकडून एक कार्बन क्रेडिट नावाची स्कीम तेथे आहे की ज्याच्या माध्यमातून एक तर त्याने अपारंपारिक ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात गुंतवणूक केली पाहिजे किंवा तेवढी एक ठरलेली रक्कम सरकारकडे जमा केली पाहिजे. यामागे सोशल ऑब्लिगेशनची भूमिका आहे. तेव्हा या पैशाच्या माध्यमातून आपल्याला अपारंपारिक ऊर्जा निर्मितीचा प्रकल्प टाकावयाचा असेल तर त्याला सबसिडी देण्याचे धोरण जगामध्ये सर्वत्र आहे. राज्य सरकारनेसुद्धा हाच विचार केला की, अशा प्रकारे आपण 4 पैसे कर बसवून पैसा गोळा केला आणि त्याचा आधार अपारंपारिक ऊर्जा निर्मितीसाठी घेता यावा यासाठी त्या 4 पैसे कराच्या माध्यमातून गोळा झालेली 66 कोटी रुपयांची रक्कम राज्याच्या मुख्य तिजोरीतून काढून त्या फंडामध्ये वर्ग करण्यासाठी ही मागणी येथे करण्यात आलेली आहे. अध्यक्ष महाराज, आपण अनेकदा चांगले निर्णय घेतो परंतु ते घेत असताना त्यात राजकारण घडत असते. आपल्या सगळ्यांनाच याची माहिती आहे की, हैड्रोपॉवर क्षेत्रामध्ये आपल्याला मर्यादा आहेत. थर्मल पॉवरसाठी देखील कोळसा आता दिवसेंदिवस कमी पडत जाणार आहे आणि गॅसचे साठे पाहता त्यालासुद्धा मर्यादा आहेत. अशा वेळेस जे काही रिसोर्सेस उपलब्ध आहेत ते टॅप करून त्यातून ऊर्जा निर्मितीचे काम आपल्याला केले पाहिजे. आता समजा पवनऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये आपण गेलो तर 1 मे.वॅ.चा प्रकल्प टाकण्यासाठी 4 कोटी रुपये खर्च येतो आहे. पण त्याचा पीएलएच 12, 13, 15 असल्यामुळे 100 मे.वॅ.चा प्रकल्प असेल तर त्यातून 15 मे.वॅ.च वीज मिळू शकते आणि खर्च मात्र त्यासाठी 100 मे.वॅ. इतकाच म्हणजे 400 कोटी पर्यंत जाऊ शकतो. म्हणूनच हे प्रकल्प

..... 4ए 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील ....

व्हाएबल होत नाहीत. युतीच्या काळामध्ये आपण एक पॉलिसी घेतलेली होती व आम्ही तेव्हा विरोधी पक्षामध्ये होतो. आम्ही कधी आपल्या त्या पॉलिसीला विरोध केला नाही. कारण आम्हाला माहीत होते की, राज्याच्या दृष्टीकोनातून हे होणे अतिशय महत्त्वाचे आहे. पण पुढे त्यामध्येही राजकारण इ ाले. मग कधी तरी साताऱ्याची चर्चा होऊ लागली, आता दुसरीच चर्चा होऊ लागली. कोणाला किती फायदा मिळाला वगैरे बोलले जाऊ लागले. या सगळ्या क्षेत्रामध्ये सरकारने एक पैशाची गुंतवणूक न करतासुद्धा सातारा सारख्या परिसरामध्ये पवनऊर्जेच्या माध्यमातून 2000 कोटीची गुंतवणूक आली. आता महाराष्ट्रामधील या संबंधीच्या साईटस् हूडकून काढून, त्या साईटस् वर सरकारची गुंतवणूक न करता बाहेरून गुंतवणूक करून अतिरिक्त वीज निर्मितीचा प्रयत्न आपण करीत आहोत. को-जनरेशनसाठी देखील आपण जवळपास 300 मे.वॅ.चे पीपीए वीज मंडळाच्या माध्यमातून साखर कारखानदारांबरोबर साईन करण्यात आलेले आहेत आणि या माध्यमातून अतिरिक्त वीज निर्माण करण्याचा आपला प्रयत्न आहे. एकंदरीतच या अपारंपारिक ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रामध्ये आपण प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. जंगलामध्ये पडणाऱ्या कुडा-कचऱ्या पासूनसुद्धा बायोगॅसचे प्रकल्प आपण त्यातून करू शकतो. या बाबतीत देखील ऊर्जा विभागाने लक्ष घातलेले आहे. केंद्र सरकारने देखील ही बाब गंभीरतेने घेतलेली आहे. केंद्रामध्ये अपारंपारिक ऊर्जा निर्मितीसाठी स्वतंत्र मंत्रीपद आणि विभागही निर्माण करण्यात आलेले आहे. आपण देखील आपल्या राज्यामध्ये त्याप्रमाणे करून सन्माननीय मंत्री श्री.विनय कोरे यांच्याकडे हे काम आणि विभाग सोपविला आहे आणि त्यांनी देखील या क्षेत्रामध्ये लक्ष घालून काम करण्याचे ठरविले आहे.

अध्यक्ष महाराज, यामध्ये तिसरी मागणी आहे बाब क्र.88. मी या सभागृहामध्ये नागपूरला एक घोषणा केली होती की, 2003 चा कायदा आल्यानंतर आपल्याला आता वीज मंडळाची पुनर्रचना करणे आवश्यक झाले आहे आणि वीज मंडळाची पुनर्रचना आपण जून पर्यंत केली नाही तर वीज मंडळाचे अस्तित्वच आता राहणार नाही. वीज मंडळाची असलेली सगळी प्रॉपर्टी त्या गीव्हन डेट नंतर राज्य सरकारच्या मालकीची होईल आणि वीज मंडळाला त्या ठिकाणी लायसेन्सींग एजन्सी म्हणून काम करता येणार नाही. अशा वेळेस वीज मंडळाची पुनर्रचना करण्याची गरज आहे, त्याच्या कंपन्या करणे गरजेचे आहे. ....

(यानंतर श्री. जागडे ..... 4बी 1 ...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

या कंपन्या करण्यासाठी राज्य सरकारला हा खर्च करावा लागला आहे. कंपनी ॲक्टनुसार 20 लाख रुपयाची तरतूद यासाठी करण्यात आली आहे. म्हणून ही बाब मला सदनाला निदर्शनास आणून द्यावी लागली आहे. सभापती महोदय, या सगळ्या कंपन्या सरकारी आहेत. कोणत्याही परिस्थितीत वीज मंडळाचे खाजगीकरण करावयाचे आहे किंवा वीज मंडळ कोणाच्या तरी ताब्यात देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, अशी भीती सगळ्यांच्या मनात निर्माण झाली आहे. तेव्हा अशा प्रकारची भीती बाळगण्याची कारण नाही. 2003 च्या कायद्यामध्ये वीजमंडळाच्या सर्व कर्मचा-यांना प्रोटेक्शन देण्याचा प्रयत्न केला आहे. आज त्याना जी श्रेणी मिळत आहे, तसेच आज त्यांच्या ज्या सेवाशर्ती आहेत, त्याच्या खाली नवीन कंपनीला जाता येणार नाही. म्हणून कर्मचा-यांना कोणत्याही प्रकारचा धोका नाही. आज आम्ही कोणतीही इक्वीटी विकावयाला काढली नाही. कोणाला काही विकावयाला निघालो नाही. आता शंका घेणा-या लोकांच्या मनात काहीही येत असते. आज ज्या परिस्थितीत वीज मंडळ आहे, त्या परिस्थितीत इक्वीटी विकावयाला काहीच हरकत नाही. 50 वर्षे राज्यकर्त्यांच्या मनामध्ये जी बाब आली नाही, ती बाब आणखी कोणाच्या तरी मनात येणे आणि त्या बाबत शंका घेणे उचीत आहे असे मला वाटत नाही. सभापती महोदय, उद्याच्या पाच वर्षात 7700 मे. वॅ. ची विजेची तूट येणार आहे. 2010 सालापर्यन्त 10 हजार मे. वॅ. विजेची तूट येणार आहे. त्यामुळे वीज मंडळाच्या माध्यमातून तसेच खाजगीकरणाच्या माध्यमातून वीज निर्माण करुन हे राज्य विजेच्या दृष्टीने सरप्लस बनविणे महत्वाचे आहे. या माध्यमातून सरकारचे उत्पन्न वाढविणे महत्वाचे आहे. आज सरकारला जवळपास 1200 कोटी रुपयाचे उत्पन्न मिळते. मी आपणाला सांगू इच्छितो की, पॉवर सेक्टरमध्ये आपण चांगली गुंतवणूक केली तर राज्याच्या उत्पन्नामध्ये भर पडेल. 1200 कोटी रुपयाच्या उत्पन्नावरुन 2400 कोटी रुपयाच्या उत्पन्नावर आपण जाऊ शकतो. म्हणून शासनाने वीज मंडळाची पुनर्रचना करण्याचा निर्णय जाणीवपूर्वक भूमिका घेतली आहे. आम्हाला आता कोठेतरी अकाऊंटीबिलीटी फिक्स करावयाची आहे. आम्हाला ग्राहकांना योग्य प्रकारची सर्विससुध्दा द्यावयाची आहे. या राज्यात नवीन उद्योजकांना आकर्षितही करावयाचे आहे. सभापती महाराज, वीज मंडळाच्या कर्मचा-यांच्या युनियनमध्ये काही शंका आहेत. त्यांची आजची नागपूरला बैठक होणार आहे. बेमुदत संपावर जाण्याचा विचार त्यांच्या मनात सुरु आहे. मी या सार्वभौम सभागृहाच्या माध्यमातून वीज मंडळाच्या सर्व युनियन्सना जाहीरपूर्वक आवाहन करीत आहे. कर्मचा-यांचे वेतनश्रेणीचे, पेन्शनचे तसेच बाकीचे काही प्रश्न असतील, त्या बाबत सरकारचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

माईन्ड ओपन आहे. तेव्हा मला त्यांना सांगावयाचे आहे की, त्यांनी कृपया जनतेला अडचणीत टाकण्याचा प्रयत्न करु नये. सभापती महोदय, मला असे वाटते की, या सर्व प्रश्नांबाबत चर्चा होण्याची गरज आहे. मी त्यांना जाहीरपणाने आवाहन करीत आहे. या नवीन मंडळाच्या माध्यमातून या राज्यात चांगले काम करण्यासाठी आम्हाला सहकार्य करावे. त्यामुळे 20 लाख रुपयाची मागणी या ठिकाणी केली आहे. मला सभागृहाला हे सांगावयाचे आहे की, वीज क्षेत्रात शॉर्ट टर्म तसेच लॉंग टर्म उपाययोजना हाती घ्याव्या लागतील. सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मला संधी मिळणार असल्यामुळे मी यावर जास्त न बोलता माझे भाषण पूर्ण करतो. माननीय सदनाला विनंती करतो की, सर्व सदनाने एकमताने माझ्या खात्याच्या मागण्या मान्य कराव्यात.

(यानंतर श्री. सरफरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, ग्राम विकास विभागाच्या मागण्यांवर बोलत असतांना माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी महाराष्ट्रामध्ये किती ग्रामसेवकांची पदे रिक्त आहेत, ती पदे आपण केव्हां भरणार आहात? असा प्रश्न उपस्थित केला होता. महाराष्ट्रामध्ये 2420 ग्रामसेवकांची पदे रिक्त असून ती पदे मे अखेरपर्यंत भरण्याची मोहीम सुरु झालेली आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी जिल्हा परिषदांमध्ये किती शिक्षकांची पदे रिक्त आहेत? असा प्रश्न उपस्थित केला होता. महाराष्ट्रामधील जिल्हा परिषदांमध्ये 7066 शिक्षण सेवकांची पदे रिक्त असून ही पदे देखील मे अखेरपर्यंत भरण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. एवढे सांगून सर्व माननीय सदस्यांनी माझ्या विभागाच्या मागण्यांना पाठींबा द्यावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन,सामाजिक न्याय, ओबीसी व भटके विमुक्त कल्याण, महिला व बालकल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी माझ्या सामाजिक न्याय विभागाच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी केलेल्या सूचनेबाबत जरुर विचार करण्यात येईल. एवढे बोलून माझ्या विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी, उद्योग, सांस्कृतिक कार्य, राज शिष्टाचार, रोजगार आणि स्वयंरोजगार, जलसंधारण, रोजगार हमी योजना) : सभापती महोदय, कृषी, उद्योग, सांस्कृतिक कार्य, राज शिष्टाचार, रोजगार आणि स्वयंरोजगार, जलसंधारण, रोजगार हमी योजना या माझ्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये ज्या माननीय सदस्यांनी भाग घेतला व उपयुक्त सूचना केल्या त्या सर्वांचे मी प्रथमत: आभार मानतो. प्रामुख्याने माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी रेट कॉट्रॅक्टने घेतले जाणारे मटेरिअल निकृष्ट दर्जाचे असते असा उल्लेख केला. रेट कॉट्रॅक्ट करीत असतांना गुणवत्तेचे निकष ठरविलेले असतात. तथापि, माननीय सदस्यांनी काही ठराविक ठिकाणी असे जर घडले असेल व त्या बाबी निदर्शनास आणून दिल्या तर त्याबाबत जरुर कारवाई करण्यात येईल. माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी ऊसाच्या अनुदानासंबंधीचा उल्लेख केला असून त्याची नोंद घेण्यात आली आहे. माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी औरंगाबाद शहराला 400 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल चतुर्थ शताब्दी महोत्सवासंबंधी सूचना केली. त्या बाबत नोंद घेण्यात आली असून लवकरात लवकर त्या बाबत कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विदर्भ, मराठवाडा व कोकणामध्ये झालेल्या गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचा उल्लेख केला. त्या बाबत सांगितले पाहिजे की, शासनाचे त्या संबंधी स्थायी आदेश आहेत. जेव्हा नैसर्गिक आपत्तीमध्ये 50 टक्क्यापेक्षा अधिक नुकसान होते त्या ठिकाणी शासनातर्फे अनुदान दिले जाते. म्हणून मला सांगितले पाहिजे की, या बाबतीत आपण हेक्टरी 1 हजार रुपये देण्याऐवजी हेक्टरी 2 हजार रुपये देण्याचे ठरविले असून सद्या त्या बाबत सर्व्हे चालू आहे. तो सर्व्हे पूर्ण झाल्यानंतर आणि आकडेवारी प्राप्त इ ाल्यानंतर मदत देण्यात येईल. माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी उद्योग जगला तर कामगार जगेल असा उल्लेख केला. शासनाचे सुध्दा तेच धोरण आहे. म्हणून टेक्सटाईलमध्ये 500 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा आपला प्रयत्न आहे. नोकिया सारखी कंपनी महाराष्ट्रामध्ये असेंब्लिंग लाईन टाकण्यासाठी प्रयत्नशील आहे..

श्री. अरविंद सावंत : आधुनिकीकरण आणि उदारीकरण हे दोन वेगळे विषय आहेत. आधुनिकीकरणामध्ये ज्या प्रमाणात रोजगार निर्मिती व्हायला पाहिजे त्या प्रमाणात होत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

दुसऱ्या बाजूला पारंपारिक उद्योग बंद पडत चालले आहेत. ज्या ठिकाणी मॅनपॉवर जास्त लागते त्या कंपन्या बंद पडत चालल्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झाला आहे. आणि नवीन निर्माण होणाऱ्या उद्योगामधून मिळणारे रोजगारीचे प्रमाण कमी आहे...

श्री. राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील : सद्या फ्री इकॉनॉमी, ग्लोबलायझेशन सुरु आहे. टेक्स्टटाईल इंडस्ट्रीमध्ये गारमेंटसारख्या व्यवसायामध्ये मॅनपॉवर जास्त निर्माण होते. तसेच, चायनाच्या तुलनेत आपण आपले गारमेंट मार्केटमध्ये चांगल्या प्रकारे निर्माण करु शकलो तर त्या माध्यमातून आपली बेरोजगारी नक्की कमी होईल.

. (यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील . . . .

तर नक्की बेरोजगारी कमी होणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.पोळसाहेबांनी मांड तालुक्यातील काळा ओढा येथील एम.आय.टँकविषयी मुद्दा उपस्थित केला होता. हे काम लवकरात लवकर करण्याचा शासन प्रयत्न करील. या मुद्याची आम्ही नोंद घेतलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.खतीब साहेबांनी बालापूर येथील किल्ल्याचे नुकसान झाले आहे असा उल्लेख केला होता. किल्ल्याचे जे नुकसान झालेले आहे, त्याबाबतीत आर्थिक मदत करुन या किल्ल्याची दुरुस्ती लवकरात लवकर होईल यादृष्टीने आपण दक्षता घेऊ. तरी बाब क्र. 2, 3, 25 ,26, 27, 80, 81, 85,89,96,97 या मागण्या सभागृहाने संमत कराव्यात अशी मी विनंती करतो.

. . . .4डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, शालेय शिक्षण,क्रिडा आणि युवक कल्याण या खात्याच्या पूरवणी मागण्यांच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते येथे व्यक्त केलेली आहेत आणि त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. शिक्षण खाते हे या सभागृहाचा आत्मा आहे. अनेक शिक्षक प्रतिनिधी या सभागृहात आहेत आणि त्यांनी अतिशय चांगल्या सूचना केलेल्या आहेत. शासनाने ज्या चुका केल्या आहेत, त्याही दाखविण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती कांताताई नलावडे, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडेसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाणसाहेब, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनीताई रायकर, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत, सन्माननीय सदस्य श्री.सदाशिवराव पोळ, सन्माननीय सदस्य श्री.खतीबसाहेब, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गो-हे, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते या सर्वांनी शिक्षण विभाग आणि क्रिडा खात्याच्या चर्चेमध्ये भाग घेतला आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी येथे मागण्या केलेल्या आहेत आणि मी प्रत्येक सन्माननीय सदस्यांच्या मागण्यांबाबत चर्चा करणार नाही, परंतु जे महत्वाचे मुद्दे आहेत आणि अनेक सन्माननीय सदस्यांनी तेच मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्याबद्दलचे शासनाचे धोरण सांगण्याचा मी येथे प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, चालु आर्थिक वर्षामध्ये गेल्या अनेक वर्षात शिक्षकेतर वेतनेतर अनुदान आपण पुरेशा प्रमाणात दिलेले नव्हते. यावर्षी 200 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद केली आणि मूळ तरतूद 42.91 आणि अतिरिक्त तरतूद 200 कोटी रुपये असे मिळून 242.91 कोटी रुपयांपैकी आपण 100 कोटी रुपयांची तरतूद येथे केली असून उर्वरित 87.91 कोटी रुपये वितरणाचा आपला यावर्षी प्रयत्न आहे. प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना मोफत शिक्षण यासाठी 1994-95 ते 2003-2004 पर्यंतची थकित देयके अदा करण्यासाठी 245.60 इतकी तरतूद करण्यात आली होती. यामुळे 2003-2004 पर्यंतची देयके अदा होतील. अनुदानित माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पाल्यांना मोफत शिक्षण या योजनेसाठी 1995-96 ते 2003-2004 पर्यतची थकीत देयके देण्यासाठी 950.90 लाखाची तरतूद आवश्यक असून ती तरतूद सुध्दा यावर्षी करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. महानगरपालिकांच्या शाळांसाठी करण्यात येणारी तरतूद अन्य बाबींमध्ये कधीच वर्ग केली जात

. . . .4 डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

नाही. गेल्या काही वर्षामध्ये ज्या-ज्या प्रयोजनासाठी तरतूद कमी पडत आहे, त्यासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध करुन घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. मुंबई महानगरपालिकेच्या मागील थकीत अनुदानापैकी 93 कोटी रुपयांची तरतूद आम्ही यावर्षी वितरित केलेली आहे. बाकीच्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत, ज्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी मागणी केली. त्या अंबरनाथ, ठाणे महानगरपालिकेच्या 50 टक्के अनुदान आम्ही यांना देतो आणि 50 टक्के अनुदान त्या महानगरपालिका स्वत: घालतात आणि त्यानुसार खर्च करतात. परंतु बाकीच्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना आमचे 50 टक्के अनुदान दिलेले आहे. परंतु ज्यांनी शिक्षकांचे पगार दिलेले नाहीत, त्यांची निश्चितपणे चौकशी केली जाईल एवढेच यानिमि-ताने सांगतो.

सभापती महोदय, जिल्हा पुरस्कार हा जिल्हा परिषदेकडून दिला जातो. राज्य पुरस्कार हा राज्य शासनाकडून दिला जातो आणि राष्ट्रीय पुरस्कार हा केंद्र शासनाकडून दिला जातो. माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत सन्मानीय सदस्य श्री.मोते यांची तक्रार आहे, त्यांनी अनेक मागण्या केलेल्या आहेत. मी त्याचवेळेला त्यांना म्हटले होते की, दालनामध्ये आपण याबाबतीत सविस्तरपणे चर्चा करु. शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या 103 तालुक्यातील विकास गटाचे शालेय अनुदान सुलभ व्हावे म्हणून मुल्यांकनात 70 गुण हा निकष केलेला आहे आणि 103 विकास गट वगळता हा निकष 75 गुण असा आहे. 12 वी पर्यंत राज्यात मुलींना मोफत शिक्षण ही योजना राबविली जात आहे. अनुदानित शाळांमध्ये नैसर्गिक वाढीच्या तुकडया . . .

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सदाशिव पोळ : खास बाब म्हणून त्यांना बरोबर आणण्याच्या दृष्टीने काही विचार करणार आहात काय ?

श्री.हसन मुश्रीफ : निश्चित त्याबाबतचा विचार केला जाईल. अनुदानित शाळामध्ये नैसर्गिक वाढीच्या तुकडया विना अनुदानित तत्त्वावरील अतिरिक्त तुकड्या कायम विना अनुदान तत्वावर मंजूर केल्या जातात. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अतिक्त शिक्षकांचे समायोजन झालेले नाही, असा सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी मुद्दा उपस्थित केला. याबाबत माझ्याकडे संपूर्ण राज्यातील आकडेवारी उपलब्ध नाही. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करावे, असे शासनाचे धोरण आहे. तशाप्रकारच्या सूचना त्यांना देण्यात येतील. सभापती महोदय, परवाच एका चर्चेच्या अनुषंगाने म्हणालो होतो की, प्राथमिक शिक्षण हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेमध्ये मोफत केले. आपण एकूण बजेटच्या 10 टक्के रक्कम या प्राथमिक शालेय शिक्षणावर खर्च करतो. 76 लाख शिक्षकांचा प्राथमिक शालेय शिक्षसाठी आणि अडीच लाख शिक्षकांचा माध्यमिक शिक्षणासाठी उपयोग करतो. याचा उल्लेख गेल्या चर्चेच्यावेळी केलेला होता की, 8 लाख 31 हजार 75 मुलांना लिहिता आणि वाचता येत नाही. ही महाराष्ट्राला भूषणावह गोष्ट नाही. म्हणून शासनाने प्रयत्न केला होता की, शाळा सुरू होण्यापूर्वी दीड तास अगोदर आणि शाळा सुटल्यानंतर दीड तास शिक्षकांनी मुलांना शिकविण्यासाठी सहकार्य करावे,असे आदेश काढलेले आहेत. परंतु अनेक संघटनांनी त्यामध्ये विरोध केला. त्यानंतर वेळापत्रक बदलले. तरी देखील शिक्षक संघटनांनी सहकार्य करायचे नाही, बहिष्कार घालायचा असा निर्णय घेतलेला आहे. मी त्यांना या सभागृहातील चर्चेच्या निमित्ताने विनंती करतो की, त्यांच्याबरोबर पुन्हा चर्चेसाठी बसले जाईल, त्यांचे मनोगत ऐकले जाईल. परंतु शासनाला या कामामध्ये मदत करावी, सहकार्य करावे. विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून शिक्षकांनी शिक्षण द्यावे एवढीच आमची अपेक्षा आहे. मुलांना त्यांचे आईवडिल शाळेच्या प्रांगणामध्ये आणून सोडतात. तेव्हा त्या विद्यार्थ्यांना केंद्र बिंदू मानून शिक्षण देण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे, शासनाची आहे. म्हणून मी द्वारे विनंती करेन की, या कामामध्ये त्यांनी सहकार्य करावे. शिक्षण ही भांडवली गुंतवणूक आहे. शिक्षणामध्ये भांडवल गुंतविले आणि ताबडतोबीने फळे मिळतील असे नाही. विद्यार्थ्यांना सुसंस्कृत करण्याचे काम, समाजाला सुसंस्कृत करण्याचे काम शिक्षक आणि शासनाने हातातहात घालून करावे अशी अपेक्षा आहे. शालेय शिक्षण आणि युवक क्रीडा विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करुन, रजा घेतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (पशुसंवर्धन दुग्धविकास,मत्स्यव्यवसाय व औकाफ राज्यमंत्री) : सभापती महोदय,पशुसंवर्धन,दुग्धविकास आणि मत्सव्यवसाय आणि औकाफ विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे, सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे साहेब, सन्माननीय सदस्य श्री.सदाशिवराव पोळ, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी भाग घेऊन अनेक सूचना केलेल्या आहेत. पशु चिकित्सालये सर्व तालुक्यांमध्ये स्थापन व्हावीत,असे सांगण्यात आले. तसा शासन प्रयत्न करणार आहे. चतुर्थ् श्रेणी कर्मचाऱ्यांच्याबाबतीत कोर्टाच्या निर्णयाची वाट न पहाता कर्मचाऱ्यांना ताबडतोबीने पगार देण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.कवाडे साहेबांनी सूचना केली. अनेक ठिकाणी जनावरांचे डॉक्टर नसल्याबाबतचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.पोळ साहेबांनी उपस्थित केला. ही रिक्त पदे भरण्याच्या सूचना संबंधितांना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी महिलांची बिले दूध संस्थेचे सहयोगी सदस्य महिलांच्या नावाने निघावीत, अशी सूचना केलेली आहे. या सर्व सदस्यांचा मी आभारी आहे. या पशुसंवर्धन,दुग्धविकास आणि मत्सव्यवसाय विभागाच्या मागण्यांना मान्यता देऊन त्या मंजूर कराव्यात, अशी मी विनंती करतो.

--

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ MHM/ SBT/

श्री.दयानंद मस्के (खार जमीन राज्यमंत्री) : सभापती महोदय, खार जमीन विभागाची बाब क्रमांक 61, पृष्ठ क्रमांक 75 ही मागणी सभागृहाने मंजूर करावी अशी विनंती करतो.

-

--

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, वैद्यकीय व तंत्र शिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या चर्चेमध्ये ज्या मा.सदस्यांनी भाग घेतला, त्याबद्दल त्यांचे सर्वप्रथम आभार मानतो. प्रामुख्याने या ठिकाणी दोन-तीन मुद्दे उपस्थित करण्यात आले. नागपूरचे मेडिकल कॉलेज, कोबाल्ड युनिटच्याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.तावडे साहेबांनी कालही आणि आजही मुद्दा उपस्थित केला.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी...

नागपूर मेडिकल कोबाल्ट युनिट संबंधी श्री. विनोद तावडेसाहेबांनी कालही या ठिकाणी मुद्दा मांडला होता. आजही त्यांनी तो मुद्दा मांडलेला आहे.नागपूर अधिवेशनात दोन्ही सभागृहामध्ये विदर्भातील सर्व सन्माननीय सदस्यांनी नागपूरमधील कोबाल्ट युनिटची मागणी केली होती. कमीत कमी दोन तीन वर्षापासून ते यासंबंधीची मागणी करीत आहेत. नागपूर अधिवेशनात मी स्वत: आश्वासन दिले होते की, कोबाल्ट युनिटसाठी अडीच ते पावणे तीन कोटी रुपयाची केंद्र सरकारकडे आम्ही मागणी केली आहे. केंद्र सरकारकडून हे पैसे आले नाहीत तर आम्ही यासंबंधात बजेटमध्ये प्रोव्हिजन करु. आज मला सांगण्यास फार आनंद होतो की, सहा दिवसापूर्वी केंद्र सरकारने मिनिस्ट्री ऑफ हेल्थ आणि फॅमिली वेल्फेअर विभागाने 2.88 कोटी रुपये या कोबाल्ट युनिटसाठी मंजूर केलेले आहेत. श्रीमती फौजियाखान या ठिकाणी बसलेल्या आहेत. त्यांनी आपल्या भाषणात दोन मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यापैकी चार उर्दू महाविद्यालयाच्या सबंधात त्यांनी पहिला मुद्दा मांडला. या चार महाविद्यालयासाठी पहिल्या वर्षी चार कोटी, दुस-या वर्षी दोन कोटी अशी एकूण 18 कोटी रुपयाची प्रोव्हिजन करावी लागेल. त्यासंबंधीचा प्रस्ताव आम्ही वित्त विभागाकडे पाठवू. वित्त विभागाकडून पैसे उपलब्ध झाले तर या प्रस्तावाच्या सबंधात विचार करु. श्रीमती नीलम गोऱ्हे ताईंनी एशियाटिक ग्रथालयाबद्दलचा मुद्दा मांडला. शासनातर्फे कॉर्पस फंडासाठी एक कोटी रुपये ऑलरेडी दिलेले आहेत. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत साहेबांनी महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिलबद्दलचा प्रश्न उपस्थित केला. महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिलमध्ये 1999 पासून इलेक्टेड बॉडी नाही. इलेक्शन झ ाल्यानंतर ताबडतोब हायकोर्टाने तेथे स्टे दिला होता. ते प्रकरण अजून हायकोर्टात पेन्डिंग आहे. विधी व न्याय विभागाला आणि आमच्या वकीलांना आम्ही सांगितले आहे की, हे लवकरच एक्सपिडाईट करुन घ्या. लवकरात लवकर नवीन बॉडी निर्माण करा. कोर्ट निर्णय देईल त्याप्रमाणे पुढे कार्यवाही करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : आमची बातमी अशी आहे की, शासनाकडून यासबंधात डिले होत आहे. शासनाचे वकील व्यवस्थित फीड करीत नाहीत.

श्री.सुरेश शेट्टी : मी या ठिकाणी आश्वासन देऊ इच्छितो की, आमच्या वकीलांना आम्ही इन्स्ट्रक्शन देऊ की, हे एक्सपिडाईट करा आणि कोर्टात लवकरात लवकर निकाल लावून घ्या. त्यानंतर डॉ. दीपक सावंत साहेबांनी जे.जे. हॉस्पिटल संबंधीचा मुद्दा उपस्थित केला. आज विधान

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ....

सभेमध्ये त्यावर चर्चा होती. सन्माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी त्याठिकाणी सांगितले की, जे.जे. हॉस्पिटलच्या संबंधात शासनातर्फे एक चोकशी समिती नेमू आणि ती समिती जे. जे. हॉस्पिटलच्या वर्किंगबद्दल, फंग्शनिंग बद्दल ज्या ज्या तक्रारी आहेत त्याची चौकशी करील आणि त्या समितीकडून तीन महिन्यात अहवाल मागवून घेऊ. जी. टी. हॉस्पिटल संबंधी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी एक प्रश्न मांडला होता. जी. टी. हॉस्पिटलचा काही वर्षा पूर्वी खाजकी संस्था वोखार्ड सोबत एक करारनामा झाला होता. एका वर्षा पूर्वी विधी व न्याय विभागाने त्या संबंधात काही ऑब्जेक्शन घेतले म्हणून आम्ही त्यांचे ॲग्रीमेंट कॅन्सल केले आहे. आता वोखार्ड संस्था कोर्टात गेली आहे. तो मॅटर कोर्टात पेन्डिंग आहे. कोर्टाचा निकाल लागला की, जी.टी. हॉस्पिटलचे प्रायव्हेटायझेशन करण्याचा आणि तेथे स्पेशालिटी हॉस्पिटल करण्याचे शासनाचे धोरण आहे त्याप्रमाणे ते करण्यात येईल. कुपर हॉस्पिटल संबंधी डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले. कुपर हॉस्पिटल मुंबई महानगरपालिकेचे हॉस्पिटल आहे. तेथे शासन काही करु शकत नाही.

Dr. Deepak Sawant: Cooper Hospital is covered by Medical Education Department.

Shri Suresh Shetty: I would like to tell the hon. Member that we have no jurisdiction in Municipal hospitals.

Dr.Deepak Sawant: The Hon. Minister can call a joint meeting.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. सुरेश शेट्टी : सकाळी माननीय विरोधी पक्ष नेते या ठिकाणी भाषण करीत असताना आम्ही ऐकत होतो. महाराष्ट्र शासन कशाला लोकल सेल्फ गव्हर्नमेंट बॉडीमध्ये जाते वगैरे सांगण्यात आले. We can request them to start teaching faculty.

डॉ. दीपक सावंत : It is True but you can have a joint meeting.

श्री. सुरेश शेट्टी : I was told that Mumbai Municipal Corporation is privatizing hospitals. This process is going on. It may be this hospital or some other hospital.

डॉ. दीपक सावंत : आपण जी.टी. हॉस्पीटलसबंधी चौकशी कमिशन नेमणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : जी.टी. हॉस्पीटलसंबंधी जी काही माहिती तुम्हाला पाहिजे त्याबाबत मला सांगावे. ती माहिती तुम्हाला देण्यास तयार आहे. नाही तर माहिती पटलावर ठेवण्यास तयार आहे.

डॉ. दीपक सावंत : जी.टी. हॉस्पीटलच्या बाबतीत प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. 10 मजली इमारत तयार होऊन पडलेली आहे. त्या ठिकाणी कोंबड्या, कुत्रे राहतात पण त्या ठिकाणी माणसांना मात्र ॲडमिशन मिळत नाही. ओखार्डने याबाबतीमध्ये करारनामा केला होता ही गोष्ट खरी होती. परंतु तो करारनामा का रद्द झाला याची माहिती सदनाला व्हावयास पाहिजे. ती इमारत अपूर्ण अवस्थेमध्ये मेडिकल एज्युकेशन खात्याच्या सचिवांनी 2000 साली ताब्यात का घेतली ? त्याच्या मागचे कारण काय ?

श्री. सुरेश शेट्टी : ती संपूर्ण माहिती आम्ही पटलावर ठेऊ. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले सर्व मुद्दे कव्हर केलेले आहेत असे मला वाटते. आमच्या खात्याच्या पुरवणी मागण्या सभागृहाने एकमताने मान्य कराव्या अशी विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, या ठिकाणी आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 112 ते 122 या मागण्या मंजूर करण्याची विनंती करण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे,सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, अनंत तरे यांनी या चर्चेच्या माध्यमातून काही प्रश्न उपस्थित केले त्यावर मी शासनाची भूमिका किंवा पुढच्या काळामध्ये जे काही धोरण असणार आहे त्याबद्दल या ठिकाणी सांगू इच्छितो. महाराष्ट्रामध्ये काही अतिदुर्गम भाग आहेत. त्या ठिकाणी अजून आपण मूलभूत गरजा देऊ शकलेलो नाही. म्हणून अशा ठिकाणी विशेष कृती आराखडा तयार करावयाचा असे आपण ठरविले होते. विशेषकरुन धडगाव आणि अक्कलकुवा हे असे अतिदुर्गम भाग आहेत की ज्या ठिकाणी गावे आणि वाडयांपर्यन्त अजून मोठया प्रमाणामध्ये रस्ते पोहोचलेले नाहीत. पिण्याच्या पाण्याच्या सोयी पाहिजे त्या प्रमाणात नाहीत. त्या ठिकाणी दळणवळणाची सोय व्हावी, सुविधा उपलब्ध व्हाव्यात त्याचबरोबर या ठिकाणी जो प्रश्न सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी उपस्थित केला की, अजून बरीचशी गावे बऱ्याचशा आश्रमशाळा अशा आहेत की ज्या ठिकाणी विजेची सोय होऊ शकलेली नाही, या सर्व मूलभूत गरजा एक आराखडा तयार करुन, विशिष्ट कालमर्यादेमध्ये त्यांना निधी उपलब्ध करुन देऊन ते पूर्ण करण्याच्या दृष्टीने आराखडा आखला. हा विशेष कृती आराखडा आखत असताना त्या आराखडयामध्ये जे काही समाविष्ट केले ते आपण मागच्या वर्षापासून करण्यास सुरुवात केलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, आतापर्यन्त वेगवेगळया ठिकाणी मोठया प्रमाणावर असे विशेष कृती आराखडे आदिवासी भागामध्ये झाले पण समाधानकारकरित्या त्यामधून आऊटकम निघालेले दिसले नाही. मग ते गडचिरोली जिल्हयातील असतील किंवा नंदुरबार जिल्हयातील असतील. परंतु लोकांमध्ये निश्चितपणे विश्वास वाटावा की, लोकशाही आघाडीच्या मागच्या व या शासनाने निश्चितपणे जो काही आराखडा तयार केला आहे तो व्यवस्थितरित्या राबवावा आणि ज्या लोकांना या मूलभूत गरजा किंवा इतर उपाययोजनांच्या माध्यमातून मदत करावयाची आहे ती व्यवस्थितपणे त्यांच्यापर्यन्त पोहोचावी आणि त्यांना मूलभूत सुविधा मिळाव्या यादृष्टीकोनातून आम्ही सुरुवात केली आहे. मी ज्यावेळी पहिल्यांदा आमदार झालो त्यावेळी आम्हाला 30-40 किलोमीटर पायी जावे लागत होते. बऱ्याच वेळेला आम्हाला महाराष्ट्रातून महाराष्ट्रामध्ये जात असताना

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित...

गुजराथ राज्यातून महाराष्ट्राच्या टोकावर जावे लागत होते. परंतु आता जवळजवळ 80 टक्के परिस्थिती सुधारली असून त्या भागामध्ये रस्त्यांची कामे झालेली आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा.मंत्रिमहोदय आदिवासी क्षेत्रातील आहेत, त्यांना माहिती आहे. त्यामुळे त्यांनी जबाबदारी स्टेटमेंट करावे. आज सुध्दा अक्कलकुवा तालुक्यातील जमाना गाव हे केवळ 4.5 कि.मी.अंतरावर आहे ते देखील रस्त्याने जोडलेले नाही. तुमच्या म्हणण्यानुसार 80 टक्के परिस्थिती सुधारली आहे तर मग हे गाव रस्त्याने का जोडले गेले नाही ?

डॉ.विजयकुमार गावित : मी जे स्टेटमेंट करीत आहे ते मा.सदस्य डॉ.सावंत यांनी नीट ऐकले पाहिजे. त्यावेळी अशी परिस्थिती होती की, गुजराथमधून जावे लागत होते. ती परिस्थिती आता 80 टक्के सुधारली असल्याचे मी म्हटले आहे. आता तेथे रस्ते झालेले आहेत, त्या गावामध्ये आपण जाऊ शकतो. अर्थात काही ठिकाणी कच्चे रस्ते आहेत. परंतु या रस्त्यांच्या कामांचे आम्ही नियोजन केलेले असल्यामुळे येत्या तीन वर्षामध्ये वन विभागामधील रस्ते सोडले तर उर्वरित अनेक रस्ते बारमाही रस्त्याने जोडलेले दिसतील. त्यासाठी मोठया प्रमाणात पैशाची तरतूद करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे विजेची सोय करण्यासाठी ऊर्जा खात्याबरोबर पारंपारिक व अपारंपारिक या दोन्ही विभागांना एकत्र बसवून विचारविनिमय केलेला आहे. त्यांच्याकडे विचारणा करण्यात आली आहे की तुम्ही कोठपर्यंत वीज नेऊ शकता ते सांगा. त्याच्यापुढे आम्ही अपारंपारिक ऊर्जेमार्फत वीज नेऊ. यासाठी केंद्र शासनाने 90 टक्के आणि राज्यशासनाने 10 टक्के निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यामुळे 3 वर्षामध्ये प्रत्येक पाडया व वाडयांचे विद्युतीकरण झाल्याचे दिसेल. त्यासाठी आवश्यक ते नियोजन करण्यात आलेले आहे. त्या भागामध्ये निधी उपलब्ध करुन दिला आहे. जेथे आश्रमशाळा व वसतिगृहे असतील त्याठिकाणी विजेची सोय होऊ शकेल. एवढेच नव्हेतर काही ठिकाणी जनरेटर उपलब्ध करुन दिले आहेत. ज्याठिकाणी वीज देऊ शकणार नाही तेथे अपारंपारिक ऊर्जा देण्याची व्यवस्था केली आहे. या भागांमध्ये लिफ्ट इरिगेशनची सोय केली आहे. सुरुवातीला 10 लिफ्ट इरिगेशनच्या योजना द्यावयाच्या होत्या,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित....

त्यापैकी 5 बुडीत क्षेत्रामध्ये गेलेल्या होत्या. त्यासंबंधीच्या आराखडयामध्ये त्रुटी होत्या त्यात दुरुस्ती करुन राहिलेल्या ठिकाणी सोय करीत आहोत. आश्रमशाळा आणि वसतिगृहांची पूर्वी परिस्थिती बरी होती, ब-याच ठिकाणी शौचालये नाहीत असे मा.सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी सांगितले. ही परिस्थिती असल्यामुळेच मागील दोन वर्षापासून आश्रमशाळा आणि वसतिगृहांसाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे, पिण्याच्या पाण्यासाठी पैसा उपलब्ध करुन दिला आहे. विजेची कामे असतील, दुरुस्तीची कामे असतील, स्वच्छतागृहे असतील यासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यामुळे वसतिगृहे व आश्रमशाळांच्या दर्जामध्ये सुधारणा झालेली आहे, होत आहे. काही ठिकाणी आश्रमशाळा व वसतिगृहांना जागा मिळत नाही त्याठिकाणी कोणीही पुढे येऊन आमच्या पॅटर्नप्रमाणे वसतिगृहे बांधून देत असेल तर आम्ही पुढील 15-20 वर्षे भाडे तत्वावर घेण्याचे धोरण स्वीकारीत आहोत. काही ठिकाणी इंटेरियरमध्ये, जंगल भागामध्ये जागा मिळत नाही. त्यामुळे ज्यांची जागा असेल त्यांच्या थोडयाशा जागेमध्ये आश्रमशाळा वा वसतिगृहे करण्याचे ठरले आहे. पुढील वर्षामध्ये अशाप्रकारे आश्रमशाळा व वसतिगृहे बांधण्याचे आम्ही प्रस्तावित करीत आहोत.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. विजयकुमार गावित पुढे सुरु....)

आता स्त्री अधिक्षिकेची पदे नव्याने निर्माण केलेली आहेत. काही पदांच्या बाबतीत जाहिराती दिलेल्या आहेत तर काही पदे भरली गेली आहेत. अधिक्षिकेच्या पदाची नेमणूक करीत असताना त्या पदासाठी 12वी पास आणि नर्सिंग असे क्लॉलिफिकेशन ठेवलेले होते आणि पुरुष अधीक्षक पदासाठी बीपीएड असे क्वालिफिकेशन ठेवलेले होते. आता नजिकच्या काळात क्वालिफिकेशनच्या संदर्भात बदल करण्याचा निर्णय घेतलेला आहे. एमएसडब्ल्यू क्वालिफिकेशन असणा-या व्यक्तीकडे सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक ज्ञान असते. अशी सर्वांगीण अनुभव असलेली व्यक्ती अधीक्षक म्हणून नेमली तर ती व्यवस्थित नियोजन करुन शकेल. म्हणून या पदासाठी एमएसडब्ल्यू हे क्वालिफिकेशन ठेवण्याचा आम्ही विचार करीत आहोत. आज सकाळी मी सांगितल्या प्रमाणे स्त्री अधिक्षिका आणि पुरष अधीक्षक यांचा पॅटर्न आम्ही येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरु करीत आहोत. ही गोष्टी खरी आहे की, या अधिवेशनामध्ये आदिवासी विकास विभागाच्या संदर्भात आपण बरेच ऐकत आहात. समन्वय बरोबर नसेल तर कोणकोणत्या अडचणी येतात हे देखील मा.सदस्यांना माहीत झालेले आहे. शाळेची मान्यता, शिक्षकांची मान्यता असे जे काही निरनिराळे प्रश्न असतात ते् कुठे तरी समन्वयाने मिटले पाहिजेत. त्यादृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत. असाच एक प्रश्न सामान्य प्रशासन विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांच्यामध्ये निर्माण झाला होता. त्यासंदर्भातही मी निर्णय घेतलेला आहे. नक्षलग्रस्त/संवेदनशील या भागामध्ये कर्मचा-यांना 15 टक्के अधिक भत्ता देण्याच्या संदर्भातील तो प्रश्न होता. यामध्ये असा प्रश्न निर्माण झाला की, एखादा भाग संवेदनशील आहे की नाही हे कोणी ठरवायचे ? परंतु मी खोलात जाऊन अभ्यास केला. मी फाईल्स पाहिल्यानंतर एक गोष्ट माझ्या लक्षात आली की, मागच्या काळात आदिवासी विभाग आणि संवेदनशील आदिवासी विभाग असा काही एरिया लोकेट करण्यात आलेला होता. हे लक्षात आल्यानंतर आम्ही लवकरच संवेदनशील भागातील कर्मचा-यांना 15 टक्के भत्ता लागू करणार आहोत. तेव्हा आदिवासी विकास विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/

तालिका सभापती (श्री. अनंत तरे) : सन 2004-2005च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 24.3.2005 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 24 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 24.3.2005च्या दुपारी 12.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही